**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०००

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. कैलास किसनराव पवार, : अपिलार्थी
चंद्रपालनगर, मते ट्रॅक्टर गॅरेज शेजारी, वैजापूर,
तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
नांदूर मधमेश्वर कालवा विभाग, वैजापूर,
जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आयोगास अशी विनंती केली आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांना तात्काळ माहिती पुरविण्याचे आयोगाने आदेशित करावे व संबंधित जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवस पूर्ण होऊनही माहिती न पुरविल्याबद्दल अथवा यासंदर्भात कोणताही पत्रव्यवहार न केल्याने त्यांच्यावर दंडात्मक कार्यवाही करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००८ या आर्थिक वर्षात - मंजूर झालेल्या कामाची संख्या, निविदा कशा प्रकारे काढण्यात आल्या, कोणकोणत्या एजन्सीला देण्यात आल्या, शासन निर्णय ३१ मार्च २००५ प्रमाणे वाटप करण्यात आले का याची सविस्तर माहिती, या आर्थिक वर्षात मंजूर संस्था व सुशिक्षित बेरोजगार अभियंत्यांना कोणकोणती कामे देण्यात आली व कोणत्या कामाच्या निविदा खुल्या करण्यात आल्या - याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०६-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचे अपील जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक १४-०८-२००८ रोजीच्या डाक पोच देय पत्राने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. यासंदर्भात त्यांनी आवश्यक तो पुरावा आयोगास सादर केला असून या पुराव्यावरुन असे दिसून येते की, अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक २५-०८-२००८ रोजी प्राप्त झाली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या माहितीचे अवलोकन करता ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सकृतदर्शनी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस आता त्यांनी, त्यांच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने आता अपिलार्थीस माहिती देण्याचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत, मात्र याचवेळी अपिलार्थीच्या दिनांक २८-०३-२००८ रोजीच्या अर्जाकडे दुर्लक्षित करुन चालणार नाही असे आयोगास वाटते. अपिलार्थीचा दिनांक २८-०३-२००८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०३-२००८ रोजीच प्राप्त झाला आहे. त्यांनी या अर्जाद्वारे मागितलेली माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (१) च्या तरतुदीप्रमाणे त्यांच्याकडे मूळ अर्ज प्राप्त झाल्यापासून ३० दिवसात प्रतिसाद देणे आवश्यक होते. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर अधीक्षक अभियंता, औरंगाबाद पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे सूचित केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस तीन महिन्यांनी म्हणजेच दिनांक १४-०८-२००८ रोजी माहिती दिली आहे. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती पुरविण्यासंदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत न पुरविण्याच्या आपल्या कृतीद्वारे आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत असल्याने, ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र होत आहेत. सबब सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग, वैजापूर (श्री. डी. एन. डाके, कार्यकारी अभियंता, सध्या उपसा सिंचना विभाग उस्मानाबाद येथे कार्यरत) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. सचिव (जलसंपदा) यांना संबंधित जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग, वैजापूर (श्री. डी. एन. डाके, कार्यकारी अभियंता, सध्या उपसा सिंचन विभाग उस्मानाबाद येथे कार्यरत ) यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंग विषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कैलास किसनराव पवार, चंद्रपालनगर, मते ट्रॅक्टर गॅरेज शेजारी, वैजापूर, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, नांदूर मधमेश्वर कालवा विभाग, वैजापूर, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ श्री. डी.एन डाके, कार्यकारी अभियंता, उपसा सिंचन विभाग, उस्मानाबाद

४ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, पाटबंधारे मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००१

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. बाळनाथ खंडेराव नवले, : अपिलार्थी

मु. पो. डोणगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा कार्यकारी अभियंता,

सार्वजनिक बांधकाम (प)विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा अधीक्षक अभियंता,

सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी हे त्यांना, ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असतांनाही मोफत माहिती देण्यासाठी प्रथमपासून टाळाटाळ करीत आहेत आणि या प्रकरणी दिशाभूल करणारा पत्रव्यवहार करुन आवश्यक त्या माहितीच्या

कागदपत्राच्या प्रती देण्यास नकार देत आहेत, म्हणून त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित स्थानिक विकास निधी कार्यक्रमातील गंगापूर व खुलताबाद तालुक्यातील एप्रिल २००० ते दि.०४-०३-२००८ पर्यंतच्या कालावधीमध्ये मंजूर झालेल्या कामांची संख्या, वर्षनिहाय यादी, त्या कामावर झालेला एकूण खर्च, कामाची सद्यस्थिती, कामाच्या कार्यारंभ आदेशाच्या प्रती, तांत्रिक मान्यतेच्या प्रती, कामाचे नकाशे व सर्व कामांच्या मोजमाप पुस्तकातील नोंदीच्या प्रती ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद करुन, यासंदर्भात आवश्यक तो वैध पुरावा त्यांनी त्यांच्या प्रथम अर्जास जोडला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची व दीर्घकालीन असल्याने त्यांना या छायांकीत प्रती पुरविण्याची आवश्यकता नाही असे कळवून अपिलार्थीस ते समक्ष जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात हजर राहिल्यास त्यांना माहिती दाखविण्याचे आश्वासीत केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी परत अपिलार्थीस दिनांक २९-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे १०० रुपयांची माहिती मोफत पुरविण्याचे आश्वासन दिले व अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात माहिती पाहण्यासाठी उपस्थित राहण्याचे सूचित केले. या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस असेही सूचित केले की, माहितीच्या झेरॉक्स प्रतीच्या छायांकीत प्रती पुरविण्यासाठी अपिलार्थीने दिनांक ०३-०४-२००८ रोजी त्यांच्या कार्यालयात १०,००० रुपये इतक्या रकमेचा भरणा करावा. जन माहिती अधिकारी यांच्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले.

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २०-०५-२००८ रोजी आपले आदेश पारित केले व या आदेशाव्दारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती दाखविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे त्यांच्या वकिलासह, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या वतीने वकील श्री. अविनाश औटे, यांनी असा युक्तिवाद केला की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचा दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचा वैध पुरावा असतांना व त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) च्या तरतुदीप्रमाणे विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना बंधनकारक असूनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली व याचबरोबर त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आणि त्यांना आवश्यक ती माहिती विहित मुदतीत न दिल्यामुळे संबंधितांवर दंडनीय कारवाई करण्याची आयोगास विनंती केली. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या पत्रावर भाष्य करुन या पत्रावर ते कायद्यातील तरतुदीशी सुसंगत नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी दिनांक १२-०३-००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची तयारी दर्शविली होती. तथापि अपिलार्थीने हा पर्याय न स्वीकारल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. तदनंतर त्यांनी दिनांक २९-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस १०० रुपयाची माहिती विनामूल्य देऊ केली होती असे त्यांनी आयोगास अवगत केले. त्यांनी अपिलार्थीस १०,००० रुपये घेऊन शासनाच्या कोणत्या

आदेशान्वये माहिती देऊ केली होती याची आयोगाने विचारणा करता, त्यांनी आयोगास शासनाच्या महसूल व वन विभागाचे दिनांक २३-०१-२००८ रोजीचे पत्र दाखविले. हे पत्र महसूल विभागाच्या अवर सचिवांनी प्रधान सचिव यांना दिले असून हे पत्र म्हणजे मुख्यमंत्री महोदय व श्री. अण्णा हजारे यांच्या दिनांक २६-१२-२००७ रोजी झालेल्या चर्चेचे इतिवृत्त आहे असे दिसून येते. जन माहिती अधिकारी यांनी आयोगापुढे असाही युक्तिवाद केला की, त्यांच्या कार्यालयास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत दरमहा २० ते २५ अर्ज प्राप्त होत असतात. पैकी ८ ते १० अर्ज दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींचे असतात व हे सर्व अर्जदार विस्तृत स्वरुपाची माहिती मागवित असतात त्यामुळे एका अर्जाकरिता दरमहा माहिती देण्यासाठी १०,००० ते १२,००० रुपये इतकी रक्कम खर्च करावी लागेल. त्यांच्या विभागाला कार्यालयीन खर्चासाठी सर्वसाधारणपणे चार लाख रुपये इतकी तरतूद आहे. तथापि त्यांनी जर अपिलार्थी आणि इतर दारिद्र्यरेषेखालील व्यक्तींना त्यांनी मागणी केलेली माहिती विनामूल्य पुरविली तर १२ ते १५ लक्ष इतका वार्षिक खर्च येणार आहे. केवळ निधीच्या अनुपलब्धतेमुळे ते अपिलार्थीस आवश्यक ती माहिती झेरॉक्स प्रतीच्या स्वरुपात विनामूल्य पुरवू शकत नाहीत. त्यांच्या या युक्तिवादाप्रीत्यर्थ जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी आयोगास तसे शपथपत्र सादर केले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक ०४-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः दिनांक १२-०३-२००८ रोजी दिलेला प्रतिसाद व तदनंतर दिनांक २९-०३-२००८ रोजी अपिलार्थीस १०,००० रुपये इतकी रक्कम भरण्यासाठी दिलेले पत्र या दोनही पत्रांना कायद्याचा अथवा शासकीय आदेशाचा कोणताही आधार नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे उपरोक्त दिनांक १२-०३-२००८ रोजीचे पत्र अवैध ठरविण्यात येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे उपलब्ध आहे. केवळ निधीच्या अनुपलब्धतेमुळे ते ती संपूर्ण माहिती अपिलार्थीस पुरवू शकत नाहीत, हे पाहता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेल्या माहितीची पाहणी करुन त्यातून

त्यांना आवश्यक असलेल्या माहितीच्या प्रती घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे ही माहिती देण्यासाठी जेवढा निधी शिल्लक त्याच्या मर्यादेपर्यंत विनामूल्य माहिती घेण्यास हरकत नाही व याउपरही जास्त माहिती हवी असेल तर त्यांनी जास्तीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून लिहून घेण्याच्या पर्यायाचा विचार करावा, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी निःसंशयपणे नाकारले नाही, ही बाब येथे, अपिलार्थीच्या वरील युक्तिवादामध्ये जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडनीय कारवाई करण्याच्या मुद्दयासंदर्भात विशेषत्वाने नोंदविण्यात येत आहे. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी कोणत्याही असद्‌हेतूने टाळले असल्याचे अथवा अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्यापासून दुष्ट हेतूने दडवून ठेवल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे कारवाई करण्याचे आदेश आयोग देत नाही. मात्र इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीचा सखोल अभ्यास करुन आपल्या कार्यशैलीमध्ये सुधारणा घडवून आणावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बाळनाथ खंडेराव नवले, मु. पो. डोणगांव, तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम (पश्चिम) विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००२

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. ईश्वरलाल गुलाबराव घोरपडे, : अपिलार्थी
संत ज्ञानेश्वरनगर, हडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण,
प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. ए. ए. शेख

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती न पुरविता त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती पुरविली गेली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. शेख ए. ए. कार्यालय अधीक्षक, व्यवसाय शिक्षण व

प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांच्यासंदर्भात त्यांच्या ३७ वर्षे सेवेच्या कालावधीतील काही माहिती एकूण २१ मुद्दयांव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी ०४-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०३-०६-२००८ रोजी आदेश पारित करुन अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना व तसेच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देतांना त्रयस्थ पक्ष श्री. ए.ए. शेख यांच्याकडे यासंदर्भात अधिनियमातील कलम (११) च्या तरतुदीप्रमाणे कोणतीही विचारणा केली नव्हती व तसेच प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्ष या सुनावणीसाठी उपस्थित नव्हते किंवा त्यांचे म्हणणे जन अपिलीय अधिकारी यांनी विचारात घेतले नाही. जन अपिलीय अधिकारी यांना प्रथम अपिलाचा निर्णय देतांना, अपिलार्थीच्या प्रथम अर्जात नमूद केलेल्या संबंधित त्रयस्थ पक्षाचे म्हणणे लक्षात घेणे अधिनियमातील कलम ११ नुसार गरजेचे आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व विस्तृत स्वरुप पाहता, या प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी लक्षात घेऊन त्यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदी लक्षात घेऊन झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, अधिनियमातील कलम ११ च्या तरतूदी लक्षात घेऊन झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. ईश्वरलाल गुलाबराव घोरपडे, संत ज्ञानेश्वरनगर, हडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा निरीक्षक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, व्यवसाय शिक्षण व प्रशिक्षण, प्रादेशिक कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००३

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. विकास दत्तात्रय जंजीरे, : अपिलार्थी

व्दारा - दिलिप ढगू ढमाले,

मु. पो. खंडाळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर,

तालुका गंगापूर, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद,

औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : १. श्री. रामदास हराळ

२. श्री. अनिल सकदेव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना विहित मुदतीत माहिती पुरविली नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्याचे आदेशित करुनही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे असद्हेतूने टाळले असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. रामदास हराळ, गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती व श्री. अनिल सकदेव, सहायक उप शिक्षण निरीक्षक याच्यासंदर्भात एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्रयस्थ पक्षाच्या सेवापुस्तकाच्या पहिल्या पनाची प्रत व त्रयस्थ पक्षाने सन २००६-२००७ या कालावधीमध्ये शाळेच्या केलेल्या तपासणीचा अहवाल व त्रयस्थ पक्षाच्या मालमत्तेचा तपशील - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडील उपलब्ध माहिती दहा दिवसाच्या आत देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही. एवढेच नव्हे तर त्यांच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी अपिलार्थीस उद्देशून पत्र न लिहिता गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री यांना पत्र लिहिले व त्याची प्रत अपिलार्थीस दिली आहे.

त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्यांच्यापासून जन माहिती अधिकारी यांनी माहिती दडविल्याबद्दल त्यांच्यावर अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे शास्ती लावावी.

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्या त्रयस्थ व्यक्तींच्या संदर्भात माहिती मागितली आहे त्यापैकी एक ते स्वतः (श्री. अनिल सकदेव) आहेत. अपिलार्थी-च्या कार्यपध्दतीसंदर्भात चौकशी करण्यासाठी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद यांनी नेमलेल्या त्रिस्तरीय समितीमध्ये ते प्रमुख होते. या चौकशीअंती अपिलार्थीस काही कालावधी-करिता निलंबीतही केले होते. अपिलार्थी हे जिल्हा परिषदेच्या शाळेमध्ये शिक्षक असून ते वेळोवेळी प्रशासनास वेठीस धरत आहेत आणि या चौकशीच्या दरम्यान अपिलार्थीने वेळोवेळी दूरध्वनीवरुन धमक्याही दिल्या होत्या. तसेच त्यांच्या संदर्भातील माहिती उघड केल्याने त्यांच्या व त्यांच्या कुटूंबाच्या जीवितास धोका उत्पन्न होणार असल्याने त्यांनी अपिलार्थीस माहिती उघड केली नाही.

त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देऊ नये कारण अपिलार्थीने ही माहिती सूडबुध्दीने व कुहेतूने मागविली आहे.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी सरळ व अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणताही प्रतिसाद दिला नसल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. तथापि अपिलार्थीस माहिती नाकारण्याचा जन माहिती अधिकारी यांचा हेतू त्यांनी गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, फुलंब्री यांना लिहिलेल्या दिनांक २५-०२-२००८ रोजीच्या पत्रावरुन अपिलार्थीस ज्ञात होत आहे. यावरुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी हे नाकारु इच्छित आहेत हे अपिलार्थीस प्रत्यक्षपणे दिनांक २५-०२-२००८ रोजी ज्ञात झाले आहे. यामुळे संबंधित जन

माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिली हा एक मुद्दा सिध्द होत आहे. जन माहिती अधिकारी यांना येथे असे सूचित करण्यात येत आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे कोणत्याही अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास त्यांनी या संदर्भातील पत्रव्यवहार सरळ अर्जदारास उद्देशून करावा. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता मुद्दा क्रमांक 'ए' व 'बी' ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे ती उघड करण्यासाठी कोणाचीही हरकत असणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'सी' व 'डी' व्दारे त्रयस्थ पक्षाच्या वैयक्तीक मालमत्तेची मागणी केलेली माहिती, जरी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असली तरी ती माहिती पुरविल्याने त्रयस्थ पक्षाच्या खाजगी बाबीत आगंतुक हस्तक्षेप झाल्यासारखे होईल. तसेच यामध्ये केवळ अपिलार्थीस आवश्यक ती माहिती मिळू शकेल परंतु यामुळे कोणतेही व्यापक जनहित याव्दारे साध्य होणार नाही व पर्यायाने अधिनियमातील कलम ८ (१) (ञ) चा भंग होणार असल्याची जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादावरुन आयोगाची खात्री झाली असल्याने, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक 'सी' व 'डी' ची माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक 'ए' व 'बी' शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत उपलब्ध करुन देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक 'ए' व 'बी' शी संबंधित माहिती त्यांनी, अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक 'ए' व 'बी' शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. विकास दत्तात्रय जंजीरे, व्दारा - दिलिप ढगू ढमाले, मु. पो. खंडाळा, तालुका वैजापूर, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, गंगापूर, तालुका गंगापूर जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक) जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००४

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, : अपिलार्थी
शिवगण निवास, सत्ताने निवाससमोर, बिदर रोड, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा विभाग नियंत्रक, रा. प. महामंडळ, विभाग लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा विभाग नियंत्रक, रा. प. परिवहन महामंडळ,
विभाग लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : विभागीय वाहतूक अधिकारी, रा. प. परिवहन महामंडळ, विभाग लातूर

त्रयस्थ पक्ष : १. श्री. इंगोले
२. श्री. यु. जी. देशमुख
३. श्री. बी. जी. माने

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली. त्यांनी एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली असता त्यांना मुद्दा क्रमांक १ व ३ ची माहिती देण्यात आली. तथापि मुद्दा क्रमांक २ ची खोटी व मुद्दा क्रमांक ४ ची माहिती त्यांना देण्यात आली नाही. अपिलार्थीने आपल्या या अभिप्रायाबरोबरच आपल्या मूळ माहितीची मागणी या अपील अर्जाव्दारे कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व एक त्रयस्थ पक्ष हजर आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ३१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेली व त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००८ रोजी, अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत, विनामूल्य पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस दिलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक २ ची माहिती खोटी देण्यात आली व मुद्दा क्रमांक ४ ची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. यासंदर्भात अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व्दारे, विभाग नियंत्रक व विभागीय वाहतूक अधिकारी यांनी श्री. यु. जी. देशमुख व श्री. बी. जी. माने यांना वाहतूक नियंत्रक म्हणून वापरण्यासाठी लेखी देण्यात आलेल्या पत्राची प्रत, जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, श्री. यु. जी. देशमुख व श्री. बी. जी. माने त्यांच्या कार्यालयामध्ये चालक या पदावर कार्यरत होते. हे दोघेही कर्मचारी आता त्यांच्या सेवेत नाहीत. श्री. यु. जी. देशमुख यांनी प्रकृती अस्वास्थ्यामुळे राजीनामा दिला आहे व श्री. बी. जी. माने यांनी स्वेच्छानिवृत्ती घेतली आहे. या दोन चालकांना त्यांनी कधीही वाहतूक नियंत्रक म्हणून कार्यभार देण्याचे आदेशित केले नव्हते व तसे त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे कळविले देखील आहे. ती माहिती खोटी कशी आहे यासंदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कोणताही पुरावा सादर केला नाही अथवा आज रोजी त्यांच्या या मुद्दयाचे स्पष्टीकरण करण्यासाठी ते आयोगासमोर उपस्थितही नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामधील मुद्दा क्रमांक ४ व्दारे, विभागीय वाहतूक अधिकारी यांनी सप्टेबर २००७ ते जानेवारी २००८ या कालावधीमध्ये कुठे कामगिरी केली, याबाबतची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली होती. या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरविली आहे. येथे असे स्पष्ट करण्यात येते की, प्रत्येक अधिका-यांची "दैनंदिन कामगिरी" अशा प्रकारची माहिती कोणत्याही सार्वजनिक प्राधिकरणाकडे ठेवण्याची पध्दत प्रचलीत नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील

अर्जामध्ये त्यांना मुद्दा क्रमांक ४ ची माहिती देण्यात आली नाही असे नमूद केले आहे. तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे माहिती दिल्याचे निःसंशयपणे सिध्द होत असल्याने अपिलार्थीच्या अपील अर्जातील हा मुद्दा देखील निकाली निघत आहे.

अशा प्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उमाकांत गणपतराव रोट्टे, शिवगण निवास, सत्ताने निवाससमोर, बिदर रोड, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा विभागीय वाहतूक अधिकारी, रा. प. परिवहन महामंडळ, विभाग लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विभाग नियंत्रक, रा. प. परिवहन महामंडळ, विभाग लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००५

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, : अपिलार्थी
राा. ठाकूर निवास, बढाई गल्ली, औरंगपुरा,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित करुनही संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरविली नसल्याने त्यांचे विचाराधीन अपील मंजूर करुन सर्व संबंधितांवर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-प्रमाणे कारवाई करुन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करावे. त्यांच्या अशा प्रकारच्या विनंतीबरोबर अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दिनांक ०१ जानेवारी २००५ ते ३१ डिसेंबर २००७ या कालावधीतील काही माहिती खालीलप्रमाणे मागितली होती.

" रो. ह. यो. सारग्रंथ खंड-१ पान क्र. ८६ प्रकरण ८.२.५ क्रमांक ३ प्रमाणे वरील कालावधी मध्ये आपल्या उपविभागामार्फत सर्व रो. ह. यो. कामांचे दर १५ दिवसांचे हजेरी पत्रके (मस्टर) प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये वेळोवेळी ज्या कार्यालयीन पत्राव्दारे जमा केले (जावक क्रमांकासह) त्या सर्व पत्रांच्या झेरॉक्स प्रती व प्रत्येक ग्रामपंचायतीने आपल्या सर्व उपविभागांना दिलेल्या पोहच पावत्यांच्या झेरॉक्स प्रती देण्यात याव्यात. सर्व झेरॉक्स प्रती प्रमाणीत प्रतिमध्ये देण्यात याव्या. "

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून शीघ्र टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजी निर्णय घेऊन अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे, प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या विनंतीशी सुसंगत युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाच्या नियंत्रणाखालील जालना, घनसावंगी, परतूर, अंबड, भोकरदन, बदनापूर या उपविभागाशी संबंधित होती. त्यामुळे त्यांनी त्यांच्या अधिपत्याखालील अभियंत्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती देण्याचे सूचित केले. तथापि उपविभागाकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने ते अपिलार्थीस अपेक्षित माहिती पुरवू शकले नाहीत. आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरविण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती अत्यंत मर्यादित व स्वरुपही साधे होते. परंतु ही माहिती देखील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविली नाही. जर अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीप्रमाणे, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध होती त्या प्राधिकरणाकडे, सदर अर्ज त्यांना प्राप्त झाल्यापासून पाच दिवसाच्या आत पाठवून त्याची एक प्रत अपिलार्थीस देणे जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी ही देखील कृती केली नाही व त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीसंदर्भात अपिलार्थीस काहीही ज्ञात झाले नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०४-२००८ रोजी अपिलार्थीस १५ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांनी अपिलार्थीस कोणतीही माहिती आजतागायत उपलब्ध करुन दिली नाही, अशी वस्तुस्थिती आयोगाच्या निदर्शनास आली आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची संबंधित जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे अक्षम्य उपेक्षा केली असल्याचे आयोगास प्रतीत होत आहे. अशाप्रकारे अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व सहायक, ज्यांना अधिनियमातील कलम ५ (५) च्या तरतुदीप्रमाणे जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे सर्वजण एकत्रितपणे जबाबदार ठरत आहेत.

सबब या प्रकरणी जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरविल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी एकत्रित शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे. विहित मुदतीत हा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, जन माहिती अधिकारी यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची, त्यांनी नोंद घ्यावी. या प्रकरणी आयोगाच्या निर्णयाची प्रत सर्व संबंधितांना प्राप्त होईल याची दक्षता अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांनी घ्यावी असे त्यांना विशेषत्वाने सुचविण्यात येत आहे. अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी एकत्रित शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेंद्र विठ्ठलराव विसपुते, रा. ठाकूर निवास, बढाई गल्ली, औरंगपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००६

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. दशरथ एकनाथ कांबळे, : अपिलार्थी
शास्त्री मोहल्ला, जुना जालना, तालुका जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अधिकारी, कृषि कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा जिल्हा अधीक्षक कृषि कार्यालय, जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तंत्र अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, जालना

जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय कृषि अधिकारी, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने विचाराधीन अपील त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्यामुळे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जालना, अंबड, बदनापूर, जाफ्राबाद व भोकरदन तालुक्यातील कार्यालयाच्या सन २००६ व २००७ या कालावधीतील कॅशबुकची

सत्यप्रत, केंद्र व राज्याच्या विविध योजनांचे प्राप्त व वितरीत अनुदान याच्या सत्यप्रती व लाल्या रोगावरील सन २००६ ते २००७ या कालावधीमध्ये झालेला खर्च, ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन त्यांच्या कार्यक्षेत्रातील या माहितीशी संबंधित सर्व तालुका कृषि अधिका-यांना माहिती अधिकार अधिनियम २००५ प्रमाणे कार्यवाही करण्याच्या सूचना दिल्या व त्याची प्रत अपिलार्थीस दिली. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीस त्यांच्या प्रथम अपील अर्जावर निर्णय प्राप्त होऊ शकला नाही. प्रथम अपील अर्जावर निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याने त्यांनी ही माहिती अपिलार्थीस त्यांच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील तालुका कृषि अधिका-यांकडून घेण्याचे सूचित केले व अपिलार्थीच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाची प्रत सर्व संबंधितांकडे दिनांक १२-०३-२००८ रोजीच्या पत्राद्वारे पाठविली. अपिलार्थीचा अर्ज सर्व संबंधित जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्याकडे न केल्याने अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही. अपिलार्थीने व्यक्तिशः माहिती मागितल्यानंतर अपिलार्थी त्यांच्या

कार्यालयामध्ये माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी किती वेळा व्यक्तिशः उपस्थित झाले, असे आयोगाने विचारले असता, अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित झाले नाहीत, अशी जन माहिती अधिकारी यांनी आयोगास माहिती दिली.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती उपविभागीय कृषि अधिकारी यांच्या कार्यालयात असणे अभिप्रेत आहे. तथापि त्यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध असूनही त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाची प्रत संबंधित तालुका कृषि अधिकारी यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस परस्पर माहिती देण्याचे त्यांना सूचित केले, ही जन माहिती अधिकारी यांची कृती गैर व चुकीची आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही त्यांच्या तालुक्यातील कार्यालयाशी संबंधित असल्याने अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस संबंधित कार्यालयाकडून माहिती घेण्याचे सूचित करण्याची त्यांची कृती बरोबर आहे. तथापि अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती केंद्र व राज्य शासनाकडून प्राप्त व वितरीत अनुदान आणि लाल्या रोगावर झालेला खर्च - ही त्यांच्या कार्यालयात उपलब्ध असतांना त्यांनी ती अपिलार्थीस न देता त्यांच्या नियंत्रणाखाली असलेल्या इतर कार्यालयास अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित करुन आपल्या या कृतीव्दारे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी टाळाटाळ केली आहे असे आयोगास आढळून येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती घेऊन जाण्यासाठी अपिलार्थी हे देखील जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न राहून त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांना स्वारस्य नसल्याचे अप्रत्यक्षपणे सूचित

केले आहे. अपिलार्थीच्या दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपिलाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाली नाही असे त्यांचे म्हणणे आहे. तथापि अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या प्रथम अपील अर्जाच्या झेरॉक्स प्रतीवरुन अपिलार्थीच्या दिनांक ११-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत जन अपिलीय अधिकारी यांना प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे. उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती ही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात असल्याने ती जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे विनामुल्य पुरवावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भात अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की ही माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे त्यांच्या संबंधित कार्यालयाकडून याच कालावधीमध्ये सशुल्क प्राप्त करुन घ्यावी. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी काहीअंशी टाळाटाळ केली असल्याचे सकृतदर्शनी सिध्द झाल्याने त्यांच्या अशा प्रकारच्या वर्तनाबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दशरथ एकनाथ कांबळे, शास्त्री मोहल्ला, जुना जालना, तालुका जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा तंत्र अधिकारी, उप विभागीय कृषि अधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय कृषि अधिकारी, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००७

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. भागवत विठ्ठलराव येनगे, : अपिलार्थी
मु. धाकटीवाडी, पो. शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर,
जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, शिरुर ताजबंद
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अहमदपूर,
तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर

जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अहमदपूर, तालुका अहमदपूर जिल्हा लातूर

त्रयस्थ पक्ष : विठ्ठल गोविंद बैकरे (मयत)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही. मुदत संपल्यानंतर त्यांना दिशाभूल करणारी माहिती पुरविली. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुन त्यांना मूळ माहिती न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विठ्ठल गोविंद बैकरे यांच्या नावावर असलेल्या उकिरड्याच्या जागेच्या खरेदीखत / बैनामा / रजिस्ट्री याच्या झेरॉक्स प्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १४-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आवश्यक ती माहिती पुरवून अपिलार्थीने मागणी केलेल्या जागेच्या खरेदीखताची अथवा रजिस्ट्रीची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे कळविले व ही जागा श्री. बैकरे यांच्या नावावर, ज्या पंचनाम्याच्या प्रतीच्या आधारे केली होती त्या पंचनाम्याची प्रत अपिलार्थीस पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २४-०३-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसल्यास तसे लेखी कळविण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी आयोगास स्पष्ट करतांना असे अवगत केले की, मौजे धाकटीवाडी येथील उकिरड्याची जागा श्री. विठ्ठल गोविंद बैकरे यांच्या नावांवर दिनांक २३-०३-२००१ पासून असून श्री. बैकरे यांच्या मालकीची नोंद त्यांनी ग्रामपंचायतीकडे ठरावाच्या आधारे त्यांनी घेतली असून या ठरावाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०२-२००८ रोजी उपलब्ध करुन दिलेली आहे. श्री. बैकरे यांच्या या जागेसंदर्भात कोणतेही खरेदीखत अथवा इतर कागदपत्रे श्री. बैकरे यांनी ग्रामपंचायतीकडे मूळात सादर केली नसल्याने या कागदपत्रांच्या प्रती त्यांना अपिलार्थीस देता आल्या नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिली नाही व दिलेली माहिती दिशाभूल करणारी असल्याचे नमूद केले आहे. याबाबत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक १४-०२-२००८ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने माहिती दिल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही कशा प्रकारे दिशाभूल करणारी आहे याचे समर्थन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच जन माहिती अधिकारी यांनी आयोगास विशद केलेल्या विचाराधीन प्रकरणाच्या पार्श्वभूमीवरुन असे आढळून येते की, श्री. बैकरे यांच्या उकिरड्याच्या जागेची मालकी ग्रामपंचायतीच्या ठरावाव्दारे निश्चित झाली असून या संदर्भात ग्रामपंचायतीकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी कोणतेही अभिलेखे उपलब्ध नाहीत. त्यामुळे ही माहिती आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळणार नाही. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीवरुन अपिलार्थीची

दिशाभूल झाली असे आयोगास वाटत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थितीदर्शक माहिती दिली आहे फक्त ती विलंबाने दिली आहे एवढाच अपिलार्थीचा मुद्दा येथे मान्य करण्यासारखा आहे. या प्रकरणी अधिनियमाव्दारे विहित केलेली मुदत व्यपगत झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने माहिती दिली असल्याने त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या अर्जावर अंमलबजावणी करण्याबाबत सतर्क राहावे, अशी त्यांना आयोगातर्फे सूचना देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिरुर ताजबंद तालुका अहमदपूर जिल्हा लातूर यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भागवत विठ्ठलराव येनगे, मु. धाकटीवाडी, पो. शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, शिरुर ताजबंद, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पं.), पंचायत समिती, अहमदपूर, तालुका अहमदपूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००८

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी

व्दारा - श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स,

कचेरी रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी,

तालुका जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद,

जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. एस. बी. मोरे (उजाड)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो माहिती प्राप्त न झाल्याचे नमूद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. एस. बी. मोरे (उजाड), सहशिक्षक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी यांनी

मंडळाच्या कामात अडथळे निर्माण केल्याबाबत तसेच त्यांच्याविरुध्द प्रशासकीय कारवाई करण्याबाबत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी जन माहिती अधिकारी यांना पाठविलेल्या दिनांक १७-०७-१९९९, २१-०८-१९९९ व दिनांक ०६-१२-१९९९ या पत्राच्या प्रती ही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १९-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित संचिका गहाळ झाली असल्याने त्यांच्याकडे माहिती उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३०-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकून घेतला असता अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अद्यापही आवश्यक असल्याचे आढळून आले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्यांच्या कार्यालयामध्ये, संबंधित संचिका गहाळ झाली असल्यामुळे उपलब्ध नाही. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, ही संचिका पूर्वी अपिलार्थी हे त्यांच्या शाळेमध्ये कारकून म्हणून कार्यरत होते त्यावेळी त्यांच्याकडे उपलब्ध होती. सध्या ते निलंबित आहेत.

अद्यापपावेतो या प्रकरणात त्यांनी त्यांच्या कार्यालयातील ही संचिका गहाळ झाल्याची कोणतीही तक्रार पोलीसात दाखल केलेली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. मात्र ही संचिका गहाळ झाल्यास्तव त्यांनी त्यांच्या क्षेत्रातील सक्षम पोलीस यंत्रणेकडे कोणतीही तक्रार दाखल केलेली नाही. सबब त्यांना असे सूचित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संचिकेमध्ये उपलब्ध आहे ती संचिका गहाळ झाल्याप्रकरणी त्यांनी त्यांच्या शाळेतील संबंधितावर फौजदारी कारवाई करावी व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्यास ती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्राप्त झाल्यास ती अपिलार्थीस, त्यानंतर सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, व्दारा - श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स, कचेरी रोड, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नेहरु विद्यालय, गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१००९

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, : अपिलार्थी
व्दारा - श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स,
कचेरी रोड, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. एस. बी. मोरे (उजाड)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - दिनांक ०१-०९-२००५ रोजी नेहरु विद्यालय, गोलापांगरी व कनिष्ठ महाविद्यालय, गोलापांगरी, तालुका जिल्हा जालना येथील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या सेवापुस्तिका हरविल्यामुळे व्दितीय प्रत तयार करण्याची परवानगी कोणत्या नियमाच्या आधारे दिली त्या नियमाची सत्यप्रत, जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने सचिव, गोलापांगरी शिक्षण

प्रसारक मंडळ, गोलापांगरी यांना दिनांक १७-०७-१९९९, २१-०८-१९९९ व दिनांक ०६-१२-१९९९ रोजी पाठविलेल्या पत्राची प्रत - ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहितीच्या अधिकारात कार्यालयातील उपलब्ध असलेल्या कागदपत्रांच्या प्रती पुरविणे अपेक्षित आहे. कार्यवाही कशी व का केली हे मागणे अपेक्षित नाही, असे अवगत केले व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ज्या संचिकेत उपलब्ध आहे ती संचिका गहाळ झाली असल्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेल्या पत्रांच्या छायांकीत प्रती त्यांना देता येत नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २७-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २२-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस या निर्णयात, अपिलार्थीने मागणी केलेल्या पत्राच्या प्रतीची माहिती देता येणे शक्य नसल्याचे अपिलार्थीस कळविले व त्यांच्या मूळ अर्जातील पहिल्या मुद्दयासंदर्भात दिनांक ०१-०५-२००८ रोजीची परवानगी देणारी नस्ती अपिलार्थीस तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि ही नस्ती अपिलार्थीस पाहणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी उपलब्ध न करुन दिल्याने त्यांनी व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात संबंधित नस्तीची तपासणी करण्यासाठी उपस्थित राहिले असता त्यांना ही नस्ती दाखविण्यासाठी जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयाने उपलब्ध करुन दिली नाही. ही नस्ती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातील श्री. सुधीर जाधव व श्री. एस. ओ. भोसले यांच्याकडे उपलब्ध आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीस अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी दिनांक ०१-०९-२००५ रोजी गोलापांगरी येथील शाळेमधील शिक्षक व शिक्षकेतर कर्मचा-यांच्या व्दितीय सेवापुस्तकाची प्रत करण्यासाठी दिलेली परवानगी कोणत्या नियमाच्या आधारे व कोणत्या संदर्भाव्दारे देण्यात आली याची माहिती प्राप्त झालेली नाही. शाळेच्या शिक्षकांच्या व कर्मचा-यांच्या सेवापुस्तकांची व्दितीय प्रत तयार करण्यासाठी जिल्हा परिषदेकडे अथवा शिक्षण खात्याकडे एखादी कार्यप्रणाली निश्चितपणे उपलब्ध असणार, त्या कार्यप्रणालीतील अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित भागाची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत पुरवावी तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलामध्ये दिलेल्या निर्णय प्रकरणाशी संदर्भित संचिका हे आदेश निर्गमित होताच याच कालावधीमध्ये पूर्वनियोजित वेळी त्यांच्या कार्यालयामध्ये अपिलार्थीस तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी, असे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील विषयाशी संबंधित संचिका त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत पूर्वनियोजित वेळी त्यांच्या कार्यालयात तपासणीसाठी विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये त्यांच्या मूळ अर्जातील सेवा

पुस्तिके संदर्भातील माहिती त्यांना विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद
दिनांक ०१-०८-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत रुस्तुमराव मोरे, व्दारा - श्रीनाथ जनरल स्टोअर्स, चाणक्य कॉम्प्लेक्स, कचेरी रोड, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०१०

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. अरुणकुमार एस. मुंदडा,<br>फ्रिलान्स रिपोर्टर, पैठण, तालुका पैठण,<br>जिल्हा औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण,<br>तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप आयुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण २१ मुद्दयांव्दारे व्यापक व्याप्ती असलेली माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०३-१२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती विस्तृत स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातून पाहून जाण्याचे सूचित केले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि तदनंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही क्लिष्ट स्वरुपाची व व्यापक व्याप्तीची असल्याने व ही माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांच्या कार्यालयातील उपलब्ध साधनसामग्री प्रमाणाबाहेर वळवावी लागत असल्याने त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात स्वतः उपस्थित राहून माहिती पाहण्यासाठी सूचित केले होते. जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अशाच प्रकारचा निर्णय त्यांच्या दिनांक २५-०३-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे दिला असतांना त्यांनी या निर्णयानंतर अपिलार्थीस प्रथमतः त्यांच्या कार्यालयात दिनांक ११-०४-२००८ रोजी १२-०० वाजता उपस्थित राहण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती पाहण्यासाठी उपस्थित न राहिल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती अद्यापपावेतो पुरविता आली नाही. यानंतर परत अपिलर्थीस दिनांक ३०-०७-२००७ रोजी उपस्थित

राहण्यासाठी लेखी विनंती करुनही अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहिले नाहीत. आजही अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तपासणी करण्यासाठी उपलब्ध आहे. मात्र अपिलार्थी त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती तपासून घेण्यासाठी वेळ देत नाहीत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती ही व्यापक प्रमाणात असल्याचे आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००८ रोजी दिलेल्या निर्णयामध्ये बदल करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. सबब जन अपिलीय अधिकारी यांचा दिनांक २५-०३-२००८ रोजीचा निर्णय कायम ठेवण्यात येऊन अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येत आहे. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी या प्रकरणी आता अंतीमतः हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत एक तारीख निश्चित करुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी व यामधून अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्राच्या प्रती त्यांना विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात. यानंतरच्या कालावधीत अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अरुणकुमार एस. मुंदडा, फ्रिलान्स रिपोर्टर, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७४९

निर्णय दिनांक ०१-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. सतीश सत्यनारायण शर्मा,<br>यो. नु. प्रा. शाळेच्या पाठीमागे, हौसिंग सोसायटी,<br>मु. पो. तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई,<br>तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपायुक्त (सा.प्र.),<br>विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०८-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देण्यात येणा-या माहितीपोटीची प्रतिपृष्ठ रुपये २ इतकी फीस आकारण्यात यावी व दिनांक २३-०४-२००७ रोजी पैसे भरणा केलेली रजिस्टरची नक्कल अद्यापी न मिळाल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर दंड आकारण्यात यावा व पुढे, सर्टिफाईड नक्कल म्हणून आवक रजिस्टरच्या पानाची झेरॉक्स प्रत देण्यात आली याकडे आयोगाचे लक्ष वेधले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २३-०५-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १२-०६-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४० व ६० भरण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने सदर शुल्काचा भरणा केल्यानंतर अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०७-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०१-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने सर्टिफिाईड नकला मागितल्या असल्याने त्यांनी सटिफाईड प्रतिकरिता निश्चित केलेले दर वीस रुपये अपिलार्थीस देण्यासाठी शुल्क म्हणून आकारले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने आवश्यक त्या शुल्काचा भरणा केल्यानंतर त्याच दिवशी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी आकारण्यात आलेल्या शुल्काच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देतांना पुरेसे भाष्य केले आहे. त्यामुळे यावर भाष्य करण्याची आयोगास आवश्यकता वाटत नाही. वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती

आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०१-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सतीश सत्यनारायण शर्मा, यो. नु. प्रा. शाळेच्या पाठीमागे, हौसिंग सोसायटी, मु. पो. तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगरपरिषद, अंबाजोगाई, तालुका अंबाजोगाई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५१

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १ | श्री. प्रकाश वामनराव महाकाळ,<br>मु. पो. मोढा बु. तालुका सिल्लोड,<br>जिल्हा औरंगाबाद | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत<br>वितरण कंपनी, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>महावितरण, विभागीय कार्यालय, कन्नड,<br>तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ११-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थी यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०१-०७-२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर झाले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने आयोगाकडे त्यांनी केलेले दिनांक ११-०६-२००८ रोजीचे व्दितीय अपील खारीज करण्याची आयोगास विनंती केलेली आहे. अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १०५१/२००८, दिनांक ११-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रकाश वामनराव महाकाळ, मु. पो. मोढा बु. तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी, सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महावितरण, विभागीय कार्यालय, कन्नड, तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५२

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

१ श्री. निशिकांत गायकवाड, अपिलार्थी
भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधिक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग , औरंगाबाद

प्रत्यक्षत : जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग , औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हे हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक २१-०७-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जासंदर्भात आयोगाकडे केलेले विचाराधीन व्दितीय अपील ते मागे घेत असल्याचे म्हटले आहे.

खुद्द अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले त्यांचे व्दितीय अपील मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक १०५२/२००८, दिनांक २४-०६-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०३-०८-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. निशिकांत गायकवाड, भिमनगर, भावसिंगपुरा, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०५३/२००८ व १०५४/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५३ व १०५४

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

१ श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, : अपिलार्थी
बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण,
जिल्हा औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता,
(रोहयो) कार्य विभाग, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ,
अहमदनगर

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता, (रोहयो) कार्य विभाग, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता, (रोहयो) कार्य विभाग अहमदनगर, जिल्हा अहमदनगर

**निर्णय**

**अपील क्रमांक १०५३/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी शेवगांव - पैठण रस्त्याची पूर्ण माहिती मुदतीत दिली नाही व माहिती देण्यास टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे शेवगांव - पैठण रस्त्याच्या कामासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कामाच्या निविदा निश्चित करत असतांना तयार करण्यात आलेला तुलनात्मक तक्ता, सदरील ठेकेदाराने यापूर्वी अशा प्रकारची कामे आपल्या विभागात केली आहेत काय, असल्यास त्याचा तपशील, सदर ठेकेदाराकडे कॉन्ट्रॅक्ट लेबर ॲक्ट परवाना आहे काय, असल्यास त्याची झेरॉक्स प्रत, काम ठेकेदार हे स्वतः करतात का, मूळ ठेकेदार कोण आहे त्याचा करारनामा आपल्या कार्यालयात दाखल केलेला आहे का, तो केलेला असल्यास लेबर ॲक्ट प्रमाणे आहे काय, असल्यास त्याची प्रत, सदर कामाच्या डांबर खपाची प्रत, कामाची अंतीम बिले अदा केली आहेत काय, सदरील काम पूर्ण झाले असल्यास मंजूर अंदाजपत्रकापेक्षा कमी अधिक झाले आहे काय, कार्यारंभ आदेश दिनांक २१-१२-२००६ असून प्रथम देयक बिल त्याच दिवशी अदा केले आहे याबाबतचा खुलासा, सदर काम रोजगार हमी योजने अंतर्गत विभागाऐवजी इतर तांत्रिक विभाग आहे का व या कामाच्या प्रथम देयकाच्या पुस्तकाची प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीचा सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-१०-२००७ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २२-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीवर कोणतेही भाष्य केले नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत उपविभागीय अभियंता, सार्वजनिक बांधकाम उपविभाग, शेवगांव यांच्याकडे

प्राप्त झाल्यानंतर यासंदर्भात उप विभागीय अभियंता यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक १९-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ३०० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने या शुल्काचा भरणा उपविभागीय अभियंता यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या विषयावरील दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या वेगळया प्रथम अर्जासंदर्भात सुनावणी घेतली परंतु या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १२-१०-२००७ च्या मूळ अर्जाची कोणतीही दखल घेतली नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या दिनांक १८-१२-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही असे सिध्द होत आहे. या घटनाक्रमानंतर अपिलार्थीने दिनांक ०९-०६-२००८ रोजी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थीस आयोगाकडे व्दितीय अपील करण्यासाठी लागलेल्या विलंबासंदर्भात त्यांनी आयोगास दिनांक ०७-०६-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे त्यांच्या व्दितीय अपील अर्जावर निर्णय देण्याची आयोगास विनंती केली आहे. अपिलार्थीच्या या विनंतीचा विचार करुन अपिलार्थीच्या व्दितीय अपील अर्जाची सुनावणी घेण्यात येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती दिनांक २२-११-२००७ व दिनांक २७-०२-२००८ रोजी पुरविली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १० व्दारे अपिलार्थीने त्यांच्याकडे "प्रथम देयकाच्या पुस्तकाची प्रत" मागितली होती. तथापि सार्वजनिक बांधकाम विभागामध्ये देयकाचे पुस्तक अशा

प्रकारचे कोणतेही अभिलेखे ठेवले जात नाहीत. अपिलार्थीच्या अर्जातील या मुद्दयावरुन अपिलार्थीस फक्त मोजमाप पुस्तिकाच्या प्रती हव्या असल्याचे त्यांनी स्वतःच्या स्तरावर अनुमान काढून जन माहिती अधिकारी यांना मोजमाप पुस्तिका देण्याचे सूचित केले. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडे, तशा प्रकारची माहिती अस्तित्वात नसल्याने उपलब्ध असण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगा-समोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण १० मुद्दयापैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून फक्त त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ व ५ या मुद्दयावरील माहिती देय होत आहे. यापैकी मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दिनांक २२-११-२००७ रोजी व मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांना दिनांक २७-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणी दरम्यान दिलेली आहे व मुद्दा क्रमांक १० शी संबंधित जी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे तशा प्रकारची माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असू शकत नाही. त्यामुळे ही माहिती देखील अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उपरोक्त सर्व मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी, जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत व संभवित नसलेली व मोघम अशा अर्थाची माहिती मागितली आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ८ व २ व्दारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मोघम स्वरुपात माहिती मागितली आहे. तर अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीस नेमकी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध होत नाही. अशा प्रकारे

अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे केलेले वरील स्पष्टीकरण पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून जी माहिती देय होती ती त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-११-२००७ व दिनांक २७-०२-२००८ रोजी दिलेली असल्याने आता जन माहिती अधिकारी यांना कोणतीही माहिती देण्याचे शिल्लक राहिले नाही. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी हेतुपुरस्सर टाळले असल्याचे नि:संशयपणे सिध्द होत नसल्याने तसेच या प्रकरणी अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील देखील अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीपेक्षा विलंबाने केले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

## अपील क्रमांक १०५४/२००८

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी शेवगांव - गेवराई या रस्त्याची माहिती मागितली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत पूर्ण माहिती दिली नाही, खोटी माहिती देऊन सत्य माहिती देण्याचे टाळले त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने त्यांचे व्दितीय अपील क्रमांक १०५३/२००८ च्या संदर्भातील दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये मागणी केलेलीच माहिती परत दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे, त्यांच्या दिनांक १२-१०-२००७ रोजीच्या अर्जामध्ये दोन मुद्दयांची भर घालून मागितली आहे.

अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या अर्जामध्ये शेवगांव - गेवराई या रस्त्याचे काम पावसाळा वगळून केले असते का,? पावसाळ्यात डांबरीकरण करण्याची कारणे व सदरील डांबरीकरणाचे काम पावसाळ्यात करण्यासाठी कोणते आधुनिक तंत्रज्ञान वापरले व त्याचे फायदे तोटे झाले आहेत का या दोन मुद्दयांची भर घातली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २१-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी अपील क्रमांक १०५३/२००८ च्या संदर्भात त्यांनी केलेल्या युक्तिवादाची पुनरावृत्ती आयोगासमोर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ०१ ते १० च्या संदर्भात आयोगाने अपील क्रमांक १०५३/२००८ च्या संदर्भात दिलेले अभिप्राय याही प्रकरणी कायम ठेवण्यात येत आहेत. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या अपील अर्जाशी संबंधित मूळ अर्जामध्ये भर घातलेल्या मुद्दा क्रमांक ११ व १२ च्या संदर्भात असे नमूद करण्यात येते की, या मुद्दयाव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती

मागविली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील कलमांशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. अर्जदारास माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कोणत्याही कृतीबद्दलची कारणे, त्यांचे वैयक्तीक स्पष्टीकरण, अभिप्राय मागविणे आणि जन माहिती अधिकारी यांनी ते अर्जदारास देणे अशी प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये मूळात अभिप्रेत नाही. त्यामुळे अपिलार्थीच्या या प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्जातील मुद्दा क्रमांक ११ शी संबंधित माहिती व मुद्दा क्रमांक १२ मधील " त्यांचे फायदे तोटे झाले आहे का " ही अंशतः माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १२ मधील " सदरील डांबरीकरणाचे काम पावसाळ्यात करण्यासाठी कोणते आधुनिक तंत्रज्ञान वापरले " ही माहिती मात्र अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. जन माहिती अधिकारी यांनी आज रोजी यासंदर्भात असा खुलासा केला की, त्यांच्याकडे पावसाळ्यात डांबरीकरणाचे काम करण्यासाठीचे असे कोणतेही तंत्रज्ञान आजमितीस उपलब्ध नाही. त्यामुळे या प्रकरणी या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी आज आयोगासमोर दिलेल्या खुलाशाप्रमाणे जर अपिलार्थीस माहिती दिली असती तर ते या प्रकरणी योग्य झाले असते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या मुद्दयावर " भाष्य नाही " अशा प्रकारची माहिती दिली आहे. मूळात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराच्या अर्जावर भाष्य करणे ही प्रक्रियाच अभिप्रेत नाही. त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती त्यांनी अर्जदारास देणे एवढेच या अधिनियमानुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी अपेक्षित होते. त्यामुळे या प्रकरणी अपिलार्थीस " भाष्य नाही " अशा प्रकारची जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती ही चुकीची आहे. तथापि ही माहिती देण्याचे टाळण्याकरिता किंवा ती अपिलार्थीपासून दडवून ठेवण्याच्या दुष्ट हेतूने

जन माहिती अधिकारी यांनी दिली नसल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ ची संबंधित " सदरील डांबरीकरणाचे काम पावसाळ्यात करण्यासाठी कोणते आधुनिक तंत्रज्ञान वापरले " या मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १०-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १२ शी संबंधित " सदरील डांबरीकरणाचे काम पावसाळ्यात करण्यासाठी कोणते आधुनिक तंत्रज्ञान वापरले " या मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे, बालाजी मंदिरामागे, दुर्गावाडी, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उप कार्यकारी अभियंता, (रोहयो) कार्य विभाग, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, (रोहयो) कार्य विभाग, अहमदनगर, जिल्हा अहमदनगर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५५

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

१ श्री. मुन्नवर अहेमद नईम अहेमद, : अपिलार्थी
प्लॉट नं. ४०, व्दारा - अब्दुल माजीद, न्यु एस. टी. कॉलनी,
कट कट गेट, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका,
जियाउल उलूम गर्ल्स हायस्कूल, औरंगाबाद
२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना तीस दिवसामध्ये माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले असल्याचे नमूद करुन त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क परत करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे आणि आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांचा दिनांक ११-१२-२००७ रोजीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर पोस्टाव्दारे केला होता. तथापि रजिस्टर पोस्टाच्या पाकिटामध्ये अपिलार्थीने कोरे कागद पाठविले असल्यामुळे जन माहिती अधिकारी अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले असता,

अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०२-२००८ रोजी आपले आदेश पारीत केले. या आदेशान्वये त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती निरीक्षणास विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व त्यामध्ये आवश्यक ती माहिती अपिलार्थीस सशुल्क पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाचे अवलोकन करता जन अपिलीय अधिकारी यांनी हे आदेश देतांना त्यासंदर्भातील कोणतीही कारणे या आदेशामध्ये नमूद केलेली नाहीत. निर्णय देतांना सदर निर्णय हा कारणासहीत देणे आयोगास आवश्यक वाटत असल्यामुळे अपिलार्थीच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी परत सुनावणी घेणे आयोगास आवश्यक वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणी असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी, अपिलार्थीच्या दिनांक १४-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच ४५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मुन्नवर अहेमद नईम अहेमद, प्लॉट नं. ४०, व्दारा - अब्दुल माजीद, न्यु एस. टी. कॉलनी, कट कट गेट, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, जियाउल उलूम गर्ल्स हायस्कूल, बुड्डीलेन, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५६

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

१ श्री. शेख मोहंमद इमरान मोहंमद इब्राहीम, : अपिलार्थी
घर नं. ४-१२-५७ पी, न्यू बायजीपुरा, गल्ली नं. २०,
सर्वे नं. २५, एम. जी. एम. हॉस्पिटल गेट समोरील गल्ली
(पश्चिम बाजू), औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापिका,
जियाउल उलूम गर्ल्स हायस्कूल, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसात माहिती न दिल्याने आणि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने व्यथित झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये, त्यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरलेले शुल्क जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस परत करण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित एकूण पाच वर्षाची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५०९२ इतके त्यांच्या शाळेमध्ये जमा करण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे, जन माहिती अधिकारी यांच्या ज्या निर्णयाविरुध्द अपील केले आहे तो निर्णय, त्यांना प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे. अपिलार्थीच्या या दिनांक १६-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०२-२००८ रोजी आदेश पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी दोन आठवड्याच्या आत निरीक्षणासाठी उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले व अपिलार्थीच्या मागणीनुसार जी माहिती आवश्यक आहे ती अपिलार्थीस सशुल्क पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करुन त्यांनी या प्रकरणी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे भरलेले शुल्क रुपये १३२२ इतके त्यांना परत देण्याचे व त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य देण्याचे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी दोनही बाजूंचा युक्तिवाद ऐकूण घेण्यात आला. त्यावेळी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीच्या दिनांक १०-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०७-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे

आवश्यक त्या तपशीलासह पूर्ण प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १५०९२ इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केले आहे. हे पत्र अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाव्दारे दिनांक ०८-०१-२००८ रोजी प्राप्त झाले असतांनाही त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १६-०२-२००८ रोजी प्रथम अपील करतांना 'No Order is Passed' अशा अर्थाचे अभिप्राय या अपील अर्जामध्ये नमूद केले आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०२-२००८ रोजी दिलेल्या निर्णयाचे अवलोकन करता असे आढळून येते की, अपिलार्थीने दिनांक २३-०१-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना प्रतिपृष्ठ ६० पैसे शुल्क लावण्याची विनंती केली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांनी ही विनंती अमान्य केली आहे. तसेच प्रथम सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने " मी शाळेत जाऊन माहितीचे निरीक्षण करु इच्छितो त्यामध्ये मला जे आवश्यक वाटेल त्याची मी यादी जन माहिती अधिकारी यांना देईल " असे कबूल केले होते. त्याप्रमाणे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेली माहिती रुपये १३२२ इतके माहितीपोटीचे शुल्क अपिलार्थीकडून घेऊन त्यांना पुरविली आहे. यावरुन असे आढळून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या मूळ माहितीची व्याप्ती मोठ्या प्रमाणात आहे. तथापि अपिलार्थी या माहितीसाठीचे आवश्यक ते शुल्क जन माहिती अधिकारी यांच्याकडे मान्य दराने भरण्यास तयार नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्याकडील झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती तपासणीसाठी उपलब्ध करुन देऊन त्यातील त्यांना आवश्यक ती माहिती घेण्याचे कबूलही केले होते त्याप्रमाणे त्यांनी आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे पूर्ण शुल्क न भरता त्यांनी मोजक्याच कागदपत्रांचे शुल्क भरुन जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती व्यक्तिशः हस्तगत करुन घेतली आहे. या प्रकरणी आयोगास असे दिसून येत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील विहित तरतुदीप्रमाणे, विहित कालावधीत आवश्यक व योग्य ते शुल्क कळविले आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अधिनियमातील तरतुदीप्रमाणे बरोबर आहे फक्त जन माहिती अधिकारी

यांच्या दिनांक ०७-०१-२००८ रोजीच्या पत्रातील त्यांनी अपिलार्थीस ए ३ या आकारमानाचे शुल्क कळवितांना रुपये दोन ऐवजी रुपये चार असे चुकीचे शुल्क कळविले असून शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दिनांक ११-१०-२००५ रोजीच्या अधिसूचनेमध्ये नमूद केल्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस ए ३ च्या आकारमानाच्या पृष्ठाकरिता दोन रुपये इतके शुल्क कळविण्याची आवश्यकता होती, त्यास त्यांनी चार रुपये इतके शुल्क कळविले असल्याचे दिसून येते. तथापि जन माहिती अधिकारी यांची, दि. ०७-०३-२००८ रोजीच्या पत्राद्वारे ए-४ आकारमानाच्या पृष्ठांकरिता प्रतिपृष्ठ रु. २ प्रमाणे अपिलार्थीकडून ६६१ पृष्ठांकरिता एकूण रु. १३२२/- इतके माहितीपोटीचे शुल्क आकारण्याची कृती योग्य आहे. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील सुनावणीच्या वेळी तयार करुन ठेवली असल्याचेही आयोगास आढळून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती यापुढेही त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्यावी लागेल, असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून, त्यांनी माहितीपोटीचे भरलेले शुल्क परत करण्याचे आदेशित करण्याची विनंती आयोगास मान्य करता येणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख मोहंमद इमरान मोहंमद इब्राहीम, घर नं. ४-१२-५७ पी, न्यू बायजीपुरा, गल्ली नं. २०, सर्वे नं. २५, एम. जी. एम. गेट समोरील गल्ली (पश्चिम बाजू), औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापिका, जियाउल उलूम गर्ल्स हायस्कूल, बुड्डीलेन,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील
कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५७

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. देवा भाऊसाहेब राठोड,<br>एन-७, एफ-६२/४, अयोध्यानगर, सिडको,<br>औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक, वन भवन, औरंगाबाद | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप वनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद | : | प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : १. वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (द)
२. वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उ)

जन अपिलीय अधिकारी : सहायक वनसंरक्षक, कार्यालय उप वनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०२-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे त्यांनी अपील केल्यानंतर देखील त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देण्यात आली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित एकूण सहा मुद्दयाव्दारे काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रातील प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावामध्ये मातीनाला बंधा-याच्या कामाचे गट नंबर व गावनिहाय यादी,

प्रत्येक कामाचा मजूर उपस्थिती अहवाल, प्रशासकीय मान्यता, प्रत्येक कामाच्या मोजमाप पुस्तिकाची प्रत, मजुराच्या जॉबकार्डची प्रत व जिल्ह्यातील प्रत्येक तालुक्यातील प्रत्येक गावातील एफ. डी. ए. च्या कामावरील मजुराचे हजेरी मस्टरची व एल. बी. एस. कामावरील मोजमाप पुस्तिकाच्या प्रती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने नोव्हेंबर २००६ ते दि. २७-०२-२००८ या कालावधीशी संबंधित ही माहिती मागितली असून या अर्जामध्ये त्यांनी ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी अपिलार्थीच्या अर्जाच्या छायांकीत प्रती त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व वनक्षेत्र अधिकारी यांना दि.०७.०३.२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठवून अपिलार्थीस परस्पर तीस दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले व अपिलार्थीस त्याची प्रत पाठविली. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०८-०५-२००८ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप मोठ्या प्रमाणात असल्याने त्यांना माहिती देण्यासाठी सुरुवातीला वेळ लागला. त्यांनी दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती वगळता उर्वरित सर्व माहिती त्यांना पुरविली आहे अपिलार्थीस

आद्यापपावेतो द्यावयाची राहिलेली माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार आहे. ते अपिलार्थीस ती तीस दिवसाच्या आत विनामूल्य देऊ शकतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठी-च्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः मोठ्या व्याप्तीची माहिती मागितली होती. तदनंतर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे झालेल्या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना प्राप्त झालेल्या माहितीपैकी अपूर्ण माहितीबाबत खुलासेवार पत्राने कळविले. तथापि असे पत्र जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीकडून प्राप्त न झाल्याने जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस उर्वरित माहिती देऊ शकले नाहीत असे दिसून येते. आता जन माहिती अधिकारी जालना (उत्तर) यांनी आयोगास असे अवगत केले आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक पाचशी संबंधित माहिती अद्यापही त्यांच्याकडून अपिलार्थीस देणे बाकी आहे. अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयास यासंदर्भात कोणताही तपशील न कळविल्याने अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयाने माहिती पाठविली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. देवा भाऊसाहेब राठोड, एन-७, एफ-६२/४, अयोध्यानगर, सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (दक्षिण) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उत्तर) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक, कार्यालय उप वनसंरक्षक, औरंगाबाद वन विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५८

निर्णय दिनांक   ०३-०८-२००९

१ श्री. मच्छिंद्र बहिरु कान्हे, : अपिलार्थी

व्दारा - गुलाब संदनशिव, आर एच-१८/१२, बजाजनगर,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

सिडको, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सिडको, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक पणन अधिकारी, सिडको, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्रशासक, सिडको, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती उपलब्ध असूनही ती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली व अपिलार्थीस अपूर्ण माहिती दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असेही नमूद केले आहे की, जी माहिती श्रीमती कावेरी मच्छिंद्र कान्हे यांना देतांना जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडून २६ रुपये इतके शुल्क आकारले त्याच

माहितीसाठी अपिलार्थीस त्यांनी २४ रुपये इतके शुल्क आकारले आहे. या अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित जानेवारी २००४ ते डिसेंबर २००७ या कालावधीशी संबंधित एकूण दोन मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सिडकोचा ठराव क्रमांक ७६२९ ची प्रत व सिडको वाळूज महानगर कार्यालयामध्ये व कार्यालयातून बदली झाल्यानंतर नियुक्त झालेल्या नवीन ठिकाणी सिडकोच्या ह्याच कर्मचा-यांना ठराव क्रमांक ७६२९ नुसार नविन घरांचे वाटप करण्यात येते काय ? नसल्यास त्यांसाठी ठराव क्रमांक ७६२९ मध्ये काय तरतूद आहे ? - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०६-०२-२००८ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती सिडको कार्यालयाच्या कार्मिक विभागाकडे उपलब्ध असल्याने ती सिडकोच्या बेलापूर येथील कार्यालयातून मागवून घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २५-०३-२००८ रोजी सुनावणी घेतली व त्या दिवशी त्यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती मुंबई येथील कार्यालयातून फॅक्सव्दारे प्राप्त करुन घेऊन ती अपिलार्थीस, त्यांच्याकडून रुपये २४ इतके शुल्क आकारुन पुरविली. अपिलार्थीस ही संपूर्ण माहिती प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ त्यांनी त्यांना माहिती मिळाल्याची पोच दिली आहे. नंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मुंबई येथील कार्यालयाकडून फॅक्सव्दारे ही माहिती मागवून नंतर ती अपिलार्थीस पुरविली आहे. हा फॅक्स त्यांना मुंबई येथील कार्यालयाकडून प्राप्त होत असतांना एका पानाचा फॅक्स त्यांना प्राप्त झाला नाही. त्यामुळे फक्त बारा पृष्ठांची माहिती त्यांनी अपिलार्थीस दिली. तथापि श्रीमती कावेरी मच्छिंद्र कान्हे यांनी मागणी केलेल्या माहितीतील सर्व पृष्ठे त्यांच्याकडे उपलब्ध झाल्याने त्यांनी श्रीमती कावेरी मच्छिंद्र कान्हे यांना तेरा पृष्ठांची माहिती दिली. त्यामुळे श्रीमती कावेरी मच्छिंद्र कान्हे यांच्याकडून २६ रुपये शुल्क आकारुन माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, अपिलार्थी हे आता हयात नसून सुमारे एक वर्षापूर्वी त्यांचे दु:खद निधन झाले असल्याची बातमी त्यांना वर्तमानपत्रात वाचावयास मिळाली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीस त्यांच्या दिनाक २२-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जातील दोन मुद्दयापैकी फक्त मुद्दा क्रमांक १ 'सिडको कर्मचारी कल्याण योजना ठराव क्रमांक ७६२९ ची प्रत' ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत आहे. त्याप्रमाणे त्यांनी ती अपिलार्थीस पुरवली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक २ व्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देय होत नाही. कारण या मुद्दयाव्दारे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचे स्पष्टीकरण व अभिप्राय अपेक्षित असल्याचे दिसून येते, जे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थी यांना अनुज्ञेय नाही. अशा प्रकारे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येते व त्याची पोच अपिलार्थीने जन

अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिली आहे. एवढे असूनही अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती देण्यास टाळाटाळ केली असे कारण दर्शवून आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जात दिलेली कारणे ही वस्तुस्थितीशी पूर्णतः विसंगत आहेत. जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास कोणत्याही टप्प्यावर टाळल्याचे आयोगास आढळून येत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मच्छिंद्र बहिरु कान्हे, व्दारा - गुलाब संदनशिव, आरएच-१८/१२, बजाजनगर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक पणन अधिकारी, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रशासक, सिडको, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०५९

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

१ श्री. उत्तम माधवराव मोटे, : अपिलार्थी
रा. मोटे गल्ली, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई,
तालुका गेवराई, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनीही कोणतीही माहिती न पुरविल्यामुळे अपिलार्थीने विचाराधीन अपील राज्य माहिती आयोगाकडे केले आहे. या अभिप्रायाबरोबर अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील गेवराई तालुक्यातील सर्व स्वस्त धान्य दुकानांच्या संदर्भात व त्यांना होणारा धान्य व रॉकेल पुरवठ्याच्या दरासंदर्भातील काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित कालावधी मार्च २००७ ते मार्च २००८ असा होता. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - गेवराई तालुक्यातील एकूण स्वस्त धान्य दुकान, किरकोळ परवानाधारक रॉकेल विक्रेते यांची संख्या, त्यांचे नांव दुकान नंबर, गाव, प्रत्येक स्वस्त धान्य दुकानांतर्गत येणा-या अन्नपुर्णा, अंत्योदय, बी.पी.एल. योजनेअंतर्गत मिळणा-या लाभ-धारकांची प्रत्येक दुकानाची व कार्डधारकांची यादी, या योजने अंतर्गत लाभधारकांना प्रत्येक दुकानाअंतर्गत किती पुरवठा होतो याची दुकाननिहाय माहिती, या योजने अंतर्गत शासनातर्फे पुरविण्यात येणा-या धान्याचा दर व लाभधारकांना स्वस्त धान्य दुकानातून कोणत्या दराने धान्य व रॉकेल पुरवठा होतो - अशा एकूण ११ मुद्दयांचा समावेश आहे. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन या पत्राव्दारे त्यांनी अपिलार्थीस, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असल्याचे व नियमाप्रमाणे शुल्क जमा करुन माहिती हस्तगत करण्याचे अपिलार्थीस सूचित केले व अशाच मजकुराचे पत्र त्यांनी अपिलार्थीस दिनांक २५-०३-२००८ रोजी परत एकदा पाठविले होते. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या प्रथम प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०८-०४-२००८ रोजी प्रथमतः सुनावणी ठेवली होती. तथापि या संदर्भात तहसीलदार यांनी कोणता निर्णय दिला याची कोणतीही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली नाहीत. मात्र यांनंतर अपिलार्थीने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस नियमाप्रमाणे शुल्क भरण्यासाठी त्यांनी तीन वेळा सूचित करुनही अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कधीही उपस्थित न राहिल्याने त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना दहा दिवस इतका कालावधी पुरेसा होईल, असे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी जरी तत्परतेने प्रथम प्रतिसाद दिला असला तरी त्यांनी अपिलार्थीस दिनांक २८-०२-२००८ व २५-०३-२००८ रोजी खरोखरच पत्रे पाठविली होती किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. कारण याबाबत आवश्यक तो पुरावा जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे उपलब्ध नाही. केवळ वादाच्या प्रयोजनार्थ जरी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत प्रतिसाद दिला असल्याचे मान्य केले तरीही जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस उद्देशून लिहिलेली दिनांक २८-०२-२००८ व २५-०३-२००८ रोजीची दोनही पत्रे अवैध आहेत. कारण या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी लागणा-या शुल्काचा तपशील, निश्चित शुल्क, या शुल्काचा भरणा कोणत्या पध्दतीने कोठे भरावयाचा याचा कोणताही तपशील अपिलार्थीस कळविला नाही. याहीपेक्षा महत्वाचे असे आहे की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे नोंदणीकृत टपालाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असतांना जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती हस्तगत

करण्याचे सूचित केले होते. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस अशा प्रकारे प्रतिसाद देण्याची कृती गैर व चुकीची आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या अर्जास ज्या प्रकारे प्रतिसाद दिला आहे तो पाहता या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले आहे असे म्हणणे जास्त सोयीस्कर होईल असे आयोगास वाटते. जन माहिती अधिकारी यांनी माहिती न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील तरतुदीनुसार तहसीलदार गेवराई यांच्याकडे दिनांक २९-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रांची पाहणी करता, आढळले नाही. यावरुन अपिलाथीच्या प्रथम अपील अर्जाची तहसीलदार, गेवराई यांनी अक्षम्य उपेक्षा केल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस १० दिवसाच्या आत पुरविण्याची जन माहिती अधिकारी यांची तयारी आहे हे पाहता, त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच त्यांना १० दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देऊन व चुकीचा प्रतिसाद देऊन संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जबाबदार असणारे त्यांचे सर्व संबंधित सहायक , ज्यांना अधिनियमतील कलम ५ (५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे, हे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवण्यासाठी एकत्रितपणे जबाबदार असल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीद्वारे जन माहिती अधिकारी व त्यांच्या सहकाऱ्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब संबंधित जन माहिती अधिकारी (श्रीमती मोरे, सध्या गेवराई तहसील येथे कार्यरत) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस विहित

मुदतीत माहिती न पुरविल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगाकडे प्राप्त न झाल्यास, त्यांना या प्रकरणी काहीही सांगावयाचे नाही, असे गृहीत धरुन हेच आदेश अंतिम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १० दिवसाचे आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्रीमती मोरे, सध्या गेवराई तहसील यांचे कार्यालय) यांना एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. उत्तम माधवराव मोटे, रा. मोटे गल्ली, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, गेवराई,

तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी. (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, गेवराई, तालुका गेवराई, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०६०

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

१ श्री. हरिभजन पांडुरंग शिंदे, : अपिलार्थी

व्दारा - 'शुभश्री' घर नं. ९९५, एन- ६, सिडको, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मिळकत व्यवस्थापक म्हाडा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्याधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास

मंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मिळकत व्यवस्थापक, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना व त्यांच्या वडिलांना मंडळाने फसविले असल्याने व त्यांना विक्री करण्यात आलेल्या गाळयाची किंमत अवास्तव असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. त्यांनी या अपील अर्जामध्ये असेही नमूद केले आहे की, गृहनिर्माण मंडळाने त्यांना माहिती दिलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आर-२९, एन-७, सिडको मधील गाळयासंदर्भात एकूण सात मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०४-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी ०९-०६-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्जाव्दारे मागणी केलेली उपरोक्त माहिती त्यांना दोन दिवसात विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय मान्य न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. या युक्तिवादावरुन असे आढळून येते की, अद्यापपर्यंत जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक " ऊ " संदर्भात मंडळाने दिनांक २१-०९-२००१ रोजी शासनाकडे पाठविलेल्या जावक क्रमांक ३९३८ या क्रमांकाच्या पत्राची सत्यप्रत त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित मुद्दयांचे अवलोकन करता, या मुद्यांव्दारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

प्रश्नार्थक स्वरुपात त्यांच्याकडून खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागितली आहे, असे आढळून येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दल कारणे अथवा खुलासे मागणे अर्जदारास अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदी-नुसार कार्यवाही करणे अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक " ऊ " या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होय नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक " ऊ " च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांच्या कार्यालयातील दिनांक २१-०९-२००१ रोजी जावक नोंदवहीची सत्यप्रत अपिलार्थीस द्यावी व जर या नोंदवहीच्या तपासणीवरुन जावक ३९३८ या क्रमांकाचे पत्र जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे निर्गमित केले गेले असेल तर त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अशा क्रमांकाचे पत्र त्यांनी दिनांक २१-०९-२००१ रोजी निर्गमित केले नाही. त्यांनी अशा प्रकारचे पत्र मूळात निर्गमित केले नसले तरी त्यांच्याकडील दिनांक २१-०९-२००१ रोजीच्या नोंदवहीची सत्यप्रत त्यांनी अपिलार्थीस पुरवावी. त्यांच्या अभिप्रायाच्या पृष्ठ्यर्थ पुरावा म्हणून वरील कालावधीत पाठवून द्यावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस माहिती देण्यास जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने टाळले असल्याचे निःसंशयपणे सिध्द होत नाही. याउलट अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जामध्ये आपल्या मागणीची व्याप्ती वाढवूनही, जन माहिती अधिकारी यांनी, दिनांक ०९-०६-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय दिल्यानंतर, दिनांक १९-०६-२००८ रोजी उपरोक्त माहिती अपिलार्थीस पुरविली आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक " ऊ " शी संबंधित माहिती दहा दिवसात विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद

दिनांक ०३-०८-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. हरिभजन पांडुरंग शिंदे, व्दारा - 'शुभश्री', घर नं. ९९५, एन- ६ सिडको, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, औरंगाबाद गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०६१

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. भालके लक्ष्मीकांत भुजंगराव,<br>रा. सुधाकरनगर, धनेगांव, तालुका जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपिलाचा निर्णय देण्यासाठी उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांनी टाळाटाळ केली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३१-०३-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे ग्रामपंचायत धनेगांव, विष्णुपुरी, बळीराम पावडेवाडी, तरोडा बु. व खू. या ग्रामपंचायतींना सन २००६ डिसेंबर मध्ये प्राप्त झालेल्या स्टॅम्प ड्युटीची रक्कम किती मिळाली याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक ०३-०५-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर सुनावणीसाठी हजर नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय दिला नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, स्वत: किंवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०३-०५-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, स्वतः किंवा या प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्यामार्फत, हे आदेश निर्गमीत होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०३-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भालके लक्ष्मीकांत भुजंगराव, रा. सुधाकरनगर, धनेगांव, तालुका जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०६२

निर्णय दिनांक ०३-०८-२००९

१ श्री. राजेश साईबाबा नागेश्वर, : अपिलार्थी

मु. पो. नरसी, तालुका नायगांव (खै), जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा सामाजिक वनीकरण अधिकारी, बिलोली,

तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २७-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी, विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सामाजिक वनीकरण योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या एकूण सात कामांच्या

संदर्भात पगारपत्रकाची झेरॉक्स प्रत, मजुरांची नांवे, गाव पत्तेनिहाय यादी, कामाची सद्यस्थिती व मस्टरची झेरॉक्स प्रत अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २१-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस दिनांक ०८-०५-२००८ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या आदेशानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०३-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर सुनावणीसाठी हजर नाहीत.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने केलेल्या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही माहिती पुरविली नाही. तथापि या प्रकरणाची सध्याची वस्तुस्थिती जन माहिती अधिकारी यांच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती उपलब्ध करुन देण्याचा अधिनियमाव्दारे विहित केलेला कालावधी आता व्यपगत झाला असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी विनामूल्य उपलब्ध करुन देणे भाग आहे, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत

विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. त्यांना अशीही जाणीव करुन देण्यात येत आहे की, जर आयोगाच्या अपील निर्णयानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती न मिळाल्याची तक्रार प्राप्त झाली तर जन माहिती अधिकारी यांच्याविरुध्द अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्यास आयोगास भाग पडेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस अद्यापपर्यंत न पुरविलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद

दिनांक ०३-०८-२००९

( वि. बा. बोरगे )

राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. राजेश साईबाबा नागेश्वर, मु. पो. नरसी, तालुका नायगांव (खै), जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९१८

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. सुखदेव नामदेव सावंत, : अपिलार्थी

मु. निंबोळा, पो. सिपोरा (बा.), तालुका भोकरदन,

जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उप अभियंता,

लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा कार्यकारी अभियंता,

लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, श्री. के. आर. वाकोडे, कनिष्ठ अभियंता, जालना यांच्या सन २००५ इ

२००६ या वर्षाच्या कार्यकाळात गावतलाव, जवाहर धडक विहिरी यांच्या गावनिहाय केलेल्या कामाच्या मोजमाप पुस्तिकाच्या छायांकीत प्रती व संपूर्ण ग्रामीण रोजगार योजने अंतर्गत केलेल्या गाव-तलावांच्या संबंधित मस्टर्सच्या छायांकीत प्रती, याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीने मागणी केलेली माहिती श्री. वाकोडे, कनिष्ठ अभियंता यांच्या कार्यालयात असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी श्री. वाकोडे, कनिष्ठ अभियंता यांना दिनांक ०३-१२-२००७ रोजी व दिनांक ०७-०३-२००८ रोजी पत्र लिहून अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सुचविले. तथापि त्यांनी ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जमा न केल्याने जन माहिती अधिकारी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद देऊ शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांच्याकडून विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे आपला निर्णय पारीत केला असून तो खालीलप्रमाणे आहे.

" उप अभियंता (लपावि) जिल्हा परिषद, उपविभाग जालना यांनी दिनांक १४-०३-२००८ पर्यंत आपणास माहिती न दिल्यास आपण पुढील अपिलात जाण्यास या कार्यालयाची संमती देण्यात येत आहे. "

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतरही अपिलार्थीस माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जातील अभिप्रायाप्रमाणे युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, या प्रकरणी श्री. वाकोडे, शाखा अभियंता यांच्याकडे वेळोवळी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पुरविण्या-संदर्भात पाठपुरावा केला असता श्री. वाकोडे, शाखा अभियंता यांनी जन माहिती अधिकारी यांच्या असे निदर्शनास आणले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०१-२००९ रोजीचे पत्र सादर केले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने श्री. वाकोडे, शाखा अभियंता यांनी सर्व कामाचे अभिलेखे अपिलार्थीस दाखविले आहेत व ते पाहून त्यांचे समाधान झाले आहे व यासंदर्भात अपिलार्थीची काहीही तक्रार नाही असे निवेदन दिलेले आहे. त्यामुळे अपिलार्थीचा दिनांक ०१-१२-२००७ रोजीचा प्रथम अर्ज निकाली काढण्यात यावा अपिलार्थीस या कबुलीपत्राची प्रत आयोगाने दाखविली. तथापि ते यास सहमत नाहीत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी बरोबर आणली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही प्रत्यक्षात जन माहिती अधिकारी यांच्या ताब्यात नव्हती. अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना श्री. वाकोडे, शाखा अभियंता यांच्यावर अवलंबून राहावे लागणार होते. अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी श्री. वाकोडे शाखा अभियंता यांना त्यांच्या कार्यालयातून दिनांक ०३-१२-२००७ व ०७-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या कार्यालयाकडे माहिती सादर करण्याचे सूचितही केले होते. तथापि एवढे असूनही श्री. वाकोडे, शाखा अभियंता यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती वेळोवेळी सूचना देऊनही सादर न केल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीस, त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर जन माहिती

अधिकारी यांच्या कार्यालयात केलेल्या कामाचे अभिलेखे श्री. वाकोडे यांनी दाखविल्यामुळे अपिलार्थीचे समाधान झाले आहे व यासंदर्भात त्यांची काही तक्रार नसल्याची अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना दिनांक २०-०१-२००९ रोजी लेखी कबूली दिली आहे हे पाहता, अपिलार्थीस विलंबाने माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी हे जबाबदार नसून त्यासाठी त्यांचे या प्रकरणाशी संबंधीत सहाय्यक, श्री. वाकोडे, शाखा अभियंता, ज्यांना माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५ (५) मधील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी म्हणून समजावे अशी तरतूद आहे ते, जबाबदार असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ती माहिती प्राप्त करुन घेण्याचे संपूर्ण उत्तरदायित्व अर्जदारावर असते. या प्रकरणी अपिलार्थीने अशा प्रकारचे आपले कर्तव्य पार पाडल्याचा कोणताही पुरावा आयोगास सादर केला नाही. त्यामुळे माहिती प्राप्त होण्यासाठीच्या विलंबास अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे सहय्यक हे सारखेच जबाबदार असल्याचे आयोगास दिसून येत आहे. आज रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती देण्यासाठी बरोबर आणली आहे व ते ती माहिती अपिलार्थीस व्यक्तिशः हस्तांतरीत करत आहेत, हे पाहता, विशेषतः अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील निकाली काढण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०५-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दिलेला निर्णय म्हणजे अपिलावर निर्णय कसा असू नये याचा एक उत्तम नमुना आहे, असे म्हटल्यास फारसे वावगे होणार नाही. अपिलार्थीच्या अपील अर्जावर निर्णय देतांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना आदेश देणे, अपिलार्थीचे अपील मान्य, अशतः मान्य करणे अथवा फेटाळून लावणे अशा प्रकारचे आदेश देणे आवश्यक आहे. या प्रकरणी केवळ अपिलार्थीस

व्दितीय अपील करण्यास परवानगी देणे, जे अधिनियमातील तरतुदीमध्ये मूळात अस्तित्वात नाही, अशा अर्थाचे द्वितिय अपीलाची परवानगी देण्याचे निरर्थक निर्णय देणे जन अपिलीय अधिकारी यांनी इत:पर टाळावे असे त्यांना येथे असे सूचित करण्यात येत आहे. तद्वतच ही बाब सचिव (जलसंपदा) यांच्या निदर्शनास आणून देण्यात येत असून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रथम अपिलावर कशा प्रकारे निर्णय घ्यावेत हे सूचित करणारे परिपत्रक शासन स्तरावर त्यांनी निर्गमित करावे अशा सूचना त्यांना अधिनियमातील कलम १९ (८) (क) (चार) नुसार देण्यात येत आहेत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सुखदेव नामदेव सावंत, मु. निंबोळा, पो. सिपोरा (बा.), तालुका भोकरदन, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, लघुपाटबंधारे, जिल्हा परिषद, उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे विभाग, जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात

पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९१९

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. सोमण गोविंदराव निडवदे, : अपिलार्थी
तुलसी निवास, शाहुपुरी कॉलनी, चौंडा कॉम्प्लेक्सच्या मागे,
राजीव गांधी चौक, लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
विभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)
मंडळ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस माहिती देण्यासाठी दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या आदेशाव्दारे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती न दिल्याने जन माहिती व अपिलीय अधिकारी या दोघांनाही नियमानुसार दंड व त्यांच्यावर कायदेशीर कारवाई करुन तात्काळ माहिती देण्याचे आदेश आयोगाने द्यावे अशी विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. डी. व्ही. सोंत, शाखा अभियंता, परभणी यांच्या सेवाविषयक बाबींची, ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रुजू झाल्यापासून ते दि. १२-१२-२००७ पर्यंतच्या कालावधीशी संबंधित माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. डी. व्ही. सोंत, शाखा अभियंता हे जन माहिती अधिकारी यांच्या विभागात रुजू झाल्यापासून ते नोव्हेंबर २००७ पर्यंतच्या मासिक दैनंदिनीच्या झेरॉक्स प्रती, त्यांच्या सेवापुस्तकावरुन ते शासकीय सेवेत रुजू झाल्याचा दिनांक, निलंबीत असल्यास त्याचा कालावधी विभाग व उपविभाग, गोपनीय अहवालामध्ये जोडलेल्या स्वंयमूल्यनिर्धारण अहवालामध्ये नमूद केलेली मालमत्ता - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस दिनांक २५-०३-२००८ पर्यंत माहिती देण्याचे आदेश त्यांच्या दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पारीत केले. या आदेशानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करेपर्यंत प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली असून त्यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या पत्राची प्रत त्यांनी आयोगास सादर केली आहे. अपिलार्थीस ही माहिती

निश्चितपणे पुरविल्याचा पुरावा आयोगाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असता सदर पुरावा जन माहिती अधिकारी यांना आयोगास दाखविता आला नाही. आयोगाने आज रोजीच्या सुनावणीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना दिलेल्या नोटीशीमध्ये अशा प्रकारचा पुरावा उदा. त्यांच्या कार्यालयातील आवक जावक नोंदवही, इत्यादी आयोगाकडे सादर करण्याची सूचना देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती दिल्यापृष्ठ्यर्थ कोणताही पुरावा आयोगास आज सादर केलेला नाही. यावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती दिली नसल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०९-०७-२००८ रोजीच्या पत्रान्वये पाठविलेल्या कथित माहितीचे अवलोकन करता ही माहिती (मुद्दा क्रमांक १ वगळता) अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ व्दारे अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाच्या स्वंयमूल्यनिर्धारण अहवालामध्ये नमूद केलेला मालमत्तेचा तपशील ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. तथापि सार्वजनिक प्राधिकरणातील कर्मचा-यांच्या स्वमूल्यनिर्धारण अहवालामध्ये त्यांच्या मालमत्तेचा तपशील या मुद्दयाचा समावेश नसल्याने अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबंधित माहिती ही मूळात अस्तित्वातच नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तथापि असे असूनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांच्या कार्यालयात जतन करुन ठेवली असल्याने अपिलार्थीस देता येत नाही असे कळविले, हे चुकीचे आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस नव्याने जन माहिती अधिकारी यांनी वर स्पष्ट केल्याप्रमाणे पूर्वी दिलेल्या माहितीत दुरुस्ती करुन माहिती द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. एवढेच नव्हे तर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक २६-०३-२००८ रोजीच्या आदेशानुसार दिलेल्या सूचनांचेही पालन त्यांनी विहित मुदतीत न करुन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून, कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय, वंचित ठेवल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांनी आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे याची आयोगास खात्री झाली आहे. अशा कृतीद्वारे जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना उपरोक्त प्रकरणी संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाव्दारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमा-प्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सोमण गोविंदराव निडवदे, तुलसी निवास, शाहुपुरी कॉलनी, चौंडा कॉम्प्लेक्सच्या मागे, राजीव गांधी चौक, लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२०

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. अब्दुल रहेमान इस्माईल मलंग, : अपिलार्थी
दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर,
तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप आयुक्त (सा.प्र.)संचालक नगरपालिका प्रशासन,
नगरपालिका प्रशासन विभाग, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती न देता खोटी व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याकारणाने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे उदगीर नगरपरिषदेमधील घर नं. १-३-५८-१/४ च्या संदर्भात एकूण ९ मुद्दयाव्दारे व २ उप मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध असलेली माहिती विनामूल्य पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश दिनांक १४-०२-२००८ रोजी पारीत केले. या आदेशाव्दारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील अंशतः मान्य करुन अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ मध्ये नमूद केलेली बैनाम्याची प्रत ७ दिवसाच्या आत पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हजर आणि अपिलार्थी हे गैरहजर आहेत.

अपिलार्थी प्रकृतीच्या कारणास्तव गैरहजर असून त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्राप्रमाणे निर्णय घेण्याची आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे उदगीर येथील रहिवासी असून केंद्रीय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीअंतर्गत ते जन

माहिती अधिकारी यांच्याकडे वारंवार एकाच विषयावरील माहिती मागवित असतात. आतापर्यंत त्यांनी ४७ अर्ज केले असून त्या सर्व अर्जास जन माहिती अधिकारी यांनी उत्तरे दिली आहेत. तसेच अपिलार्थी व्यक्तिशः माहितीची मागणी करतात परंतु ही माहिती घेऊन जात नाहीत अथवा सेवकाच्या हाती दिलेली माहिती घेत नाहीत व टपालाने माहिती पाठवा असे म्हणतात. प्रत्येक पत्रामध्ये कर्मचा-यांना दंड करा, निलंबीत करा अशाप्रकारची विनंती करुन त्यांना त्रास देत असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना मूळात देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ व ८ मधील उप मुद्दा 'अ' व 'ब' या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून, ती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्यामुळे देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ९ वगळता उर्वरित सर्व मुद्दयांची माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व्दारे सौ. रहमतबी भ्र. मो. इस्माईल मलंग यांनी नुरोद्दीन मलंग यांना हे दिनांक ०१-०३-९९ रोजी सदर विक्री केलेल्या भूखंडाच्या खरेदीखताची प्रत नगरपरिषदेच्या मुख्याधिका-याकडे मागितली आहे. मालमत्तेचे हस्तांतरण करीत असतांना मालकी हक्क प्रस्थापित करण्याच्या दृष्टीने अशा प्रकारच्या प्रती नगरपरिषद संबंधित नागरिकांकडून प्राप्त करुन घेत असते, त्यामुळे ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असणे अभिप्रेत आहे. जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीचा अर्ज करतेवेळी उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीचा दिनांक १७-१२-२००७ रोजीचा प्रथम अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर पाच दिवसाच्या आत अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत दुय्यम निबंधकाकडे, अपिलार्थीस यासंदर्भात माहिती देण्यासाठी, आवश्यक त्या कार्यवाहीस्तव पाठविणे आवश्यक होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कोणतीही

कार्यवाही या प्रकरणी केली नाही.  त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ६ शी संबंधित माहिती देण्याचे उत्तरदायित्व जन माहिती अधिकारी यांच्यावर येत आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ९ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस " सदरची संचिका आपण दिलेल्या विषयाशी संबंधित नाही " असे कळविले आहे, जे चुकीचे आहे.  या पत्राचा संदर्भ श्री. बांगबरे के. एम., यांनी मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर यांना उद्देशून लिहिलेल्या दिनांक ०९-०२-२००७ रोजीच्या पत्रामध्ये आढळून येत आहे.  यावरुन अपिलार्थीने मागणी केलेल्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या पत्राची प्रत म्हणजे नगरपरिषदेने श्री. बांगबरे के. एम. यांना दिलेली नोटीस असल्याचे आढळून येत आहे.  हा विषय जरी अपिलार्थीने मागणी केलेल्या विषयाशी संबंधित नसला तरीही या मुद्दयावरील माहिती  ही,  माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने अपिलार्थीस ही  माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना आवश्यक आहे.

अशा प्रकारे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती व प्रत्यक्षात त्यांना प्राप्त झालेली माहिती यांचे वरील परिच्छेदात केलेले पृथःकरण पाहता, जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ६ व ९ व्दारे मागणी केलेली माहिती देणे भाग आहे.  ही माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील अर्जात नमूद केल्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती देण्याचे टाळल्याचे, आढळून येत नाही व तसेच त्यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या कागदपत्रावरुन दिली असून त्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेली माहिती ही दिशाभूल करणारी व चुकीची कशी आहे हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता अपिलार्थीचा, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती देण्याचे टाळले व चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली हा युक्तिवाद, आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे नमूद केलेली मुद्दा क्रमांक ६ व ९ शी संबधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुल द्यावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अब्दुल रहेमान इस्माईल मलंग, दबीरपुरा, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२१

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी

रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,

तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा.प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. महारुद्र कोंडीबा चवळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित दिलेल्या अपील निर्णयाने त्यांचे समाधान न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. महारुद्र कोंडीबा चवळे यांच्या नेमणुकीसंदर्भात, जन माहिती अधिकारी यांच्याकडे पद मंजूर नसतांना कोणत्या नियमान्वये नेमणूक करण्यात आली व नेमणूक आदेश ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केली होती व यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर अपिलार्थीने दिनांक ०१-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाव्दारे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील अर्ज सादर केला होता. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अमान्य केले आहे. अपिलार्थीचे अपील त्यांनी, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असल्याचा निष्कर्ष काढून, अमान्य केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या अपील निर्णयाचे अवलोकन केले असता सदर निर्णय स्वयंस्पष्ट असल्याचे आयोगास आढळून आले आहे. तथापि अपिलार्थीचे प्रथम अपिलावरील निर्णयाने समाधान का होऊ शकत नाही याचे स्पष्टीकरण अपिलार्थीने त्यांच्या व्दितिय अपील अर्जामध्ये केलेले नाही व ते व्यक्तिशः करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर अनुपस्थित असल्यामुळे, अपिलार्थीच्या विचाराधीन अपिल अर्जावर विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास दिसून येत नाही. सबब अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२२

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगारामगौड, : अपिलार्थी
उपाध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास (महाराष्ट्र),
नांदेड, तालुका शाखा गवळीपुरा, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सहायक आयुक्त (आस्थापना),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपायुक्त (प्रशासन),
नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत्यक्षः जन माहिती अधिकारी : मराठी लघुलेखक, नगर सचिव कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : नगर सचिव, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. प्रकाश येवले

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३०-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक २१-०८-२००७ रोजीच्या केलेल्या अर्जावर उपआयुक्त यांनी माहिती देण्याचे आदेश संबंधितांना दिले. तथापि त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर माहिती अधिकारी अथवा अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणाचीही स्वाक्षरी नसल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. तसेच त्यांना दिनांक ०५-०६-२००७ रोजीच्या सभेच्या कार्यवृत्तांताची प्रत देण्यात आली नसल्याचेही त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्रात दिनांक ०५-०६-२००७ व दि. ०६.०६.२००७ रोजी प्रसिध्द झालेल्या अवैध बांधकामाच्या संदर्भातील बातमीच्या आधारे एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - आयुक्त श्री. दिपक म्हैसेकर यांनी सभागृहास दिलेल्या आश्वासनाप्रमाणे दोषी कर्मचा-यांची नांवे, त्यांच्यावर काय कार्यवाही झाली, श्री. प्रकाश येवले यांनी दिलेल्या जून व जुलै महिन्याच्या रजेच्या अर्जास मान्यता दिल्यास त्याची प्रमाणित प्रत, तसेच दिनांक ०५-०६-२००७ व दिनांक ०६-०६-२००७ रोजी झालेले ठराव व कार्यवृत्तांत, अनधिकृत बांधकामाबाबत दोषी ठरलेल्या कर्मचा-यांची नांवे, हुद्दा व वेतनश्रेणी व त्यांना दोषारोपपत्र अथवा नोटीस देण्यात आली आहे काय, दिली असल्यास त्याचे काय उत्तर आले याची प्रमाणित प्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००७ रोजी प्रतिसाद देऊन काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २३-१०-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी

यांनी दिनांक २७-११-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सदरील संचिका पाहण्यास उपलब्ध करुन देण्यासाठी व त्यातील अपिलार्थीस आवश्यक कागदपत्राच्या प्रमाणित प्रती सात दिवसात प्रमाणित करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व श्री. प्रकाश येवले यांच्या रजेच्या अर्जाची प्रमाणित प्रत उपलब्ध करुन देण्याचे आस्थापना शाखेला आदेशित केले. तथापि या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व दिलेल्या माहितीवर जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची स्वाक्षरी नसल्यामुळे त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील केल्याचे आपल्या युक्तिवादामध्ये स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगाच्या असे निदर्शनास आणून दिले की, अपिलार्थीस दिनांक ०५-०९-२००७, २१-११-२००७ व ०१-०२-२००८ रोजी त्यांनी आवश्यक माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत जो प्रथम प्रतिसाद दिला आहे तो चुकीचा असून या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीस मुद्देनिहाय माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांनी दक्षता घेतल्याचे आढळून येत नाही. तसेच अपिलार्थीस पुरविण्यात आलेल्या माहितीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी म्हणून अपिलार्थीस माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी नमूद केले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, दैनिक प्रजावाणी या वृत्तपत्रात दिनांक ०५-०६-२००७,

दिनांक ०६-०६-२००७ रोजी प्रसिध्द झालेल्या बातमीत नमूद केले असले तरी वास्तवात आयुक्त दिपक म्हैसेकर यांनी सभागृहास दोषी कर्मचा-यांच्या संदर्भात कोणतेही आश्वासन दिले नाही व दिनांक ०५-०६-२००७ व दिनांक ०६-०६-२००७ रोजी महानगरपालिकेच्या कोणत्याही सभा झाल्या नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस त्यांना माहिती देण्यास त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १, ४ व ५ शी संबंधित माहिती मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अस्तित्वात नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक २, ३ च्या संदर्भात श्री. येवले यांच्या रजेची प्रत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २१-११-२००७ रोजी व कार्यवृत्तांताची प्रमाणित प्रत जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०९-२००७ रोजी अपिलार्थीस दिली आहे व या मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, दिनांक ०५-०६-२००७ व दिनांक ०६-०६-२००७ रोजी महानगरपालिकेची नियमित सभा न होता या विषयावर फक्त चर्चा झाली व त्या चर्चेचे इतिवृत्तांत त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०१-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविले आहे. यावरुन असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांच्याकडून श्री. येवले यांच्या रजेच्या मान्यतेची प्रमाणित प्रत अपिलार्थीस त्यांनी पुरविलेली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस या प्रकरणी मुद्देनिहाय माहिती न देता प्रत्येक मुद्दयावर वेगवेगळ्या प्रकारे पत्रव्यवहार करुन अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती अयोग्य असून अपिलार्थीच्या दिनांक २३-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती एकत्रित स्वरुपात ती, मुद्देनिहाय व साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमित होताच त्यांना सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस काही माहिती जन माहिती अधिकारी यांनी विस्कळीत स्वरुपात दिली असल्याने अपिलार्थीचे अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, एकत्रित स्वरुपात मुद्देनिहाय व साक्षांकीत करुन हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बत्तिन सायन्ना गंगारामगौड, उपाध्यक्ष, भ्रष्टाचार विरोधी जनआंदोलन न्यास (महाराष्ट्र), नांदेड, तालुका शाखा गवळीपुरा, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मराठी लघुलेखक, नगर सचिव कार्यालय, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा नगर सचिव, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२३

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. दीपक पिराजी सातोरे, : अपिलार्थी

रा. प्रभातनगर, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर,

तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर,

तालुका भोकर, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष :

१. तुळशीराम गंगाराम पोकलवार

२. श्री. लक्ष्मण देवीदास उतरवार

३. श्री. विष्णू लक्ष्मण सोमेवाड

४. श्री. एकनाथ गुंडाप्पा महाजन

५. मे. व्यंकटेश ऑईल एजन्सी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी पाच अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यांच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता त्यांनी अपिलार्थीस जाणुनबुजून माहिती पाठविली नाही. त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांनीही अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन २००० ते ३१ डिसेंबर २००७ या आठ वर्षाशी संबंधित सर्व अर्धघाऊक केरोसीन विक्रेत्यासंदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - शासनाकडून अर्धघाऊक विक्रेत्यांना वितरित केलेल्या केरोसीनचा महिनेवारी तपशील, त्यांना सलग्न असलेले किरकोळ परवानेधारक यांना वितरित केलेल्या केरोसीनचा महिनेवारी तपशील, स्टॉक रजिस्टर सत्यप्रत, तसेच सर्व किरकोळ रॉकेल हॉकर्स व स्वस्त धान्य दुकानदार यांच्या रॉकेल रजिस्टरची सत्यप्रत - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे लागणारे शुल्क रुपये १२,४०० इतके त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडे जमा करण्याचे सूचित केले. सदर पत्र त्यांनी अपिलार्थीस पाठविल्याचा योग्य तो पुरावा आयोगाकडे सादर केला आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीने या शुल्काचा भरणा न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार यांच्याकडे दिनांक २८-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २६-०५-२००८ रोजी प्रथम सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीस अपिलार्थी हे गैरहजर राहिले. त्यांनी ही सुनावणी परत दिनांक ०२-०६-२००८ रोजी ठेवली होती तथापि याही सुनावणीस अपिलार्थी गैरहजर राहिले. या सुनावणीमध्ये जन अपिलीय

अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जमा केल्यानंतर १५ दिवसाच्या आत अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. जन अपिलीय अधिकारी यांनी हा निर्णय साध्या टपालाने अपिलार्थीस पाठविल्याप्रीत्यर्थ आवश्यक तो पुरावा सादर केला आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती आणि अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे आजही तयार असून ते अपिलार्थीस ती सशुल्क पुरविण्यास तयार आहेत. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरले नसल्याने अपिलार्थीस माहिती देणे शक्य झाले नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीचा दिनांक २७-०२-२००८ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षात दिनांक ०३-०३-२००८ रोजी प्राप्त झाला असून अपिलार्थीच्या प्राप्त अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत त्यांच्याकडील दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क जमा करण्याचे सुचविले होते. या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस शुल्काचा तपशीलही दिला आहे. परंतु या संपूर्ण घटनाक्रमामध्ये अपिलार्थीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क भरण्याची कोणत्याही टप्प्यावर तयारी दर्शविली नाही. त्यांचे म्हणणे मांडण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २६-०५-२००८ रोजी सुनावणीसाठी उपस्थित राहण्याची सूचना देऊनही अपिलार्थी या सुनावणीसाठी अनुपस्थितीत राहिले.तसेच आज रोजी देखील आयोगाच्या सुनावणीसाठी अपिलार्थी हे उपस्थित

नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रय रेषेखालील व्यक्ती नसल्याचे नमूद केले आहे. त्यामुळे त्यांना या प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार काही माहिती आवश्यक असल्यास त्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे करणे भाग होते. तथापि त्यांनी अशा प्रकारची कृती न केल्यामुळे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत माहिती न मिळण्यासाठी अपिलार्थीच जबाबदार असल्याचे दिसून येते त्यामुळे अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. दीपक पिराजी सातोरे, रा. प्रभातनगर, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२४

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. कैलास नारायण वल्लाकट्टी, : अपिलार्थी
रा. शिवाजी पुतळा, रेस्ट हाऊस परिसर, कोठारी
बंगल्यासमोर, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता त्यांना जन अपिलीय अधिकारी यांच्या-कडून निर्णय प्राप्त झालेला नाही व जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांनी मागणी केलेली माहिती अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०९-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे कर्नाटक सेकेंडरी एज्युकेशन एक्झामिनिशन बोर्ड, बँगलोर तर्फे घेतल्या जाणा-या हिंदी शिक्षक (बी.एड च्या समकक्ष) परीक्षेच्या प्रमाणपत्रानुसार सन २००३ ते दि. ०९-

०२-२००८ या कालावधीतील नियुक्ती दिलेल्या शिक्षकांच्या वैयक्तीक मान्यतेच्या व सेवा सातत्य मान्यतेच्या प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध न झाल्याने ते अपिलार्थीस कोणतीही माहिती पुरवू शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले असता मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांनी त्यांच्याकडील पत्र दिनांक ३१-०३-२००८ अन्वये अपिलार्थीस शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांच्याकडे संपर्क साधण्याचे सूचित केले. संबधित जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या मूळ अर्जातील माहिती त्यांना आवश्यक असल्याचा युक्तिवाद आयोगासमोर केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत त्यांच्याकडे उपलब्ध झालेली नाही. तथापि आयोगाच्या व्दितीय अपील सुनावणीचे पत्र त्यांना प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस ज्या माहितीची आवश्यकता आहे ती माहिती त्यांना प्रथमतः ज्ञात झाली. या माहितीच्या अनुषंगाने त्यांनी त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्याची पडताळणी केली असता कर्नाटक माध्यमिक शिक्षण परीक्षा मंडळ, बँगलोर यांच्या हिंदी शिक्षक प्रमाणपत्राच्या आधारे त्यांच्या कार्यालयामार्फत कोणत्याही शिक्षक कर्मचा-यास मान्यता देण्यात आलेली नाही, त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती निरंक असल्याचे आढळून आले आहे व तसे त्यांनी अपिलार्थीस दिनांक ०३-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपाची आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीमध्ये त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीच्यासंदर्भात कोणत्याही शिक्षण संस्थेचा अथवा शिक्षकाच्या नावाचा उल्लेख केला नसल्याने त्यांनी मागणी केलेली माहिती ही मोघम असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे अपिलार्थीस असे स्पष्ट करण्यात येते की, त्यांना जर एखाद्या शिक्षण संस्थेमध्ये शिक्षणाधिकारी यांनी कनार्टक परीक्षा मंडळाच्या आधारे दिलेल्या नियुक्तीसंदर्भात मान्यता दिली असेल तर त्यांनी त्याचा उल्लेख करुन जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळया अर्जाद्वारे माहिती मागावी. विचाराधीन अपील प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती मोघम स्वरुपाची आहे व जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे कोणत्याही शिक्षकाच्या नेमणुकीस मान्यता दिली नसल्याचे अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०३-०८-२००९ रोजीच्या पत्राव्दारे कळविले आहे, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. कैलास नारायण वल्लाकट्टी, रा. शिवाजी पुतळा, रेस्ट हाऊस परिसर, कोठारी बंगल्यासमोर, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२५

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. शिंगाडे अंन्सीराम बापूराव, : अपिलार्थी
व्दारा श्री. राम लांडे, होळकर नगर, अंबड, तालुका अंबड,
जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०८-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसामध्ये माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. सुनावणीमध्ये संपूर्ण माहिती देण्याचे बंधनकारक केले असतांनाही अपूर्ण माहिती देऊन जन माहिती अधिकारी यांनी त्यांची दिशाभूल केल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १४-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रामधील सन २००६ ते २००७ या कालावधीतील रोजगार हमी योजनेमार्फत केलेल्या चार जोडरस्त्याच्या कामाशी संबंधित मजुरांचे मस्टर्स, मोजमाप-पुस्तिका, बँक पासबुक व गहु वाटप पासेसची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले असता, अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०४-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस दिनांक २५-०४-२००८ पर्यंत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २५-०४-२००८ रोजी अपिलार्थीस त्यांच्याकडील अपिलार्थीने मागणी केलेल्या कामाशी संबंधित मजुरांच्या हजेरीपत्रकाच्या व मोजमापपुस्तिकेच्या सत्यप्रती विनामूल्य पुरविल्या. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस पूर्णतः दिनांक २५-०४-२००८ रोजी पुरविली असून या माहितीमध्ये अपिलार्थीने मागितलेल्या गव्हाच्या कुपनाच्या व मजुरांच्या पासबुकाच्या प्रती ही माहिती नसल्यामुळे अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी वाटते. तथापि अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केल्यानंतर त्यांनी अपिलार्थीस रोजगार हमी योजने अंतर्गत गव्हाच्या कुपनाचे वाटप केले जात नसल्याचे व तसेच रोजगार हमी योजनेअंतर्गत

मजुरांचे पासबुक जन माहिती अधिकारी यांच्याकडे ठेवण्याची पध्दत प्रचलीत नसल्याची कल्पना, दिनांक ०८-०५-२००८ रोजी दिली. जन माहिती अधिकारी यांनी वस्तुस्थिती स्पष्ट केल्यानंतर अपिलार्थीचे समाधान झाले असल्याचे अपिलार्थीने त्यांना दिनांक १५-०५-२००८ रोजी लेखी लिहून दिले आहे. या पत्राची प्रत त्यांनी आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस पुरविलेली माहिती त्यांना अपुरी व दिशाभूल करणारी का वाटते याचे विवेचन जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये केले आहे. जन माहिती अधिकारी यांच्या-कडून प्राप्त झालेली माहिती दिशाभूल करणारी कशी नाही हे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १५-०५-२००८ रोजी पटवून दिले आहे आणि जन माहिती अधिकारी यांचे स्पष्टीकरण अपिलार्थीस मान्य झाल्याने त्यांचे समाधान झाले असल्याचे त्यांनी दिनांक १५-०५-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे लेखी कबूल देखील केले आहे. हे पाहता अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याबद्दल जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील खारीज करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक ०४-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शिंगाडे अंन्सीराम बापूराव, व्दारा - राम लांडे, होळकर नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२६

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. गोविंद मारोतराव कराळे,<br>मु. पो. शिराढोण, तालुका कंधार, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा मुख्याध्यापक, श्री. भीमाशंकर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, शिराढोण, तालुका कंधार, जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०७-२००७ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहितीची मागणी करुन विहित मुदतीत माहिती उपलब्ध करुन न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये संबंधितावर दंडात्मक कारवाई करण्याची त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या भविष्यनिर्वाह निधीच्या संदर्भात एकूण दोन मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी २७-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहिती ही दिशाभूल करणारी वाटल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे दिनांक १९-०४-२००७ रोजी प्रथम अपील केले असता त्यांनी यावर कोणताही निर्णय दिला नाही. अशा प्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांचे वतीने ॲडव्होकेट श्री. ए. जे. देशपांडे हजर व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी हे गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या वकिलाने अपिलार्थीस दिनांक २७-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे माहिती पुरविल्याचे आयोगास अवगत केले. तथापि अपिलार्थीने त्यांच्या दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती सुसंगत नाही. त्यामुळे या टप्प्यावर या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांनी प्रथमतः सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे इष्ट राहील, असे आयोगास वाटते.

सबब शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड तथा जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे, व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड तथा जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक १९-०४-२००७ रोजीच्या अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपले आदेश पारीत करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोविंद मारोतराव कराळे, मु. पो. शिराढोण, तालुका कंधार, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्री. भीमाशंकर माध्यमिक व उच्च माध्यमिक शाळा, शिराढोण, तालुका कंधार, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२७

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. भिमराव हरी नरवाडे, अपिलार्थी
अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वयंरोजगार सेवा
सहकारी संस्था, म. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
अधिकारी कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प
कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे दिनांक ०३-०५-२००८ रोजीचे आयोगाकडे दिनांक ०७-०५-२००८ रोजी नोंदणी झालेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी आणि अपिलार्थी गैरहजर आहेत.

या अपिलासंदर्भात अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०३-०८-२००९ रोजीचे पत्र आयोगास फॅक्सव्दारे प्राप्त झाले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०८-०८-२००८ रोजी दिलेल्या माहितीमुळे त्यांचे समाधान झाले आहे व याबाबत आता त्यांचे कोणतेही मत नाही.

अपिलार्थीने लिहिलेल्या या पत्रावरुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून पूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने यासंदर्भात अपिलार्थीची कोणतीही तक्रार नसल्याचे अनुमान काढण्यात येत आहे व अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ९२७/२००८, दिनांक ०७-०५-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. भिमराव हरी नरवाडे, अध्यक्ष, डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्वयंरोजगार सेवा सहकारी संस्था, म. गोकुंदा, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक प्रकल्प अधिकारी (शिक्षण), एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प कार्यालय, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/९२८

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. गजानन बापुराव काळे, : अपिलार्थी
मु. मरडगा, पो. कोळी, तालुका हदगांव,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मरडगा,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव,
तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्याने व अद्यापही संबंधित ग्रामसेवक माहिती देण्यास टाळाटाळ करीत असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित दिनांक ०१-१०-२००५ ते १२-०२-२००८ या कालावधीतील विस्तृत स्वरुपाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीशी वारंवार संपर्क साधूनही त्यांचा अपिलार्थीशी संपर्क होऊ शकला नसल्याचे कळविले व अपिलार्थीस ही माहिती देण्यासाठी त्यांना दीड महिन्याचा कालावधी लागेल असे अपिलार्थीस अवगत केले. जन माहिती अधिकारी यांनी दीड महिन्याचा कालावधी लागेल असे आश्वासित करुनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न

झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक २८-०४-२००८ रोजी आपला निर्णय पारीत करुन जन माहिती अधिकारी हे या प्रकरणी अपिलार्थीस माहिती न पुरविण्यासाठी दोषी आहेत असा निर्णय दिला. मात्र या निर्णया-मध्ये अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांनी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश दिले नाहीत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना पूर्ण माहिती हवी असल्याचा युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांच्याशी संपर्क साधला नाही, असे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही विस्तृत स्वरुपाची व मोठ्या व्याप्तीची अशी आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यास दीड महिन्याचा कालावधी लागेल असे प्रथमतः अवगत केले होते. आज रोजी व्दितीय अपील सुनावणीच्या वेळी देखील जन माहिती अधिकारी यांच्याकडे ती माहिती तयार नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदीनुसार देय असल्याने त्यांना ती अपिलार्थीस विहित मुदतीत देणे अनिवार्य होते. तसेच अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुन ते, त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे गेल्याचा कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगास सादर केलेला नाही. ही वस्तुस्थिती पाहता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित सात दिवसाच्या आत विनामूल्य व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव यांनी उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच आयोगाने निर्णयामध्ये विहित केलेला कालावधीमध्ये अपिलार्थीस संपूर्ण माहिती विनामूल्य उपलब्ध करुन देतील असे पहावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

# <u>आदेश</u>

१.	अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित सात दिवसाच्या आत विनामूल्य व दोन त्रयस्थ साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी.

औरंगाबाद						( वि. बा. बोरगे )

दिनांक	०४-०८-२००९				राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१	श्री. गजानन बापुराव काळे, मु. मरडगा, पो. कोळी, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२	जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, मरडगा, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३	जन अपिलीय अधिकारी तथा विस्तार अधिकारी (पंचायत), पंचायत समिती, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४	गट विकास अधिकारी, पंचायत समिती, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७४२

निर्णय दिनांक ०४-०८-२००९

१ श्री. गणेश मुकाजी टेंभुर्णीकर, : अपिलार्थी
रा. गौरव अपार्टमेंट, गोळेगांवकर कॉलनी, फ्लॅट नं. १०,
रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
जिल्हाधिकारी कार्यालय तथा दंडाधिकारी, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उपविभागीय जिल्हाधिकारी तथा जिल्हा दंडाधिकारी,
औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद
जन अपिलीय अधिकारी : उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०५-२००८ रोजी फेरनोंदणी केलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी ३०० लोकांच्या स्वातंत्र्य हक्कावर गदा आणली आहे व त्यांनी दाखल केलेले अपील योग्य आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, श्री. नंदलाल गुणवाणी यांनी मौजे भावसिंगपुरा येथील सर्वे नंबर २९/१ या सरकारी जमिनीतील दिनांक ०८-१२-१९८० रोजी प्लॉट नंबर ३८ क्षेत्रफळ ५० x ६० चौरस फूट त्यांना व इतर ३०० लोकांना प्लॉट विक्री केली. सदरील जमीन सरकारी परंपीक गायरान (ग्रीन झोन) असतांना ती विकता येत नाही तेव्हा सदर व्यक्तीने त्यांची व शासनाची फसवणूक केल्याने त्यांच्यावर फौजदारी करावी म्हणून अपिलार्थीने दिनांक २०-०४-२००१ ला तहसीलदार, औरंगाबाद यांना अर्ज दिला, तरीही श्री. नंदलाल गुणवाणी यांच्यावर फौजदारी केस का दाखल झाली नाही, ही माहिती मागितली आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०५-०२-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाव्दारे उपस्थित केलेल्या प्रश्नासंदर्भात आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०७-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १६-०७-२००७ रोजीच्या पत्राव्दारे, त्यांनी प्रश्नार्थक स्वरुपाची माहिती विचारली आहे व प्रश्नार्थक स्वरुपात माहिती देण्याची तरतूद कायद्यात नाही, असे अपिलार्थीस समजावून सांगितले व अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीसाठी त्यांनी तहसीलदार, औरंगाबाद यांच्याकडे रुजू होऊन या प्रकरणाशी संबंधित अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती व कागदपत्रे तपासावीत असेही सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०४-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना, त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करतांना आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली जमीन सर्वे नंबर २९/१ मधील क्षेत्र १३ एकर ३८ गुंठे व पोट खराब १ एकर असे क्षेत्र १४ एकर ३८ गुंठे महसूल रेकॉर्डप्रमाणे ७/१२ वर अस्तित्वात असून ही जमीन शासकीय गायरान नसून ती नंदलाल गुणवानी यांच्या वैयक्तीक मालकीची आहे. अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे ती जमीन शासनाच्या मालकीची नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १८-०१-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदी-नुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या कृतीबद्दल अथवा निर्णयाबद्दलची कारणे अथवा स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारणे अनुज्ञेय नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास त्यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीस जर महसूल विभागातर्फे श्री. नंदलाल गुणवाणी यांच्यावर कार्यवाही का केली नाही हे जाणून घ्यावयाचे असेल तर त्यांनी या प्रकरणी तहसीलदार, औरंगाबाद यांच्या कार्यालयात जाऊन या प्रकरणाशी संबंधित नस्तीची पाहणी करुन आपला निष्कर्ष काढणे योग्य राहील, असे अपिलार्थीस सुचविण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०४-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गणेश मुकाजी टेंभुर्णीकर, रा. गौरव अपार्टमेंट, गोळेगांवकर कॉलनी, फ्लॅट नं. १०, रेल्वे स्टेशन रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८४९

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. प्रबुध्दकुमार शिवाजीराव बनसोडे, अपिलार्थी
प्लॉट क्रमांक ११, न्यू नंदनवन कॉलनी,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण,
तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी,
जिल्हा परिषद, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक २८-११-२००८ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांच्यातर्फे आयोगास सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जिल्हा परिषदेच्या संबंधित कार्यालयाकडून त्यांनी मागणी केलेली माहिती मिळाली असल्याने त्यांचे दिनाक २५-११-२००८ रोजी आयोगाकडे केलेले व्दितीय अपील ते मागे घेत आहेत.

खुद्द अपिलार्थीने आयोगाकडे केलेले त्यांचे विचाराधीन व्दितीय अपील आता मागे घेतले असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८४९/२००८, दिनांक २५-११-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. प्रबुध्दकुमार शिवाजीराव बनसोडे, प्लॉट क्रमांक ११, न्यू नंदनवन कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, पैठण, तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५०

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. सर्जेराव राधेबा मनोरे, अपिलार्थी
रा. रेल्वे स्टेशन उड्डाणपूलाजवळ, जहागीरदार
कॉलनी, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम
विभाग, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम
मंडळ, औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : शाखा अभियंता श्री. बिरारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास दिनांक ०४-०७-२००९ रोजी लिहिलेले त्यांचे पत्र सादर करण्यात आले असून या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील क्रमांक ८५०/२००८ हे मागे घेत असल्याचे नमूद केले आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आज रोजी विचाराधीन व्दितीय अपील मागे घेतले असल्यामुळे अपिलार्थीचे अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८५०/२००८, दिनांक ०३-०४-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. सर्जेराव राधेबा मनोरे, रा. रेल्वे स्टेशन उड्डाणपूलाजवळ, जहागीरदार कॉलनी, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५१

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. फकिरचंद केदारी खंडेकर, : अपिलार्थी

मु. पो. टेभूर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याध्यापक, श्रीमती जमनाबाई बाळाराम काबरा

विद्यालय, टेंभूर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा सचिव, नवभारत शिक्षण संस्था, टेंभूर्णी,

तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मूळ माहितीसाठीच्या अर्जाव्दारे मागितलेली माहिती संबंधितांनी न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०२-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, नवभारत शिक्षण संस्था, टेंभूर्णी यासंदर्भात व त्यांच्या शाळेच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून

व्यक्तिशः अपेक्षिली होती. तथापि अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न प्राप्त झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपील अपिलार्थीने सचिव, नवभारत शिक्षण संस्था, टेंभूर्णी यांच्याकडे केले होते. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता, अपिलार्थीच्या संबंधित संस्थेकडे प्राप्त झालेल्या दिनांक १३-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे गरजेचे आहे असे आयोगास वाटते. आता शिक्षण संचालनालयाचे आदेश क्रमांक संकीर्ण/केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र.(८)६०३७, दिनांक २६-११-२००७ अन्वये शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांची या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्याने अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच आठ दिवसाच्या आत त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जासह पाठवावी. अपिलार्थीच्या दिनांक ०५-०६-२००८ रोजीच्या मूळ अपील अर्जाची प्रत आवश्यक त्या सहपत्रासह जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या प्रकरणी झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन ३० दिवसाच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या आदेशाने समाधान न झाल्यास अपिलार्थी माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी

यांचा निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांनी अपिलार्थीचा दिनांक ०५-०६-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर ३० दिवसाच्या आत, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश पारित करावेत.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. फकिरचंद केदारी खंडेकर, मु. पो. टेंभूर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, श्रीमती जमनाबाई बाळाराम काबरा विद्यालय, टेंभूर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ सचिव, नवभारत शिक्षण संस्था, टेंभूर्णी, तालुका जाफ्राबाद, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५२

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. राम रुस्तुमराव लांडे, : अपिलार्थी

रा. होळकर नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,

जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय,

जालना

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून तीस दिवसामध्ये माहिती न मिळाल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अडीच महिन्याचा कालावधी व्यपगत होऊनही अपील घेण्यासाठी जन अपिलीय अधिकारी यांनी टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर यासंदर्भात असा खुलासा सादर केला की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २५-०७-२००८ रोजीच्या अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक १९ व २० डिसेंबर रोजी महाराष्ट्र विधान मंडळ रोजगार हमी योजना समितीच्या विभागीय बैठकीत जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे जालना जिल्ह्यातील प्रलंबित गैरव्यवहार प्रकरणाशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचा कालावधी २००२ ते २००८ असा असून अपिलार्थीने या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे विभागीय बैठकीमध्ये महसूल आयुक्त औरंगाबाद यांच्यामार्फत करण्यात आलेल्या पुस्तकातील काही पृष्ठ क्रमांकाचा संदर्भ देऊन त्या प्रश्नावर झालेल्या चौकशीसंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या दिनांक २५-०७-२००८ रोजीच्या अर्जास त्यांनी त्यांच्याकडील दिनांक ३०-०८-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती घेऊन जाण्याबाबत सूचित केले होते. तथापि अपिलार्थीने त्यांच्या कार्यालयात हजर राहून माहिती प्राप्त करुन घेतली नाही व आयोगाकडे दिनांक १६-११-२००८ रोजी व्दितीय अपील सादर केले. यानंतर अपिलार्थी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये दिनांक २०-०७-२००९ रोजी हजर राहिले असता त्यांना आवश्यक असलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतली. या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे तशी दिनांक २०-०७-२००९ रोजी कबूली देखील दिली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक २०-०७-२००९ रोजीचे पत्र जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले आहे. यावरुन अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे आढळून येत आहे.आयोगाकडे केलेल्या द्वितिय अपील

अर्जामध्ये प्राप्त माहितीवर अपिलार्थीचे कोणतेही भाष्य नाही. या अर्जामध्ये अपिलार्थीने फक्त, त्यांना माहिती मिळाली नाही एवढीच बाब नमूद केली आहे परंतु अपिलार्थीस आवश्यक माहिती दिल्याचे जन माहिती अधिकारी यांनी आयोगासमोर पुराव्यासह सिध्द केले आहे.

आज रोजी जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. यावरुन अपिलार्थीस या प्रकरणाची संपूर्ण माहिती मिळाल्याचे अनुमान काढण्यात येऊन अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या विचाराधीन अपिलावर नव्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अशा परिस्थितीत अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. राम रुस्तुमराव लांडे, रा. होळकर नगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा उपजिल्हाधिकारी (रोहयो), जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५३

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. चंद्रकांत बी. के. : अपिलार्थी

साठेनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा वनक्षेत्रपाल, वन विभाग, वनपरिक्षेत्र कार्यालय, जालना

२ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (राहयो), : प्रतिवादी

जालना

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उत्तर)

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-१०-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर दिनांक ०९-०७-२००८ रोजी सुनावणी घेऊन अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना आदेशित करुनही त्यांनी अद्यापपावेतो अपिलार्थीस माहिती दिली नाही. त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याकरिता ते कार्यालयात गेले असता जन माहिती अधिकारी हे गैरहजर होते व एक वेळ भेट झाली असता 'माहिती मिळत नाही जा' असे उध्दट उत्तर देऊन माहिती देण्यास जन माहिती

अधिकारी यांनी टाळल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व या अपील अर्जामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०७-०५-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक ०१-०१-२००८ ते ३१-०३-२००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यालयातर्फे रोजगार हमी योजने अंतर्गत केल्या गेलेल्या वनतलाव व विविध कामांची माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - दिनांक ०६-०५-२००८ ते ०५-०६-२००८ पर्यंत रोजगार हमी योजने अंतर्गत जन माहिती अधिकारी यांनी केलेले वन तलाव व विविध कामावरील मजुरांचे हजेरीपत्रक, धान्य वाटप रजिस्टरच्या छायांकीत प्रती, रोजगार हमी योजनेचा प्राप्त निधी व खर्च केलेला निधी - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने व विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०९-०७-२००८ रोजी आपला निर्णय देऊन या निर्णयाव्दारे अपिलार्थीस दिनांक २१-०७-२००८ पर्यंत माहिती पुरविण्याचे त्यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस ही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक २१ जुलै २००९ पासून कार्यरत आहेत. या अर्जासंदर्भात अपिलार्थीचे, त्यांच्या पूर्वी कार्यरत असलेल्या जन

माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने लिहून दिलेले दिनांक १०-०५-२००९ रोजीचे पत्र प्राप्त झाले असून या पत्रात अपिलार्थीने त्यांना माहितीच्या झेरॉक्स प्रती घेण्याची आवश्यकता वाटत नसल्याचे व तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. भालेराव यांनी दाखविलेल्या माहितीने त्यांचे समाधान झाल्याचे लिहून दिले आहे, त्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात यावे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी यांचा, अपिलार्थीस त्यांच्या पूर्वीच्या अधिका-याने माहिती दाखविली, ही माहिती पाहून अपिलार्थीचे समाधान झाले व आता त्यांची कोणतीही तक्रार नाही हा केलेला युक्तिवाद, अमान्य करण्यात येत आहे. कारण अपिलार्थीने वनक्षेत्रपाल, जालना श्री. भालेराव यांना दिनांक १०-०५-२००९ रोजीच्या लिहिलेल्या पत्रामध्ये अपिलार्थीच्या आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपिलाचा अथवा माहितीसाठी-च्या प्रथम अर्जाचा कोणताही उल्लेख अथवा संदर्भ या पत्रामध्ये नाही. त्यामुळे हेच पत्र जन माहिती अधिकारी त्यांच्याकडे अपिलार्थीच्या माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जाच्या संदर्भात ते आयोगास दाखवू शकतात. अशा प्रकारचे सर्वसाधारण व संदर्भहीन स्वरुपाचे पत्र ज्यामध्ये विचाराधीन अपिलाचा अथवा प्रथम अर्जाच्या वस्तुस्थितीबाबत कोणताही उल्लेख नाही, आयोगास याप्रकरणी विचारात घेणे आवश्यक वाटत नाही.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीच्या केलेल्या प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये काही माहिती मोघम स्वरुपाची असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे " विविध केलेल्या कामाची माहिती " अशा प्रकारची माहिती मागितली आहे. ती माहिती मोघम स्वरुपाची असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्यांनी मागणी केलेली माहिती फक्त वन तलावाशी संदर्भित असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या कालावधीमधील त्यांच्या कार्यालयातील रोजगार हमी योजने अंतर्गत

केलेल्या  वन तलावाच्या कामासंबंधात अपिलार्थीने प्रथम अर्जामध्ये वेगवेगळया मुद्दयावर जन माहिती अधिकारी यांच्याकडे  मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीनंतर ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती.  तथापि त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तिशः किती वेळा उपस्थित राहिले यासंदर्भातील कोणताही पुरावा आयोगाकडे दाखल केलेला नाही.  माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ही माहिती प्राप्त करुन घेईपर्यंतची संपूर्ण जबाबदारी अर्जदार यांची असते.  प्रस्तुत प्रकरणी अपिलार्थीने अशा प्रकारे जबाबदारी व्यवस्थित पार पाडल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही तसेच यासंदर्भात युक्तिवाद करण्यासाठी अपिलार्थी आज आयोगासमोर उपस्थित नाहीत, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीपासून ही माहिती हेतूतः दडवून ठेवली होती किंवा कसे हे कळण्यास आयोगास मार्ग नाही, ही वस्तुस्थिती पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करण्याचे आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१.	अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२.	जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांच्या मूळ अर्जातील वन तलावाच्या कामाची माहिती  हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या

आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य देय असणार नाही.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. चंद्रकांत बी. के. साठेनगर, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, जालना (उत्तर) यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५४

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. मधुकर नवनाथ बिडवे, : अपिलार्थी

रा. हिंगणगाव (खु.), तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम,

तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा जिल्हाधिकारी, उस्मानाबाद

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दिनांक ०३-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी तत्कालीन उपविभागीय अधिकारी, भूम श्री. एच. व्ही. आरगुंडे यांच्याकडून मागवून न घेताच अपिलार्थीस चुकीची व दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम १५५ खालील दोन प्रकरणातील निकालाच्या तफावतीबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मौजे कंडारी, तालुका परंडा येथील सर्व्हे नंबर २८६ व सर्व्हे नंबर २७ (१) व २७ (२) मधील दोनही प्रकरणी वस्तुस्थिती एकसारखी असतांना व एकाच अधिका-याने यासंदर्भात दोन पक्षकारांना निर्णय देतांना वेगवेगळा न्याय कसा दिला याची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात आवश्यक ती वस्तुस्थिती अवगत करुन दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील नामंजूर केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर व अपिलार्थी आणि जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास या प्रकरणाची वस्तुस्थिती अवगत करुन दिली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील

अर्जामध्ये आयोगास तत्कालीन उपविभागीय अधिकारी, भूम श्री. एच. व्ही. आरगुंडे यांच्याकडून त्यांनी अर्धन्यायिक प्रकरणातील दिलेल्या निर्णयाच्या विसंगतीबाबतची माहिती घेऊन ती अपिलार्थीस पुरविण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि मूळात आयोगाचे कार्य हे त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार प्राप्त होणा-या माहितीच्या अपील अर्जासंदर्भात आदेश पारीत करण्यापुरते सीमित आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती घेऊन ती आयोगाने अपिलार्थीस पुरविणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे श्री. एच. व्ही. आरगुंडे यांनी एकसारख्या प्रकरणात दोन वेगवेगळे निर्णय कसे काय दिले अशा प्रकारची माहिती मागविली आहे. अशा प्रकारची माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीत समाविष्ट होणारी नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती त्यांनी अर्जदारास देणे या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या कृतीबद्दलची किंवा निर्णयाबाबतची कारणे, स्पष्टीकरणे अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित करणे आणि जन माहिती अधिकारी यांनी अशा प्रकारे स्पष्टीकरणे अथवा त्यांचे अभिप्राय अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाहीत. अपिलार्थीस जर श्री. एच. व्ही. आरगुंडे तत्कालीन उपविभागीय अधिकारी, भूम यांच्या निर्णयाबद्दल काही आक्षेप असतील तर त्या आक्षेपांचे निराकरण ते सक्षम महसूल यंत्रणेकडे जाऊन अथवा दिवाणी न्यायालयात जाऊन करु शकतात.

वरील परिच्छेदात नमूद केलेली वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील, मूळात त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने, फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## **आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. मधुकर नवनाथ बिडवे, रा. हिंगणगाव (खु.), तालुका परंडा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी (महसूल), भूम, तालुका भूम, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५५

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, : अपिलार्थी
मु. पो. मंगरुळ, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग,
माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक २, बीड

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०३-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस, त्यांनी आयोगाकडे व्दितीय अपील अर्ज करेपर्यंत पूर्ण माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे. या अपील अर्जामध्ये त्यांनी शासकीय माहिती अधिकारी यांच्यावर कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई व्हावी आणि त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना

विनामूल्य देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करावे अशी आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २०-०९-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील त्यांच्या कार्यालयाअंर्तगत रोजगार हमी योजनेच्या कामासंदर्भात सन २००५ ते दि. २०-०९-२००७ पर्यंतच्या कालावधीतील काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुरविली व  हजेरीपत्रकाच्या  फोटो प्रतीसाठी अपिलार्थीस एकूण ८९६ रुपये इतके शुल्क त्यांच्या कार्यालयाचे भरण्याचे सूचित केले.  जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या पत्राच्या अनुषंगाने अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे जन माहिती अधिकारी यांना त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीपैकी मंगरुळ नं. १ ते घाटूळ वस्ती व रामपिंपळगांव ते बापमारे वस्ती (मंगरुळ नं. २) या दोन रस्त्यासंदर्भातील माहितीसाठी लागणारे शुल्क अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना कळविण्याची विनंती केली.  त्याप्रमाणे याबाबतची माहिती देण्यासाठी एकूण ३४ रुपये इतके शुल्क आवश्यक असल्याचे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या पत्राव्दारे कळविले.  त्याप्रमाणे अपिलार्थीने दिनांक १२-११-२००७ रोजी या शुल्काचा भरणा करुन त्यांना देय असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेतली.  तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १९-११-२००७ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-१२-२००७ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश दिनांक ०८-०१-२००८ रोजी पारीत केले.  या आदेशामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीने

त्यांच्या मूळ अर्जामध्ये मुद्दा क्रमांक ३ व ६ व्दारे मागणी केलेली माहिती अपिलार्थीस पुन्हा तपासून देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयानंतर जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०१-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आवश्यक ती कार्यवाही केली. तथापि प्राप्त माहिती अपूर्ण असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दिनांक १८-१०-२००७ व दिनांक ०१-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पूर्ण प्रतिसाद दिला आहे व अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडून आवश्यक त्या शुल्काचा भरणा करुन घेऊन गेले आहेत. अपिलार्थीस त्यांनी दिलेली माहिती ही अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्यास्तव व्दितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या प्रकरणी प्राप्त झालेली माहिती ही अपूर्ण कशी आहे व त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती मिळणे बाकी आहे याचा खुलासा करण्यासाठी अपिलार्थी आज रोजी आयोगासमोर उपस्थित नाहीत किंवा अप्राप्त माहितीचा स्पष्ट उल्लेखही त्यांनी द्वितिय अपिल अर्जामध्ये केलेला नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता ती सकृतदर्शनी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सुसंगत असल्याचे

दिसून येते. ही वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. नारायण ग्यानबा बापमारे, मु. पो. मंगरुळ नं. १, तालुका माजलगांव, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप अभियंता, जिल्हा परिषद (बांधकाम) उपविभाग, माजलगांव, तालुका माजलगांव, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग क्रमांक २, बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५६

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. सय्यद वजीर सय्यद अहमद, : अपिलार्थी
रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर,
तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : १. श्री. कुरेशी
२. श्री. गोविंद शिनगारे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १०-०३-२००८ रोजीच्या आदेशान्वये अपिलार्थीस मुदतीत माहिती देण्याच्या जन माहिती अधिकारी यांना सूचना दिल्या होत्या. तथापि

अपिलार्थीने आयोगाकडे व्दितीय अपील दाखल करेपर्यंत त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००७ मधील कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, दिनांक ०३-०२-२००७ रोजी सरपंच श्री. कुरेशी व अनुमोदक श्री. गोविंद शिनगारे यांनी वडार व घिसडी समाजाच्या लोकांची अतिक्रमणे नियमाकुल करण्यासंदर्भात घेतलेल्या ठरवाच्या, या सभेच्या उपस्थितीपटाच्या, व याचबरोबर अपिलार्थीने या विषयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने इतर सर्व संबंधितांशी केलेल्या सर्व पत्रव्यवहाराच्या प्रती व्यक्तिशः मागितल्या होत्या.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०५-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १०-०३-२००८ रोजी सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपले आदेश पारीत केले व या आदेशाव्दारे अपिलार्थीस दिनांक २५-०३-२००८ रोजी माहिती देण्याचे आदेशित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून सूचना प्राप्त झाल्यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी (सध्याचे व पूर्वीचे) यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार वारंवार अर्ज करुन गावातील सर्व शासकीय कार्यालयांना त्रास देत असतात. या प्रकरणी देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी

स्वतः होऊन अपिलार्थीकडे माहिती देण्यासाठी गेले असता त्यांनी अपिलार्थीस पोस्टाव्दारे माहिती पाठविण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे त्यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००९ रोजी आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. त्यांनी आयोगास पुढे असेही अवगत केले की, गावामध्ये अपिलार्थी यांच्यासारख्या इतर गावामधील काही व्यक्ती माहिती अधिकार अधिनियमाचा दुरुपयोग करुन एकत्रितपणे सर्व शासकीय कार्यालयांना वेठीस धरत आहेत.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रथमतः व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी नेमके कोणते प्रयत्न केले व ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात कोणत्या तारखेला उपस्थित होते या मुद्दयावर त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये कोणतीही माहिती दिली नाही अथवा यासंदर्भात कोणताही सबळ पुरावा त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या कागदपत्रामध्ये असल्याचे आयोगास आढळून येत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलकर्त्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली परंतु ती माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी त्यांचे संपूर्ण उत्तरदायित्व व्यवस्थितपणे पार पाडल्याचे आयोगास आढळून येत नाही. तसेच या प्रकरणी अपिलार्थीचे वर्तनही आयोगास विसंगत असल्याचे आढळून आले आहे. त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही तत्कालीन जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस व्यक्तिशः माहिती उपलब्ध करुन देण्यासाठी गेले असता, ही माहिती अपिलार्थीने त्यांच्याकडून न स्वीकारता जन माहिती अधिकारी यांना पोस्टाने माहिती पाठविण्याची सूचना केली. जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस

तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी देऊ केलेल्या माहितीचे अवलोकन करता, ही माहिती अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी सर्वसाधारणपणे सुसंगत असल्याचे दिसून येत आहे. ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २२-०६-२००९ रोजी अंडर सर्टिफिकेट ऑफ पोस्टींगव्दारे पाठविली आहे. यासंदर्भात आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगास सादर केला आहे, हे पाहता, अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना, त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील केल्यानंतर माहिती प्राप्त झाली असावी असे अनुमान काढण्यात येत आहे. तसेच आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे देखील आयोगासमोर युक्तिवाद करण्यासाठी उपस्थित नाहीत. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश देण्यात येत नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१) अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद वजीर सय्यद अहमद, रा. बरकतपुरा, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय, अर्धापूर,

तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अर्धापूर, तालुका अर्धापूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५७

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. तेलंग कैलास नरबा टेंभूर्णीकर, : अपिलार्थी
मु. पो. शामनगर नरसी, तालुका नायगांव (खै.)
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा सामाजिक वनीकरण विभाग, ता. बिलोली - नायगांव

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सामाजिक वनीकरण विभाग, ता. बिलोली - नायगांव

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांच्या कार्यालयामार्फत सन २००३ ते दिनांक २९-१०-२००७ पर्यंतच्या कालावधीमध्ये कोणकोणत्या कामांना प्रशासकीय मान्यता मिळाली, कामाची सविस्तर

अंदाजपत्रके, मंजूर निधी, खर्च, शिल्लक असल्यास कारणे इत्यादीसह मोजमापपुस्तिका व मजूर हजेरीपत्रकाच्या साक्षांकीत प्रती - ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-११-२००७ रोजी प्रथम अपील केले. हे अपील जरी अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केले असल्याचे म्हटले असले तरीही हे अपील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडेच (लागवड अधिकारी यांच्याकडे) केल्याचे आढळून येत आहे. अपिलार्थीचा अपील अर्ज जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठ अधिका-याकडे न पाठविता तो स्वतःकडे विनाकार्यवाही ठेऊन घेतला. परिणामी अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली नाही व व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांना संपूर्ण माहितीची आवश्यकता असल्याचे आयोगास अवगत केले. आयोगाने अपिलार्थीस त्यांनी व्यक्तिशः माहितीची मागणी केल्यानंतर ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी किती वेळा गेले या संदर्भात काही सबळ पुरावा उपलब्ध आहे का, असे विचारले असता, अपिलार्थीने नकारार्थी उत्तर दिले.

जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस देण्यासाठी संपूर्ण माहिती त्यांच्याकडे तयार असल्याचे, आयोगास अवगत केले.

अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीचा हा अपील अर्ज त्यांच्या विभागातील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे न

पाठविण्याची कारणे जन माहिती अधिकारी यांना विचारली असता त्यांना यासंदर्भात आयोगासमोर कोणताही खुलासा करता आला नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली बहुतांश माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील " शिल्लक असल्यास कारणे " या मुद्दयावरील माहिती व " तपशीलवार " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण या दोनही मुद्दयाव्दारे मागितलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील उर्वरित माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी देणे अनिवार्य आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केल्यानंतर ती माहिती प्राप्त करुन घेण्याची सर्व जबाबदारी अपिलार्थी यांच्यावर होती. तथापि अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात माहिती उपलब्ध करुन घेण्यासाठी ते किती वेळा गेले याचा पुरावा त्यांना आयोगासमोर देता आला नाही. यावरुन अपिलार्थीने त्यांचे या प्रकरणी उत्तरदायित्व पार पाडले नसल्याचे आढळून येत आहे. या घटनाक्रमाच्या दुस-या टप्प्यावर अपिलार्थीने त्यांचे दिनांक २९-११-२००७ रोजीचे प्रथम अपील परत सामाजिक वनीकरण विभाग, तालुका बिलोली येथे केले होते. या प्रकरणाशी संबंधित अपिलीय अधिकारी तालुका पातळीवरील अधिकारी हे नाहीत, हे लागवड अधिकारी यांना माहित असूनही अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज स्वतःकडे, या अर्जावर कोणतीही कार्यवाही न करता त्यांनी ठेवला व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित राहिले आहेत. जन माहिती अधिकारी अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या विभागातील अपिलीय अधिकारी यांच्याकडे न पाठविण्याबाबत त्याची कोणतीही समर्थनीय कारणे आयोगास उपलब्ध करुन देऊ शकले नाहीत. यावरुन जन माहिती अधिकारी यांच्या या चुकीचे समर्थन

त्यांना स्वतःलाही करता येत नसल्याचे दिसून येत आहे. या टप्प्यावर देखील अपिलार्थी त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीपासून वंचित राहिले आहेत, हे पाहता, या प्रकरणी आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस त्यांनी, मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण देय माहिती त्यांना विनामूल्य द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज स्वतःकडे विनाकार्यवाही तसाच ठेऊन घेतल्याबद्दल संबंधित जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून इतःपर त्यांनी अशा प्रकारची पुनरावृत्ती टाळावी, असे त्यांना आयोगातर्फे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली व वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे अपिलार्थीस देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०५-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तेलंग कैलास नरबा टेंभूर्णीकर, मु. पो. शामनगर नरसी, तालुका नायगांव (खै.) जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा लागवड अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप संचालक, सामाजिक वनीकरण विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५८

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. तेलंग कैलास नरबा टेंभूर्णीकर,<br>मु. पो. शामनगर नरसी, तालुका नायगांव (खै.)<br>जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी,<br>पंचायत समिती, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी,<br>पंचायत समिती, नायगांव (खै.), जिल्हा नांदेड | : | प्रतिवादी |

| | | | |
|---|---|---|---|
| प्रत्यक्षतः | जन माहिती अधिकारी | : | गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.) जिल्हा नांदेड |
| | जन अपिलीय अधिकारी | : | उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे संपूर्ण ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या मांजरम नरसी सर्कलमधील कामांची सन २००३ ते २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मंजूर कामे, मजूंर निधी व खर्च, अंतीम देयक निघालेल्या पूर्ण कामांच्या मोजमाप पुस्तिका, मिळालेले धान्य व त्यांचे वाटप आणि कामाचा दर्जा - या मुद्दयांचा समावेश होता.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २९-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. सदर अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०४-०५-२००८ रोजी ठेवली होती. तथापि या सुनावणीचे आदेश आयोगाकडे उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रात समाविष्ट नाहीत.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवाद ऐकून घेण्यात आला. जन माहिती अधिकारी यांनी आयोगास, अपिलार्थीचे आयोगास उद्देशून लिहिलेले दिनांक ०४-०५-२००८ रोजीचे पत्र सादर केले असून या पत्रात अपिलार्थीने दिनांक ०४-०५-२००८ रोजी माहिती मिळाल्याचे कबूल केल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले आहे. यावर अपिलार्थीने माहिती मिळाल्यापृष्ठ्यर्थ आयोगास जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या दिनांक ०४-०५-२००८ रोजीच्या कथित पत्रावरील सही त्यांची नाही, असे आयोगास सांगितले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता आता उपस्थित गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव हे अपिलार्थीस निश्चितपणे किती दिवसात माहिती पुरवू शकतील अशी आयोगाने त्यांच्याकडे विचारणा केली असता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, त्यातील मोजमाप पुस्तिकांच्या प्रती

वगळता, त्यांच्याकडे तयार असल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. मात्र मोजमाप पुस्तिकांच्या प्रती प्राप्त करुन घेऊन त्या अपिलार्थीस देण्यासाठी त्यांना वेळ लागेल असेही त्यांनी आयोगास अवगत केले. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील, शिल्लक रकमेची कारणे, कामाचा दर्जा ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही "कारण शिल्लक रकमेची कारणे " ही माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. अशा प्रकारच्या माहितीचा "माहिती " या शब्दाच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नसल्याने ती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. उर्वरित मुद्दा "कामाचा दर्जा " या मुद्दयासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अशा स्वरुपाची माहिती जन माहिती अधिकारी यांच्या प्रचलीत कार्यपध्दतीमध्ये मूळात उपलब्ध होत नसल्याने ही माहिती अपिलार्थीस उपलब्ध करुन देता येणार नाही. ही वस्तुस्थिती पाहता, गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, या अर्जातील शिल्लक रकमेची कारणे व कामाचा दर्जा या मुद्दयांवरील माहिती वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती व्यक्तिशः व दोन साक्षीदारांच्या उपस्थितीत उपलब्ध करुन द्यावी. या कालावधीनंतर अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामुल्य देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली, या अर्जातील शिल्लक रकमेची कारणे व कामाचा

दर्जा इत्यादी मुद्दयावरील माहिती वगळता, उर्वरित संपूर्ण माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०५-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. तेलंग कैलास नरबा टेंभूर्णीकर, मु. पो. शामनगर नरसी, तालुका नायगांव (खै.) जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, नायगांव (खै.), तालुका नायगांव (खै.) जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप मुख्य कार्यकारी अधिकारी (पंचायत), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८५९

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. अलताफ अहेमद सानी पि. शेख अमीर, : अपिलार्थी
घर नं. ९-६-१००६, चुनाभट्टी, खुसरोनगर,
देगलूर नाका, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

जन अपिलीय अधिकारी : उपायुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांनी दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती मागितली असता, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदत व्यपगत झाल्यानंतरही माहिती न दिल्यामुळे त्यांनी दिनांक २८-०२-२००८ रोजी जन अपिलीय

अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील दाखल केले. तथापि त्यांनी देखील अपिलार्थीच्या अपील अर्जाची दखल न घेतल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड वाघाळा शहर महानगरपालिकेमधील रिक्त पदासंदर्भात काही माहिती एकूण पाच मुद्दयाव्दारे नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती. तथापि अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. मात्र अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज संबंधितांकडे वेळीच प्राप्त झाला होता. परंतु त्यांनी या अर्जावर कोणतीही कार्यवाही न केल्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी आयोगाकडे व्दितीय अपील केले आहे. या प्रकरणात अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी या टप्प्यावर प्रथमतः सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, १५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील अथवा कलम १८ अन्वये तक्रार दाखल करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, १५ दिवसांच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )
दिनांक ०५-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अलताफ अहेमद सानी पि. शेख अमीर, घर नं. ९-६-१००६, चुनाभट्टी, खुसरोनगर, देगलूर नाका, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त, नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६०

निर्णय दिनांक ०५-०८-२००९

१ श्री. संजय सोपानराव गायकवाड, : अपिलार्थी
रा. श्रध्दा निवास, सिध्दार्थ हॉस्टेलमागे, लालवाडी,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,
हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर,
तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष : श्री. संतोष शेषराव शिंदे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे माहिती मागितली होती. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त झाली नाही, त्यामुळे त्यांनी दिनांक २६-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार

यांच्याकडे प्रथम अपील केले असता, त्यांनी या प्रकरणी माहिती देण्यासाठी टाळाटाळ केल्याने अपिलार्थीने विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे हिमायतनगर तालुक्यातील अर्धघाऊक रॉकेल विक्रेते श्री. संतोष शेषराव शिंदे, परवाना क्रमांक ४१/९८ यांना शासनाकडून मिळणा-या रॉकेलच्या पुरवठयासंदर्भात व त्यांनी वितरित केलेल्या रॉकेलच्या संदर्भात सन २००० ते २००७ या कालावधीतील काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०२-२००८ रोजी प्रथम अपील केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन दिसून येत आहे. हे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांना अपिलार्थीने पाठविल्याचा यासंदर्भात आवश्यक तो पुरावा अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जासोबत (रजिस्टर्ड पोस्टाची पावती) आयोगास सादर केला आहे. यावरुन अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्याच्याशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेला प्रथम अपील अर्ज संबधितांना प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०५-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब, जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी

त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २६-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमीत होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन यासंदर्भातील आपला निर्णय पारित करावा.

औरंगाबाद

दिनांक ०५-०८-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. संजय सोपानराव गायकवाड, रा. श्रध्दा निवास, सिध्दार्थ हॉस्टेलमागे, लालवाडी, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील

नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, हिमायतनगर, तालुका हिमायतनगर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६१

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. उदय सुधाकरराव कुलकर्णी, : अपिलार्थी
४, ' गौतमी ' बिल्डींग, कडा वसाहत, कडा ऑफिस परिसर,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग,
नाथनगर (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास
प्राधिकरण, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक १ ची माहिती देण्याबाबत जन माहिती अधिकारी यांनी टाळाटाळ केली असून त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अपूर्ण आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे, त्रयस्थ पक्ष श्री. यु. एस. कुलकर्णी, स्थापत्य अभियांत्रिकी सहायक यांना भविष्यनिर्वाह निधीमधून ना परतावा अग्रिम विलंबाने दिल्यामुळे त्यावरील व्याज देण्यासंदर्भात त्यांनी अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण यांच्या दिनांक ०६-०९, ३०-११, २७-१२-२००७ व दिनांक १३-०२-२००८ रोजीच्या पत्रावर जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने केलेल्या कार्यवाहीशी संबंधीत साक्षांकीत अभिलेखे व जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ११-१०-१९९९ च्या पत्राची प्रत ही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०९-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २४-०७-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. त्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील दोन मुद्दयापैकी एका मुद्दयाच्या संदर्भात (कार्यकारी अभियंता यांच्या दिनांक ११-१०-१९९९ रोजीच्या पत्राची प्रत) माहिती दिली. तथापि अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ च्या संदर्भातील माहिती न मिळाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास असे अवगत केले की, संबंधित त्रयस्थ पक्ष हे त्यांचे वडील असून त्यांना भविष्यनिर्वाह निधीतील रक्कम संबंधित कार्यालयाने

अनुज्ञेय कालावधीपेक्षा विलंबाने दिली, त्यामुळे त्यांना देय असलेले व्याज पाटबंधारे विभागाकडून प्राप्त झाले नाही व त्यांचा आर्थिक तोटा झाला, त्यांना भविष्यनिर्वाह निधी विलंबाने मिळाल्याबद्दल या विलंबाच्या कालावधीतील व्याज संबधितांकडून मिळणे अपेक्षित आहे. त्यांनी आयोगास असेही अवगत केले की, अद्यापपावेतो त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ शी संबधित माहिती प्राप्त झालेली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रशासक, कडा यांच्या पत्राच्या संदर्भात त्यांनी आता एका चौकशी अधिका-याची नियुक्ती केली असून ते अपिलार्थीचे मूळ गा-हाणे सोडविण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य देण्यास तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये नमूद केलेल्या कालावधीमध्ये प्रथम प्रतिसाद देणे आवश्यक होते. तथापि या कालावधीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद दिला नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या दोन मुद्दयांच्या माहितीपैकी अपिलार्थीस फक्त मुद्दा क्रमांक २ च्या संदर्भातील माहिती जन माहिती अधिकारी यांनी, जन अपिलीय अधिकारी यांच्या आदेशानंतर, दिनांक २९-०७-२००८ रोजी पुरविली आहे तोपर्यंत देखील त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक १ ची माहिती पुरविली नाही.

या प्रकरणाची वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या मुद्दा क्रमांक १ शी संबधित माहिती देणे जन माहिती अधिकारी यांना फारसे अवघड काम होते, असे आयोगास वाटत नाही. त्यामुळे जर प्रशासक, कडा यांच्याकडून प्राप्त झालेल्या पत्रावर त्यांच्या

कार्यालयाने कोणतीच कार्यवाही केली नसेल तर त्यांनी तसे अपिलार्थीस कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस कळविण्याचे सौजन्य दाखविले नाही. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेल्या प्रशासक, कडा यांच्या संदर्भित पत्रांच्या अनुषंगाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने विविध प्राधिकरणाशी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती व या विषयावरील त्यांच्याकडे उपलब्ध असलेल्या आदेशाच्या व टिपणीच्या प्रती त्यांनी अपिलार्थी यांना त्यांच्या मूळ अर्जासंदर्भात देणे अपेक्षित आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केलेल्या प्रशासक, कडा, औरंगाबाद यांच्या कार्यालयाने पाठविलेल्या चार पत्रांच्या संदर्भात त्यांच्या कार्यालयाने या प्रकरणाशी संबंधित केलेला पत्रव्यवहार व संबंधित सर्व अभिलेखे यामधील टिपणीच्या प्रती त्यांना अपिलार्थीस द्याव्या लागतील. आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी, प्रशासक, कडा यांच्या या चार पत्रावर त्यांच्या कार्यालयाने दिनांक ०६-०६-२००८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस द्याव्यात अशी आयोगातर्फे सूचना त्यांना देण्यात येत आहे. या सर्व प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरविणे आवश्यक आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०६-०६-२००८ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २९-०७-२००८ रोजीच्या त्यांच्या अर्जातील दोन मुद्दयापैकी फक्त एकाच मुद्दयावर माहिती दिली आहे. यावरुन असे सिध्द होत आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विलंबाने व अपूर्ण माहिती पुरविली आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब सचिव (जलसंपदा) यांना या प्रकरणाशी संबधित जन माहिती अधिकारी व त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहिती-तील मुद्दा क्रमांक १ ची उर्वरित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाने पुरवावी.

३. सचिव (जलसंपदा) यांना संबंधीत जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. उदय सुधाकरराव कुलकर्णी, ४, ' गौतमी ' बिल्डींग, कडा वसाहत, कडा ऑफिस परिसर, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, जायकवाडी पाटबंधारे विभाग, नाथनगर (उत्तर), तालुका पैठण, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता व प्रशासक, लाभक्षेत्र विकास प्राधिकरण, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ सचिव (जलसंपदा), मंत्रालय, मुंबई - ३२ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६२

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. सुभाष दामोदर देशमुख, : अपिलार्थी
६२, शिवदत्त सहकारी गृहनिर्माण संस्था, सिडको, एन-८,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, कन्नड,
तालुका कन्नड, जिल्हा औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सिल्लोड,
तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २२-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीचा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे सात महिने पाठपुरावा केला. जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या आदेशाप्रमाणे आठ दिवसात जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती

प्राप्त होण्याची वाट पाहिली. परंतु त्यांना माहिती प्राप्त झाली नाही त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - उप प्रबंधक एम. आर. टी. औरंगाबाद यांच्या दिनांक १६-०५-१९६३ च्या आदेशावर जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या कार्यवाहीच्या तपशीलाच्या सत्यप्रती व गुंजोबा विरुध्द दामोधर प्रकरणातील दिनांक १८-०१-१९६३ च्या आदेशावर त्यांच्या कार्यालयाने केलेली कार्यवाही - अशी माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक ०२-०२-२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस अपेक्षित असलेल्या माहितीच्या संदर्भात अधिकच्या संदर्भाची उदा. संचिका क्रमांक, गावाचे नाव, गट नंबर, क्षेत्र, एम. आर. टी. च्या आदेशाची प्रत इत्यादी माहिती मागितली. तसेच यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडील दिनांक २८-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती ही बरीच जुनी असल्याने ती शोधण्याचे काम चालू आहे आणि संबधित संचिका प्राप्त होताच अपिलार्थीस त्वरित माहिती देण्यात येईल असे आश्वासीत केले गेले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २१-०७-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०८-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. परंतु त्यानंतरही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून

माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी, जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर दिनांक ०६-०६-२००९ पासून कार्यरत असून त्यांच्या पूर्वी श्री. हिरेकर नावाचे नायब तहसीलदार या पदावर कार्यरत होते. ते सध्या जिल्हाधिकारी, परभणी यांच्या कार्यालयात कार्यरत आहेत. त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही १९६३ व १९७० या सालाशी संबंधित असल्याने त्या जुन्या संचिका शोधण्याचे काम त्यांच्याकडे चालू होते, आता संचिका सापडल्यानंतर अपिलार्थीच्या मुलास त्यांनी दूरध्वनीव्दारे बोलावून घेऊन त्यांना या संचिकाच्या प्रती देण्यात आलेल्या आहेत व याबाबत अर्जदाराची आता काहीही तक्रार नाही असे संबंधितांनी लिहून दिले आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांचा माहितीसाठीचा अर्ज केला त्यावेळी श्री. हिरेकर नावाचे नायब तहसीलदार जन माहिती अधिकारी या पदावर होते. अपिलार्थीच्या दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जास त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद देण्याचा प्रयत्न केला असला तरीही हा प्रतिसाद अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने पुरेसा सकारात्मक असल्याचे आयोगास आढळून येत नाही. जन माहिती अधिकारी यांनी प्रथमतः अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीकडून त्यांनी उल्लेख केलेले संदर्भ मागितले व अपिलार्थीस माहिती देण्यासाठीचा विहित कालावधी संपुष्टात येत असतांना अपिलार्थीस संचिका सापडताच माहिती देण्यात येईल अशा शब्दामध्ये पत्र पाठविले. यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०८-२००८ रोजी आठ दिवसाच्या

आत माहिती देण्याचे सूचित करुनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने कोणतेही सकारात्मक प्रयत्न केल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रावरुन आढळून येत नाही. या प्रकरणाची संचिका आयोगाने तपासली असून आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थी यांची दिनांक २९-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली दोनही प्रकरणे सक्षम महसूल न्यायाधिकरणाकडून नामंजूर करण्यात आलेली आहेत. त्यावेळेस या प्रकरणांची स्थिती जी होती ती अद्यापही कायम आहे. थोडक्यात सक्षम अधिकाऱ्याच्या म्हणण्यानुसार सदर निर्णय वादीच्या विरुध्द गेल्याने या प्रकरणी अद्यापपर्यंत कोणतीही कार्यवाही झाल्याचे दिसून येत नाही.

आज रोजी उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या मुलास त्यांच्या कार्यालयामध्ये बोलावून या दोनही संचिकाच्या प्रती दिल्या असून ती माहिती प्राप्त झाल्याचे अपिलार्थीच्या मुलाकडून लिहून घेतले आहे व यासंदर्भात त्यांची काहीही तक्रार नाही असे त्यांनी लिहून दिले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडील प्राप्त झालेल्या अपिलार्थीच्या प्रतिनिधीच्या पोचपावतीची पाहणी करता असे आढळून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या मुलाला कोणत्याही प्राधिकार पत्राअभावी प्राप्त झाली असून त्यांच्या मुलाची यासंदर्भात काहीही तक्रार नाही असे त्यांच्या मुलाने जन माहिती अधिकारी यांना लिहून दिले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारासच माहिती देणे अभिप्रेत आहे. अर्जदाराच्या नातेवाईकास किंवा प्राधिकृत केले नसलेल्या व्यक्तिला माहिती दिली याचा अर्थ अर्जदारास माहिती दिली असा होत नाही यामुळे जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीच्या मुलाला त्यांच्या कार्यालयात बोलावून घेऊन अशा प्रकारे माहिती देऊन त्यांच्याकडून कबुली लिहून घेण्याची त्यांची कृती ही सर्वथा चुकीची आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांना आता असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी संपूर्ण माहिती त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत अपिलार्थीस टपालाव्दारे विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास सकारात्मक प्रतिसाद न देऊन व अपिलार्थीस आठ दिवसाच्या आत माहिती देण्याचे त्यांना जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस कोणतीही माहिती न देऊन, त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावामुळे ते अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत टपालाने विनामूल्य पुरवावी.

३. महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुभाष दामोदर देशमुख, ६२, शिवदत्त सहकारी गृहनिर्माण संस्था, सिडको, एन-८, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, कन्नड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सिल्लोड, तालुका सिल्लोड, जिल्हा औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ महसूल आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६३

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपिलार्थी

हिना मंजिल, टाऊन हॉल, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

जिल्हा क्रीडा कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप संचालक, क्रीडा अधिकारी, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : जिल्हा क्रीडा अधिकारी, औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०८-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती प्राप्त झाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या माहितीमध्ये ज्या संस्थांना जन माहिती अधिकारी यांनी अनुदान दिले त्यांचा समावेश नसल्याचे आयोगाच्या निदर्शनास आणले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधीत सन २००१ ते २००७ या कालावधीमधील,

त्यांच्या कार्यालयातर्फे अनुदान वाटप करण्यात येत असलेल्या संस्थांच्या संदर्भात व वाटपासंदर्भात एकूण पाच मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - किती संस्थांना / मंडळांना अनुदान देण्यात आले, संस्थेचे नांव, मंजूर अनुदानाची रक्कम, प्रकल्प अहवालाची सत्यप्रत व कृती आराखडा, २००१ ते २००७ पर्यंत ज्या संस्थांनी अनुदान घेऊन प्रकल्पासाठी काही खर्च केला नाही अशा संस्थांवर कारवाई करण्यात आली किंवा का करण्यात आली नाही, या कालावधीमध्ये औरंगाबाद जिल्हा कार्यालयास किती निधी मंजूर करण्यात आला व कोणत्या प्रकल्पासाठी व कसा खर्च करण्यात आला, राज्य / केंद्र शासनाकडून आमखास मैदानासाठी औरंगाबाद जिल्हा क्रीडा कार्यालयात प्राप्त झालेला निधी, कोणत्या कामासाठी किती खर्च करण्यात आला, खर्चाचा तपशील व खर्चित रकमेच्या पावत्याच्या सत्यप्रती - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०६-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय पारीत केला नाही, परंतु त्याच दिवशी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाकडे सादर करण्याची सूचना जन माहिती अधिकारी यांना दिली. तदनंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक ०८-०७-२००८ रोजी एकूण १२७ पृष्ठांची माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीमध्ये संबंधित संस्थांचे पत्ते नसल्याने प्राप्त माहिती अपूर्ण स्वरुपाची असल्याच्या कारणावरुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगा-कडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीस त्यांनी दिनांक ०८-०७-२००८ रोजी १२७ पृष्ठांची माहिती पुरविली आहे. अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविण्याचे कारण विचारले असता आयोगास असे अवगत करुन देण्यात आले की, या कालावधीमध्ये जिल्हा क्रीडा स्पर्धा चालू असल्याने त्यांना अपिलार्थीस ही माहिती वेळेत पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या माहितीमध्ये संबंधित संस्थांच्या पत्याचा समावेश नसल्याने ती माहिती अपूर्ण असल्याचे नमूद करुन ही माहिती त्यांना पुरविण्यासाठी आदेशित करण्याची आयोगाकडे विनंती केली आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन करता त्यामध्ये असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये या संस्थेच्या पत्यांची जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागणी केलेली नसल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना त्यांच्या दिनांक ३०-०४-२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात ही माहिती देय होत नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून या संस्थांचे पत्ते हवे असतील तर त्यांना याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळयाने माहितीचा अर्ज करावा लागेल. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेल्या दिनांक ०८-०७-२००८ रोजीच्या कथित माहितीचे अवलोकन करता, या माहितीमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी चुकीची दिली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये औरंगाबाद जिल्हा क्रीडा कार्यालयाने आमखास मैदानाकरिता जो मंजूर खर्च केला आहे त्यांच्या रकमेच्या पावतीच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून मागितल्या आहेत. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मोजमापपुस्तकाच्या प्रती या मुद्दयासंदर्भात पुरविल्याचे आयोगास आढळून येत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येते की, अपिलार्थीस मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ५ च्या संदर्भात त्यांनी या

कामावर जो खर्च केला आहे त्या कामाच्या सर्व बिलांच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवाव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी प्रतिसाद देण्यासाठी लावलेल्या विलंबाचे त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये केलेले समर्थन आयोगास मान्य नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना करावे लागणारे काम हे अतिरिक्त काम नसून त्यांच्या दैनंदिन कर्तव्याचा तो एक भाग आहे याची जाण त्यांनी ठेऊन इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या तरतुदीनुसार कार्यवाही करण्याची दक्षता घ्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे व या प्रकरणी त्यांच्याकडून घडलेल्या अनियमिततेबाबत त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ५ शी संबंधित माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, हिना मंजिल, टाऊन हॉल, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवक सेवा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६४

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. शेख मोहंमद इमरान मोहमंद इब्राहिम, अपिलार्थी
घर नं. ४-१२-५७ पी. इंदिरानगर, न्यू बायजीपूरा,
औरंगाबाद पश्चिम बाजू, एम. जी. एम. हॉस्पिटल
गेट, गल्ली नं. २०, औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद,
औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद,
औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : सचिव, अंजुमन इशाते तालीम संस्था

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी गैरहजर आहेत. त्यांनी राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०४-०८-२००९ रोजीचे पत्र आयोगास प्राप्त झाले असून, या

पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना आवश्यक असलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली असल्यामुळे, याबाबत त्यांची काहीही तक्रार राहिलेली नाही व त्यांची उपस्थिती ग्राह्य मानून त्यांचे अपील निकाली काढण्यात यावे. याबाबत त्यांची कोणतीही हरकत राहणार नाही.

खुद्द अपिलार्थीने त्यांचे आयोगाकडे विचाराधीन असलेले व्दितीय अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८६४/२००८, दिनांक ०४-०७-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. शेख मोहंमद इमरान मोहमंद इब्राहिम, घर नं. ४-१२-५७ पी. इंदिरानगर, न्यू बायजीपूरा, औरंगाबाद पश्चिम बाजू, एम. जी. एम. हॉस्पिटल गेट, गल्ली नं. २०, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६५

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. अशोक बाळाधन उके, : अपिलार्थी

एल. बी. पेरकर निवास, बेगमपुरा, कृष्णा गल्ली,

औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,

प्रि आयएएस कोचिंग सेंटर,

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी, : प्रतिवादी

डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

प्रत्यक्षत: जन अपिलीय अधिकारी : संचालक, बी. सी. यु. डी., डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १७-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नाही, पाठविली नाही, यामुळे त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील दाखल केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे सन १९८१ ते २००८ या कालावधीशी संबंधित त्यांच्या कार्यक्षेत्रातील प्रि आयएएस सेंटरमध्ये प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची नांवे, याकरिता शासनाकडून प्राप्त झालेला निधी व खर्चाच्या संदर्भात त्यांच्याकडून एकूण १६ मुद्दयाव्दारे व्यक्तिशः माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्र्यरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपर्यंत कोणतीही माहिती प्राप्त झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांचया प्रतिनिधीने, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती ही वीस वर्षाशी संबंधित असल्यामुळे व तिची व्याप्ती मोठ्या प्रमाणात असल्यामुळे ही माहिती गोळा करण्यासाठी त्यांना वेळ लागला तथापि आता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते अपिलार्थीस ही माहिती विनामूल्य देण्यास तयार आहेत, असा युक्तिवाद केला.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २८-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण १६ मुद्दयाव्दारे माहिती मागितली होती. याबाबत अपिलार्थीच्या मुद्दा क्रमांक १, मुद्दा क्रमांक ४ अंशत: (सन २००६-०७ ते २००८ या कालावधीमधील सर्व विद्यार्थ्यांच्या प्रश्न व उत्तरपत्रिका) मुद्दा क्रमांक ५, ६, ९ व मुद्दा क्रमांक १६ या मुद्दयांची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही, कारण ही माहिती अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. मात्र उर्वरित मुद्दयावरील माहिती अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. या देय माहितीपैकी देखील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे धनादेशाच्या सत्यप्रती काही मुद्दयांव्दारे मागितलेल्या आहेत. या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, कोणत्याही प्राधिकरणाकडून धनादेश जारी केला गेल्याच्या त्या धनादेशाच्या झेरॉक्स प्रती त्या प्राधिकरणाकडे ठेवल्या जात नाहीत. जर ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असली तरच ती अपिलार्थीस मिळू शकेल. उर्वरित सर्व माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने विनामूल्य देण्याचे आयोगासमोर कबूल केले आहे. आता अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने व विशेषत: अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ७ (१) मध्ये विहीत केलेल्या कालावधीमध्ये कोणताही प्रतिसाद न दिल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थी ही माहिती विनामूल्य घ्यावी लागेल.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेल्या माहितीतील देय असलेली माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दहा दिवसाच्या आत व्यक्तिशःव विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. अशोक बाळाधन उके, एल. बी. पेरकर निवास, बेगमपुरा, कृष्णा गल्ली, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी, प्रि आयएएस कोचिंग सेंटर, डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा संचालक, बी. सी. यु. डी. डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६६

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. तुकाराम बकारामजी वैद्य, : अपिलार्थी
मार्फत, प्रभारी विमा वैद्यकीय अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना दवाखाना क्रमांक १, वाळूज,
औरंगाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी,
राज्य कामगार विमा योजना रुग्णालय,
चिकलठाणा, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, पंचदिप भवन,
ना. म. जोशी मार्ग, लोअर परेळ, मुंबई - १३

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : वैद्यकीय अधीक्षक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, चिकलठाणा, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन असे नमूद केले आहे की, त्यांच्या शिक्षेचा कालावधी संपून गेल्यानंतरही ०१ फेब्रवारी २००५ रोजी त्यांना देय असलेल्या वार्षिक वेतनवाढी आजपावेतो मोकळया केलेल्या नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०५-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या वेतनवाढी मंजूर करण्यासंदर्भात दिनांक ०१-०२-२००३ ते ०५-१०-२००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती एकूण सहा मुद्दयाव्दारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये -..... हे खरे आहे किंवा नाही ..... हे खरे आहे किंवा नाही ..... हे खरे आहे किंवा नाही ..... आपण सहमत आहात किंवा कसे ? सहमत नसल्यास कृपया कारणे द्यावीत, ..... हे चुकीचे आहे असे आपणास वाटत नाही काय ? असे वाटण्याची कृपया कारणे द्यावीत ..... आपण सहमती दर्शवून त्याप्रमाणे कारवाई करण्यात येईल किंवा कसे - अशा प्रकरच्या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने ज्या विषयावर त्यांच्याकडे माहितीची मागणी केली होती त्या विषयावर महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई, खंडपीठ औरंगाबाद यांनी दिलेला निर्णय हाच अंतीम समजावण्यात यावा असे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या अशा प्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी विहित मुदत व्यपगत झाल्यानंतरही निर्णय न दिल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या व्दितीय अपील अर्जामधील मजकुराप्रमाणे युक्तिवाद करुन आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ज्या विषयावर माहिती अपेक्षित आहे त्या विषयाची पार्श्वभूमी आयोगास विशद करुन अपिलार्थीस त्यांना देय असलेल्या सर्व रकमांचे भुगतान केले असल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही मूळात माहिती अधिकार अधिनियमा-तील तरतुदीशी सुसंगत नाही. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे, एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध असलेल्या माहितीवर त्यांनी वेगळ्याने स्वतःचे स्पष्टीकरण अथवा यासंदर्भात अर्जदारास त्यांच्या कृती अथवा निर्णयाची कारणे देणे हे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नाही. परिणामी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात मागितलेली माहिती ही अधिनियमातील कलम २ (च) मध्ये स्पष्ट केलेल्या " माहिती " या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीबाहेर असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती मूळात देय होत नाही. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ०७-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे दिलेला प्रतिसाद हा आयोगास अयोग्य वाटतो. या प्रतिसादावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज व्यवस्थितपणे वाचला नसावा किंवा त्यांना माहिती अधिकार अधिनियमाचे पूर्ण आकलन झाले नसावे, असे आयोगास वाटते. अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी अधिनियमातील कलम १९ (६) च्या तरतुदीमध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कोणतीही कार्यवाही न करुन या प्रकरणी आपल्या बेजबाबदारपणाचे दर्शन घडविल्याचे आयोगास आढळून येत आहे. इतःपर त्यांच्याकडे प्राप्त

होणा-या प्रत्येक प्रथम अपील अर्जावर अधिनियमातील कलम १९ (६) मधील तरतुदीनुसार आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचा युक्तिवादावरुन आयोगास असे अवगत झाले आहे की, अपिलार्थीच्या प्रलंबीत वेतनवाढी व तदनुषंगाने अपिलार्थीस कथित देणे असलेला फरक अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेला नाही. तथापि या मुद्दयांवर जन माहिती अधिकारी यांचे असे म्हणणे आहे की, अपिलार्थीस देय असलेल्या सर्व वेतनवाढी त्यांच्या कार्यालयाने प्रचलीत नियमाप्रमाणे त्यांना दिलेल्या आहेत. अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन अपिलार्थीस त्यांच्या प्रलंबीत वेतनवाढी संदर्भात आयोगाकडून आदेश निर्गमित होणे अपेक्षित आहे असे दिसून येत आहे. तथापि या मुद्दयावर असे स्पष्ट करण्यात येते की, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जाव्दारे ज्या मुद्दयांची माहिती अपेक्षित आहे ती माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडील या प्रकरणाशी संबंधित नस्त्यांचे अवलोकन केले असता प्राप्त होण्याची शक्यता आहे. तेव्हा त्यांनी संबंधित अभिलेख्यांची तपासणी करण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगळयाने अर्ज करावा असे त्यांना या टप्प्यावर सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यातील वादाचे स्वरुप पाहता हा वाद प्रशासकीय स्वरुपाचा असून अशा प्रकारच्या वादाचा निपटारा करण्यासाठी स्वतंत्र सक्षम प्राधिकरणे अस्तित्वात आहेत त्यामुळे अपिलार्थीने त्यांच्या प्रश्नांची अंतीम तड लावण्यासाठी अशा प्रकारच्या सक्षम प्राधिकरणाकडे स्वतंत्र अर्ज करुन आपल्या गा-हाण्याची तड लावून घ्यावी, असेही त्यांना सूचित करण्यात येत आहे. त्यांनी आयोगाकडे, त्यांच्या वेतनवाढीच्या मंजुरीच्या संदर्भात केलेल्या विनंतीवर निर्णय देण्याची अधिकारिता आयोगास नाही त्यामुळे अपिलार्थीच्या आयोगास सादर केलेल्या, अर्जातील मूळ विनंतीवर आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील, त्यांनी मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती

अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे, फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. तुकाराम बकारामजी वैद्य, मार्फत, प्रभारी विमा वैद्यकीय अधिकारी, राज्य कामगार विमा योजना दवाखाना क्रमांक १, वाळूज, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा वैद्यकीय अधीक्षक, राज्य कामगार विमा योजना रुग्णालय, चिकलठाणा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा आयुक्त, राज्य कामगार विमा योजना, पंचदिप भवन, ना. म. जोशी मार्ग, लोअर परेळ, मुंबई - १३ यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६७

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. बी. के. त्रिभुवन,<br>प्लॉट नं. ४८-बी, न्यू शांतिनिकेतन कॉलनी,<br>जवाहर कॉलनी रोड, औरंगाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड,<br>तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक | : | प्रतिवादी |

त्रयस्थ पक्ष : श्री. सुनिल किशनराव खरे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०७-०३-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी त्रयस्थ पक्ष श्री. सुनिल किशनराव खरे, पोलीस उप निरीक्षक, कोपरगांव यांच्या संदर्भात मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक ०४-११-२००४ रोजी तसेच मा. राज्यपाल, महाराष्ट्र राज्य यांच्याकडे दिनांक २३-११-२००४ आणि दिनांक ०७-०७-२००७ रोजी केलेल्या तक्रारीची चौकशी उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड यांनी दिनांक २४-११-२००४ रोजी केली. या प्रकरणी श्री. सुनिल किशनराव खरे यांचा खुलासा व उपविभागीय पोलीस अधिकारी यांनी दिनांक ०५-०१-२००५ रोजी

पाठविलेल्या चौकशी अहवालाची प्रमाणित प्रत दिनांक ३०-०८-२००७ रोजी मागणी करुनही त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेऊन श्री. सुनिल किशनराव खरे यांचा चौकशी अहवाल गहाळ करुन, माहिती देण्यासाठी टाळाटाळ करुन श्री. सुनिल किशनराव खरे यांना संरक्षण देण्याचा जन माहिती अधिकारी प्रयत्न करीत असल्याने त्यांच्याविरुध्द शिस्तभंगाची कारवाई व नियमानुसार दंड लावण्यात यावा, अशी त्यांनी या अपील अर्जामध्ये आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी वरील परिच्छेदामध्ये नमूद केलेल्या विनंतीप्रमाणे मा. मुख्यमंत्री व मा. राज्यपाल यांना पाठविलेल्या दिनांक ०५-०१-२००५ रोजीच्या अहवालाच्या प्रमाणित प्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने सदर अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविला होता. अपिलार्थीस यासंदर्भात कोणतीही माहिती न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून दिनांक १७-०३-२००८ रोजी आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे त्यांनी आयोगासमोर कबूल केले. तथापि त्यांचे म्हणणे असे आहे की, जन माहिती अधिकारी यांनी तयार केलेला अहवाल हा त्यांची

बाजू ऐकून न घेता करण्यात आलेला आहे. तसेच पोलीस महासंचालक यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांनी पाठविलेल्या अहवालाची प्रत जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध करुन देण्यात आलेली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक ३०-०८-२००७ रोजीच्या अर्जाची प्रत त्यांना दिनांक १९-०२-२००८ रोजी प्राप्त झाली. यावर त्यांनी दिनांक २९-०२-२००८ रोजी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ४५ /- इतके त्यांना भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने त्यांच्याकडे केला नाही व अंतीमतः त्यांनी दिनांक १७-०३-२००८ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती उपलब्ध करुन दिली आहे. त्यांच्या कार्यालयातर्फे मा. राज्यपाल, मा. मुख्यमंत्री व पोलीस महासंचालक यांना अहवाल सादर केला नसल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे दिसून येते की, अपिलार्थीचा दिनांक ३०-०८-२००७ रोजीचा अर्ज जन माहिती अधिकारी यांना प्रत्यक्षतः दिनांक १९-०२-२००८ रोजी प्राप्त झाला. यानंतर अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक १७-०३-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पुरविली आहे. जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिका-याकडे पोलीस महासंचालकाकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत मागितली नव्हती. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी मा. मुख्यमंत्री व मा. राज्यपाल यांना या प्रकरणाशी संबंधित कोणताही अहवाल पाठविला नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही व जन माहिती अधिकारी यांनी जिल्हा पोलीस अधीक्षकाकडे पाठविलेल्या अहवालाची प्रत त्यांनी अपिलार्थीस दिनांक १७-०३-२००८ रोजी विनामूल्य उपलब्ध करुन दिली आहे. अपिलार्थीने आजच्या युक्तिवादामध्ये या अहवालातील काही त्रुटी - त्यांचे म्हणणे न ऐकता अहवाल तयार

करण्यात आला आहे - आयोगाच्या निदर्शनास, त्यांच्या युक्तिवादाव्दारे आणण्याचा प्रयत्न केला आहे. या त्रूटी संदर्भात अपिलार्थीस जर काही कार्यवाही अपेक्षित असेल तर त्यांनी याकरिता गृह विभागाच्या इतर सक्षम प्राधिकरणाकडे त्यांची तक्रार नोंदवावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीच्या मर्यादेमध्ये अपिलार्थीच्या मूळ अर्जाचा विचार करता व वरील वस्तुस्थिती पाहता अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय असलेली संपूर्ण माहिती अधिनियमाव्दारे विहित मुदतीत प्राप्त झाली असल्याने अपिलार्थीच्या विचाराधीन अपील अर्जावर वेगळ्याने विचार करण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निकर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. बी. के. त्रिभुवन, प्लॉट नं. ४८-बी, न्यू शांतिनिकेतन कॉलनी, जवाहर कॉलनी रोड, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय पोलीस अधिकारी, मनमाड, तालुका नांदगांव, जिल्हा नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा जिल्हा पोलीस अधीक्षक (ग्रामीण), नाशिक यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६८

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. गोल्हार अशोक सयाजीराव, अपिलार्थी
मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा, तालुका आष्टी,
जिल्हा बीड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय,
कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा सचिव, श्री अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ,
कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १४-०१-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी हे सर्व गैरहजर आहेत.

सुनावणीचे सुरुवातीस आयोगास, अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १४-०७-२००९ रोजीचे पत्र सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने

विचाराधीन प्रकरण त्यांना चालवावयाचे नाही, प्रकरणात दोनही बाजूंनी त्यांचा समझोता आहे व त्यानुसार अपील निकाली काढावे अशी आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-०७-२००९ रोजीच्या पत्राव्दारे आयोगास केलेल्या विनंतीचा विचार करता अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ८६८/२००८, दिनांक १४-०१-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. गोल्हार अशोक सयाजीराव, मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, मोतीलाल कोठारी विद्यालय, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, श्री. अमोलक जैन विद्या प्रसारक मंडळ, कडा, तालुका आष्टी, जिल्हा बीड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८६९

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, : अपिलार्थी
मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारे पत्र लिहून मुदतीत माहिती देण्यास टाळाटाळ केली व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपिलाची दखल घेतली नसल्याने आवश्यक ती माहिती मिळण्यासाठी त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २७-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे भारत ग्रामीण रोजगार हमी योजने अंतर्गत मौजे लादगा तालुका मुखेड येथे झालेल्या कामाची माहिती एकूण चार मुद्दयाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी (दिलेल्या पत्रावर १६-०१-२००७ अशी तारीख टाकली आहे) त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या या योजनेसंदर्भात ती योजना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातर्फे कार्यन्वित केली गेली नसल्याचे अपिलार्थीस कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०२-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी २२-०२-२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि हे पत्र अपिलार्थीस दिनांक २८-०२-२००८ रोजी प्राप्त झाल्याने या कथित सुनावणीसाठी अपिलार्थी हजर राहू शकले नाहीत व तसेच या सुनावणीच्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून त्यांना कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता अपिलार्थीच्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, मुखेड यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ०२-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सुर्यवंशी अशोक विठ्ठलराव, मु. होंडाळा, पो. दापका (राजा), तालुका मुखेड, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७०

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. एकनाथ भाऊराव मराठे,<br>" औदुंबर निवास ", मन्नालाल सराफनगर,<br>अमतेश्वर मंदिरासमोर, जुना जालना | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी<br>मर्यादित, ग्रामीण उपविभाग, जालना | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, जालना | : | प्रतिवादी |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १२-११-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागविलेली माहिती त्यांना न दिल्यामुळे व जुनी २००६ ची दिशाभूल करणारी व अनावश्यक माहिती दिल्याने व तसेच जन अपिलीय अधिकारी यांनी माहिती अधिकारी सुनावणीसाठी गैरहजर असूनही त्यांच्यावर कुठलीही कार्यवाही न केल्याने व अपिलार्थीस अपूर्ण, अनावश्यक व दिशाभूल करणारी माहिती

दिल्यामुळे व त्यांचे समाधान झालेले नसल्याने त्यांची विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-०९-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील मौजे कुंभेफळ येथील सिंचनासाठी विद्युत पुरवठा दिल्याबाबतची दिनांक ०१ जानेवारी २००५ ते ०१-०९-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. यानंतर अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०४-१०-२००८ रोजी प्रथम अपील केले व तदनंतर त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीच्या मूळ अर्जासंदर्भात त्यांनी केलेला पत्रव्यवहार व आवश्यक त्या कागदपत्राच्या अनुपलब्धतेमुळे वस्तुस्थिती कळण्यास मार्ग नाही. तसेच अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात माहिती मिळाली किंवा कसे, मिळाली असल्यास प्राप्त माहिती अपिलार्थीस अनावश्यक कशी वाटते व त्या माहितीमुळे अपिलार्थीची दिशाभूल कशा प्रकारे झाली आहे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. केवळ अपिलार्थीचे समाधान झाले नाही, म्हणून अपिलार्थीने आयोगाकडे अपील करणे, सुनावणीचे वेळी सर्व संबंधितांची अनुपस्थिती व आवश्यक त्या कोणत्याही कागदपत्रांच्या अनुपलब्धता असणे यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्याशिवाय दुसरा कोणताही निर्णय आयोग देऊ शकत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

# आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०६-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. एकनाथ भाऊराव मराठे, " औदुंबर निवास ", मन्नालाल सराफनगर, अमतेश्वर मंदिरासमोर, जुना जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा सहायक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, ग्रामीण उपविभाग, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित, जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७१

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

| | | | |
|---|---|---|---|
| १ | श्री. जी. एस. रायबोळे,<br>मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ,<br>तालुका किनवट, जिल्हा नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | | |
|---|---|---|---|
| १ | जन माहिती अधिकारी<br>तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड | | |
| २ | जन अपिलीय अधिकारी<br>तथा उपसंचालक,<br>क्रीडा व युवकसेवा विभाग, लातूर | : | प्रतिवादी |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २५-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १५-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे, जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांच्यामार्फत शासनाकडून स्वंयसेवी संस्था, शाळा, महाविद्यालये, व्यायामशाळा व क्रीडा विकासासाठी दिलेल्या अनुदानासंदर्भात सन २००० ते २००७ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या

माहितीमध्ये - अनुदानाच्या रकमेची व लाभार्थ्यांच्या नावांचा व त्यांना दिलेल्या अनुदानाची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाबरोबर त्यांनी जोडलेल्या त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जाची व त्यावरील अपील अर्जाची प्रत्येकी एक प्रत वगळता इतर कोणतीही कागदपत्रे आयोगास उपलब्ध करुन दिली नाहीत. या प्रकरणाची वस्तुस्थिती स्पष्ट करण्यासाठी क्रीडा विभागाचे अधिकारी आयोगासमोर उपस्थित नाहीत हे पाहता, आयोगास अपिलार्थीचे व्दितीय अपील फेटाळण्याशिवाय दुसरा कोणताही पर्याय नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

औरंगाबाद ( वि. बा. बोरगे )

दिनांक ०६-०८-२००९ राज्य माहिती आयुक्त

खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. जी. एस. रायबोळे, मुख्य संपादक, साप्तहिक धुमाकूळ, तालुका किनवट, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा जिल्हा क्रीडा अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उपसंचालक, क्रीडा व युवकसेवा विभाग, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७३८

निर्णय दिनांक ०६-०८-२००९

१ श्री. अमरराजे कदम परमेश्वर, अपिलार्थी
" परमेश्वरवाडा " तुळजापूर, तालुका तुळजापूर,
जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा उपविभागीय अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) उपविभाग, परंडा,
जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी प्रतिवादी
तथा कार्यकारी अभियंता,
लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २८-०२-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०६-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर आहेत.

सदर अपील अपिलार्थीने मूळात दिनांक २७-०४-२००७ रोजी आयोगाकडे केले होते व त्याची नोंदणी आयोगाकडे दिनांक ३०-०४-२००७ रोजी झाली आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिका-यास जन अपिलीय अधिकारी यांनी

१३२५० रुपये इतकी शास्ती न लावता व अपिलार्थीस पूर्ण माहिती न दिल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक १५-०७-२००९ रोजीचे एक पत्र आयोगास सादर करण्यात आले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दिनांक १३-०२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना दिनांक २०-०४-२००७ रोजी मिळाली होती. परंतु त्यांनी काही गैरसमजातून आयोगाकडे दिनांक २७-०४-२००७ रोजी अपील दाखल केले होते ते आता न चालविता ते बंद करण्यात यावे अशी विनंती त्यांनी आयोगास त्यांच्या या दिनांक १५-०७-२००९ रोजीच्या पत्रामध्ये केलेली आहे. अपिलार्थीची ही विनंती आयोग मान्य करत असून अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील क्रमांक २७३८/२००७, दिनांक २८-०२-२००८ खारीज करण्यात येत आहे.

औरंगाबाद

दिनांक ०६-०८-२००९

( वि. बा. बोरगे )
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ औरंगाबाद

प्रत,

१ श्री. अमरराजे कदम परमेश्वर, " परमेश्वरवाडा " तुळजापूर, तालुका तुळजापूर, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर)

उपविभाग, परंडा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर) विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०६३/२००८, १०६४/०८ व १०६५/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०६३, १०६४ व १०६५

निर्णय दिनांक ०७-०८-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक १०६३/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू,
तालुका सेलू, जिल्हा परभणी

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी

अपील क्रमांक १०६४/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल),

तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर,

तालुका उदगीर, जिल्हा लातूर

अपील क्रमांक १०६५/०८

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (महसूल),

तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,

तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष - अपील क्रमांक १०६३/०८ : श्री. ठावरे नागनाथ विक्रम

त्रयस्थ पक्ष - अपील क्रमांक १०६४/०८ : श्री. फुलारी अश्विन माणिकराव

त्रयस्थ पक्ष - अपील क्रमांक १०६५/०८ : श्री. शिरुर जीवन पिराजीराव

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००८, दिनांक ०९-०५-२००८ व दिनांक १५-०५-२००८ रोजी नोंदविलेली अनुक्रमे अपील क्रमांक १०६३/२००८, १०६४ व १०६५/२००८ ही तीन स्वतंत्र व्दितीय अपिले, एकाच विषयाशी संबंधित असल्याने, एकत्रित सुनावणीसाठी आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे अनुक्रमे दिनांक २१-०१-२००८ रोजी दोन व दिनांक ३०-०१-२००८ रोजी एक असे माहितीसाठीचे अर्ज दिले असतांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक १०६३/०८,

१०६४/०८ व १०६५/०८ या द्वितिय अपीलाशी संबंधीत अनुक्रमे दिनांक २४-०३-२००८, दिनांक ०८-०४-२००८ व २४-०३-२००८ रोजी प्रथम अपिले सादर केली असता, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी या प्रकरणी अपिलांची सुनावणी न घेता प्रकरणे प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ०७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक १०६३/०८ शी संबंधित उप विभागीय अधिकारी, सेलू यांचे प्रतिनिधी हजर व जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत. अपील क्रमांक १०६४/०८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष हजर आहेत. अपील क्रमांक १०६५/०८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचे प्रतिनिधी हजर नाहीत. या तीनही अपील प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी हजर आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः अपील क्रमांक १०६३/०८ व १०६४/०८ च्या संदर्भात दिनांक २१-०१-२००८ रोजी व अपील क्रमांक १०६५/०८ च्या संदर्भात दिनांक ३०-०१-२००८ रोजी अनुक्रमे उपविभागीय अधिकारी, सेलू, नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उदगीर व नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली यांच्याकडे अनुक्रमे त्रयस्थ पक्ष श्री. ठावरे नागनाथ विक्रम, श्री. फुलारी अश्विन माणिकराव व श्री. शिरुरे जीवन पिराजीराव यांच्या जात प्रमाणपत्राच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या तीन जातीची प्रमाणपत्रे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी निर्गमित केली होती, या त्रयस्थ पक्षांनी आपापल्या जातीची प्रमाणपत्रे मिळविण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या कागदपत्राच्या मूळ संचिकेच्या सत्यप्रती, तसेच जावक क्रमांकाच्या रजिस्टरच्या सत्यप्रती, या जातीची प्रमाणपत्रे त्यांच्या कार्यालयाकडून देण्यात आली आहेत किंवा नाही - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू यांनी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या कार्यालयाशी संबंधित नसल्याने अपिलार्थीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज दिनांक ०८-०२-२००८ रोजी उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांच्याकडे पाठवून अपिलार्थीस माहिती पुरविण्याचे त्यांना सूचित केले. अपील क्रमांक १०६४/०८ व १०६५/०८ च्या संदर्भात संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपील क्रमांक १०६३/०८, १०६४/०८ व १०६५/०८ च्या संदर्भात अनुक्रमे दिनांक २४-०३-२००८, ०८-०४-२००८ व दिनांक २४-०३-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपिले केली. या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

**<u>अपील क्रमांक १०६३/०८</u>**

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी आयोगास या अपील अर्जासंदर्भात केलेल्या व्दितीय अपील अर्जातील निवेदनाप्रमाणे आयोगासमोर युक्तिवाद केला.

उप विभागीय अधिकारी (महसूल), सेलू यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांच्याशी संबंधित असल्याने त्यांनी दिनांक ०८-०२-२००८ रोजी अपिलार्थीच्या प्रथम अर्जाची प्रत, उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांच्याकडे पाठवून दिली. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना कोणत्या संचिकेद्वारे पुरविली आहे हे देखील त्यांनी उपविभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या पत्राने कळविले आहे. त्यांच्या दिनांक ०८-०२-२००८ रोजीच्या पत्राप्रमाणे त्यांनी परत दिनांक ०१-०४-२००८ रोजी उपविभाीय अधिकारी (महसूल), परभणी

यांना या अर्जाची प्रत पाठविली. तथापि उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी हे अपिलार्थीस माहिती का पुरवू शकले नाहीत याची कारणे त्यांच्याकडे उपलब्ध नाहीत.

या प्रकारणाशी संबंधित घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप पाहता, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. मात्र ही माहिती देतांना जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदींचा विचार करणे भाग आहे. सबब उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासंदर्भात अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदीचा विचार करुन हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थीच्या प्रथम अर्जासंदर्भात आपला निर्णय घ्यावा. उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांच्याकडून प्राप्त झालेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान झाले नाही तर ते अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार अपर जिल्हाधिकारी, परभणी यांच्याकडे प्रथम अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अपील क्रमांक १०६४/०८**

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जातील केलेल्या निवेदनाप्रमाणे आयोगासमोर युक्तिवाद केला आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या विषयावर माहितीची मागणी केली आहे त्या विषयाशी संबंधित संचिका त्यांच्या कार्यालयाकडे आढळून येत नाही.

आज रोजी सुनावणीसाठी त्रयस्थ पक्ष श्री. अश्विन माणिकराव फुलारी हे आयोगासमोर हजर असून त्यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे नांदेड जिल्ह्यातील शिक्षण संस्थेतील माहिती व कर्मचारी यांच्या संदर्भात माहिती मागवित असून त्यांच्या या कृतीमुळे शासकीय अधिकारी / कर्मचारी यांना आर्थिक व मानसिक त्रास होत आहे. अपिलार्थी हे एकंदरीत कर्मचा-यांचे आर्थिक शोषण करण्याचा प्रयत्न कदाचित करीत असेल त्याचा आयोगाने गांभीर्याने विचार करावा. या अपिलार्थीमुळे त्यांना आर्थिक व मानसिक त्रास तर झालाच पण विद्यालयात चाचणी परीक्षा समोर असतांना त्यांना दोन दिवसांची रजा घ्यावी लागली व विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान झाले. याबरोबर कासराळी ते उदगीर व औरंगाबाद असा प्रवास करावा लागून त्यांना नाहक आर्थिक खर्च करावा लागला या खर्चाची वसूली अपिलकर्ता यांच्याकडून करुन द्यावी. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांनी सोबत आणली आहे परंतु अपिलार्थीच्या अशा प्रकारच्या वागणुकीचा गांभीर्याने विचार करुन त्यांना न्याय द्यावा.

या घटनाक्रमासंदर्भात दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने तहसीलदार, उदगीर यांच्याकडे प्रथम अपील दिनांक ०८-०४-२००८ रोजी केल्याचे म्हटले आहे. तथापि यासंदर्भात आवश्यक तो पुरावा त्यांनी आपल्या कागदपत्रासोबत जोडलेला नाही. तसेच त्यांनी तहसील कार्यालय, उदगीर, जिल्हा नांदेड असे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे केलेल्या अपील अर्जावर म्हटले आहे. उदगीर तहसील लातूर जिल्हयामध्ये आहे. यावरुन अपिलार्थीने चुकीच्या पत्त्यावर अपील केल्याचे आयोगास आढळून येत आहे.

तसेच अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे सादर केलेल्या प्रथम अपील अर्जाच्या प्रतीवर अपिलार्थीची सही नाही, ही त्रुटी अपिलार्थीने सुनावणीच्या वेळी मान्य केली. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येते की, त्यांनी आता जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, उदगीर यांच्याकडे त्यांच्या दिनांक २१-०१-२००८ रोजीच्या प्रथम अर्जासंदर्भात प्रथम अपील अर्ज करावा व तहसीलदार, उदगीर यांनी अपिलार्थीचा याविषयावर प्रथम अपील अर्ज

प्राप्त झाल्यानंतर, अपिलार्थीच्या अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारीत करावा, असे तहसीलदार उदगीर तथा जन अपिलीय अधिकारी यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास अपिलार्थी अधिनियमातील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार राज्य माहिती आयोगाकडे, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**अपील क्रमांक १०६५/०८**

या प्रकरणी अपिलार्थीने आयोगाकडे झालेल्या सुनावणीमध्ये अपिलार्थीने आपल्या व्दितीय अपील अर्जातील निवेदनाशी सुसंगत असा युक्तिवाद केला.

आज रोजी सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाही.

या प्रकरणाशी संबंधित घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी केलेल्या कथित प्रथम अपील अर्जासंदर्भात कोणताही पुरावा आयोगास सादर केलेला नाही. सबब अपिलार्थीचा मूळ अपील अर्ज तहसीलदार, बिलोली यांना प्राप्त झाला आहे किंवा कसे हे आयोगास कळण्यास मार्ग नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने त्यांचा दिनांक ३०-०१-२००८ रोजीचा माहितीसाठीचा प्रथम अर्ज दाखल केल्याचा आवश्यक तो पुरावा त्यांनी आयोगासमोर सादर केला आहे.

अपिलार्थीने या अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. शिरुरे जीवन पिराजीराव यांनी कुंभार जातीचे प्रमाणपत्र मिळण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दाखल केलेल्या आवश्यक त्या कागदपत्राच्या सत्यप्रतीची मागणी केली होती, तथापि अपिलार्थीच्या या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही कार्यवाही केली नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील तरतुदीशी सुसंगत असून ती त्रयस्थ पक्षाशी संबंधित आहे. या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही केलेली नाही. सबब जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, बिलोली यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०३-२००८ रोजीच्या अपील अर्जावर अधिनियमातील कलम ११ च्या तरतुदी लक्षात घेऊन निर्णय देण्यासंदर्भात हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसाच्या आत आवश्यक ती कार्यवाही करावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अधिकारी (महसूल), परभणी यांना या

निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, परभणी यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, उदगीर, तालुका उदगीर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०६६/२००८, १०६७ व १०६८/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०६६, १०६७ व १०६८

निर्णय दिनांक ०७-०८-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक १०६६/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक १०६७/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर,

तालुका देगलूर, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक १०६८/०८

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार (महसूल),

तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड,

जिल्हा नांदेड

त्रयस्थ पक्ष - अपील क्रमांक १०६६/०८ : १. श्री. सुरेश शेषेराव सोनकांबळे

त्रयस्थ पक्ष - अपील क्रमांक १०६७/०८ : १. श्री. दंडेवार मारोती हुलगुंडे,

२. श्री. प्रल्हाद दामोधर जाधव

त्रयस्थ पक्ष - अपील क्रमांक १०६८/०८ : १. कु. फहमुनीसा बेगम पि. अ. गनी

२. श्री. सय्यद रहिम सय्यद मुख्तार

३. श्री. खलील अहमद पि. एम. ए. जलील

४. श्री. शेख जाकीर शेख अहेमद

५. श्री. गुलाम अहेमद गुलाम महेमुद

६. श्री. शकील अहेमद नजीर अहेमद

७. श्री. सिरोजोद्दीन सईदोद्दीन

८. श्री. अब्दुल मजीद अब्दुल रहीम सौदागर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८, दिनांक १५-०५-२००८ व दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेली अनुक्रमे क्रमांक १०६६/२००८,

१०६७/२००८ व १०६८/२००८  अशी  तीन स्वतंत्र व्दितीय अपिले रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने एकाच स्वरुपाची माहिती ही वेगवेगळ्या जन माहिती अधिका-याकडे मागितली असल्याने या तीनही अपिलांची आयोगातर्फे एकत्रित सुनावणी घेण्यात येत आहे.  या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षासंदर्भात काही माहिती मागविली असता संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ३१-०१-२००८, १०-०३-२००८ व २६-१२-२००७ रोजी प्रथम अपिले केली आहेत.  संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न घेता प्रकरणे प्रलंबीत ठेवली असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ०७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक १०६६/०८ व १०६७/०८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी आणि त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत.  अपील क्रमांक १०६८/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी तथा जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व त्रयस्थ पक्ष गैरहजर आहेत. या तीनही अपील प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी हजर आहेत.

**<u>अपील क्रमांक १०६६/२००८</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जामधील जन माहिती अधिकारी यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक ११-०६-१९९२ रोजी श्री. सुरेश शेषेराव सोनकांबळे यांनी महार जातीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या व यासंदर्भात त्यांनी केलेल्या प्रथम अपिलावर संबंधितांनी कोणताही

निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता त्यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या कागदपत्रांच्या प्रती संबंधितांना प्राप्त झाल्यासंदर्भात कोणताही पुरावा त्यामध्ये उपलब्ध असल्याचे आयोगास आढळून येत नाही. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आज स्वतः उपस्थित आहेत. आयोगाने त्यांच्याकडे यासंदर्भातील पुराव्याची मागणी केली असता, सदर पुरावा त्यांनी आपल्या बरोबर आणला नाही असे आयोगास अवगत केले. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी ते स्वतः अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगा-समोर उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अपील क्रमांक १०६७/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या दिनांक १०-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जामधील जन माहिती अधिकारी यांच्याकडे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून दिनांक २६-१०-१९९० रोजी श्री. दंडेवार मारोती हुलगुंडे यांनी धनगड जातीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी व दिनांक ०४-०४-१९९१ रोजी श्री. प्रल्हाद दामोधर जाधव यांनी लमाणी जातीचे प्रमाणपत्र घेण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेल्या कागदपत्राच्या सत्यप्रती ही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या व यासंदर्भात त्यांनी केलेल्या प्रथम अपिलावर संबंधितांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या आयोगाकडे सादर करण्यात आलेल्या कागदपत्रांची तपासणी करता त्यामध्ये अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या अर्जांच्या प्रती संबंधितांना प्राप्त झाल्यासंदर्भात कोणताही पुरावा त्यामध्ये उपलब्ध असल्याचे आयोगास आढळून येत नाही. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे आज स्वत: उपस्थित आहेत. आयोगाने त्यांच्याकडे यासंदर्भातील पुराव्याची मागणी केली असता सदर पुरावा त्यांनी आपल्या बरोबर आणला नाही असे आयोगास अवगत केले. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी ते स्वत: अथवा त्यांचे कोणीही प्रतिनिधी आयोगा-समोर उपस्थित नाहीत हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**<u>आदेश</u>**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**<u>अपील क्रमांक १०६८/२००८</u>**

या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दिनांक २९-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे आठ त्रयस्थ पक्षांच्या जाती प्रमाणपत्राबरोबर संबंधित त्रयस्थ पक्षाने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात सादर केलेल्या अर्जासंबंधीच्या कागदपत्रांच्या सत्यप्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक २७-११-२००७ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या आठ त्रयस्थ पक्षांच्या माहितीपैकी पाच त्रयस्थ पक्षांच्या संदर्भातील माहिती नष्ट करण्यात आली असून दोन त्रयस्थ पक्षासंदर्भातील माहिती शोधण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले व एका त्रयस्थ पक्षाच्या संदर्भातील माहिती घेण्यासाठी अपिलार्थीस माहितीपोटीचे आवश्यक ते शुल्क रुपये २० इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. तथापि हे पत्र अपिलार्थीस प्राप्त झाले नसल्याचे अपिलार्थीने आयोगास आज रोजी स्पष्ट केले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून

कोणताही प्रतिसाद न मिळाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम अपील केले. हा अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांना दिनांक ०४-०१-२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०२-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हा निर्णय अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जातील अभिप्रायाशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने माहितीसाठीच्या त्यांच्या मूळ अर्जात जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण आठ त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्रयस्थ पक्ष क्रमांक १, २, ३, ६ व ८ या संदर्भातील माहिती त्यांनी १९८२ साली लखीना पॅटर्नअंतर्गत त्यांच्या कार्यालयातील अभिलेख्यांचे पुनर्व्यवस्थापन करतांना नष्ट केली व यासदर्भातील आवश्यक तो पुरावा ते अपिलार्थीस पुरविण्यास तयार आहेत, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील क्रमांक ४ व ५ वरील त्रयस्थ पक्षांच्या संदर्भातील संचिकांचा शोध घेण्याचे काम त्यांच्या कार्यालयात चालू असून ही माहिती तीस वर्षापूर्वीची जुनी असल्याने ही अपिलार्थीस देण्यामध्ये त्यांना अडचणी येत आहेत. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७ वरील त्रयस्थ पक्षासंदर्भात अपिलार्थीस त्यांनी दिनांक २७-११-२००७ रोजी २० रुपये इतक्या शुल्काचा भरणा करण्याचे सांगितले होते. तथापि हे शुल्क अपिलार्थीने न भरल्यामुळे त्यांना अपिलार्थीस माहिती पुरविता आली नाही. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे त्यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती हस्तगत करुन घेण्याची विनंती केली होती. तथापि अपिलार्थीने ही माहिती त्यांच्याकडून हस्तगत

करुन घेतली नाही. यावर अपिलार्थीने असा खुलासा केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाची व जन माहिती अधिकारी यांच्या कथित दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या पत्राची प्रत त्यांना प्राप्त झाली नाही.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण आठ त्रयस्थ पक्षांच्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीपैकी अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्ष क्रमांक १, २, ३, ६ व ८ शी संबंधित माहिती, ती नष्ट झाल्यामुळे आता, मिळू शकणार नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील त्रयस्थ पक्ष क्रमांक ४ व ५ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी या माहितीचा शोध त्यांच्या कार्यालयात अभिलेख कक्षात कसोशीने घेऊन ही माहिती अपिलार्थीस तीस दिवसाचे आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी. जर ही माहिती नष्ट केलेली असेल तर या संदर्भातील आवश्यक तो पुरावा त्यांनी याच कालावधीमध्ये अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाने पाठवावा. अपिलार्थीच्या मूळ अर्जातील अनुक्रमांक ७ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे. तथापि त्यांनी ही माहिती अपिलार्थीस, त्यांनी माहितीसाठीच्या मूळ अर्जाव्दारे माहिती नमूद केल्याप्रमाणे रजिस्टर्ड पोस्टाने न पाठविता जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून हस्तगत करुन घेण्याची सूचना अपिलार्थीस केली आहे. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची व गैर आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जामध्ये रजिस्टर्ड टपालाव्दारे माहिती मागितली असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात उपस्थित राहून माहिती हस्तगत करुन घेऊन जाण्यासाठी सूचना देण्याचे जन माहिती अधिकारी यांना कोणतेही प्रयोजन नव्हते. त्यांच्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी एक प्रकारे टाळाटाळ केली असल्याचे सिध्द होत आहे. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीबद्दल त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत आहे व जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्रमांक ७

शी संबंधीत संपूर्ण माहिती व मुद्दा क्रमांक १, २, ३, ६ व ८ ही माहिती नष्ट केल्याचा पुरावा अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड पोस्टाने विनामूल्य पुरवावा.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत रजिस्टर्ड टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, देगलूर, तालुका देगलूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, नांदेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०६९/२००८ व १०७०/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०६९ व १०७०

निर्णय दिनांक ०७-०८-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक १०६९/०८

१ जन माहिती अधिकारी,
अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य रस्ते
विकास महामंडळ, देवगिरी विश्रामगृह, नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा अधीक्षक अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्यादित), नांदेड

जन अपिलीय अधिकारी : मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्यादित), औरंगाबाद

अपील क्रमांक १०७०/०८

१ जन माहिती अधिकारी,

मुख्य अभियंता यांचे कार्यालय, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास

महामंडळ, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा मुख्य अभियंता,

महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्यादित), नांदेड

**निर्णय**

**अपील क्रमांक १०६९/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०१-२००८ रोजी अर्ज सादर केला असता विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी दिनांक १७-०३-२००८ रोजी प्रथम अपिलेट अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता प्रथम अपिलेट अधिकारी यांनी अपिलाची सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्हा लघु वृत्तपत्र व पत्रकार संघाने दिनांक २०-०३-२००७ रोजी क्रमांक १२/२००६-०७ च्या लेखी पत्राव्दारे विजय कन्स्ट्रक्शन कंपनी सोलापूर यांच्या संदर्भात दिलेल्या लेखी तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कायदेशीर कार्यवाही केली या

कार्यवाहीच्या व चौकशी अहवालाच्या सत्यप्रती व जर कार्यवाही केली नसेल तर त्याची कारणे या मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २५-०१-२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ११-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातील संदर्भिय तक्रारीवरुन चौकशी केली असता त्यामध्ये कोणत्याही प्रकारे शासनाची फसवणूक करणारे अथवा शहराच्या विकासात अडथळा निर्माण करणारे कोणतेही पुरावे आढळले नसल्याने सदर प्रकरण दप्तरबंद केले असल्याचे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १७-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-०२-२००८ रोजी पुरविली असून जिल्हा लघु वृत्तपत्र व पत्रकार संघाने विजय कंन्स्ट्रक्शन कंपनी सोलापूर यांच्या विरुध्द दिलेल्या तक्रारीमध्ये तथ्य आढळून आले नसल्याने हे प्रकरण त्यांच्या स्तरावर बंद केले आहे.

जिल्हा लघु वृत्तपत्र व पत्रकार संघाने दिलेल्या तक्रारीवर नेमकी कशा प्रकारे चौकशी करण्यात आली व कोणत्या कागदपत्राच्या आधारे या चौकशीच्या संदर्भात अंतीम निर्णय घेतला गेला यासंबंधीची माहिती अपिलार्थीस पुरविली आहे किंवा कसे असे आयोगाने विचारले असता,

त्यांनी अशा प्रकारच्या चौकशी अहवालाची प्रत वगैरे त्यांनी अपिलार्थीस पाठविली नसल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेल्या माहितीपैकी " कार्यवाही केली नसेल तर त्याची कारणे काय " या मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, कारण जन माहिती अधिकारी यांना माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये, अर्जदाराने त्यांच्या कृतीबाबतची कारणे विचारणे व अशा प्रकारच्या कारणांचे स्पष्टीकरण जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास देणे अशा प्रकारच्या प्रक्रियेचा समावेश नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन केले असता त्यामध्ये अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे चौकशी केलेल्या कार्यवाहीसंदर्भात व चौकशी अहवालाच्या प्रती यांच्या माहितीची मागणी केली असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी संदर्भित केलेल्या प्रकरणातील अंतीम निर्णय कळविला आहे. परंतु चौकशी अहवाल व यासंदर्भात त्यांनी केलेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती अपिलार्थीस पुरविल्या नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अपिलार्थीने मागणी केलेली ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ती पुरविणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये संदर्भित केलेली तक्रार त्यांच्या कार्यालयात प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या अर्जावर विविध प्राधिकरणाशी दि. २५-०१-०८ पर्यंत केलेल्या पत्रव्यवहाराच्या व चौकशी अहवालाच्या प्रती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्याव्यात.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्‌हेतूने माहिती दडविल्याचे आयोगास आढळून न आल्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कोणतीही कारवाई आयोग आदेशित करु इच्छित नाही. तथापि इत:पर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणा-या प्रत्येक अर्जावर त्यांनी सतर्कतेने कार्यवाही करुन अर्जदारांना त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती देण्याबाबत अधिनियमातील तरतुदीनुसार निर्णय घ्यावा, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

प्रसंगावशात् या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक १७-०३-२००८ रोजी प्रथम अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या बेजबाबदार कार्यशैलीची यथायोग्यरित्या नोंद उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्यादित), मुंबई यांनी घ्यावी, असे त्यांना येथे सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील " कार्यवाही केली नसेल तर त्याची कारणे " हा मुद्दा वगळून उर्वरित सर्व मुद्दयावरील, वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**अपील क्रमांक १०७०/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १५-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २८-०१-२००८ रोजी अर्ज पाठवून दिला या अर्जावर जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीच्या आत माहिती न दिल्यामुळे त्यांनी दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपिलेट अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता प्रथम अपिलेट अधिकारी यांनी दिनांक ०९-०५-२००८ रोजी प्रथम अपील अर्जाची सुनावणी घेऊन निरंक माहिती असा निर्णय दिला असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नांदेड जिल्हा लघु वृत्तपत्र व पत्रकार संघाने दिनांक ०२-०४-२००७ रोजी क्रमांक १४/२००६-०७ च्या लेखी पत्राव्दारे विजय कन्स्ट्रक्शन कंपनी सोलापूर यांच्या संदर्भात दिलेल्या लेखी तक्रारीवर जन माहिती अधिकारी यांनी कोणती कायदेशीर कार्यवाही केली या कार्यवाहीच्या व चौकशी अहवालाच्या सत्यप्रती व जर कार्यवाही केली नसेल तर त्याची कारणे या मुद्दयावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीचा हा अर्ज जन माहिती अधिकारी यांना दिनांक २८-०१-२००८ रोजी प्राप्त झाला. या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ०७-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन आपल्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती निरंक समजण्यात यावी असे अपिलार्थीस कळविले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०९-०५-२००८ रोजी सुनावणी घेऊन सदरील प्रकरणी निरंक माहिती असा निर्णय दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ०७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीसंदर्भात त्यांना दिनांक ०७-०२-२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली असून या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या माहितीची मागणी केली आहे, ती माहिती नांदेड जिल्हा लघु वृत्तपत्र व पत्रकार संघ यांच्या दिनांक १४/२००६-०७ च्या दिनांक ०२-०४-२००७ च्या तक्रार अर्जासंदर्भात आहे. पत्रकारांनी दिलेल्या या तक्रारीवरुन कोणत्याही प्रकारची चौकशी झाली नसल्याने त्यांनी अपिलार्थीस अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक ०७-०२-२००८ रोजी निरंक माहिती पुरविली. अपिलार्थीने या प्रकरणी दिनांक २४-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले असता या अपिलाची सुनावणी जन अपिलीय अधिकारी तथा तत्कालीन अधीक्षक अभियंता श्री. डुबे यांनी दिनांक ०९-०५-२००८ रोजी घेऊन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ०७-०२-२००८ रोजीच्या पत्राची प्रत हस्तांतरीत केली आहे.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, नांदेड जिल्हा लघु वृत्तपत्र पत्रकार संघाच्या पत्र क्रमांक १४/२००६-०७ दिनांक ०२-०४-२००७ रोजीच्या पत्राव्दारे त्यांनी अधीक्षक अभियंता यांच्याकडे विजय कन्स्ट्रक्शन कंपनी, सोलापूर यांच्या विरुध्द केलेल्या अर्जावर कोणतीही कार्यवाही जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाकडून केली गेली नसल्याचे स्पष्ट होत आहे. तथापि अशी माहिती देण्याऐवजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस 'निरंक' अशी माहिती दिली. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस माहिती देण्याची ही पध्दत

सदोष  व चुकीची आहे.  जरी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये नमूद केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नसली तरी त्यांनी या प्रकरणी अपिलार्थीस तसे  विहित मुदतीत स्पष्टपणे कळविणे त्यांना भाग होते.  परंतु त्यांनी अपिलार्थीस अप्रत्यक्षरित्या माहिती देण्याचा प्रयत्न करुन 'निरंक'  या शब्दाव्दारे त्यांच्या कार्यालयाने कोणतीही कार्यवाही केली नाही असे सुचविले आहे.  माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्या स्वरुपात ती अर्जदारास  उपलब्ध करुन देणे अभिप्रेत आहे.

उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने नांदेड जिल्हा लघु वृत्तपत्र संघाच्या संदर्भित पत्रावर अपिलार्थीने माहितीसाठीचा मूळ अर्ज करेपर्यंत कोणतीही कार्यवाही केली नसल्यास त्यांनी अपिलार्थीस तसे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत स्पष्टपणे व विनामूल्य कळवावे, असे  जन माहिती अधिकारी  यांना आदेशित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील " कार्यवाही केली नसेल तर त्याची कारणे " हा मुद्दा वगळून उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच ७ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**

**दिनांक ०७-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**

**राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्यादित), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्यादित), औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ उपाध्यक्ष तथा व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्यादित), प्रियदर्शनी पार्कच्या बाजुला, देना बँकेसमोर, नेपोलीयन सी रोड, मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०७१/२००८ व १०७२/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०७१ व १०७२

निर्णय दिनांक ०७-०८-२००९

१ श्री. सौदागर महंमद वसीम पिता महंमद एकबाल, : अपिलार्थी
रा. समिराबाग, खडकपुराच्या पाठीमागे,
नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा मुख्याध्यापक, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड,
तालुका मुखेड, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड
मार्फत नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड,
जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०९-०५-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले क्रमांक १०७१/०८ व १०७२/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार दिनांक ०१-१२-२००७ रोजी जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टामार्फत अर्ज सादर केले

असता जन माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड यांच्याकडे दिनांक ०९-०१-२००८ रोजी प्रथम अपिले केली असता प्रथम अपिलीय अधिका-याने या प्रकरणांची सुनावणी न घेता सदरील प्रकरणे प्रलंबीत ठेवल्या कारणाने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे दाखल केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ०१-१२-२००७ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे दोन वेगवेगळया मुद्दयावर स्वतंत्रपणे माहिती मागितली होती व यासंदर्भात दिनांक ०९-०१-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपिले केली होती. परंतु अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती मिळाली नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ०७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी ते स्वतः किंवा त्यांचे प्रतिनिधी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने आयोगाकडे दाखल केलेल्या कागदपत्रांची छाननी केली असता अपिलार्थीने त्यांच्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांनी माहितीसाठीचे अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाने पाठवून दिल्याचे नमूद केले आहे. तथापि यासंदर्भात कोणताही आवश्यक तो पुरावा त्यांनी व्दितीय अपील अर्जासोबत सादर केलेल्या कागदपत्रामध्ये समाविष्ट नाही. तसेच आयोगास हा पुरावा दाखविण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर समक्ष उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीच्या दोनही अपिलावर आवश्यक त्या पुराव्याअभावी सुनावणी घेणे आयोगास प्रस्तुत

वाटत नाही.  सबब आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीची दोनही व्दितीय अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १०७१/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १०७२/०८ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. सौदागर महंमद वसीम पिता महंमद एकबाल, रा. समिराराबाग, खडकपुराच्या पाठीमागे, नांदेड

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सचिव, सना एज्युकेशन सोसायटी, मुखेड मार्फत नोबल उर्दू हायस्कूल, मुखेड, तालुका मुखेड, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०७३/२००८ व १०७४/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०७३ व १०७४

निर्णय दिनांक ०७-०८-२००९

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, : अपिलार्थी

रा. नांदगांव, पो. मांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर,

तालुका चाकूर, जिल्हा लातूर

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर,

तालुका चाकूर, जिल्हा लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २६-०६-२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र व्दितीय अपिले क्रमांक १०७३/०८ व १०७४/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या प्रकरणी आयोगास असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या एकाच मूळ अर्जासंदर्भात दोन स्वतंत्र प्रथम अपिले व व्दितीय अपिले दाखल केली असल्याने या दोनही अपील अर्जांची एकत्रित सुनावणी आयोगातर्फे घेण्यात येत आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक ०७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीस श्री. विनोद नरहरराव जोशी, नायब तहसीलदार (महसूल), तालुका चाकूर यांनी अपिलार्थीने आयोगास उद्देशून लिहिलेला दिनांक ०७-०८-२००९ रोजीचा फॅक्स आयोगास सादर केला असून या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना काही माहिती लिखित स्वरुपात उपलब्ध करुन दिली आहे व काही माहिती पाहण्यासाठी उपलब्ध करुन दिली आहे. सदरील माहितीने त्यांचे समाधान झाले आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडील संचिकाचे अवलोकन केले असता अपिलार्थीने त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या प्रथम अर्जासंदर्भात तहसीलदार तथा जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले त्यांचे दिनांक ०२-०५-२००८ रोजीचे पत्र देखील आयोगाच्या पाहण्यात आले असून या पत्रामध्ये देखील अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना अशा प्रकारचे निवेदन करुन अपिलार्थीस माहितीची आवश्यकता वाटत नसल्याने त्यांचे प्रथम अपील निकाली काढावे अशी विनंती केली असल्याचे दिसून येते. अपिलार्थीचा राज्य माहिती आयोगास जन माहिती अधिकारी यांच्यामार्फत प्राप्त झालेला फॅक्स व अपिलार्थीचे जन अपिलीय अधिकारी यांना उद्देशून लिहिलेले दिनांक ०२-०५-२००८ रोजीचे पत्र पाहता अपिलार्थीस माहिती प्राप्त करुन घेण्यामध्ये फारसे स्वारस्य असावे असे वाटत नाही.

आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थीची गैरहजेरी पाहता, अपिलार्थीची दोनही अपिले क्रमांक १०७३/०८ व १०७४/०८ खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक १०७३/०८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक १०७४/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक ०७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नंदवे तातेराव जगन्नाथराव, रा. नांदगांव, पो. मांजूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर.

२ जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (म), तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, चाकूर, तालुका चाकूर, जिल्हा लातूर यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०७५/०८ , १०७६/०८ व १०७७/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०७५,१०७६ व १०७७
निर्णय दिनांक १०-०८-२००९

१ श्री. अमीर खॉन करीम खॉन, : अपिलार्थी
किनवट, ता.किनवट,जि.नांदेड.

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
तहसील कार्यालय,किनवट,जि.नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी तथा,
तहसीलदार, किनवट, जि. नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,किनवट,जि.नांदेड

त्रयस्थ पक्षः श्री. महाजन, श्री गजानन ट्रेडींग कंपनी

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२७.०६.२००८ रोजी नोंदविलेली एकूण तीन स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र.१०७५/०८, १०७६/०८ व १०७७/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाला उद्देशून लिहिलेले दि. ०७.०८.२००९ रोजीचे एक निवेदन जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले असून, या निवेदनामध्ये अपिलार्थीने अशी विनंती केली आहे की, त्यांना नायब तहसीलदार (पुरवठा) यांनी त्यांच्या उपरोक्त तीनही प्रकरणामध्ये आवश्यक ती माहिती दिली असल्याने त्यांची विचाराधीन तीनही अपिले निकाली काढावीत.

या निवेदनावरुन अपिलार्थीस आता आवश्यक ती माहिती मिळाल्याने विचाराधीन अपील चालविण्यामध्ये त्यांना स्वारस्य राहिले नसल्याचे दिसून येत आहे. सबब अपिलार्थीने विनंती केल्याप्रमाणे त्यांची विचाराधीन तीनही अपिले खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र.१०७५/०८ खारीज करण्यात येत आहे.

२) अपील क्र.१०७६/०८ खारीज करण्यात येत आहे.

३) अपील क्र.१०७७/०८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. अमीर खॉन करीम खॉन,वार्ड क्र.१४,इस्लामपुरा,किनवट,ता.किनवट,जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा),तहसील कार्यालय, किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०८१/०८ व १०८२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०८१ व १०८२
निर्णय दिनांक १०-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल विभाग), तहसील कार्यालय, नांदेड. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड. | | |

त्रयस्थ पक्ष: **अपील क्र.१०८१/०८:**
१.श्री. रघुनाथ गंगाराम भालेराव,
२.श्री. उत्तम गंगाराम टेकले,
३.श्री. नारायण लोकोजी गैरवाड,
४.श्री. गुजरवाड गोपीनाथ डिगांबर,
५.श्री. दुडकीकर गजानन प्रल्हादराव
**अपील क्र.१०८२/०८:**
१.बोकेफोड धोंडू गंगाराम

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेली एकूण दोन स्वतंत्र द्वितीय अपिले क्र. १०८१/०८ व १०८२/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने त्रयस्थ पक्षाशी संबंधित एकाच स्वरुपाची माहिती वेगवेगळया अर्जाद्वारे मागितली असल्याने या प्रकरणांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

या दोनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे वेगवेगळया त्रयस्थ पक्षाने त्यांच्याकडे जातीचे प्रमाणपत्र घेण्याकरिता

केलेल्या अर्जांच्या प्रतीसोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती ही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार मागितली होती. तथापि ही माहिती त्यांना मुदतीत न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलेट अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांच्याकडे दि. २६.१२.२००७ व दि.२०.२.२००८ रोजी दोन प्रथम अपिले दाखल केली असता, ही अपिले अपिलीय प्राधिकरणाकडे प्रलंबित राहिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने अपील क्र.१०८१/०८ च्या संदर्भात प्रथमतः दि. ०५.११.२००७ रोजी व अपील क्र.१०८२/०८ च्या संदर्भात दि.०९.०१.२००८ रोजी, अनुक्रमे त्रयस्थ पक्ष श्री. रघुनाथ गंगाराम भालेराव,श्री. उत्तम गंगाराम टेकले,श्री. नारायण लोकोजी गैरवाड,श्री. गुजरवाड गोपीनाथ डिगांबर, श्री. दुडकीकर गजानन प्रल्हादराव या पाच व्यक्तींनी स्वतःच्या जातीचे प्रमाणपत्र प्राप्त करुन घेण्याकरिता जन माहिती अधिकारी यांच्याकडे सादर केलेल्या अर्जासोबत जोडलेल्या कागदपत्रांच्या प्रती मागितल्या होत्या. अपिलार्थीच्या दि. ०५.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२८.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या एकूण ५ त्रयस्थ पक्षाच्या माहितीपैकी श्री. रघुनाथ गंगाराम भालेराव व श्री. उत्तम गंगाराम टेकले यांच्याशी संबंधित संचिका नष्ट करण्यात आल्या असल्याचे अपिलार्थीस कळविले व उर्वरित तीनही श्री.नारायण लोकोजी गैरवाड,श्री.गुजरवाड गोपीनाथ डिगांबर व श्री. दुडकीकर गजानन प्रल्हादराव यांच्याशी संबंधित संचिका अभिलेख कक्षात शोधण्याचे काम चालू असल्याचे अपिलार्थीस कळविले आणि संचिका प्राप्त होताच माहिती देण्याचे अपिलार्थीस आश्वासित केले.

अपिलार्थीच्या अपील क्र. १०८२/०८ च्या दि. ०९.०१.२००८ रोजीच्या प्रथम अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०४.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित असलेल्या संचिका त्यांच्या कार्यालयात उपलब्ध नसल्याचे अपिलार्थीस कळविले. अशाप्रकारच्या कोणत्याही क्रमांकाचे अभिलेखे

त्यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी अपिलार्थीस पाठविलेल्या पत्रामध्ये नमूद केले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने या प्रकरणी अपील क्र.१०८१/०८ च्या संदर्भात दि.२६.१२.२००७ रोजी व अपील क्र.१०८२/०८ च्या संदर्भात दि.२०.०२.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) अन्वये जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २६.१२.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर दि.११.०२.२००८ रोजी निर्णय देऊन, अपिलार्थीस सात दिवसांच्या आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपिलार्थीच्या विचाराधीन अपील क्र.१०८२/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने दि. २०.०२.२००८ रोजी केलेल्या प्रथम अपील अर्जावर दि. ०३.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्यही केले व निकाली काढले. या आदेशामध्ये त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणतीही सूचना दिली नसल्याचे दिसून येते. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस सदर निर्णय पाठविले आहेत. तथापि हे निर्णय अपिलार्थीस प्राप्त न झाल्याने व जन माहिती अधिकारी यांच्याकडील कोणतेही पत्र त्यांना प्राप्त न झाल्याने, त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या दोन प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १०.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या दोनही अपील अर्जांशी संबंधित त्यांनी त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दि. ०५.११.२००७ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील पाच त्रयस्थ पक्षांशी संबंधित असलेल्या संचिकांपैकी एकूण दोन संचिका अभिलेखाच्या वर्गीकरणानुसार त्यांच्या कार्यालयातून नष्ट करण्यात आल्या असून या संचिका नष्ट केल्या असल्याचा पुरावा ते अपिलार्थीस देऊ शकतील. उर्वरित तीन त्रयस्थ पक्षासंबंधीच्या माहिती संदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्या

अभिलेख कक्षामध्ये शोधण्याचे काम चालू असल्याचे त्यांनी आयोगास सांगितले. अपिलार्थीच्या अपील क्र.१०८२/०८ च्या संदर्भातील मूळ अर्ज दि. ०९.०१.२००८ च्या संदर्भात त्यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी या प्रकरणी १९८४ सालच्या सी.आर.रजिस्टरची तपासणी केली असता, या रजिस्टरमध्ये सी.आर.क्र.१ ते ३२४३ पर्यंत नोंद आहे परंतु अर्जदाराने संदर्भित केलेल्या सी.आर.क्र.३२६२ या क्रमांकाची नोंद नाही. ही संचिका अभिलेख कक्षात आढळून आली नाही व तसे त्यांनी अपिलार्थीस दि. ०४.०२.२००८ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे कळविले आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जांद्वारे सहा त्रयस्थ पक्षांचेसंदर्भात माहिती मागविली आहे. त्यापैकी अपील क्र.१०८१/०८ च्या संदर्भातील दि.०५.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे एकूण ५ त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागविली असल्याचे व दि. ०९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे एका त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती मागितल्याचे दिसून येते. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सार्वजनिक स्वरुपाची असल्याने ती जरी त्रयस्थ पक्षाशी संबंधित असली तरी ती उघड करण्यास काहीही हरकत नाही. सबब अपिलार्थीच्या दि. ०५.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील एकूण ५ त्रयस्थ पक्षापैकी ज्या तीन त्रयस्थ पक्षाशी संबंधित माहिती शोधण्याचे काम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयामध्ये चालू आहे, ते त्यांनी हे आदेश निर्गमित होताच ३० दिवसांच्या आत संपवावे व जर ही माहिती त्यांच्या कार्यालयाने नष्ट केली असेल तर यासंदर्भातील पुरावे त्यांनी याच कालावधीमध्ये अपिलार्थीस पाठवावे असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. अपिलार्थीच्या दि. ०९.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीस त्यांच्या कार्यालयातर्फे त्रयस्थ पक्षास दिल्या गेलेल्या प्रमाणपत्र क्र.१९८४/ए/स्टेट/०३/३२६२, दि.१९.१२.१९८४ ची वैधता, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत त्यांच्या स्तरावर तपासावी व या संदर्भातील

वस्तुस्थिती त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये कळवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

या प्रमाणपत्राची वैधता तपासणी करण्यासाठी त्यांना अपिलार्थी यांनी आवश्यक ते सहकार्य वेळोवेळी आवश्यकतेप्रमाणे करावे, असे या प्रकरणी अपिलार्थीस सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र.१०८१/०८ व १०८२/०८ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.१०८१/०८व १०८२/०८ मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र.१०८१/०८व १०८२/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या दोनही मूळ अर्जांद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांक : १०-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर बसस्टॅण्डरोड, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी

संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०८३/०८ व १०८४/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०८३ व १०८४
निर्णय दिनांक: १०.०८.२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ : अपिलार्थी
नांदेड

**विरुध्द**

१. **<u>अपील क्रमांक १०८३/०८</u>**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>मुख्य अभियंता यांचे कार्यालय,<br>महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,<br>बांधकाम भवन,औरंगाबाद | जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य रस्ते विकास<br>महामंडळ,बांधकाम भवन,औरंगाबाद | :प्रतिवादी |

२. **<u>अपील क्रमांक १०८४/०८</u>**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी,<br>अधीक्षक अभियंता यांचे कार्यालय,<br>महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ<br>नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य रस्ते विकास<br>महामंडळ,नांदेड |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
(मर्या.), नांदेड

जन अपिलीय अधिकारी : मुख्य अभियंता,
महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ
(मर्या.), औरंगाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. टेळकीकर, अधीक्षक अभियंता

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले (अपील क्र.१०८३/०८ व १०८४/०८) आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १३.१२.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार स्वतंत्र अर्ज केले असता, त्यांनी मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी मुख्य अभियंता व अधीक्षक अभियंता यांच्याकडे अनुक्रमे दि. ३१.०१.२००८ व २५.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, त्या अपील अर्जाची सुनावणी न घेता एकतर्फी निकाल देऊन अर्जदाराची दिशाभूल केल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

या दोनही अपील अर्जांशी संबंधित प्रथम अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, अपिलार्थीने या दोनही विचाराधीन प्रकरणी एकाच माहितीकरिता कार्यकारी अभियंता यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज व त्यावरील प्रथम अपील अर्ज केला आहे. अपिलार्थीने दोनही प्रकरणी एकच माहिती मागविली असल्याने या दोनही अपील अर्जांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने उपरोक्त दोनही प्रकरणी प्रथमतः त्यांच्या दि.१३.१२.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. टेळकीकर,अधीक्षक अभियता यांच्या दि. ०१.०१.२००७ पासूनच्या टुर डायरीच्या सत्यप्रती व वाहनाच्या लॉगबुकच्या सत्यप्रती तसेच अधीक्षक अभियंता यांना शासकीय वाहन खाजगी वापरासाठी दिलेल्या आदेशाच्या सत्यप्रती आणि अधीक्षक अभियंता यांना खाजगीरित्या वाहन वापराची अनुज्ञेयता या मुद्यावर माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या दोनही प्रकरणाशी संबंधित प्रथम अर्जांना जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. विहित मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार या दोन प्रकरणांच्या संदर्भात अनुक्रमे दि. ३१.०१.२००८ व २५.०१.२००८ रोजी प्रथम अपील केल्याचे दिसून येत आहे. अपिलार्थीचे सदर अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या

दोनही अर्जांच्या संदर्भातील माहिती त्यांच्याकडील दि. २१.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, ९१ पृष्ठांची माहिती, रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठवून दिली. ही माहिती अपिलार्थीस दि. ०१.०४.२००८ रोजी प्राप्त झाली. तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने अर्ज करते वेळी श्री. लाटकर नावाचे कार्यकारी अभियंता, जन माहिती अधिकारी या पदावर कार्यरत होते. श्री. लाटकर यांनी विहित मुदतीत प्रतिसाद न देण्याची कोणतीही कारणे त्यांच्याकडील अभिलेख्यांवर उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले. वरील दोनही प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय न घेण्याची कारणे त्यांना आयोगास स्पष्ट करुन सांगता आली नाहीत. तसेच त्यांनी आयोगासमोर असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर त्यांनी दि. २१.०३.२००८ रोजी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती अपिलार्थीस दिली आहे. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाच्या प्रचलीत कार्यपध्दतीमध्ये टुर डायरी ठेवण्याची पध्दत नाही किंवा यासंदर्भात कोणतेही निर्देश त्यांच्या वरिष्ठांनी दिले नसल्यामुळे, अशाप्रकारची माहिती त्यांच्याकडे तयार केली जात नाही. महामंडळाच्या वाहनाच्या खाजगी वापराबाबत अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या मुद्यावर माहिती मागितली आहे, त्या माहितीसंदर्भात महामंडळाकडे अद्यापपावेतो कोणतेही परिपत्रक जारी केले गेलेले नाही. त्यामुळे याही मुद्यावर त्यांच्याकडे अपिलार्थीस देण्यासाठी माहिती उपलब्ध नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती, ती माहिती, म्हणजे महामंडळाच्या वाहनाच्या लॉगबुकच्या ९१ पृष्ठांच्या प्रती, त्यांनी अपिलार्थीस दि.

२१.०३.२००८ रोजी विनामूल्य व रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पुरविली आहे. सदर माहिती अपिलार्थीस प्राप्त झाल्यापृष्ठ्यर्थ अपिलार्थीची कथित सही त्यांनी आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या दोनही प्रकरणात असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे ही माहिती अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीमध्ये अपिलार्थीस पुरविणे हे संबंधित जन माहिती अधिकारी यांना अनिवार्य होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केलेली नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी अपिलार्थीस संबंधित अपिलीय प्राधिकरणाकडे प्रथम अपील केल्यानंतर दिलेली आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे टूर डायरीच्या सत्यप्रती, महामंडळाने त्यांच्या वाहनाच्या खाजगी वापराबाबत काढलेले आदेश व त्रयस्थ पक्षाने महामंडळाच्या वाहनाचा खाजगीरित्या किती किलामिटरचा वापर केला आहे, अशी माहिती मागितली आहे. यासंदर्भात अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे त्रयस्थ पक्षाने महामंडळाच्या वाहनाचा खाजगी वापर केला नाही. तथापि त्यांनी उपस्थित केलेल्या उर्वरित दोन मुद्यांचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि.२१.०३.२००८ रोजी पुरविलेल्या कथित माहितीमध्ये दिसून येत नाही. तेव्हा अपिलार्थीस उर्वरित दोन मुद्यावर जन माहिती अधिकारी यांनी आता माहिती देणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील शासकीय वाहनाच्या खाजगी वापरासंदर्भात व टूर डायरीच्या संदर्भात त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीच्या मूळ अर्जाची उपेक्षा केली असल्याचे दिसून येत आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी स्वत:ला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब

व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना संबंधित जन माहिती अधिकारी, श्री. सी.के.लाटकर यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे. प्रथमतः अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या दोनही मूळ अर्जाद्वारे अपेक्षिलेल्या माहितीसंदर्भात व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांनी गांभीर्याने विचार करावा, असे आयोगास वाटते. महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ हे महामंडळाच्या कामाकरिता किती वाहने खाजगी कंपनीकडून भाडयाने घेऊन ती अधिकाऱ्यांना महामंडळाच्या कामासाठी वापरास उपलब्ध करुन देत असतात. या वाहनांच्या वापरावर सनियंत्रण करण्याच्या दृष्टीने व्यवस्थापकीय संचालक,म.रा.रस्ते विकास महामंडळ यांनी त्यांच्या अधिकाऱ्यांना उपलब्ध करुन दिलेल्या वाहनाच्या खाजगी वापराबाबत त्यांच्या स्तरावर निश्चित स्वरुपाचे आदेश पारीत करावेत, असे व्यवस्थापकीय संचालक यांना अधिनियमातील कलम १९(८)(क)(चार) मधील तरतुदीनुसार सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची उपरोक्त दोनही अपिले क्र.१०८३/०८ व १०८४/०८ अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१) अपील क्र.१०८३/०८ व १०८४/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहेत.

२) जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ अर्जातील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केलेली उर्वरित माहिती हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३) व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक: १०-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड .

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य अभियंता,महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,नेपेयीन सी रोड, प्रियदर्शनी पार्कजवळ,देना बँकेसमोर,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०८५/०८ व १०८६/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०८५ व १०८६
निर्णय दिनांकः १०-०८-२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, नांदेड . : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कार्यालय अभियंता यांचे कार्यालय, नांदेड. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कार्यालय नांदेड.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) नांदेड

जन अपिलीय अधिकारी : मुख्य अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ (मर्या.) औरंगाबाद

**निर्णय**

**अपील क्रमांक १०८५/०८:**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.१२.२००७ रोजी माहिती मागितली असता, जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याशी कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार न करता माहिती देण्यासाठी जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्यानंतर त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता महाराष्ट्र राज्य

रस्ते विकास महामंडळ, नांदेड यांच्याकडे दि.२९.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१०.०३.२००८ रोजी सुनावणी घेऊन व कोणतेही कारण न दर्शविता त्यांचे प्रथम अपील निकाली काढल्याने त्यांनी विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"आपल्या कार्यालयामार्फत मागणी दोन वर्षापासून चालू असलेले बाफना ते देगलूर नाका रोडच्या दोन्ही बाजुने दोनमिटरचा पाय रस्ताचा भरणीकरण व मजबुतीकरण करण्यासाठी दिलेल्या इस्टीमेटप्रमाणे किती प्रमाणात काळी माती व मुरुम भरण्यात आला याची शहानिशा करण्यासाठी आपले महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे मुख्य अभियंता व गुणनियंत्रण विभागाचे वरिष्ठ अधिकारी यांच्या समक्ष अर्जदारास सदरील कामाचे खोदकाम करुन दाखविणे बाबत. तसेच वरिष्ठ अधिकाऱ्यासमक्ष सदरील खोदकामाचा पंचनामा करणे बाबत.

नोट : नियमानुसार खोदकामासाठी जो काही खर्च येईल तो अर्जदार भरण्यास तयार आहे."

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या हे अपील जन अपिलीय अधिकारी यांना दि. २५.०१.२००८ रोजी प्राप्त झाले.या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०३.०३.२००८ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी व अपिलार्थी यांच्यामध्ये चर्चा होऊन या अपिलावर पुन्हा दि. १०.०३.२००८ रोजी चर्चेला बोलाविण्यात आले. यानंतर दि. १०.०३.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील कोणतेही कारण न दर्शविता फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्यांच्याकडे बाफना पंप ते देगलूर नाका या रस्त्याच्या त्यावेळी प्रगतीत असलेल्या कामाचे खोदकाम करुन पंचनामा करण्यासंदर्भात माहिती मागविली होती व या अर्जामध्ये अपिलार्थीने हा पंचनामा व हे खोदकाम हे महामंडळाच्या मुख्य अभियंता व गुणनियंत्रण मंडळाच्या वरिष्ठ अधिकारी यांच्या उपस्थितीत करुन घेण्याची मागणी केल्याने त्यांनी अपिलार्थीस अशाप्रकारची माहिती विहित मुदतीत पुरविता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यावेळी प्रगतीत असलेली कामे फक्त पूर्ण कामाचे खोदकाम करुन त्या कामाचा पंचनामा महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत करणे अपेक्षित होते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २('च') मध्ये 'माहिती' या शब्दाची व्याख्या पुरेशा प्रमाणात स्पष्ट केली आहे. या कलमातील उपकलम (तीन) मध्ये "सामग्रीचे प्रमाणित नमुने " घेणे व एखाद्या कामाची पाहणी करणे अशाप्रकारची माहिती अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त होणे अभिप्रेत आहे. त्यामुळे अपिलार्थीने या प्रकरणी जर प्रगतीत असलेल्या कामांची तपासणी करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला असता तर, अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय झाली असती. अशाप्रकारच्या कामांची तपासणी करण्याची माहिती, एका विशिष्ट अधिकाऱ्याच्या उपस्थितीतच व झालेले काम खोदून त्याचा पंचनामा करणे, अशाप्रकारची माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून अनुज्ञेय नाही. अपिलार्थीस कामाची तपासणी करणे व त्यातील सामग्रीचे प्रमाणित नमूने घेणे इतक्या हद्दीपर्यंत अपिलार्थीस

जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती देय आहे. परंतु अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या प्रकरणी ज्या प्रकारे माहितीची मागणी केली आहे, तशा प्रकारची म्हणजे, महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्याच्या उपस्थितीतच या कामाची तपासणी करावी, अशी विशिष्ट अट जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षित केल्याने, ही माहिती त्यांना अनुज्ञेय नाही. या प्रकरणी त्यांनी अनुज्ञेय नसलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली असल्याने अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तथापि अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास कोणतेही उत्तर न देण्याचा जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवादही आयसोगास मान्य नाही, कारण त्यांनी यासंदर्भात अपिलार्थीस या घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर लेखी स्वरुपात काहीही कळविले नसल्याचे आयोगास आढळून येत आहे. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर एकदा बैठक घेऊन तदनंतर कोणतेही कारण न देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावण्यात येत आहे,असा एका ओळीचा निर्णय देण्याची जन अपिलीय अधिकारी यांची कृतीदेखील तेवढीच गैर व चुकीची आहे, असे अभिप्राय आयोग येथे या अपिलाच्या निर्णयासंदर्भात नोंदवित आहे. यासंदर्भात जन अपिलीय अधिकारी यांना असेही सूचित करण्यात येते की, अर्जदाराच्या माहितीसाठीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात निर्णय देताना निर्णय कोणत्या पुराव्याच्या आधारे घेतला गेला, त्या पुराव्याचा व कारणाचा त्यांनी आपल्या निर्णयामध्ये उल्लेख करणे त्यांना गरजेचे आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने ज्या पध्दतीने माहितीची मागणी केली आहे, अशाप्रकारच्या पद्धतीने माहिती देण्याची तरतूद माहिती अधिकार अधिनियमातील कोणत्याही कलमामध्ये नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग येत आहे.

**<u>अपील क्रमांक १०८६/०८:</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०९.०५.२००८रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि.१७.१२.२००७ रोजी माहिती मागितली असता, मुदतीच्या आत माहिती न दिल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि त्यांनी सुनावणी न घेता, अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २०००/- इतके त्यांना कळवून त्यांची दिशाभूल केली असल्याने त्यांनी विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत करण्यात येत असलेल्या नांदेड येथील उज्ज्वल शोरुम ते विमानतळ या रस्त्याच्या रुंदीकरण व मजबुतीकरणाच्या कामासंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - निविदांच्या सत्यप्रती, निविदा धारकांच्या नावाची यादी, मंजूर निविदांच्या सत्यप्रती, कामांचे अंदाजपत्रक , वर्कऑडरच्या सत्यप्रती, गुणनियंत्रण अधिकाऱ्याच्या तपासणी अहवालाच्या सत्यप्रती, कामाचे रुंदीकरण व रस्त्याच्या जाडीकरणाची लेखी स्वरुपात माहिती, सदरील कामाच्या तयार करण्यात आलेल्या मोजमाप पुस्तिकेच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होतो.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचे प्रथम अपील जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्या दि. ११.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.२०००/- इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही व जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील

अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १०.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी, अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. ०९.०५.२००८ रोजी हीच माहिती त्यांनी केलेल्या दुसऱ्या अर्जाच्या संदर्भात अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे व नंतर परत अपिलार्थीच्या या अपिलाशी संबंधित मूळ अर्जाच्या अनुषंगाने अपिलार्थीस दि. ०७.०८.२००९ रोजी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली असून अपिलार्थीस ही माहिती प्राप्त झाल्याची पोचसही देखील घेतली आहे. सदर पोचसही त्यांनी आयोगास दाखविली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती जरी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असली तरी त्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात होती. अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दुसऱ्या अर्जाच्या संदर्भात दि. ०९.०५.२००८ रोजी म्हणजे अपिलार्थीने आयोगाकडे या प्रकरणी केलेल्या द्वितीय अपील अर्जाच्या वेळी विनामूल्य पुरविली आहे व परत हीच माहिती त्यांनी अपिलार्थीस दि. ०७.०८.२००९ रोजी देखील विनामूल्य दिली आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस माहिती देण्याच्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना कोणताही आदेश नाहीत. एवढे जरी असले तरी या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १७.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास अधिनियमातील कलम ७(१) प्रमाणे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी तीस दिवसांच्या आत प्रथम प्रतिसाद देणे त्यांना आवश्यक होते, तथापि त्यांनी अशाप्रकारची कोणतीही कृती केली नाही. आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपेक्षित माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवून आपल्या कार्यशैलीतील स्पष्ट केलेल्या कर्तव्य

परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची, व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, मर्यादित यांना, शिफारस करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र.१०८५/०८ फेटाळून, अपील क्र. १०८६/०८ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्र.१०८५/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्र.१०८६/०८ मान्य करण्यात येत आहे.

३. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,मर्यादित यांना संबंधित जन माहिती अधिकारी (अपील क्र. १०८६/०८) यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १०-०६-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कार्याकारी अभियंता यांचे कार्यालय नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ, कार्यालय नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक, महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळ,नेपेयीन सी रोड, प्रियदर्शनी पार्कजवळ,देना बँकेसमोर,मुंबई यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील

कार्यवाहीसाठी

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक १०७८/०८ , १०७९/०८ व १०८०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०७८,१०७९ व १०८०
निर्णय दिनांक १०-०८-२००९

१. श्री. महंमद रिजवान पि.एहसन कुरेशी, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय अधिकारी, नांदेड.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, नांदेड.

अपील क्र. १०७९/०८: त्रयस्थ पक्ष: श्री. पालेपवाड साईनाथ राजेश्वर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०६.२००८ रोजी नोंदविलेली एकूण तीन स्वतंत्र द्वितीय अपिले, क्र.१०७८/०८, १०७९/०८ व १०८०/०८ आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीन अपील अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप एकसारखे असल्याने व तसेच या प्रकरणांशी संबंधित मूळ अर्ज, प्रथम अपील व द्वितीय अपील हे एकाच दिवशी केलेले असल्याने या अपिलांची सुनावणी एकत्रितपणे घेण्यात येत आहे.

या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली असता, माहिती अधिकारी यांनी त्यांना मुदतीत माहिती न दिल्याने त्यांनी अपिलेट अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी यांच्याकडे दि.२८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय

अधिकारी यांनी दि.२७.०५.२००८ रोजी सुनावणी न घेता त्यांची प्रथम अपिले संचित केल्याने त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०३.२००८ रोजीच्या तीन स्वतंत्र अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित काही माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या अपील क्र.१०७८ शी संबंधित प्रथम अर्जाद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये - त्यांच्या कार्यालयातर्फे अर्जदारांना दिल्या गेलेल्या 'मन्नेरवारलु' जातीच्या प्रमाणपत्राबाबत काही मुद्यावर लेखी खुलासा मागविला होता. यामध्ये अर्जदारांनी जातीचे प्रमाणपत्र देण्यासाठी दि.३१.१२.२००७ रोजी त्यांच्या कार्यालयात विनंती अर्ज दाखल केले असता, सदरील जातीचे प्रमाणपत्र देण्याकरिता तलाठी अहवाल, मंडळ अधिकाऱ्याचा गृहचौकशी अहवाल व अर्जदारांनी दाखल केलेल्या संचिकेत त्रुटीची पूर्तता करण्यासाठी १५ दिवसांचा कालावधी असताना कोणत्या नियमानुसार दि.३१.१२.२००७ रोजी दाखल केलेल्या संचिका कोणत्या आधारे त्याचदिवशी दि.३१.१२.२००७ रोजी सर्व अर्जदारांना तात्काळ जातीचे प्रमाणपत्र देण्यात आले आहे. याचा शासन नियमानुसार व परिपत्रकानुसार लेखी खुलासा व याप्रमाणे सर्वसामान्य नागरिकांना तात्काळ पध्दतीने जातीचे प्रमाणपत्र का देण्यात येत नाही,याचा लेखी खुलासा,- या मुद्यांवर माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या अपील क्र. १९७९ च्या संदर्भात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत सी.आर.नं.२४३३ दि. २७.१२.२००७ रोजी श्री. पालेपवाड साईनाथ राजेश्वर यांना दिल्या गेलेल्या 'मन्नेरवारलु' ' जातीच्या प्रमाणपत्राबाबत, अर्जदाराचे वडील शासकीय कर्मचारी असून त्यांनी, त्यांचे शिक्षण मौ.कामठा व मौ.ढाणका ता.उमरखेड जिल्हा यवतमाळ येथे पूर्ण केले असून ते मूळचे कुठले रहिवाशी आहेत, याचा उल्लेख त्यांच्या शाळा सोडल्याच्या प्रमाणपत्रामध्ये केला नाही. तसेच त्यांच्या जातीचे प्रमाणपत्र किनवट तहसीलचे दिले आहे. किनवट तालुक्याचे "जातीचे प्रमाणपत्र असताना, नांदेड उपविभागीय कार्यालयातून कोणत्या

नियमानुसार जातीचे प्रमाणपत्र दिले व तसेच सदर प्रमाणपत्र नियमानुसार देण्यात आले की नियमबाहय याबाबतचा लेखी खुलासा." याबाबतची माहिती मागितली होती.

अपील क्र. १०८०/०८ च्या संदर्भाने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाकडून सी.आर.नं.२४३३,२५३५,२५३६,३६३७,२५३८,२५३९,२५४०,२५४१ व २५४२ दि.३१.१२.२००७ रोजी दिलेल्या 'मन्नेरवारलु' जातीचे प्रमाणपत्राची संचिका अर्जदाराने मूळात जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्याकडे दाखल केली असता व सदरील अर्ज उपविभागीय अधिकारी, नांदेड यांच्याकडे कोणत्या नियमान्वये पाठविला ? त्या शासन परिपत्रकाच्या सत्यप्रती व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या नावाने केलेल्या अर्जावर निर्णय घेण्याचा व त्यांच्या नावाने केलेल्या अर्जाच्या आधारे जन माहिती अधिकारी यांनी कोणत्या नियमानुसार त्यांचे प्रमाणपत्र दिले याची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या तीनही मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती प्रश्नोत्तर स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देणे अभिप्रेत नाही, या कारणास्तव अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले व अपिलार्थीस अभिलेख पाहावयाचे असल्यास त्यासाठी वेगळा अर्ज करावा, असे अपिलार्थीस सूचविले. तथापि, या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने दि. २८.०४.२००८ रोजी उपरोक्त तीनही प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा अतिरिक्त जिल्हाधिकारी, नांदेड यांच्याकडे अधिनियमातील तरतुदीनुसार १९(१) च्या तरतुदीनुसार प्रथम अपील केले.

या तीनही अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.२७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीच्या या अपील अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील पाठविलेल्या दि.१५.०४.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करण्याचे सूचित केले व अपिलार्थीचे प्रथम अपील अर्ज संचित करण्यात येत असल्याचे अपिलार्थीस कळविले. जन अपिलीय अधिकारी

यांच्या तीनही प्रथम अपिलावरील निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे तीन स्वतंत्र द्वितीय अपिले राज्य माहिती आयोगाकडे सादर केली आहेत.

या तीन प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १०.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जांना त्यांनी दि. १५.०४.२००८ रोजी प्रथम प्रतिसाद दिला असून अपिलार्थीने प्रश्नार्थक स्वरुपात माहिती विचारली असल्याने त्यांना ही माहिती देणे, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अभिप्रेत नसल्याने ते अपिलार्थीस ही माहिती पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप संमिश्र असे आहे. अपिलार्थीच्या अपील क्र.१०७८/०८ च्या संदर्भात मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, त्या अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीतील, "सर्व अर्जदारांना तात्काळ जातीचे प्रमाणपत्र कोणत्या नियमानुसार देण्यात आले", ते नियम जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविणे भाग आहे. मात्र या अर्जातील "सर्वसामान्य नागरिकांना तात्काळ पध्दतीने जातीचे प्रमाणपत्र का देण्यात येत नाही, याचा लेखी खुलासा" या मुद्यावरील माहिती अपिलार्थीस देय होत नाही. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीमध्ये अर्जदाराने जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासे व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती मागणे आणि जन माहिती अधिकारी यांनी त्यांना अशाप्रकारे त्यांच्या कृतीचे अथवा निर्णयाचे खुलासे देणे अशाप्रकारची प्रक्रिया अभिप्रेत नाही. सबब अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे या मुद्यावर मागितलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. त्यामुळे अपिलार्थीस ती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या

अपील क्र.१०७९ च्या संदर्भातील मूळ माहितीच्या अर्जामध्ये "किनवट येथे विभागीय कार्यालय असताना नांदेड उपविभागाच्या उपविभागीय अधिकारी, नांदेड यांनी त्यांना कोणत्या नियमाच्या आधारे जातीचे प्रमाणपत्र दिले", ही माहिती, अपिलार्थीस देय होत आहे. या अर्जातील उर्वरित माहिती "सदरील प्रमाणपत्र नियमानुसार देण्यात आले की नियमबाहय देण्यात आले", ही अपिलार्थीस, वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे, जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांचा खुलासा अपेक्षित करणारी असल्याने, देय होत नाही.

अपिलार्थीचे अपील क्र.१०८० च्या संदर्भात मागणी केलेल्या माहितीमध्ये देखील"अर्जाची मूळ संचिका जिल्हा पुरवठा अधिकारी,नांदेड यांच्याकडे दाखल केली असता, सदर अर्ज उपविभागीय अधिकारी,नांदेड यांच्या कार्यालयाकडे कोणत्या नियमान्वये पाठविण्यात आला, त्या शासन परिपत्रकाच्या प्रती व जिल्हा पुरवठा अधिकारी यांच्या नावाने केलेल्या अर्जावर निर्णय घेण्याचा आणि त्यांच्या नावाने केलेल्या अर्जाच्या आधारे उपविभागीय अधिकारी, नांदेड यांच्या कार्यालयामार्फत कोणत्या नियमानुसार जातीचे प्रमाणपत्र देण्यात आले, ही माहिती अपिलार्थीस देय होत आहे.

अशाप्रकारे अपिलार्थीच्या अपील क्र.१०७८/०८ व १०७९/०८ च्या संदर्भातील मूळ माहितीच्या अर्जातील अपिलार्थीस अंशतः माहिती देय होत आहे. तसेच अपील क्र.१०८०/०८ च्या संदर्भात मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत असल्याचे दिसून येते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी. वास्तविक पाहता, या तीनही प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे संबंधित जन माहिती अधिकारी यांनी नीट अवलोकन केले असते तर, त्यांना अपिलार्थीच्या मूळ अर्जातील नेमकी कोणती माहिती द्यावयाची व कोणती द्यावयाची नाही, हे वेळेत ज्ञात झाले असते. तथापि त्यांनी या तीनही प्रकरणी त्यांना अपिलार्थीने

प्रश्नार्थक माहिती विचारली असल्याने अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले, ही त्यांची कृती चुकीची असून इत:पर अर्जदाराने मागणी केलेली माहिती जरी प्रश्नार्थक स्वरुपात असली तरी या प्रकरणासंबंधी आवश्यक ते तपशील ज्या अभिलेख्यात उपलब्ध असतील, त्या अभिलेख्यामधील माहिती अर्जदारास उपलब्ध करुन द्यावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. या ठिकाणी एका कार्यालयाचे काम दुसऱ्या कार्यालयाकडून केले गेले असले तरी कदाचित प्रशासकीय सोयीच्या दृष्टीने वरिष्ठांच्या आदेशाने तसे केले गेले असल्याची शक्यता नाकारता येणार नाही. तथापि या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या वरिष्ठांचे तसे आदेश असल्यास किंवा एका कार्यालयाचे कामकाज दुसरे कार्यालय काही अपवादात्मक प्रकरणी करण्यासंबंधी काही नियम असल्यास त्या नियमाच्या व संबंधित परिपत्रकाच्या प्रती त्यांनी वरील प्रकरणाशी संबंधित माहिती म्हणून अपिलार्थीस पुरवावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र.१०७८/०८ व १०७९/०८ अंशत: मान्य व अपील क्र.१०८०/०८ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.१०७८/०८व १०७९/०८ अंशत: मान्य करण्यात येत आहेत.

२. अपील क्र.१०८०/०८ मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या तीनही मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे त्यांना देय होत असलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक : १०-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. महंमद रिजवान पि. एहसन कुरेशी,अध्यक्ष, नांदेड जिल्हा ओ.बी.सी.ऑर्गनायझेशन, साप्ताहिक बोलचाल कार्यालय, एम.जी.रोड,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७५
निर्णय दिनांक ११-०८-२००९

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत, : अपिलार्थी
रा.औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
मुख्याध्यापक,
नूतन बहुउद्देशिय विद्यालय,एन-११,
सिडको, नवीन औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी,
नूतन बहुउद्देशिय विद्यालय,एन-११,
सिडको, नवीन औरंगाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्याध्यापक,
नूतन बहुउद्देशिय विद्यालय,एन-११,
सिडको, नवीन औरंगाबाद.

जन अपिलीय अधिकारी : शिक्षणाधिकारी (माध्यमिक),
जिल्हा परिषद, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१५.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून असे नमूद केले आहे की, त्यांच्या दि. ०६.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर कोणतीही सुनावणी न घेतल्याने, त्यांनी आयोगाकडे विचाराधीन अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०६.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी तथा नूतन बहुउद्देशिय विद्यालय,औरंगाबाद यांच्याकडे त्यांच्या शाळेशी संबंधित माहिती एकूण १३

मुद्यांद्वारे मागितली होती. सदर अर्ज अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविला होता, तथापि हा अर्ज जन माहिती अधिकारी यांनी न स्वीकारल्याने तो अपिलार्थीकडे परत प्राप्त झाला. जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार तत्कालीन जन अपिलीय अधिकारी, नूतन बहुउद्देशिय विद्यालय यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत. त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची त्यांना आवश्यकता असल्याचे आयोगास स्पष्ट केले.

जन माहिती अधिकारी हे अनुपस्थित आहेत व त्यांच्या उपस्थित अधिकृत प्रतिनिधीकडे या प्रकरणाशी संबंधित कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले की, अपिलार्थीने त्यांचा दि.०६.०८.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार संबंधित संस्थेकडेच केला होता. तथापि आता शिक्षण संचालनालयाचे पत्र क्रमांकः संकीर्ण/ केंमाअ/२००७/६३५२७/१५ क्र. (८) ६०३७, दि. २६.११.२००७ अन्वये संबंधित शिक्षणाधिकारी, जिल्हा परिषद यांची आता जन अपिलीय अधिकारी म्हणून नेमणूक केली गेली असल्यामुळे, या प्रकरणी अपिलार्थीच्या दि.०६.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी प्रथम सुनावणी घेऊन निर्णय घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब अपिलार्थी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्या दि.०६.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जाची प्रत आवश्यक त्या सहपत्रांसह जन अपिलीय अधिकारी तथा

शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांच्याकडे हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत पाठवावी. अपिलार्थीचा सदर प्रथम अपील अर्ज शिक्षणाधिकारी (माध्य.), जि.प. औरंगाबाद यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर त्यांनी या अपील अर्जावर झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन सदरचा अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय द्यावा.

जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी अपिलार्थी यांचा दि.०६.०८.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांना प्राप्त झाल्यानंतर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. किशोर भिकनसिंग राजपूत,रा.एन-६, सिडको, ई-२३/१०, संभाजी कॉलनी,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नूतन बहुउद्देशिय विद्यालय,सिडको, एन-११, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७९
निर्णय दिनांक ११-०८-२००९

१. श्री. पदमाकर जगन्नाथराव जोशी, रा.औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा, वॉर्ड अधिकारी, वॉर्ड 'अ', महानगरपालिका,औरंगाबाद : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य समन्वयक, लोकशाही दिन तथा उपायुक्त (प्र) महानगरपालिका, औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.११.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच, अपिलार्थीने त्यांचे आयोगास उद्देशून लिहिलेले दि. ११.०८.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या अपिलाशी संबंधित त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झाली असून त्यांचे रु.४००/- इतक्या रकमेचे झालेले समायोजन जन माहिती अधिकारी यांनी त्यांना दाखविले असल्याचे यामध्ये नमूद केले आहे. त्यामुळे यासंदर्भात त्यांचा कोणातही आक्षेप आता राहिला नाही, असेही त्यांनी या अर्जाच्या अखेरीस नमूद केले आहे.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने स्वतः हा अर्ज आयोगास सादर केला व त्यांना विचाराधीन अपील चालवावयाचे नाही, असे आयोगास अवगत केले. अपिलार्थीच्या विनंतीवरुन अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र.८७९/०८, दि.११.०८.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : ११-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. पद्माकर जगन्नाथराव जोशी,घ.नं.१/९/१५/३ नवीन घ.नं.१-१३-२५,पराक्रम कॉलनी, जयसिंगपूरा,औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा वॉर्ड अधिकारी, वॉर्ड 'अ',महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य समन्वयक,लोकशाही दिन तथा उपायुक्त (प्र) महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७४०
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री.जी. एस.रायबोळे,<br>रा.किनवट,जि. नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी,<br>तहसील कार्यालय,किनवट,जि.नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी<br>तहसीलदार, किनवट,जि.नांदेड | | |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (महसूल),
तहसील कार्यालय,किनवट,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २८.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१३.०८.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे किनवट तालुक्यामध्ये झालेल्या व चालू असलेल्या विविध कामातून शासनास मिळालेल्या गौण खनिजाच्या दगड, माती व रेतीतून मिळालेल्या संपूर्ण रॉयल्टीच्या रकमेच्या संदर्भात सन २००५ ते २००७ या कालावधीतील काही माहिती एकूण सात मुद्यांद्वारे व नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि.२०.०९.२००७ रोजी जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,किनवट यांच्याकडे

यासंदर्भात प्रथम अपील केले. तथापि अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जाची दखल न घेता व कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. उपस्थित जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने ज्यावेळी माहितीची मागणी केली त्यावेळी ते या पदावर कार्यरत नव्हते. श्री. डुकरे नावाचे नायब तहसीलदार त्यावेळी या पदावर कार्यरत होते. सध्या ते कंधार येथे नायब तहसीलदार या पदावर कार्यरत आहेत व तत्कालीन जन अपिलीय अधिकारी श्री. लाड यांना आता शासन सेवेतून बडतर्फ करण्यात आलेले आहे.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित प्रकरणाचा त्यांनी अभ्यास केला असून अपिलार्थीस ते ही माहिती तीस दिवसांच्या आत विनामूल्य देतील.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती अधिनियमातील कलम ७ प्रमाणे द्यावी लागेल. अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचा कालावधी व्यपगत झाला असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी लागेल, हे पाहता, जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जावर तत्कालीन जन माहिती अधिकारी श्री. डुकरे, नायब तहसीलदार यांनी कोणतीही कार्यवाही न करुन अपिलार्थीस

कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवून व अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न देण्याच्या आपल्या अशाप्रकारच्या कृतीद्वारे त्यांच्या कार्यशैलीतील स्पष्ट केलेल्या कर्तव्य परायणतेच्या अभावाबाबत त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस विभागीय (महसूल)आयुक्त,औरंगाबाद यांच्याकडे करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व नोंदणीकृत टपालाद्वारे उपलब्ध करुन द्यावी.

३. विभागीय आयुक्त, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः ११.०८.२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. जि.एस.रायबोळे, सरस्वती कॉलनी, किनवट, जि.नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (महसूल),तहसील कार्यालय, किनवट, जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील

नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. विभागीय आयुक्त, औरंगाबाद विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७२
निर्णय दिनांकः ११-०८-२००९

१. श्री. संजय रुपचंद अहिरराव, : अपिलार्थी
औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
अधिक्षक, मध्यवर्ती कारागृह, औरंगाबाद
२. जन अपिलीय अधिकारी तथा
कारागृह उपमहानिरीक्षक, मध्यवर्ती कारागृह,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी या प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील अर्ज केला असता, त्यांना हवी ती माहिती न देता, निलंबनाचे आदेश/कामावर हजर करणेबाबतच्या आदेशाच्या छायांकित प्रती दिल्या. जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना जी माहिती हवी होती, ती माहिती अद्यापही पुरविली नाही. त्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०८.११.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या स्वतःच्या निलंबनाविषयी,"निलंबन आदेश कशाच्या आधारावर दिला, याबद्दलची सविस्तर माहिती", ही माहिती व्यक्तिशः मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २७.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा सदर अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दाखल झाल्यानंतर दि. २८.०२.२००८ रोजी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती पुरविली. माहिती प्राप्त झाली असल्यामुळे अपिलार्थीने दि. २८.०२.२००८ रोजी त्यांचा अर्ज दप्तरी दाखल करण्यासाठी विनंती केली, त्यामुळे अपिलार्थीच्या या प्रथम अपिलावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिला नाही. माहिती प्राप्त झाल्याचे कबूल करुनही, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी सहायक जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. सहायक जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी दि.२८.०२.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. या प्रकरणाची पार्श्वभूमी स्पष्ट करताना त्यांनी आयोगास असे अवगत केले की, तुरुंग पोलीस महानिरीक्षक हे औरंगाबाद येथे भेटीसाठी आले असता, विश्रामगृह पोलीस मुख्यालय, औरंगाबाद येथे अपिलार्थी यांना डयुटी देण्यात आली होती. तथापि डयुटीसाठी अपिलार्थी हे विनापरवानगी गैरहजर राहिल्याने त्यांना निलंबित करण्यात आले होते. सद्यस्थितीत अपिलार्थीस पूर्ववत कामावर घेण्यात आलेले आहे. त्यांच्याकडील उपलब्ध माहिती त्यांनी अपिलार्थीस पूर्णपणे पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, सहायक जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस त्यांचे निलंबन कोणत्या नियमांच्या आधारे केले आहे याची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हवी असल्याचे दिसून येते. यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि.

२८.०२.२००८ रोजी दिलेली माहिती पाहता, या माहितीमध्ये अधीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह यांनी कारागृह उपमहानिरीक्षक, औरंगाबाद यांना अपिलार्थीच्या निलंबनासंदर्भात एक अहवाल सादर केला आहे. या अहवालामध्ये अपिलार्थीचे निलंबन कोणत्या कारणास्तव करण्यात आले, याची माहिती आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या कथित माहितीमध्ये कारागृह अधीक्षक यांच्या दि. १५.१०.२००३ रोजीच्या पत्राचा समावेश असल्याचे आयोगास आढळून आले नाही. तसेच अपिलार्थीने या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी त्यांनी सर्व माहिती प्राप्त झाली असल्याने प्रथम अपिलाची सुनावणी न घेण्याची जन अपिलीय अधिकारी यांना विनंती केली होती, ही बाब येथे लक्षात घेतली नाही. अपिलार्थीच्या राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या अर्जावरुन, त्यांचे जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान झाले नसल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास उपलब्ध करुन देण्याची तरतूद आहे. जन माहिती अधिकारी यांनी घेतलेल्या एखाद्या निर्णयाची कारणे अथवा खुलासा अर्जदारास देणे, त्यांना अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. त्यामुळे या टप्प्यावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांच्या मनातील शंका दूर होण्याच्या दृष्टीने या प्रकरणी त्यांना अपेक्षित माहिती उपलब्ध होण्याकरिता त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कारागृह अधीक्षक यांच्याकडे माहितीच्या अभिलेख्याच्या तपासणीसाठी एक स्वतंत्र अर्ज करावा, जेणेकरुन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या नस्ती तपासणीसाठी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध करुन देण्याबाबत जन माहिती अधिकारी निर्णय घेऊ शकतील. जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी अपिलार्थीस कारागृह उपमहानिरीक्षक यांना अधीक्षक औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह यांनी उद्देशून लिहिलेल्या दि. १५.१०.२००३ रोजीच्या पत्राची एक प्रत हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी केली होती. तथापि व्यक्तीशः माहितीची मागणी करुन अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधी गेले होते, यासंदर्भातील कोणताही पुरावा त्यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडला नाही. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाईच्या शिफारशीबाबत कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील कारागृह अधीक्षक यांच्या उपमहानिरीक्षक, कारागृह यांना उद्देशून लिहिलेल्या दि. १५.१०.२००३ रोजीच्या पत्राची सत्यप्रत त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः ११-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. संजय रुपचंद अहिरराव, जेल पोलीस, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, हर्सूल, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा अधिक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह,हर्सूल,औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कारागृह उपमहानिरीक्षक, औरंगाबाद मध्यवर्ती कारागृह, हर्सूल, औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७३
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

१. श्री. अरुणकुमार एस. मुंदडा, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिक्षक अभियंता, अधिक्षक अभियंता कार्यालय,
बांधकाम भवन, औरंगाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : उप कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून, या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापपावेतो कोणतीही माहिती प्राप्त झाली नाही.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२७.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित सन २००६ ते २००८ या कालावधीतील काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - मेमो ऑफ चेक ड्रॉन रजिस्टरची साक्षांकित सत्यप्रत, वर्क कॅशबुकची साक्षांकित सत्यप्रत, जावक

नोंदवहीची साक्षांकित सत्यप्रत व पूर्ण व अपूर्ण कामांच्या यादीची साक्षांकित सत्यप्रत, पैठण उपविभागांतर्गत अपूर्ण अवस्थेत असलेले जिल्हा आरोग्य प्रशिक्षण केंद्र, दवाखाना, कर्मचारी निवासस्थानाचे बांधकाम, या कामाचे Completion Date,एकूण लागलेला खर्च व निवासस्थाने आरोग्य विभागाकडे हस्तांतरित झाली आहे काय? - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस प्रथमतः त्यांनी दि. २३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेण्यासंदर्भात कळविण्यात आले होते. तथापि अपिलार्थीने ही माहिती त्यांच्या कार्यालयातून प्राप्त करुन घेतली नाही. त्यामुळे त्यांनी दि. २४.०७.२००९ रोजी त्यांच्या कार्यालयातील शिपायामार्फत ही माहिती अपिलार्थीकडे पाठविली असता, अपिलार्थीने ही माहिती स्वीकारण्यास नकार दिला. अपिलार्थीने टपालाद्वारे माहिती मागितली असता, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या कार्यालयातून माहिती घेऊन जाण्याचे का सूचविले, असे जन माहिती अधिकारी यांना विचारले असता, अपिलार्थीचे निवासस्थान त्यांच्या कार्यालयाच्या जवळच असल्याने व अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे आकारमान मोठया प्रमाणात असल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याचे सूचविले, असे आयोगास अवगत केले.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दि. २४.४.२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त झाला नसल्यामुळे त्यांना अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणतीही कार्यवाही करता आली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. २७.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २३.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांच्या कार्यालयातून घेऊन जाण्याबाबत कळविले होते. या पत्राचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांच्या अपिलार्थीस उद्देशून लिहिलेल्या दि. २४.०७.२००९ रोजीच्या पत्रामध्ये आहे. तथापि हे पत्र आयोगास दाखविण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नाही. हे पत्र ज्या नस्तीमध्ये उपलब्ध आहे, ती नस्ती तत्कालीन कार्यकारी अभियंता यांच्याकडून कार्यालयास परत प्राप्त झाली नसल्याचेही त्यांनी आयोगास अवगत केले आहे.

या प्रकरणाशी संबंधित संपूर्ण घटनाक्रमाचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व आकारमान मोठे असल्याने व तसेच अपिलार्थी हे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या जवळच राहत असल्याने त्यांनी अपिलार्थीस ही माहिती त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः येऊन घेऊन जाण्याचे सूचित केले. तथापि माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती देण्यासाठी किती पृष्ठांच्या प्रती त्यांना झेरॉक्स कराव्या लागणार व या प्रती अपिलार्थीस रजिस्टर्ड पोस्टाद्वारे पाठविण्यासाठी काय दराने एकूण किती खर्च येईल, या खर्चाची अंदाजित रक्कम त्यांनी अपिलार्थीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून तीस दिवसांच्या आत निश्चित करावयास हवी होती व त्याप्रमाणे अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या कालावधीमध्ये कळवावयास हवे होते. तथापि अशाप्रकारची कार्यवाही जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणी केल्याचे आढळून येत नाही.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांना ज्या माध्यमाद्वारे (व्यक्तिशः अथवा पोस्टाद्वारे) अपेक्षित आहे, त्या माध्यमाद्वारे जन माहिती अधिकारी यांनी ती अपिलार्थीस देणे अपेक्षित आहे. त्यामुळे आता जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीस आता त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत रजिस्टर्ड पोस्टाद्वारे विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः ११.०८.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. अरुणकुमार एस. मुंदडा,द्वारा अरुणोदय एन्टरप्रायझेस, १ ला मजला, राणा बिल्डींग,पंचवटी हॉटेलजवळ,पदमपुरा,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपकार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, पदमपुरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७६
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार, : अपिलार्थी
औरंगाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
जिल्हा पुरवठा अधिकारी,औरंगाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २०.०९.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाली असल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे नमूद केले आहे व उर्वरित माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०७.०५.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडून खालीलप्रमाणे व्यक्तिशः माहिती मागविली होती.

"१.औरंगाबाद शहरात किती स्वस्त धान्य दुकानाचे मुळ परवाने देण्यात आले व कोणत्या वर्षी किती दुकानाला व कोणत्या महिण्यात व कोणत्या पत्त्यावर कोणत्या नंबरची दुकान शासनाच्या नियमाप्रमाणे देण्यात आली याची माहिती देण्यात यावी.

२. शासनाच्या नियमाप्रमाणे स्वस्त धान्य दुकानाचे (उदा. गुलमंडीची दुकान रहेमानीया कॉलनी) शहरात काही स्वस्त दुकानाचे पत्ते बदललेले आहे कोणती दुकान कोणत्या पत्त्यावर

बदलण्यात आली आहे आणि कोणाच्या नावावर कोणती दुकान आहे,दुकान नंबर सहीत माहिती देण्यात यावी. "

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन,अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस अधिनियमाप्रमाणे फीस भरुन हस्तांतरित करण्याचे सूचित केले व मुद्दा क्र. २ च्या संदर्भात अन्नधान्य वितरण अधिकारी,औरंगाबाद यांच्याशी संपर्क साधण्याचे अपिलार्थीस सूचित केले.तथापि जन माहिती अधिकारी यांच्या सूचनेप्रमाणे कार्यवाही न करता, अपिलार्थीने दि. ०९.०६.२००८ रोजी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०७.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मंजूर केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस पंधरा दिवसांच्या आत सर्व माहिती विनामूल्य देण्याचे सूचित केले. या सुनावणीच्या दरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०७.२००८ रोजी १९३ दुकानांसंदर्भात माहिती पुरविली. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १ च्या संदर्भातील माहिती त्यामध्ये समाविष्ट नसल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. २ च्या संदर्भात माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली आहे. तथापि मुद्दा क्र.१ च्या संदर्भात माहिती त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो मिळाली नाही. ती त्यांना हवी आहे. तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांनी असे अभिप्राय व्यक्त केले की, त्यांना प्राप्त झालेल्या माहितीमध्ये क्र.२

व क्र.४० या क्रमांकावर कोणत्याही दुकानाचे नाव अथवा पत्ता मिळालेला नसून ही पृष्ठे कोरी आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती दि. १७.०७.२००८ रोजी विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही सर्वसाधारण स्वरुपाची असून अपिलार्थीस जर एखाद्या विशिष्ट दुकानासंदर्भात माहिती हवी असली तर अपिलार्थीस ती उपलब्ध करुन देण्यास ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीच्या मूळ अर्जामध्ये माहितीशी संबंधित कालावधीचा उल्लेख, '३० दिवस' असा केलेला आहे. अपिलार्थीने त्यांच्या अर्जातील मुद्दा क्र. १ द्वारे मागणी केलेली माहिती पाहता, अपिलार्थीस निश्चितपणे कोणत्या दुकानाशी संबंधित अथवा कोणत्या कालावधीतील माहिती अपेक्षित आहे, याचा या अर्जावरुन कोणत्याही प्रकारे अर्थबोध होत नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी म्हणतात त्याप्रमाणे अपिलार्थीस जर एखाद्या विशिष्ट स्वस्त धान्य दुकानासंदर्भात काही माहिती अपेक्षित असेल तर त्यांनी यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे या विषयाशी संबंधित अभिलेख्यांची तपासणी करावी, म्हणजे अपिलार्थीस नेमकी जी माहिती हवी आहे, ती जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस देऊ शकतील.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये मागणी केलेली माहिती ही मोघम स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता अभिलेख्यांची तपासणी करण्यासाठी व्यक्तिशः उपस्थित राहणे आवश्यक आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने या प्रकरणी मागणी केलेल्या एखाद्या विशिष्ट माहितीशी संबंधित अभिलेखे अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावेत. या अभिलेख्यातील आवश्यक त्या कागदपत्रांच्या प्रती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घ्याव्या लागतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील एखाद्या विशिष्ट स्वस्त धान्य दुकानासंदर्भातील माहितीची त्यांना आवश्यकता असेल तर त्या माहितीशी संबंधित अभिलेखे तपासणीसाठी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावेत.

**औरंगाबाद**
**दिनांक: ११.०८.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. सय्यद साबेर सय्यद सरदार,हिना मंजील,टाऊन हॉल,औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा जिल्हा पुरवठा अधिकारी,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७७
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर, : अपिलार्थी
तुळजापूर, जि.उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,
तुळजापूर, जि.उस्मानाबाद

२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.),
जिल्हा परिषद, उस्मानाबाद

त्रयस्थ पक्ष : श्री. डी.यु.राठोड,
श्री. आंगुले, श्री.जी.एस.कऱ्हाळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०४.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून परिपूर्ण माहिती देण्यात आली नाही, माहिती खोटी व चुकीची देण्यात आली, माहिती मोफत देण्यात आली व ९२ दिवस होऊनही माहिती देण्यात आली नसल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व उर्वरित माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयामार्फत झालेल्या श्री. राठोड, श्री. कऱ्हाळे,श्री.शिंदे यांच्या बदल्यासंदर्भात सन २००४-०७ या कालावधीशी संबंधित काही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २२.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन,अपिलार्थीस काही माहिती पुरविली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २९.०१.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना दि. २०.०३.२००८ पर्यंत अपिलार्थीस माहिती देण्याचे सूचित केले. तथापि हा निर्णय पारित व्हावयाच्या आधीच दि. १९.०३.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती पुरविली. ही माहिती अपिलार्थीस मिळाल्यापृष्टयर्थ अपिलार्थीची पोचसही असलेले त्यांचे दि. १९.०३.२००८ रोजीचे, शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद,उस्मानाबाद यांना उद्देशून लिहिलेले एक पत्र, जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केले आहे. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस त्यांनी दि. १९.०३.२००८ रोजी संपूर्ण माहिती पुरविली असून या माहितीने अपिलार्थीचे समाधान झाल्यापृष्टयर्थ त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दि. १९.०३.२००८ रोजी तसे पत्र दिले आहे.या पत्राची प्रत त्यांनी सुनावणीच्या वेळी आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. १९.०३.२००८ रोजी माहिती पुरविली आहे. प्राप्त माहितीने अपिलार्थीचे

समाधान झाले होते व त्यांची यासंदर्भात कोणतीही तक्रार राहिलेली नव्हती. तथापि अशी लेखी कबूली देऊनही अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि. ०४.०४.२००८ रोजी द्वितीय अपील केले आहे. या अपील अर्जावर त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेली माहिती अर्धवट,चुकीची व दिशाभूल करणारी असल्याचे म्हटले आहे. तथापि ही माहिती अपूर्ण,चुकीची व दिशाभूल करणारी कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी यांनी त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत कोणताही वेगळा लेखी युक्तिवाद सादर केला नाही किंवा आपले म्हणणे तोंडी सादर करण्यासाठी आज ते आयोगासमोर उपस्थितही नाहीत. हे पाहता व या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १९.०३.२००८ रोजीच्या पत्रातील आणि आयोगाकडे केलेल्या दि. ०४.०४.२००८ रोजीच्या द्वितीय अपील अर्जातील विसंगतीपूर्ण विधाने पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ११.०८.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. अमरराजे कदम परमेश्वर,परमेश्वरवाडा,तुळजापूर, जि.उस्मानाबाद .

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती,तुळजापूर, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.), जिल्हा परिषद, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७४
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. गणेश उधमसिंग राजपूत,<br>वैजापूर,जि.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>मुख्याध्यापक,<br>नृसिंह विद्यामंदिर,वाळुज,<br>ता.गंगापूर, जि.औ.बाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, औरंगाबाद. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०३.१०.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी वेळीच माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले असल्याचे म्हटले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.२१.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या प्राथमिक शाळेच्या व संस्थेच्या वास्तव्याबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून ८ मुद्याद्वारे व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - "शाळा मान्यतेचे वर्ष, माध्यम, शाळा चालविणाऱ्या संस्थेचे संस्थाचालक/नियामक मंडळ,कार्यकारिणी नाव,पत्ता,फोन नंबरसह माहिती, शिक्षकांची सेवाज्येष्ठता यादी (जन्मतारीख व रुजूतारखेसह), शिक्षकांची शैक्षणिक पात्रता, शाळेस

आजपावेतो मंजूर शासकीय अनुदान, शाळेला जिल्हा परिषद शिक्षण विभागामार्फत मंजूर वर्ग, विद्यार्थी संच मान्यतेसह, २००७-०८ संच मान्यता आहे काय? शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी मंजूरीचे आदेश, शाळेने शासकीय नियमानुसार भरलेले व संस्थेचे कार्यरत व रिक्त असलेले शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांची संख्या, पदे अनुशेषानुसार भरले आहे काय ? शिल्लक अनुशेष, शाळेची इमारत स्वतःची/किरायाची तपशील द्यावा."- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने या अर्जामध्ये त्यांना ज्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे, तो कालावधी, "निश्चित नाही" असे नमूद केले आहे.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०८.२००८ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १९.०९.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी शिक्षणाधिकारी यांच्याकडून मुदत वाढवून घेतली व अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत माहिती पुरविण्याचे तोंडी आश्वासित केले. तथापि अपिलार्थीस ही माहिती प्राप्त न झाल्याने, अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडून जनता शिक्षण प्रसारक मंडळ, उमरदरी,ता.मुखेड,जि.नांदेड संचलीत,नृसिंह विद्यामंदिर प्राथमिक शाळा,वाळुज,औरंगाबाद या संस्थेचे विश्वस्त,श्री. अविनाश नागोराव यांनी रु.८०,०००/- इतकी रक्कम लाच म्हणून घेतली. तदनंतर वरिष्ठांनी दि. १९.०९.२००२ रोजी अपिलार्थीस नेमणूक आदेश दिले. तथापि त्यांनी नेमणूक आदेशात नमूद केल्याप्रमाणे ते वाळुज येथे संस्थेच्या शाळेमध्ये अर्ज करण्यासाठी गेले असता, त्यांना संस्थेने रुजू करुन घेतले नाही. त्यामुळे अपिलार्थीस

संस्थेविषयी या अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती आवश्यक आहे. अपिलार्थी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी जन माहिती अधिकारी अथवा त्यांचे प्रतिनिधी हे कुणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, अपिलार्थी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी नांदेड जिल्हयातील शिक्षण संस्थेच्या कारभारावर प्रकाश पडतो. अपिलार्थीच्या युक्तिवादावरुन शिक्षण क्षेत्रामध्ये बोकाळलेल्या भ्रष्टाचाराचे आयोगास दर्शन होत आहे. यातील दुर्दैवाची बाब अशी आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी देखील अपिलार्थीच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर एकदाच दि. १९.०९.२००८ रोजी सुनावणी घेतली आहे. नंतर त्यांनी परत कधीही अपिलार्थीच्या दि. २८.०८.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेण्याचे साधे सौजन्यही दाखविले नाही. यानंतर अपिलार्थीने शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना उद्देशून दि. ०६.१०.२००८ रोजी एक पत्र लिहिले आहे. या पत्रामध्ये देखील त्यांनी संबंधित शाळेकडून त्यांना कोणतीही माहिती मिळालेली नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणताही निर्णय प्राप्त झाला नसल्याचे नमूद केले आहे. एवढे असूनही आज रोजी सुनावणीच्या वेळी शिक्षणाधिकारी, प्राथमिक अथवा त्यांच्या कार्यालयातील कुणीही प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही. यावरुन संबंधित संस्था व औरंगाबाद जिल्हा परिषदेतील शिक्षण खात्याचे अधिकारी यांच्यातील संबंधाविषयी शंका घेण्यास भरपूर वाव असल्याचे आयोगास प्रतीत होत आहे. या प्रकरणी शिक्षण उपसंचालक, औरंगाबाद यांनी वैयक्तिक लक्ष घालून या प्रकरणाची चौकशी करण्याचे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, या अर्जामध्ये अपिलार्थीने ज्या कालावधीशी संबंधित माहिती हवी आहे त्या कालावधीचा, "निश्चित नाही" असा उल्लेख केला आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणत्या कालावधीची निश्चित माहिती हवी आहे याचा बोध खुद्द अपिलार्थीसच झाला नसल्याचे आज सुनावणीच्यावेळी दिसून येत आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे

मागणी केलेल्या आठ मुद्यावरील माहितीपैकी मुद्दा क्र. १- 'शाळा मान्यतेचे वर्ष', मुद्दा क्र. ४ - 'शाळेस आजपावेतो मंजूर शासकीय अनुदान' व मुद्दा क्र.८ - 'शाळेची इमारत स्वतःची/किरायाची' या मुद्यावरील माहिती फक्त कायम स्वरुपाची असून उर्वरित पाच मुद्यांवरील माहिती ही दरवर्षी बदलत असते. त्यामुळे अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमाखालील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज करताना त्यांनी ज्या कालावधीशी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त करुन घेण्याचे आहे. याचा स्पष्ट उल्लेख या अर्जामध्ये करणे त्यांना अनिवार्य आहे. त्यामुळे अपिलार्थीस आता जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,४ व ८ वगळता उर्वरित माहिती देय असणार नाही. मात्र अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ८ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देणे त्यांना भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, नृसिंह विद्या मंदिर, वाळुज, ता.गंगापूर,जि.औरंगाबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने दि. २१.०८.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,४ व ८ च्या संदर्भात माहिती त्यांनी, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः, पूर्वनियोजित वेळी उपलब्ध करुन द्यावी.

या प्रकरणी अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्यामुळे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याशी स्वतः होऊन संपर्क साधणे गरजेचे आहे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच संबंधित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस या आदेशामध्ये विहित केलेल्या मुदतीत माहिती पुरवतील, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, औरंगाबाद यांनी पहावे, असे शिक्षणाधिकारी (प्राथमिक) यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र. १,४ व ८ च्या संदर्भात संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः ११.०८.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. राजपूत गणेश उधमसिंग, आमदार संपर्क कार्यालय, वैजापूर, जि.औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक,नृसिंह विद्यामंदिर, वाळुज, ता.गंगापूर, जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/६९४
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. नारायणराव तातेराव कदम,<br>पूर्णा, जि.परभणी. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम उपविभाग,पूर्णा,जि.परभणी | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक अभियंता,<br>सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड | | |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०१.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी व अपूर्ण माहिती दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१६.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे -"पूर्णा ते झीरो फाटा रोडवर ब्रम्हाळ नदीवर जुन्या पूलावरुन सलग रोड होता. आपल्या कार्यालयातर्फे तो किती रुपयात व कोणत्या वर्षी काकडे यांना विकला,त्याबाबत निवीदा मागवली होती किंवा नाही, हा रोड अंदाजे किती स्क्वेअरफूट आहे. कार्यालयातर्फे विक्री केला किंवा नाही, विक्री केला नसेल तर त्यांनी तो रोड खोदून त्यावर शेती तयार केली कशी, आपल्या कार्यालयातर्फे

काय कार्यवाही केली किंवा नाही, कारणे काय? रोड खोदल्याबाबत व तो रोड आपल्या विभागाचा होता की नाही" - ही माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस असे कळविले आहे की, "सन १९९२ साली ब्रम्हाला नाल्यावर पूलाचे बांधकाम चालू असताना वळण रस्त्यासाठी तात्पुरत्या स्वरुपात संबंधित शेतकऱ्याची जमीन घेण्यात आली होती व पूलाचे काम पूर्ण होताच सदर जमीन, जी तात्पुरत्या स्वरुपात घेतली होती, ती संबंधित शेतकऱ्यास परत केली. त्यामुळे सदर जमीन विकण्याचा व अतिक्रमणाचा प्रश्न उद्‌भवत नाही." जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या या माहितीने अपिलार्थीचे समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व १० दिवसात अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांच्यामध्ये बराच पत्रव्यवहार झाला आणि अखेरीस अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस पुरविलेल्या माहितीबाबत आयोगास वरीलप्रमाणे अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने त्यांच्या दि. १६.०१.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे जी माहिती मागितली आहे, ती माहिती अधिकार अधिनियमातील

तरतुदींशी सुसंगत नाही. प्रचलीत पध्दतीप्रमाणे सार्वजनिक बांधकाम विभागातर्फे अस्तित्त्वात असलेल्या रस्त्यावर ज्या वेळी पूलाचे किंवा मोरीचे बांधकाम केले जाते, त्यावेळी वाहतुक सुरळीत होण्याच्या दृष्टीने तात्पुरता वळणरस्ता (Diversion Road) बांधण्यात येतो.अपिलार्थीने मागणी केलेल्या बांधकामासंदर्भात हा वळणरस्ता (Diversion Road) १९९० साली एका शेतकऱ्याच्या खाजगी जमिनीतून काढण्यात आला होता व पूलाचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर वळणरस्ता (Diversion Road) जमिनीसह संबंधित शेतकऱ्याला परत करण्यात आला. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, मूळात जमीन सार्वजनिक बांधकाम विभागाकडे, उपलब्ध असणे संभवत नाही. याही उपर सार्वजनिक बांधकाम विभागात अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीतील मजकूराप्रमाणे रस्ता विक्रीची कोणतीही पध्दत प्रचलीत नाही. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रश्नार्थक स्वरुपात व त्यांचे स्पष्टीकरण अपेक्षित करणारी माहिती विचारलेली आहे, जी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून मूळात ती अधिनियमातील तरतुदीशी विसंगत असल्यामुळे, देय होत नाही. तसेच अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती ही खोटी व अपूर्ण कशी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज उपस्थित नाहीत किंवा यासंदर्भात त्यांनी कोणताही लेखी युक्तिवाद आयोगासमोर सादर केलेला नाही. या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता, अपिलार्थीचे विचाराधीन फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक: ११.०८.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. नारायणराव तातेराव कदम, शिवाजी रोड, महादेव मंदिराजवळ, पूर्णा, ता.पूर्णा, जि.परभणी.

२. जन माहिती अधिकारी तथा उप विभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग, पूर्णा,जि.परभणी यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,हिंगोली यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७३९
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. शेख अफसर शेख बाबू,<br>रा.नांदेड | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हाधिकारी, नांदेड | | |

| | |
|---|---|
| तत्कालीन जन माहिती अधिकारी : | निवासी उपजिल्हाधिकारी,नांदेड |
| जन अपिलीय अधिकारी : | अपर जिल्हाधिकारी,नांदेड |
| सध्याचे जन माहिती अधिकारी : | अव्वल कारकुन,<br>महसूल शाखा-१ (आस्थापना-१),<br>जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड |
| जन अपिलीय अधिकारी : | नायब तहसीलदार (आस्थापना शाखा), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड |
| त्रयस्थ पक्ष : | १. सौ.सुनिता किशनराव परोडवाड,<br>२. सौ.सुचिता शिवराम बोधगिरे |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २९.१२.२००७ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचा अर्ज दि. १३.०९.२००७ रोजी अपिलार्थीचे म्हणणे न ऐकता निकाली काढल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे व आपल्या या प्रकरणाशी संबंधित मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीच्या मागणीची विनंती कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१३.०७.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष कु. सुचिता बोधगिरे रा.जंगमवाडी व सुनिता परोडवाड यांनी कारकून पदाकरिता दिलेल्या परीक्षा पेपरची व त्यांच्या धरणग्रस्त प्रमाणपत्रांच्या प्रतीची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. ०३.०८.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्रयस्थ पक्षाशी संबंधित असल्यामुळे यासंदर्भात त्रयस्थ पक्षाचे म्हणणे ते अजमावून घेत असल्याचे त्यांनी अपिलार्थीस कळविले. या प्रकरणी अपिलार्थीस माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाने तदनंतर नकार दिल्याने त्रयस्थ पक्षाने दिलेल्या नकाराचे कारण दर्शवून जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या संदर्भात माहिती उघड करण्याचे त्यांच्या दि. २४.०८.२००७ रोजीच्या पत्राद्वारे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०८.२००७ रोजी यासंदर्भात प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १३.०९.२००७ रोजी निर्णय देऊन त्रयस्थ पक्षाच्या हरकतीच्या मुद्यावरुन अपिलार्थीचे प्रथम अपील त्यांनी फेटाळले व जन माहिती अधिकारी यांची दि. २४.०८.२००७ रोजीच्या पत्राची प्रत परत अपिलार्थीस पाठविली. अशाप्रकारे अपिलार्थीस संबंधित प्राधिकरणाकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाविषयी व खाजगी

स्वरुपाची असल्याने त्रयस्थ पक्षाने ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यास नकार दिला व म्हणून त्यांनी अपिलार्थीस ही माहिती देण्याचे नाकारले. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आजही त्यांच्याकडे उपलब्ध आहे.

त्रयस्थ पक्ष सौ.सुचिता शिवराम बोधगिरे यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थी हे त्यांचे नातेवाईक किंवा जवळचे संबंधित नसल्यामुळे व तसेच अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही कार्यालयीन आस्थापनेवरील असल्यामुळे व अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचे प्रयोजन स्पष्ट केले नसल्यामुळे ही माहिती अपिलार्थीस उघड करण्यासाठी त्यांची संमती नाही. त्रयस्थ पक्ष सौ.सुनिता किशनराव परोडवाड यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही खाजगी असून यासंदर्भात कार्यालयाने निर्णय घ्यावयाचा आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी  व त्रयस्थ पक्षाने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाच्या, त्यांनी नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातर्फे कारकून या पदाकरिता घेण्यात आलेल्या परीक्षेच्या उत्तरपत्रिकेच्या प्रती व त्रयस्थ पक्षाच्या धरणगस्त प्रमाणपत्राच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितल्या होत्या. या पैकी परीक्षेच्या उत्तरपत्रिकांच्या प्रतींसंदर्भात वेगवेगळया राज्य व केंद्रीय माहिती आयोगांनी, तसेच मा.उच्च न्यायालयाने देखील परीक्षांच्या उत्तरपत्रिका उघड करण्याचे अनेक निर्णयाद्वारे नाकारले आहे. हाच निर्णय त्रयस्थ पक्षाच्या बाबतीत देखील या प्रकरणी लागू होतो, त्यामुळे अपिलार्थीस त्रयस्थ पक्षाच्या उत्तरपत्रिकांच्या प्रती जन माहिती अधिकारी यांच्याकडून उपलब्ध होऊ शकणार नाहीत. मात्र या त्रयस्थ पक्षाने  प्रकल्पग्रस्त व्यक्ती असल्याबाबतचे जिल्हाधिकारी, नांदेड यांना सादर केलेल्या प्रमाणपत्राच्या प्रती, ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे, ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाचा जरी विरोध असला तरी पुढे स्पष्ट केल्याप्रमाणे व्यापक जनहिताच्या दृष्टीकोनातून, विशेषतः ही माहिती सार्वजनिक स्वरुपाची असल्यामुळे आणि ती उघड केल्याने

अधिनियमातील कलम ८ व ९ च्या तरतुदी कोणत्याही प्रकारे भंग होण्याचे संभवत नसल्याने त्रयस्थ पक्षाच्या प्रकल्पग्रस्ताच्या प्रमाणपत्राच्या प्रती जन महिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता विनामूल्य द्याव्या लागतील. यासंदर्भात त्रयस्थ पक्षाने वरील परिच्छेदामध्ये त्यांच्या युक्तिवादामध्ये उपस्थित केलेले मुद्दे येथे गैरलागू आहेत. कारण माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार केवळ या प्रकरणाशी संबंधित व्यक्तींनीच / नातेवाईकांनीच त्रयस्थ पक्षांची माहिती मागितली पाहिजे, असे बंधनकारक नाही. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ३ च्या तरतुदीनुसार प्रत्येक भारतीय नागरिकास सार्वजनिक प्राधिकरणाकडून त्यांना आवश्यक असलेली माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क आहे. तसेच त्रयस्थ पक्षाचे प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्र उघड केल्याने त्यांचे वैयक्तिक असे कोणतेही नुकसान होणार नाही. कारण या प्रमाणपत्राच्या आधारे संबंधितांना शासकीय/निमशासकीय कार्यालयाद्वारे शासकीय सेवेत प्रवेश मिळवून दिला जातो. जनतेकडून जमा झालेल्या विविध कराच्या रकमेतून त्यांना शासनाकडून वेतन व इतर आर्थिक लाभ मिळतात. त्यामुळे ही माहिती, जरी त्रयस्थ पक्षाने हरकत घेतली तरी, ती जन माहिती अधिकारी यांनी व्यापक जनहिताच्या दृष्टीने उघड करणे अनिवार्य आहे, असे आयोगाचे मत अहे. सबब या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी त्रयस्थ पक्ष सौ. सुचिता शिवराम बोधगिरे व सौ.सुनिता किशनराव परोडवाड यांच्या धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या प्रती, ही माहिती, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी. या टप्प्यावर अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, त्यांनी सदर माहिती जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयातून पूर्वनियोजित वेळी जन माहिती अधिकारी यांच्याकडून याच कालावधीमध्ये व्यक्तिशः हस्तगत करुन घ्यावी, ही माहिती अपिलार्थीच्या प्रतिनिधीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही, याची अपिलार्थीने नोंद घ्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील त्रयस्थ पक्षाच्या प्रकल्पग्रस्त प्रमाणपत्राच्या प्रती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्याव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः ११.०८.२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शेख अफसर शेख बाबू रा.हमालपूरा,मस्जिदजवळ,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा अव्वल कारकून, महसूल शाखा-१ (आस्थापना-१), जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा नायब तहसीलदार, आस्थापना शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००७/रामाआ/अपील/सिआर/२७४१
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

१. श्री.राजाराम श्रीधर भोंडे, : अपिलार्थी
ता.पैठण, जि.औरंगाबाद

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नगर परिषद,पैठण,जि.औरंगाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी
विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मुख्याधिकारी, नगर परिषद, पैठण,जि.औरंगाबाद

जन अपिलीय अधिकारी : उपआयुक्त (सामान्य प्रशासन), विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०५.०५.२००८ रोजी फेर नोंदणी केलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी वेळेवर माहिती न देता खोटी माहिती दिली, त्यामुळे त्यांच्यावर दंडात्मक कारवाई करावी, तसेच जन माहिती अधिकारी यांनी कायद्याचा गैरवापर केला, शासनाची दिशाभूल केली व नगरपालिकेचे नुकसान केले म्हणून त्यांच्यावर योग्य कारवाई करावी व ही रक्कम त्यांच्या पगारातून वसूल करावी असे आदेश द्यावे. अशाप्रकारच्या विनंतीबरोबरच अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील माहितीची मागणी या अपील अर्जामध्ये कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०९.०३.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे - त्यांना कोणतीही कल्पना न देता, कोणत्या नियमाप्रमाणे दुकानदारी बंद करुन

नगरपालिकेच्या कुलपा -दि. ०६.०३.२००७ रोजी पैठण येथील भारतवाले यांच्या दुकानास कुलुपे कोणत्या कायद्याप्रमाणे लावली, या बाबतची माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. १२.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात अपिलार्थीस मुद्देनिहाय खुलासा केला. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २६.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २५.०५.२००७ रोजी निर्णय देऊन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस, त्यांनी दि. ०६.०३.२००७ रोजी पैठण येथील ज्या दुकानांना कुलपे लावली, ती कोणत्या नियमानुसार लावली,याची माहिती सात दिवसांचे आत विनामूल्य देण्याचे सूचित केले. यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. २७.०६.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस असे कळविले की, नगर परिषदेने त्यांच्याकडील कराच्या वसूलीसाठी दुकानांना कुलपे लावलीच नसल्यामुळे कुलुपे कोणत्या नियमानुसार लावली याचे उत्तर देण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही व जी कृती नगर परिषदेने केली नाही, ती कृती कोणत्या नियमानुसार केली, ते सांगता येणे शक्य नाही. तथापि जन माहिती अधिकारी यांच्या या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. या प्रकरणाशी संबंधित त्यांचा युक्तिवाद त्यांनी आयोगाकडे लेखी पत्राद्वारे सादर केला असून त्यांना जन माहिती अधिकारी यांनी खोटी माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर दंडात्मक व शिस्तभंगाची कारवाई व्हावी, अशी आयोगास विनंती केली आहे.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे नगर परिषदेतर्फे श्री. भारतवाले यांच्या मालकीच्या इमारतीतील दुकानांना नगर

परिषदेतर्फे कुलपे लावण्यात आली नव्हती. त्यांनी मूळात जी कृती केली नाही, त्यासंदर्भात माहिती अपिलार्थीस देणे शक्य नाही व ही माहिती अपिलार्थीस त्यांनी दि. १२.०४.२००७ रोजीच्या पत्राद्वारे दिली आहे. अपिलार्थीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १५.०३.२००७ रोजी प्राप्त झाल्यानंतर अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविल्याचे त्यांनी आयोगाच्या निदर्शनास आणले.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, पैठण नगर परिषदेतील कर्मचाऱ्यांनी, अपिलार्थी म्हणतात त्याप्रमाणे, श्री. भारतवाले यांच्या मालकीच्या इमारतीतील दुकानांना कुलूपे लावण्यात आली होती किंवा कसे हे, आयोगास कळण्यास मार्ग नाही. सबब जन माहिती अधिकारी यांचा अपिलार्थीने त्यांच्या अर्जात उल्लेख केल्याप्रमाणे इमारतीमधील दुकानांना कुलूपे लावण्यात आली नाहीत, हा युक्तिवाद, आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये अपिलार्थीने त्यांच्या म्हणण्यापृष्ठ्यर्थ कोणताही सबळ पुरावा सादर न केल्यामुळे मान्य करण्यात येत आहे. तसेच अपिलार्थीने त्यांचे म्हणणे सिध्द करण्यासाठी इतर कोणतीही पूरक माहिती देखील आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जाबरोबर अथवा त्यानंतर सादर केलेल्या लेखी युक्तिवादाबरोबर न जोडल्यामुळे आणि जन माहिती अधिकारी यांच्या वरील युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज ते आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, आवश्यक त्या पुराव्याअभावी अपिलार्थीची व्दितीय अपील अर्जातील विनंती अमान्य करण्यात येत आहे.

या प्रकरणी अपिलार्थीपासून जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही असद्हेतूने माहिती दडविल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत नसल्याने जन माहिती अधिकारी यांच्यावर दंडात्मक कारवाई करण्याची अपिलार्थीची विनंती मान्य करण्यात येत नाही.

या सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता अपिलार्थीचे आयोगाकडे सादर केलेले व्दितीय अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: ११.०८.२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. राजाराम श्रीधरराव भोंडे,बालाजी मंदिरामागे,दुर्गावाडी,पैठण,जि.औरंगाबाद

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद,पैठण,जि.औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपआयुक्त (सा.प्र.),विभागीय आयुक्त कार्यालय,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/८७८
निर्णय दिनांकः ११.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. पदमाकर जगन्नाथराव जोशी,<br>रा.औरंगाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>उपअभियंता,<br>नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य समन्वयक<br>लोकशाही दिन तथा उपआयुक्त (प्र),<br>महानगरपालिका,औरंगाबाद | | |

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : १. सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद.

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ११.०८.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१५.०७.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे "त्यांच्या निवासस्थान बांधकामाचेवेळी अगाऊ रक्कम रु.१०७०/-ती रक्कम व्याजासह परत मिळणे आवश्यक होते, ती रक्कम मिळालेली नाही" अशाप्रकारची माहिती मागविली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तथापि अधिनियमाद्वारे विहित केलेली मुदत व्यपगत होण्याआधीच अपिलार्थीने दि. ३१.०७.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून कोणतेही आदेश पारित न केले गेल्यामुळे व परिणामी अपिलार्थी हे त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित राहिल्याने व्यथित होऊन त्यांनी वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक ११.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी दि. ०८.०१.१९९० रोजी बांधकाम परवाने मिळण्यासाठी रु.१०७०/- इतकी अनामत रक्कम भरली होती, ती १२ टक्के व्याजासह परत मिळावी, असा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्ज केला होता, ही रक्कम त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अद्यापपावेतो प्राप्त झाली नाही.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने औरंगाबाद मनपाकडे दि. ०८.०१.२००९ रोजी चलनाद्वारे बांधकाम परवाना मिळण्यासाठी अनामत रक्कम रु.८७०/- व बांधकाम परवाना शुल्क रु. १००/- असे जमा केले होते. यातील रु.९७०/- इतकी रक्कम अपिलार्थीस अनामत रक्कम म्हणून परत मिळण्यासाठी देय ठरते. ही अनामत रक्कम महानगरपालिकेने अपिलार्थीस त्यांच्याकडील धनादेश क्र. ५७८२८/- दि. २७.०५.१९९१ रोजी दिली असून त्याची नोंद औरंगाबाद महानगरपालिकेतील कॅशबुक रजिस्टरच्या पृष्ठ क्र.१८ वर व्हावचर क्र.१५३६ अन्वये घेतली गेली आहे व त्यांनी ही माहिती अपिलार्थीस दि. ०८.०७.२००९ रोजी पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १५.०७.२००८ रोजीच्या

अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, कोणत्याही प्रकारे 'माहिती'चा विषय होऊ शकत नाही. या अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी औरंगाबाद महानगरपालिका यांच्याकडे त्यांच्या निवासस्थानाच्या बांधकामाच्या वेळी पुरविलेली आगाऊ रक्कम परत मिळण्याबाबत केलेली विनंती आहे. अपिलार्थीने अनामत म्हणून भरलेली रक्कम जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाने अपिलार्थीस दि. २७.०५.१९९१ रोजी चेकद्वारे परत केली आहे व तसे अपिलार्थीस अवगतही केले आहे. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नाही. अपिलार्थीने औरंगाबाद महानगरपालिकेकडे अनामत रक्कम म्हणून भरलेले रु.९७०/- इतके महानगरपालिकेने अपिलार्थीस धनादेशाद्वारे परत केले आहे. त्याचा तपशील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. ०८.०७.२००९ रोजी कळविला आहे, हे पाहता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत आहे.

अपिलार्थीस त्यांनी मागणी केलेली माहिती, अधिनियमातील तरतुदींशी विसंगत असूनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून मिळाली असली तरीही अपिलार्थीच्या दि. १८.०७.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी दि. ०८.०७.२००९ रोजी म्हणजेच सुमारे अकरा महिन्यांच्या विलंबाने अपिलार्थीस पुरविल्याचे दिसून येते.अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत प्रथम प्रतिसाद न देण्याचे कोणतेही समर्थन अस्तित्त्वात असू शकत नाही. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नाकारण्याचा देखील त्यांना अधिनियमातील कलम ७(१) व ७(८) च्या तरतुदीनुसार अधिकार आहे. तथापि त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचा कधीही विचार न करुन, त्यांचा प्रथम अर्ज कोणत्याही कार्यवाहीविना तसाच ठेवून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे. सबब आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य

शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे व अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

२. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः ११.०८.२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. पद्माकर जगन्नाथराव जोशी,पराक्रम कॉलनी,जयसिंगपूरा,घर नं.१-९-१५, नवीन घर नं.१-१३-२५, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा उपअभियंता,नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक संचालक, नगररचना, महानगरपालिका,औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. आयुक्त, महानगरपालिका, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०८७

निर्णय दिनांक १२-०८-२००९

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, : अपिलार्थी

ट्रेड युनियन सेंटर लक्कडकोट, जालना

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आलमगांव,

पो. हस्तपोखरी, तालुका अंबड, जिल्हा जालना

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड,

तालुका अंबड, जिल्हा जालना

त्रयस्थ पक्ष : श्री. बाबुराव बापूराव नारळे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ०४-०७-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केल्याचे नमूद केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. बाबुराव बापूराव नारळे, शिपाई यांच्या दिनांक ०१-०७-१९६९

ते जून १९७७ पर्यंतच्या कालावधीशी संबधित माहिती साक्षांकीत स्वरुपात मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - श्री. बाबुराव बापुराव नारळे यांच्या दिनांक ०१-०७-१९६९ ते जून १९७७ पर्यंतच्या नमुना नंबर २४ च्या साक्षांकीत प्रती, श्री. नारळे यांना कामावर घेण्याच्या ठरावाच्या साक्षांकीत प्रत, श्री. नारळे यांचा सेवापट भरुन त्याची साक्षांकीत प्रत, श्री. नारळे यांच्या जी. पी. एफ खात्याच्या साक्षांकीत प्रत, ऑक्टोबर १९९० ते डिसेंबर २००७ या कालावधीत कामास असलेल्या कर्मचा-यांच्या नमुना नंबर २४ च्या साक्षांकीत प्रती, श्री. नारळे यांना कामावरुन कमी केले असल्यास त्या ठरावाची एक साक्षाकीत प्रत, - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाव्दारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास संबधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०३-०३-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस तीन महिन्याच्या आत निशुल्क माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी व त्रयस्थ पक्ष हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता आहे. त्रयस्थ पक्षास त्यांचे हक्क मिळवून देण्यासाठी ते प्रयत्नशील आहेत, म्हणून अपिलार्थीने अशा प्रकारची माहिती

मागितली आहे. अपिलार्थीने मागितलेली माहिती उघड केल्याने त्रयस्थ पक्षासारख्या असंख्य चतुर्थ श्रेणी कर्मचा-यांचे प्रश्न सुटणार असून त्यातून व्यापक जनहित साध्य होणार आहे. ही माहिती त्यांना विनामूल्य प्राप्त व्हावी अशी अपेक्षा त्यांनी आपल्या युक्तिवादामध्ये व्यक्त केली.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर ऑक्टोबर २००८ पासून कार्यरत आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत देण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अंदाजे ३८ वर्षापूर्वीची जुनी असल्यामुळे ही माहिती शोधण्यासाठी त्यांना वेळ लागेल.

आज रोजी सुनावणीच्या वेळी त्रयस्थ पक्षाने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने विचारलेली त्यांच्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस देण्यास त्यांची कोणतीही हरकत नाही.

वरील घटनाक्रम, संबंधितांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्षाविषयी मागितलेली माहिती ही अंदाजे ३८ वर्षापूर्वीची आहे. ही माहिती उघड करण्यासाठी त्रयस्थ पक्षाची कोणतीही हरकत नाही, त्यामुळे ही माहिती आता जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस द्यावी लागेल. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही अंदाजे ३८ वर्षापूर्वीची जुनी असल्याने जन माहिती अधिकारी यांनी आयोगास ही माहिती शोधण्यासाठी त्यांना अंदाजे एक महिन्याचा कालावधी लागेल असे अवगत केले आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्रमांक ३ ची, श्री. बाबुराव बापुराव नारळे यांचे सेवापट भरुन त्याची साक्षांकीत प्रत देण्यात यावी, ही माहिती वगळता उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांनी मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित अपिलार्थीने मागितल्याप्रमाणे नव्याने माहिती तयार करुन देण्याचा भाग वगळता त्या मुद्दयावरील व उर्वरित सर्व मुद्दयावरील माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी. मुद्दा

क्रमांक ३ च्या संदर्भात असे स्पष्ट करण्यात येते की, श्री. नारळे यांचे सेवापट जन माहिती अधिकारी यांच्याकडे आता ज्या स्थितीत असेल त्याच स्थितीमध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ते उपलब्ध करुन द्यावे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे अर्जदाराने मागणी केलेली माहिती ज्या स्वरुपात उपलब्ध आहे त्याच स्वरुपात ती अर्जदारास देणे अभिप्रेत आहे. अर्जदाराच्या विनंतीवरुन नव्याने एखादी माहिती तयार करुन नंतर ती अर्जदारास देणे अशा प्रकारची प्रक्रिया माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नसल्यामुळे अपिलार्थीस श्री. बाबुराव बापराव नारळे यांचे सेवापट भरुन त्याची साक्षांकीत प्रत देणे हे जन माहिती अधिकारी यांच्यावर बंधनकारक असणार नाही.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक २३-०१-२००८ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. देशमुख एल. पी., तत्कालीन ग्रामसेवक सध्या निलंबीत) यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कलम ७ (१) अथवा ७ (८) प्रमाणे कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपासून वंचित ठेवल्याचे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. त्यांनी स्वतः तर अपिलार्थीच्या मूळ अर्जास प्रतिसाद दिला नाही, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १७-०४-२००८ रोजी आदेशित करुनही व तीन महिने इतका पुरेसा कालावधी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना उपलब्ध करुन देऊनही त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी या संपूर्ण घटनाक्रमामध्ये कोणत्याही टप्प्यावर सकारात्मक प्रतिसाद दिला नाही. त्यांच्या अशा प्रकारच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल ते माहिती अधिकार अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. सबब तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. देशमुख एल. पी., तत्कालीन ग्रामसेवक सध्या निलंबीत) यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास त्यांनी कोणताही प्रतिसाद न देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ काळासाठी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५०

/- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा. विहित मुदतीत त्यांचा खुलासा आयोगास प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांनी लावलेला विलंब त्यांना मान्य आहे, असा निष्कर्ष काढून हेच आदेश अंतिम करण्यात येतील याची त्यांनी नोंद घ्यावी.

वरील परिच्छेदात उपस्थित जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, आलमगांव यांना तीस दिवसाच्या आत माहिती देण्याचे आदेशित केले आहे. संबंधित जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस या कालावधीमध्ये विनामूल्य माहिती पुरवतील याची दक्षता गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड यांनी घ्यावयाची आहे. तसेच या कालावधीत जर अपिलार्थीस देण्यासाठी माहिती जन माहिती अधिकारी यांना उपलब्ध झाली नाही तर ही माहिती जतन करुन ठेवण्याची जबाबदारी ग्रामपंचायतीच्या ज्या कर्मचा-यावर होती त्यांच्यावर त्यांनी फौजदारी अथवा प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

तत्कालीन जन माहिती अधिकारी (श्री. देशमुख एल. पी., तत्कालीन ग्रामसेवक सध्या निलंबीत) यांना आयोगाचे आदेश विहित मुदतीत पोहोचले जातील याची जबाबदारी गट विकास अधिकारी, पंचायत समिती अंबड यांची राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशत: मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## <u>आदेश</u>

१. अपील अंशत: मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीस त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील मुद्दा क्रमांक ३ शी संबंधित माहितीमधील नव्याने माहिती तयार करुन देण्याचा भाग वगळता

उर्वरित सर्व मुद्दयांवरील माहिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमत होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संबंधित जन माहिती अधिकारी (श्री. देशमुख एल. पी., तत्कालीन ग्रामसेवक सध्या निलंबीत) यांना अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी त्यांनी वंचित ठेवल्याबद्दल त्यांच्यावर विलंबाच्या प्रतिदिनी रुपये २५० /- याप्रमाणे एकूण रुपये २५,००० (अक्षरी रुपये पंचवीस हजार) इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमीत झाल्यापासून तीस दिवसाच्या आत सरळ आयोगाकडे सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १२-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. प्रकाश पुंडलिक बोदवडे, ट्रेड युनियन सेंटर लक्कडकोट, जालना.

२ जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, आलमगांव, पो. हस्तपोखरी, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, अंबड, तालुका अंबड, जिल्हा जालना यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९२
निर्णय दिनांक १२-०८-२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. दिगांबर पांडुरंग गायकवाड,<br>सिध्दार्थनगर,अहमदपूर,जि.लातूर | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>नायब तहसीलदार,<br>अहमदपूर,जि.लातूर. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे. या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तत्कालीन जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या सुरुवातीसच तत्कालीन जन माहिती अधिकारी (सध्या नायब तहसीलदार (सं.गां.योजना) तहसील कार्यालय,अहमदपूर,जि.लातूर ) यांनी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगास उद्देशून लिहिलेले दि.०७.०८.२००९ रोजीचे पत्र आयोगास सादर केले असून, या पत्रामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती तहसील कार्यालयात पहाणीस्तव त्यांना मिळाली असल्यामुळे व यामुळे त्यांचे समाधान झाले असल्यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले अपील क्र.१०९२/०८ हे ते स्वखुषीने मागे घेत आहेत. या पत्रामध्ये अपिलार्थीने त्यांचे विचाराधीन अपील निकाली काढण्याची आयोगास विनंती केली आहे.

खुद्द अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दाखल केलेले विचाराधीन अपील निकाली काढण्याची विनंती केली असल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील खारीज करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

अपील क्र.१०९२/०८, दि.१३.०६.२००८ खारीज करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांक : १२-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१. श्री. दिगांबर पांडुरंग गायकवाड,सिध्दार्थनगर,अहमदपूर,जि.लातूर

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार,अहमदपूर,जि.लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९०
निर्णय दिनांक: १२.०८.२००९

१. श्री. ॲड अजित एम. देशमुख, बीड : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत, केज, ता. केज, जि. बीड : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, ता. केज, जि. बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी ज्या ग्रामपंचायतीकडे माहिती मागितली होती. त्या ग्रामपंचायतीचे १७ वर्षात केवळ दोन वेळा ऑडीट झाले असून त्यामध्ये एक हजारावर चुका व काही ठिकाणी अपहार आढळून आला असल्यामुळे जन माहिती अधिकारी आणि जन अपिलीय अधिकारी यांनी संगनमताने माहिती दडविण्याचा प्रयत्न केला. व त्यांना आजही पुर्ण माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. त्यामुळे त्यांनी आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) प्रमाणे कारवाई करावी व जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना माहिती अधिकाराचे प्रशिक्षण देण्याचे आदेश सचिव (ग्राम विकास ) यांना देण्यात यावे व त्यांनी मूळ अर्जामध्ये मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना अधिनियमातील कलम ७ (६) प्रमाणे मोफत देण्याचे आदेश व्हावेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या ग्रामपंचायतीतर्फे शेकडा पन्नास पैसे या दराने नोदणी फीस घेण्यासंदर्भात एकूण चार मुद्याद्वारे व ग्रामपंचायतीचे या बाबत झालेल्या दोन सलग लेखापरिक्षण अहवालाच्या प्रती अशी माहिती शिघ्र टपालाद्वारे मागितली होती. अपिलार्थीने हा अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे पोस्टाने पाठविला होता. परंतु 'ग्रामसेवक भेटत नाही' या कारणास्तव सदरचा अर्ज अपिलार्थीस पोस्ट खात्याकडून परत प्राप्त झाला त्यामूळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ३१.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता त्यांच्या दिनांक ०८.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस काही माहिती पुरविली व अपिलार्थीचे प्रथम अपील निकाली काढले. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांच्याकडे जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून दिनांक ०८.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेल्या माहितीवर त्यांनी बरेच आक्षेप घेतल्याचे दिसून येत आहे. त्यामूळे या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ३१.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपला निर्णय देणे या टप्प्यावर योग्य राहील, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. ३१.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे

आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन,आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.३१.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. ॲड अजित एम. देशमुख कारंजा रोड बीड .

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामसेवक, ग्रामपंचायत कार्यालय, केज, ता. केज, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गट विकास अधिकारी, पंचायत समिती, केज, ता. केज, जि. बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०८८
निर्णय दिनांकः १२.०८.२००९

१. श्री. श्रीकांत अंबादास महाजन, : अपिलार्थी
उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग,
उस्मानाबाद .

प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी : अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ अर्जातील माहितीची मागणी कायम ठेवून, अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाशी असहमती दर्शविली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७/२८.०९.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद शहरातील सर्व्हे नं. २१७ आणि सर्व्हे नं.२१८ मध्ये 'सांजा रोड' या नावाने बांधकाम केलेल्या रस्त्यासंदर्भात काही माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सर्व्हे नंबर २१७ व २१८ मध्ये 'सांजा रस्ता' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या रस्त्याचे बांधकाम जिल्हा परिषदेने बांधकाम विभागाकडे वर्ग केले असल्यास त्याची माहिती, जिल्हा परिषदेने केलेल्या रस्त्याच्या बांधकामाशिवाय बांधकाम करताना अतिरिक्त क्षेत्र

निश्चित केले असल्यास अतिरिक्त क्षेत्र व जिल्हा परिषदेने बांधकाम केलेले क्षेत्र स.नं. २१७ व २१८मध्ये किती आहे, स.नं. २१७ व २१८ मधील रस्त्याचे एकूण क्षेत्र, सदर क्षेत्र संपादित केले आहे किंवा कसे, सदर क्षेत्र ७/१२ उताऱ्यामधून वगळण्याची शिफारस शासनाकडे केली असल्यास त्याची माहिती, सर्व्हे नं. २१७ व २१८ मध्ये बांधलेल्या रस्त्याचा तपशील जन माहिती अधिकारी यांच्या खात्याकडे असल्याने त्यांनी संपादित केलेल्या रस्त्याचे क्षेत्र वगळण्याची शिफारस करावी अशी विनंती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २६.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. २/-इतके त्यांच्या कार्यालयात अथवा शासकीय कोषागारात भरणा करुन त्यांच्या कार्यालयास चलनाची प्रत पाठविण्याचे सूचित केले. यानंतर अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.१०.२००७ रोजी उपविभागीय अधिकारी यांनी त्यांना उद्देशून लिहिलेल्या पत्राची प्रत अपिलार्थीस पुरविली. तथापि अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १०.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०१.२००८ रोजी सुनावणी घेऊन जन माहिती अधिकारी यांना चाळीस दिवसांच्या आत संबंधित सर्व्हे नंबरची प्रत्यक्ष पाहणी करुन सार्वजनिक बांधकाम विभागाच्या हद्दी निश्चित करुन घेण्याचे व त्या ठिकाणी पांढरा चुना असलेले दगड बसविण्याची सूचना केली व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात त्यांना आपल्या निर्णयामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी आपले कोणतेही आदेश पारित केले नाहीत. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, सदर रस्त्याचे काम जिल्हा परिषदेकडून अंदाजे २० ते २५ वर्षापूर्वी केले गेले आहे.अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही जिल्हा परिषद कार्यालयाकडे उपलब्ध असण्याची शक्यता आहे. अर्जदारास ही माहिती आवश्यक असल्यास अर्जदाराने ही माहिती जिल्हा परिषदेकडून घ्यावी. सदर रस्त्याचे बांधकाम जिल्हा परिषदेने केले आहे. सदर रस्ता जिल्हा परिषदेने सार्वजनिक बांधकाम विभागाकडे हस्तांतरित केल्याबद्दलचा पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे आयोगाने मागितला असता, अशाप्रकारचा कोणताही पुरावा जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध नसल्याचे त्यांनी आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ५ शी संबंधित माहिती ही अपिलार्थीस देय होत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे उस्मानाबाद शहरातील स.नं.२१८ व २१७ मधून जाणाऱ्या रस्त्याचे क्षेत्र संपादित क्षेत्रातून वगळण्याची शिफारस जन माहिती अधिकारी यांनी करावी, अशी विनंती त्यांना केली आहे. अशाप्रकारच्या विनंतीचा माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च) मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येच्या व्याप्तीमध्ये समावेश नसल्याने ही माहिती अपिलार्थीस देय होत नाही. मात्र अपिलार्थीच्या अर्जातील उर्वरित चार मुद्यांवरील माहिती अपिलार्थीस देय होत आहे. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे पुरविलेल्या माहितीचे अवलोकन करता यामध्ये मुद्दा क्र. १ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कोणत्याही पुराव्याशिवाय दिल्याचे दिसून येत आहे. मुद्दा क्र.२ शी संबंधित माहिती अपिलार्थीने मागितलेल्या माहितीशी सुसंगत आहे. जन माहिती अधिकारी यांच्या मते, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ शी संबंधित मागितलेली माहिती ही जिल्हा परिषदेकडे असल्याने, अपिलार्थीने ही माहिती जिल्हा परिषदेकडून घ्यावी, तथापि अशा प्रकरणी माहिती अधिकार अधिनियमातील कलम ६(३)(एक) मध्ये स्पष्ट तरतूद करण्यात आली

आहे की, जर अर्जदाराने मागणी केलेली माहिती संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाशी संबंधित नसेल तर त्यांनी अर्जदाराच्या माहितीसाठीचा अर्ज, ती माहिती ज्या प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे, त्या प्राधिकरणाकडे, अर्जदाराचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत पाठवून, त्याची एक प्रत अर्जदारास द्यावी. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अशाप्रकारची कोणतीही कार्यवाही केली नाही व अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती प्राप्त होण्यापासून वंचित ठेवले आहे. त्यांच्या अशाप्रकारच्या प्रमादामुळे आता अपिलार्थीस या मुद्यांवरील माहिती देण्याचे उत्तरदायित्त्व जन माहिती अधिकारी यांच्यावर येते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. १,३ व ४ च्या संदर्भातील माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांचे आत विनामूल्य पुरवावी व या प्रकरणी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.२/- त्यांना याच कालावधीमध्ये परत करावे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.
२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटी स्वीकारलेली रक्कम रु.२/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत परत करावी व त्यांच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र.१,३,४ च्या संदर्भातील माहिती त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १२-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. श्रीकांत अंबादास महाजन, 'कुलश्री', ७/७२७, समतानगर, नगर परिषद शाळा क्र.११ समोर,उस्मानाबाद .

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, सार्वजनिक बांधकाम विभाग, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०८९
निर्णय दिनांकः १२.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. सुतार वसंत रामभाऊ,<br>रा. बावी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>सहायक अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उपविभाग कळंब, जि. उस्मानाबाद | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>कार्यकारी अभियंता,<br>महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित,<br>उस्मानाबाद | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२५०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. २७.०९.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ.बावी, ता.वाशी, जि.उस्मानाबाद या गावातील स.नं.४ (ओ-२२) गावठान नं.२ मधील डि.पी. ट्रान्सफॉर्मर किती दिवस बंद होते व कशामुळे, अशी माहिती व्यक्तिशः विचारली असता त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले असता, त्यांना या प्रकरणी कोणत्याही प्रकारची सुनावणी न घेता दि. २७.०२.२००८ रोजीच्या पत्राबरोबर माहिती पाठविली असे कळविले तथापि त्यांना पाठविलेली माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी आहे, यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे व

आयोगास अशी विनंती केली आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहितीच्या हक्कापासून वंचित ठेवल्याबद्दल आणि चुकीची माहिती दिल्याबद्दल त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करावी आणि अर्जदार यांना मूळ अर्जाप्रमाणे सत्य माहिती देण्याचा हुकूम व्हावा.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वरील परिच्छेदात उल्लेखिल्याप्रमाणे मौ.बावी,ता.वाशी,जि.उस्मानाबाद गावातील स.नं.४ मध्ये डी.पी.(ट्रान्सफार्मर) जळाल्याबद्दल माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १८.१२.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीचा हा अपील अर्ज प्राप्त झाल्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २७.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस त्यांच्याकडील उपलब्ध माहिती पाठविली. तथापि प्राप्त माहिती ही चुकीची व दिशाभूल करणारी वाटल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, कार्यकारी अभियंता यांनी दि. २७.०२.२००८ रोजी अपिलार्थीस पुरविलेली माहिती ही सत्य व अचूक आहे. महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनीच्या कार्यपध्दतीमुळे एखाद्या ट्रान्सफॉर्मरला इजा झाल्यास अथवा तो जळाल्यास यासंबंधीचा अहवाल त्यांचे क्षेत्रीय अधिकारी यांच्याकडे त्याच दिवशी किंवा जास्तीत जास्त उशिरा म्हणजे दुसऱ्या दिवशी त्यांच्या वरिष्ठांकडे सादर करीत असतात.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत आहे. त्यामुळे ती अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७ प्रमाणे उपलब्ध करुन देणे हे जन माहिती अधिकारी यांना भाग आहे. आयोगाकडे अपिलार्थीने केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत माहिती दिली नाही व तसेच कार्यकारी अभियंता यांच्याकडील दि. २७.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० प्रमाणे कारवाई करावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे. यापैकी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती दिली नाही हा अपिलार्थीचा मुद्दा आयोग मान्य करीत आहे. कारण अपिलार्थीने दि. २७.०९.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अपिलार्थीस अधिनियमातील तरतुदीप्रमाणे उशिरात उशिरा दि.२६.१०.२००७ रोजी अगर तत्पूर्वी प्राप्त होणे सर्वसाधारण परिस्थितीत अपेक्षित आहे. तथापि या प्रकरणी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती प्राप्त झाली नाही हा त्यांचा मुद्दा मान्य करण्यात येत आहे. अपिलार्थीचा दुसरा मुद्दा असा आहे की, त्यांना कार्यकारी अभियंता यांच्याकडून त्यांच्या दि.२७.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्राप्त झालेली माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे. यासंदर्भात त्यांनी आपला लेखी युक्तिवाद आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये सादर केलेला आहे. अपिलार्थीस कार्यकारी अभियंता यांनी दिलेली माहिती चुकीची वाटल्याचे पहिले कारण म्हणजे ग्रामपंचायत कार्यालयाने त्यांना, संबंधित ट्रान्सफॉर्मर दि. २७.०४.२००७ रोजी जळाला होता व तो दि. २४.०७.२००७ पर्यंत बंद होता असे लिहून दिले आहे. तथापि ग्रामपंचायतीच्या सदरच्या लेखी पत्राची प्रत अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील

अर्जासोबत त्यांच्या युक्तिवादाच्या पृष्ठयर्थ पुरावा म्हणून सादर केलेली नाही. याही उपर दुसरी महत्त्वाची बाब अशी आहे की, ट्रान्सफॉर्मरची दुरुस्ती-देखभाल करण्यासाठीची संपूर्ण जबाबदारी म.रा.वि.वि.कं.ची आहे व ट्रान्सफॉर्मरच्या सद्यस्थितीचे सर्व तपशील त्यांच्याकडे त्यांनी ठेवणे अभिप्रेत आहे आणि त्यामुळे त्यांच्याकडील तपशील हा अधिकृत मानावयास हवा. केवळ ग्रामपंचायतीने एखादे लेखी निवेदन दिले, तेच निवेदन खरे, असे मानण्याचे कोणतेही कारण नाही. अपिलार्थीच्या अभिप्रायापृष्ठयर्थ त्यांनी दुसरा मुद्दा त्यांच्या द्वितीय अपील अर्जामध्ये असा नमूद केला आहे की, सदर प्रकरणी ग्राहकमंच,उस्मानाबाद यांनी सदरचा ट्रान्सफॉर्मर दि. २७.०४.२००७ ते २६.०७.२००७ या कालावधीमध्ये बंद असल्याचे मान्य केले आहे. मात्र ग्राहकमंचाचा सदर निर्णय त्यांनी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे ग्राहकमंचाने सदरचा ट्रान्सफॉर्मर दि. २७.०४.२००७ ते २६.०७.२००७ या कालावधीमध्ये बंद असल्याचे खरोखरीच मान्य केले आहे किंवा कसे हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अभावी कळण्यास मार्ग नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने त्यांचे, आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये, त्यांना चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याचे दिलेले अभिप्राय, आयोगास मान्य नाहीत.

या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. २७.०९.२००७ रोजीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, ही बाब येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या पत्रव्यवहारावरुन असे आढळून येते की, सहायक अभियंता यांना या प्रकरणी त्यांच्या कार्यालयातील कनिष्ठ अभियंता यांच्याकडून ही माहिती प्राप्त करुन घेऊन नंतर ती अपिलार्थीस पुरवावी लागणार होती त्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांना त्यांच्या सहायकांवर अवलंबून राहावे लागत होते. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ५(५) च्या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सर्व सहायक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी तरतूद आहे. सदर तरतूद पाहता, या

प्रकरणी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न होण्यासाठी संबंधित सहायक अभियंता व त्यांच्या कार्यक्षेत्रातील संबंधित कनिष्ठ अभियंता, हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे दिसून येते. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न पुरविण्याच्या त्यांच्या कृतीद्वारे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. सबब व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.म. यांना या प्रकरणाशी संबंधित सहायक अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस कार्यकारी अभियंता यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती पुरविली असल्याने व ती माहिती चुकीची व दिशाभूल करणारी आहे, असे वरील परिच्छेदामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे सिध्द झाले नसल्याने अपिलार्थीस माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकारी यांना कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. व्यवस्थापकीय संचालक, म.रा.वि.वि.कं.म. यांना या प्रकरणाशी संबंधित सहायक अभियंता व कनिष्ठ अभियंता यांच्यावर प्रचलित सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांकः १२-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. सुतार वसंत रामभाऊ, रा. बावी, ता. वाशी, जि. उस्मानाबाद-४१३ ५२५.

२. जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्यादित, उपविभाग कळंब, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्यूत वितरण कंपनी मर्यादित, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. व्यवस्थापकीय संचालक,महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी लिमिटेड,प्रकाशगड,वांद्रे (पूर्व) ५१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९३
निर्णय दिनांकः १२-०८-२००९

१. श्री. शेख अनवर शेख मन्नू : अपिलार्थी
रा. लेबर कॉलनी, नांदेड .

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
शासकिय वैद्यकीय महाविद्यालय
व रुग्णालय, नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व
रुग्णालय, नांदेड.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रशासकीय अधिकारी,
शासकीय वैद्यकिय महाविद्यालय व
रुग्णालय,नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १२.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना दि. ११.०२.२००८ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड येथे प्रत्यक्ष अर्ज देऊन मागितलेल्या माहितीपैकी कोणतीही माहिती जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांच्याकडे दि. १२.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपिलाची सुनावणी घेऊन जन अपिलीय अधिकारी यांनी प्रकरण प्रलंबित ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे वर्ष १९९५ ते २००७ या कालावधीमध्ये अनुकंपा तत्त्वावर धरणगस्त,प्रकल्पग्रस्त, स्वातंत्र्यसैनिक,अपंग,अंशकालीन या सर्व वर्गामधून भरती केलेल्या सर्व कर्मचाऱ्यांची नावे, नेमणूक दिनांक, शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र, जातीची प्रमाणपत्रे व तदनुषंगीक इतर प्रमाणपत्रे,जिल्हाधिकारी यांच्या शिफारस पत्रांच्या सत्यप्रतीसह, अशी माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे मागितली होती. अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १२.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी हे हजर आहेत. या प्रकरणी कोणालाही अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांना कधी व काय प्रतिसाद दिला व अपिलार्थीच्या दि. १२.०२.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चित कोणता निर्णय दिला, याबाबत आयोगास काहीही सांगता आले नाही. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप व व्याप्ती पाहता, अपिलार्थीच्या दि. १२.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांनी सुनावणी घेणे आयोगास गरजेचे वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १२.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा, असे त्यांना आदेशित करण्यात येत आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) च्या तरतुदीनुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि.१२.०३.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला ि- नर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शेख अनवर शेख मन्नू रा. लेबर कॉलनी, घर नं.४९, ब्लॉक नं.४, नांदेड .

२. जन माहिती अधिकारी तथा प्रशासकीय अधिकारी, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिष्ठता, शासकिय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९४
निर्णय दिनांकः १२-०८-२००९

१. श्री. वाय. बी.पवार, : अपिलार्थी
मु.पो.तामसा रोड,अर्धापूर,जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
गट शिक्षणाधिकारी,
पंचायत समिती,अर्धापूर, जि. नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
शिक्षणाधिकारी (प्राथ.),
जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना अद्यापि जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती न मिळाल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित मुख्याध्यापक, केंद्रीय प्राथमिक शाळा,अर्धापूर, गट शिक्षणाधिकारी व जिल्हा परिषदेमध्ये झालेल्या पत्रव्यवहाराच्या प्रती, मुख्याध्यापक जिल्हा परिषद,केंद्रीय प्राथमिक शाळा,अर्धापूर यांच्या केलेल्या चौकशीच्या पत्राच्या व निर्णयाच्या प्रती आणि संगणक खरेदीसंदर्भात काही माहिती मागविली होती. तथापि अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने

त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.२८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या या अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी, मूळ अर्जाद्वारे त्यांनी मागणी केलेल्या माहितीची त्यांना आजही आवश्यकता असल्याचे आयोगास सांगितले व जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, ते या पदावर नव्याने नियुक्त झाले असल्याने त्यांना या प्रकरणाशी संबंधित काहीही माहिती नाही.

जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती पाहता, या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. २८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर सुनावणी घेणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीच्या दि. २८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या दि.२८.०४.२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १२-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. श्री. वाय. बी.पवार,मु.पो. तामसारोड,अर्धापूर,ता. अर्धापूर,जि. नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा गट शिक्षणाधिकारी,पंचायत समिती,अर्धापूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथ.),जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९५
निर्णय दिनांकः १२.०८.२००९

१. श्री. दिपक पिराजी सातोरे, : अपिलार्थी
रा.प्रभातनगर,जि.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
वनपरिक्षेत्र अधिकारी,
वनपरिक्षेत्र कार्यालय,भोकर,जि.नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
सहायक वनसंरक्षक (रोहयो),
नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१०.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. ११.०३.२००८ रोजी वनपरिक्षेत्र अधिकारी, भोकर यांच्याकडे रजिस्टर्ड पोस्टाद्वारे माहितीसाठीचा अर्ज पाठविला असता, तीस दिवसांचा कालावधी होऊन देखील जन माहिती अधिकारी यांनी त्यावर कोणतीही माहिती न दिल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले तथापि त्यांनीही त्या अपिलावर कोणताही निर्णय न दिल्याने अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ११.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित आर्थिक वर्ष २००४ ते डिसेंबर, २००७ या कालावधीतील रोहयो अंतर्गत व खात्यामार्फत राबविण्यात आलेल्या इतर योजनांच्या संदर्भात विस्तृत प्रमाणात

माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कामाची गावनिहाय यादी, अंदाजपत्रक व कामाची मोजमापपुस्तिका व कामावर उपस्थित असलेल्या मजूरांच्या हजेरीपट व वेतन पत्राच्या सत्यप्रती व झालेल्या कामाचा तपशील,तसेच सन २००४ ते डिसेंबर २००७ या आर्थिक वर्षात रोजगार हमी योजनेशिवाय कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या व त्याकरिता शासनाकडून किती निधी उपलब्ध झाला आणि निधी कोणकोणत्या कामावर खर्चण्यात आला, त्याचा लेखी तपशील व काम केलेल्या संस्था व एजन्सीची नावे व त्यांना अदा केलेल्या देयकांचया सत्यप्रती तसेच नमुना -४ च्या तपशीलवार सत्यप्रती - या मुद्यांचा समोवश होता.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी या सर्व संबंधिताना दि. २२.०७.२००९ रोजी अंडर सर्टीफिकेट ऑफ पोस्टींगद्वारे सुनावणी संदर्भात कळवूनही सर्वजण अनुपस्थित आहेत. अपिलार्थीने राज्य माहिती आयोगास सादर केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांनी जन माहिती व अपिलीय अधिकारी यांना पाठविलेल्या अर्जाच्या संदर्भातील पोस्टाच्या पावत्यांच्या झेरॉक्स प्रती आयोगास सादर केल्या आहेत. तथापि या प्रतीवरुन या प्रती नेमक्या माहितीसाठीच्या प्रथम अर्ज व अपिलाशी संबंधित आहेत किंवा कसे याचा बोध होत नाही. त्यामुळे या टप्प्यावर मूळात अपिलार्थीच्या माहितीसाठीचा प्रथम अर्ज व अपील अर्ज अनुक्रमे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला किंवा कसे, हे निश्चितपणे कळण्यास मार्ग नाही. आज रोजी सुनावणीच्या वेळी सर्व संबंधित गैरहजर आहेत. हे

पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १२-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. दीपक पिराजी सातोरे, रा.प्रभातनगर,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, वनपरिक्षेत्र कार्यालय,भोकर,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९६
निर्णय दिनांकः १२.०८.२००९

१. श्री. रामप्रसाद श्रीकिशनजी खंडेलवाल, : अपिलार्थी
रा.नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपविभागीय पोलीस अधिकारी (शहर),नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
पोलीस अधीक्षक,
नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : सहायक पोलीस अधीक्षक,
नांदेड (शहर)
जन अपिलीय अधिकारी : अपर पोलीस अधीक्षक,नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली असल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २६.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित असलेल्या पोलीस ठाणे, वजिराबाद ,नांदेड येथे दाखल झालेला गुन्हा नोंद क्र. ४९/२००८ संदर्भात खालीलप्रमाणे माहिती व्यक्तिशः मागितली होती.

" १) उप विभाग कार्यालयाचे पत्र क्र. ३२४/०८ दि. ०१.०२.२००८

२) सदर पत्रात दिलेला अभिप्राय कोणत्या आधारावर दिला कागदपत्रांसह विस्तृत विवेचन"

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.०५.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस सदर प्रकरणात गुन्हयाचा तपास पोलीस निरीक्षक, वजिराबाद हे करीत असून तपास प्रक्रिया पूर्ण होताच अपिलार्थीस माहिती उपलब्ध करुन देण्याचे आश्वासित केले व अपिलार्थीस तूर्त माहिती देण्याचे नाकारले. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १६.०४.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावरही जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०५.२००८ रोजी निर्णय देऊन कलम ८ (ज) प्रमाणे त्यांनी मागणी केलेली माहिती अपिलार्थीस देता येणे शक्य नसल्याचे कळविले व अपिलार्थीचे अपील निकाली काढले. सदर निर्णय अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२७.०५.२००८ रोजी कळविल्याचे दिसून येते. तथापि अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याचे कारण दर्शवून वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती एक गुन्हयाशी संबंधित असून या गुन्हयाचा सध्या त्यांच्या कार्यालयातर्फे तपास चालू आहे. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्यास या प्रकरणाशी संबंधित अपराध्याचा तपास करण्याच्या प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात, अशी त्यांची खात्री आहे व त्यामुळे त्यांनी ही माहिती अपिलार्थीस पुरविली नाही.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने ज्या गुन्हा नोंदीची माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे, ती माहिती उघड केल्याने अपराध्यांचा तपास करण्यासाठी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यवाहीमध्ये अडथळे निर्माण होऊ शकतात. माहिती अधिकार अधिनियमातील कलम ८(१)(ज) मध्ये खालीलप्रमाणे तरतूद आहे.

"१) -----कोणत्याही नागरिकाला पुढील माहिती पुरविण्याचे आबंधन असणार नाही.

(ज) ज्या माहितीमुळे अपराध्यांचा तपास करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे या प्रक्रियांमध्ये अडथळा येईल, अशी माहिती; " या तरतुदीचे अवलोकन करता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उघड केल्याने अधिनियमातील कलम ८ (१)(ज) चा भंग होणार असल्याने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी घेतलेली भूमिका आयोगास योग्य वाटते. तसेच जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेल्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीची अनुपस्थिती पाहता, आता अपिलार्थीस ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नसल्याने अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. रामप्रसाद श्रीकिशनजी खंडेलवाल, 'खंडेलवाल प्लाझा', वजीराबाद,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सहायक पोलीस अधीक्षक, नांदेड (शहर) यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर पोलीस अधीक्षक,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९७
निर्णय दिनांकः १२.०८.२००९

१. श्री. रविंद्र संगनवार, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,नांदेड

विद्यमान जन माहिती अधिकारी : उपविभागीय अभियंता,
सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर),
नांदेड

जन अपिलीय अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड

त्रयस्थ पक्ष : शाखा अभियंता,श्री. बी.जे.जोशी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना न मिळाल्यामुळे संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर योग्य ती दंडात्मक कारवाई करावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १७.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी

यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. बी.जे.जोशी, शाखा अभियंता, यांनी नांदेड ते आलेगाव, नाळेश्वर, निळा या रस्त्यावर सन २००० ते २००७ या वित्तीय वर्षामध्ये केलेल्या कामांची चार मुद्याद्वारे माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - या कालावधीमध्ये या रस्त्यावर रस्ता दुरुस्ती, डागडुजी व डांबरीकरणावर झालेला खर्च, वित्तीय वर्षनिहाय खर्चाचा कामनिहाय तपशील, कामाचा प्रकार, मंजूर तरतुद, झालेला खर्च व काम करणाऱ्या यंत्रणेचे नाव व नांदेड उपविभागात कार्यरत शाखा अभियंता श्री. बी.जे.जोशी यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यक्षेत्रात केलेल्या कामांची नियंत्रक म्हणून पहाणी केलेल्या कामांची वरीलप्रमाणे नमूद केलेली सविस्तर माहिती, सदर माहिती उपलब्ध नसल्यास त्याची कारणे - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०३.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील मान्य केले व अपिलार्थीस आठ दिवसांच्या आत विनाशुल्क माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित करुनही अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी, जन माहिती तथा अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी त्रयस्थ पक्षासह उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या द्वितीय अपील अर्जातील विनंतीशी सुसंगत युक्तिवाद केला.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती आता त्यांच्याकडे तयार असून ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यासाठी ते तयार आहेत. जन अपिलीय अधिकारी यांनी आदेशित केल्यानंतरही अपिलार्थीस माहिती न देण्याची कारणे उपस्थित जन माहिती अधिकारी आयोगास स्पष्ट करु शकले नाहीत. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्यासोबत सध्याचे जन अपिलीय अधिकारी यांचे निवेदन आणले असून, या निवेदनामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, या प्रकरणाशी संबंधित जन माहिती अधिकारी व सहायक जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अपेक्षित माहिती उपलब्ध न करुन दिल्यामुळे त्यांच्याकडून कार्यकारी अभियंता यांच्या कार्यालयाचे पत्र क्र. ६१३,६१४ दि.२०.०५.२००८ अन्वये त्यांना "कारणे दाखवा" नोटीस पाठविण्यात आली आहे. यावरुन अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने तत्कालीन जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता यांनी निश्चितपणे सकारात्मक प्रयत्न केला आहे, असे दिसून येते.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्र पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या चार मुद्यांद्वारे माहिती मागितली आहे, त्यातील मुद्दा क्र.१ च्या संदर्भातील माहिती मुद्दा क्र.२ मध्ये समाविष्ट असल्यामुळे, ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून परत नव्याने देय नाही. अपिलार्थीच्या अर्जातील मुद्दा क्र. ३ व ४ च्या संदर्भातील माहिती ही, जन माहिती अधिकारी यांच्याकडून खुलासा अपेक्षित करणारी व मोघम स्वरुपाची असल्याने व त्यामुळे अधिनियमातील तरतुदीशी सुसंगत नसल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. मात्र उर्वरित मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत आहे. उपरोक्त कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती नांदेड सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यालयातील उपअभियंता श्री. पी.पी.देशपांडे व लेखा परीक्षक (उत्तर) नांदेड यांच्याकडे उपलब्ध आहे. अपिलार्थीच्या मूळ अर्जास त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या कालावधीत तर माहिती

दिली नाहीच, परंतु जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१७.०३.२००८ रोजी आठ दिवसांच्या आत अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांनी अपिलार्थीस आजतागायत, आयोगाकडील द्वितीय अपील सुनावणीपर्यंत, कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही. जन माहिती अधिकारी यांना अर्जदारास माहिती देण्यासाठी सहाय्य करणारे त्यांचे सहाय्यक यांना देखील जन माहिती अधिकारी म्हणून समजावे, अशी अधिनियमातील कलम ५(५) मध्ये तरतुद आहे. हे पाहता, या प्रकरणी अपिलार्थीस अपेक्षित असलेली माहिती देण्यासाठी श्री. पी.पी.देशपांडे व लेखा परीक्षक (उत्तर), नांदेड हे एकत्रितपणे जबाबदार असल्याचे दिसून येते. आज रोजी सुनावणीच्या वेळी श्री. देशपांडे व ले.प.(उत्तर) हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय प्रदीर्घ कालावधीसाठी माहिती प्राप्त होण्यापासुन वंचित ठेवल्यामुळे हे दोनही अधिकारी अधिनियमातील कलम २० प्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरत आहेत. त्यांचे म्हणणे मांडण्याकरिता एक संधी देण्याच्या दृष्टीकोनातून संबंधित जन माहिती अधिकारी यांच्या या सहायकांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना प्राप्त होण्यापासून कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय अपिलार्थीस वंचित ठेवल्याबद्दल त्यांना विलंबाच्या प्रतिदिनी रु.२५०/- प्रमाणे एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा. या मुदतीत त्यांचा खुलासा प्राप्त न झाल्यास, अपिलार्थीस माहितीपासून वंचित ठेवण्यास ते जबाबदार असल्याचे त्यांना मान्य असल्याचा निष्कर्ष काढण्यात येऊन हेच आदेश अंतीम करण्यात येतील, याची त्यांनी नोंद घ्यावी.

अपिलार्थीस माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसांच्या आत पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेल्या माहितीतील मुद्दा क्र.१ व २ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच दोन दिवसांच्या आत पोस्टाने विनामूल्य पुरवावी.

३. जन माहिती अधिकारी यांचे या प्रकरणाशी संबंधित सहायक (श्री. देशपांडे व लेखा परीक्षक (उत्तर) नांदेड) यांना, त्यांनी अपिलार्थीस कोणत्याही समर्थनीय कारणाशिवाय माहिती मिळण्यापासून वंचित ठेवल्याबद्दल एकूण रु.२५०००/- इतकी शास्ती का लावण्यात येऊ नये, याचा खुलासा त्यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत सरळ आयोगास सादर करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १२-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. रविंद्र संगनवार, मारवाडी धर्मशाळेमागे, वजिराबाद, नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय अभियंता,सार्वजनिक बांधकाम उपविभाग (उत्तर), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी (नोंदणीकृत टपालाद्वारे)

३. जन अपिलीय अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग,नांदेड

यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४.	निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९८
निर्णय दिनांकः १२.०८.२००९

१. श्री. राजेंद्र हरीनारायण शर्मा, : अपिलार्थी
रा. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी , : प्रतिवादी
सार्वजनिक बांधकाम विभाग,सोलापूर
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अधीक्षक अभियंता,
सार्वजनिक बांधकाम मंडळ,सोलापूर
प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : कार्यकारी अभियंता,
सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.३१.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी दि. १८.१२.२००७ रोजी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे काही माहिती मागितली असता, कोणत्याही प्रकारची माहिती न पुरविल्या गेल्याने त्यांनी दि. २०.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. प्रथम अपिलाच्या सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांनी केलेल्या विनंतीप्रमाणे माहिती देण्यासाठी जन माहिती अधिकाऱ्यास दहा दिवसांची मुदतवाढ देण्यात आली. तथापि यानंतरही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयातर्फे दि. ०१.०१.२००७ ते ३०.११.२००७ या कालावधीमध्ये कोणत्या

शीर्षाखाली किती अनुदान प्राप्त झाले, खर्च किती झाला व कोणती कामे करण्यात आली, यांची यादी, अशी माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०२.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०४.२००८ रोजी आदेश देऊन अपिलार्थीस दहा दिवसाच्या आत माहिती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि तदनंतरही अपिलार्थीस कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अथवा अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कोणीही अथवा त्यांचा प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाही.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दि.१८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती अधिनियमातील कलम ७(१) मध्ये विहित केलेल्या मुदतीत उपलब्ध करुन देणे भाग होते. तथापि जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस मुदतीत तर कोणतीही माहिती उपलब्ध करुन दिली नाही, एवढेच नव्हेतर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०२.०४.२००८ रोजी निर्णय देऊनही त्यांनी अपिलार्थीस जन अपिलीय अधिकारी यांनी निश्चित करुन दिलेल्या कालावधीमध्ये कोणतीही माहिती पुरविली नाही, असे अपिलार्थीचे म्हणणे आहे. अपिलार्थीच्या या म्हणण्यातील सत्यासत्यता

पडताळून पाहणे आयोगास सर्व संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे शक्य नाही. मात्र या घटनाक्रमाचा तपशील पाहता, जी माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १७.०१.२००८ रोजीपर्यंत उपलब्ध करुन देणे गरजेचे होते, ती माहिती अपिलार्थीस दि. ०२.०४.२००८ पर्यंत दिली नव्हती. जन अपिलीय अधिकारी यांच्या दि.०२.०४.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता या निर्णयामध्ये देखील संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस माहिती देण्यासाठी दि. ०२.०४.२००८ रोजी दहा दिवस मुदतवाढ मागितली असल्याचे दिसून येते. यावरुन असे सिध्द होते की, अपिलार्थीस संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीमध्ये कोणतीही माहिती दिली नाही. अपिलार्थीस अशाप्रकारे अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणतीही माहिती न देऊन संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक अधिकारी/कर्मचारी यांनी एकत्रितपणे माहिती पुरविण्यासाठी विलंब लावून आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला असल्याचे येथे निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस आवश्यक ती माहिती उपलब्ध करुन देण्याच्या दृष्टीने संबंधित जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी व या प्रकरणाशी संबंधित त्यांचे सर्व सहायक यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: १२-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. राजेंद्र हरीनारायण शर्मा, संपादक नांदेड पोलखोल,एस.पी.ऑफीसच्या मागे,वजिराबाद,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कार्यकारी अभियंता,सार्वजनिक बांधकाम विभाग, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधीक्षक अभियंता,सार्वजनिक बांधकाम मंडळ, सोलापूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य अभियंता, सार्वजनिक बांधकाम प्रादेशिक विभाग, मध्यवर्ती इमारत, बी.जे.रोड, पुणे रेल्वेस्टेशन जवळ, पुणे-४११ ००१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९१
निर्णय दिनांकः १२.०८.२००९

१. श्री. जीवन रामराव उबाळे, : अपिलार्थी
रा. बीड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
उपजिल्हानिवडणूक अधिकारी, बीड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
अपर जिल्हाधिकारी, बीड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : प्रमुख लिपीक,
जिल्हाधिकारी कार्यालय,बीड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना बीड जिल्हयातील तीन तहसीलदार वगळता कोणत्याही तहसीलदाराने मुदतीत माहिती न दिल्याने त्यांच्यावर अधिनियमातील कलम २०(१) व २०(२) प्रमाणे कारवाई करावी आणि त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना अद्यापपावेतो प्राप्त न झाल्याने उर्वरित माहिती कलम ७(६) प्रमाणे त्यांना मोफत प्राप्त व्हावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०३.२००८ रोजीच्या (जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रत्यक्षतः दि.१४.३.२००८ रोजी प्राप्त) मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित दि.०१.०१.२००५ ते ०७.०३.२००८ या कालावधीत राज्य निवडणूक

आयोगाने सन २००५ पासून पुढे झालेल्या सर्व ग्रामपंचायत निवडणूकीमध्ये राखीव जागांवर निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांशी संबंधित माहिती एकूण ८ मुद्यांद्वारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस काही माहिती पुरविली व उर्वरित माहितीच्या संदर्भात जिल्हयातील सर्व तहसीलदारांना त्यांच्या दि. २४.०३.२००८ रोजीच्या पत्राची प्रत देऊन अपिलार्थीस सन २००५ पासून अनुसूचित जाती,जमाती,ना.मा.प्र.वर्गासाठी,राखीव जागेवर ज्या उमेदवारांनी ग्रामपंचायत निवडणूकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल केले होते, त्यांची संख्या किती आहे, याची माहिती वर्षनिहाय अर्जदारास परस्पर देण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीस अपेक्षेप्रमाणे कोणतीही माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने माहिती अधिकार अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०६.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २७.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपला निर्णय त्याच दिवशी पारित केला व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी मुदतीत माहिती दिल्याचा निष्कर्ष काढून अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १२.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. २४.०३.२००८ रोजी माहिती पुरविली आहे व अपिलार्थीने मागणी केलेल्या अर्जातील जी माहिती बीड जिल्हयातील तहसील कार्यालयांशी संबंधित होती, त्यासंदर्भात संबंधित तहसीलदारांना याच पत्राद्वारे अपिलार्थीस परस्पर

माहिती पुरविण्याचे त्यांनी सूचित केले होते. त्याप्रमाणे सर्व तहसीलदार (तहसील बीड व पाटोदा वगळता) यांनी विहित मुदतीत माहिती पुरविली आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि.१४.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या एकूण ८ मुद्यांवरील माहितीपैकी मुद्दा क्र. ४ व मुद्दा क्र. ८ च्या संदर्भातील माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. कारण ती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी विसंगत आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील उपलब्ध माहिती, ज्या स्वरुपात आहे,त्या स्वरुपात देण्यासंदर्भात अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच प्रक्रिया अभिप्रेत आहे. माहिती अधिकार अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कोणत्याही कृतीची अथवा निर्णयाची कारणे आणि त्यांचे अभिप्राय व स्पष्टीकरणे अपेक्षित करणारी माहिती अर्जदाराने मागणे हे मूळात या अधिनियमामध्ये अभिप्रेत नसल्यामुळे अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ४ व ८ च्या संदर्भातील माहिती, अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. अपिलार्थीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील मुद्दा क्र. ३ व ५ शी संबंधित माहिती ही जिल्हयातील तहसील कार्यालयांशी संबंधित असल्यामुळे, बीड जिल्हयातील सर्व संबंधित तहसीलदार यांच्याकडे उपलब्ध होती. त्यामुळे या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील कलम ६(३)(एक) प्रमाणे कार्यवाही करणे अपेक्षित होते. या तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज त्यांच्याकडे प्राप्त झाल्यापासून पाच दिवसांच्या आत, या अर्जाची प्रत संबंधित सर्व तहसीलदार यांच्याकडे पाठवून त्या-त्या पत्राची प्रत त्यांनी अपिलार्थीस द्यावयास हवी होती. परंतु त्यांनी अशी कार्यवाही न करता त्यांच्या दि.२४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे, ज्यामध्ये त्यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील माहिती पुरविली आहे, त्या पत्राव्दारे संबंधित

तहसीलदार यांना कोणत्या मुद्यावर अपिलार्थीस माहिती द्यावयाची आहे, हे कळविले. जन माहिती अधिकारी यांची ही कृती सर्वथा चुकीची आहे. त्यांनी अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या प्रती या प्रकरणी संबंधित तहसीलदार यांना देणे अपेक्षित होते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन व जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २७.०५.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता, संबंधित तहसीलदार यांनी (बीड व पाटोदा वगळता) अपिलार्थीस माहिती दिल्याबाबत निर्णयामध्ये उल्लेख आहे.आज रोजी सुनावणीच्या वेळी उपस्थित जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, तहसीलदार,पाटोदा व बीड यांनी अनुक्रमे दि.१६.०५.२००८ व दि. ०५.०६.२००८ रोजी अपिलार्थीस माहिती पुरविली आहे.

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती त्यांना देण्यासाठी फारसे परिश्रम घ्यावे लागले असते, अशातील कोणतीही बाब या ठिकाणी संभवत असल्याचे आयोगास आढळून येत नाही. या प्रकरणी मूळात अपिलार्थीच्या मूळ अर्जाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी संबंधित तहसीलदार यांच्याकडे अधिनियमातील कलम ६ (३) (एक) च्या तरतुदीमधील अनुज्ञेय कालावधीपेक्षा पाच दिवस विलंबाने पाठविली. त्यांनी आपल्या अशा प्रकारच्या कृतीव्दारे त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे आयोगाचे मत आहे. सबब जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर या प्रकरणी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस देय असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी आणि तहसीलदार यांनी आता दिली असल्यामुळे अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात आयोगाचे कोणतेही आदेश नाहीत.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जिल्हाधिकारी, बीड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर या प्रकरणी प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १२-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. जीवन रामराव उबाळे,संत ज्ञानेश्वर नगर, शासकीय आय.टी.आय.च्या पाठीमागे,नगर रोड, बीड-४३१ १२२.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रमुख लिपीक,जिल्हाधिकारी कार्यालय, बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अपर जिल्हाधिकारी, बीड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जिल्हाधिकारी, बीड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११००
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

१. श्री. दत्ता भगवानराव पुदाले, : अपिलार्थी
रा. मुरुड, ता. जि. लातूर

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय,
लातूर

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, लातूर, जि. लातूर.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा),
तहसील कार्यालय,लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. २५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी सत्यप्रतीच्या स्वरुपात न दिल्यामुळे त्यांनी दि. १५.०५.२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले असता, अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले आहे. त्यामुळे त्यांनी विचाराधीन द्वितीय अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित जुलै २००७ ते दि. ३१.०३.२००८ या कालावधीतील मुरुड शहरातील स्वस्त धान्य दुकान व किरकोळ रॉकेल विक्रेते यांच्या पावतीबुकाच्या सत्यप्रतीची मागणी केली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २७.०४.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपोटी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात रु. ११,४४०/- इतके शुल्क जमा करण्याचे सूचित केले. त्याप्रमाणे अपिलार्थीने दि. ०२.०५.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात आवश्यक त्या शुल्काचा भरणा कोषागारात केलेल्या चलनाची प्रत सादर केली. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्याच दिवशी ही माहिती व्यक्तिशः देऊ केली. तथापि व्यक्तिशः माहिती स्वीकारण्याचे अपिलार्थीने नाकारले व तदनंतर अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १५.०५.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आपला निर्णय कळवून त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून तात्काळ हस्तगत करण्याचे त्यांना सूचित केले व अपिलार्थीचे अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने समाधान न झाल्याने, व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत.जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस माहिती देण्याचे टाळले नाही. उलट अपिलार्थीने दि. ०२.०५.२००८ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा करुन चलनाची प्रत त्यांना दिली असता, त्यांनी दि. ०२.०५.२००८ रोजी अपिलार्थीस त्यांनी मागितलेली माहिती तयार असून ती माहिती घेऊन जाण्याची अपिलार्थीस विनंती केली. परंतु या नंतर ते ही माहिती घेऊन जाण्याकरिता या विषयाच्या संदर्भात त्यांच्याकडे कधीही उपस्थित झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थी यांना जन माहिती अधिकारी यांनी, त्यांना मागितलेली माहिती सत्यप्रतीच्या स्वरुपात दिली नसल्याने आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, असे आढळून येते की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे सत्यप्रतीच्या स्वरुपात व नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागितली होती. माहितीकरिता आवश्यक असणारे शुल्क देखील या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे सूचना प्राप्त होताच त्वरित भरले आहे. माहिती अधिकार अधिनियमानुसार अपिलार्थीने जर जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्रमाणित प्रतींची माहिती मागितली असेल तर अशाप्रकारच्या प्रमाणित प्रती जन माहिती अधिकारी  यांनी अपिलार्थीस देणे भाग आहे. या मुद्यावरील तरतुद माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (ञ) (दोन) मध्ये स्पष्टपणे नमूद केली आहे. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती मागविली असल्याने जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस ही माहिती आता नोंदणीकृत टपालाद्वारे पुरवावी लागेल. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदारास जर नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती अपेक्षित असेल तर अर्जदारास जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीचा खर्च कळविताना आवश्यक त्या माहितीच्या एकूण पृष्ठांची संख्या व या माहितीच्या झेरॉक्स प्रतीसाठी दर प्रतिपृष्ठ रु.२/- प्रमाणे एकूण रक्कम अधिक अर्जदारास नोंदणीकृत टपालाने माहिती पाठविण्यासाठी लागणारा आवश्यक तो टपाल खर्च देखील कळवावयाचा असतो. परंतु या प्रकरणी अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी टपाल खर्चाच्या रकमेचा कोणताही समावेश न करता, अपिलार्थीस फक्त माहितीच्या झेरॉक्सपोटीचे शुल्क कळविले आहे, ही जन माहिती अधिकारी यांची चूक आहे. त्यामुळे आता अपिलार्थीस नोंदणीकृत टपालाद्वारे माहिती पाठविण्याचा खर्च जन माहिती अधिकारी यांना सोसावा लागेल.

सबब,जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना सत्यप्रतींच्या स्वरुपात, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना सत्यप्रतींच्या स्वरुपात, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद**
**दिनांक: १३-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. दत्ता भगवानराव पुदाले, मु. पो. मुरुड, शिवाजीनगर, पाण्याच्या टाकीजवळ,ता. जि. लातूर ४१३५१०.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलादार (पुरवठा),तहसील कार्यालय,लातूर, जि. लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०१
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

१. श्री. शशी विष्णुपंत काळे, : अपिलार्थी
रा. वांजरखेडा, ता. जि. लातूर.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी माहिती अधिकार प्रपत्र 'अ' व 'ब' सादर केल्यानंतर विलंबाने माहिती पुरविली त्यामुळे त्यांना खूप मानसिक त्रास सहन करावा लागला आहे. यासंदर्भात खुलासा व्हावा, अशाप्रकारची माहिती अपेक्षित असल्याचे नमूद केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांनी नायब तहसीलदार,लातूर यांच्या कार्यालयात दि. २२.०२.२००८ रोजी सादर केलेल्या अर्जाचा खुलासा या विषयावर खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"दिनांक २२ फेब्रुवारी २००८ रोजी आपल्या कार्यालयात नक्कल प्रत मिळणेबाबत अर्ज सादर केलेला आहे.(अर्जाची छायांकित पोच पावती आपल्या स्वच्छ संदर्भात जोडली आहे.)

अर्जाची मुदत संपून हि आपल्या कार्यालयाने मला नक्कल प्राप्त करुन दिली नाही त्यामुळे मला खुप मानसीक त्रास झालेला आहे. माझे पैशाने भरुन न निघणारे नुकसान झालेले आहे. याचा खुलासा व्हावा."

अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तीशः/घरपोच अपेक्षित केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली. तथापि सदर पत्र अपिलार्थीस वेळीच प्राप्त न झाल्याने त्यांनी अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. १२.०५.२००८ रोजी तहसीलदार, लातूर यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २६.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन आपले आदेश पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळून लावले व अपिलार्थीस दहा दिवस इतक्या उशिराने माहिती पुरविली असल्याचे अनुमान काढले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने त्यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही व्यक्तिशः हजर झाले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या दि. ०७.०४.२००८ रोजीच्या अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील कलम २(च)मध्ये स्पष्ट केलेल्या 'माहिती' या शब्दाच्या व्याख्येशी सुसंगत नाही. या अर्जाद्वारे त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना झालेल्या मानसिक त्रासाबद्दल व त्यांचे पैशाने भरुन न निघणारे नुकसान झाल्याबद्दल खुलासा मागितल्याचे दिसून येते. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अर्जदाराने मागणी केलेली माहिती जन

माहिती अधिकारी यांच्याकडे ज्या स्वरुपात आहे, त्याच स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमातील तरतुदीप्रमाणे कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया या अधिनियमामध्ये अभिप्रेत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून कारणे मागणे, त्यांच्याकडून खुलासे अथवा स्पष्टीकरणात्मक माहितीची मागणी करणे अशाप्रकारच्या माहितीचा अधिनियमातील 'माहिती' या शब्दाच्या व्याप्तीमध्ये समावेश होत नाही. त्यामुळे अपिलार्थीस मूळात ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय होत नाही. तसेच अपिलार्थीने त्यांच्या दि. २२.०२.२००८ रोजीच्या अर्जामध्ये विनंती केल्याप्रमाणे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती विनामूल्य पुरविली आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी केली असल्याने विहित मुदतीत माहिती प्राप्त करुन घेण्याचे व त्यापोटीचे शुल्क भरण्याचे उत्तरदायित्त्व हे पूर्णपणे अपिलार्थीचे होते. तथापि त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तीशः माहितीची मागणी करुनही ते जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात व्यक्तीशः कधीही हजर झाले नाहीत. मूळात त्यांनी अर्जामध्ये "व्यक्तीशः घरपोच व्हावे"अशाप्रकारे त्यांना माहिती आवश्यक असल्याचे नमूद केले आहे. जन माहिती अधिकारी यांनी अर्जदारास व्यक्तीशः त्यांच्या घरी जाऊन माहिती देणे हे माहिती अधिकार अधिनियमामध्ये अभिप्रेत नाही. अर्जदाराने व्यक्तीशः माहितीची मागणी केल्यास जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी अथवा कार्यालयीन दिवशी कार्यालयीन वेळेत स्वतः उपस्थित राहून आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून हस्तगत करुन घेण्याची जबाबदारी अर्जदाराची असते, तथापि वर नमूद केल्याप्रमाणे अपिलार्थीने चुकीच्या स्वरुपाची व चुकीच्या पध्दतीने माहिती मागितली असल्याने अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही.

वरील सर्व बाबींचा एकत्रितपणे विचार करता अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १३-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शशी विष्णुपंत काळे,रा. श्रीराम बंगला, लमान तांडयाच्या उत्तरेस, वांजरखेडा ता. जि. लातूर.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, लातूर, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०२
निर्णय दिनांक: १३.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. निवृत्ती सोपान माळी (भोजणे),<br>रा. काटी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>तालूका निरीक्षक भूमी अभिलेख, तुळजापूर, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद. | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>अधीक्षक, भूमी अभिलेख, उस्मानाबाद. | | |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अर्जामध्ये त्यांनी आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि.१६.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे, "त्यांचे जमिनीचे प्रकरण क्रमांक एकत्री/एस.आर.३४/०७ प्रकरणी अपिलार्थीने दि. २८.११.२००७ रोजी त्यांची स्वाक्षरी नसलेल्या अर्जाची प्रत दाखल केली होती, सदर मूळ अर्जाची नक्कल व याच प्रकरणी त्यांनी दि. १५.०२.२००८ रोजी त्यांच्या स्वाक्षरीसह दाखल केलेल्या अर्जाची नक्कल", ही माहिती व्यक्तिश: मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १४.०३.२००८ रोजी पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली कागदपत्रे त्यांच्या कार्यालयात उपलब्ध आहेत.

तेव्हा नकलेची होणारी फीस कार्यालयात भरुन त्या नकला प्राप्त करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचविले. तथापि अपिलार्थीस आवश्यक ती माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २५.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. २९.०४.२००८ रोजी आपले आदेश पारित केले व त्याद्वारे अपिलार्थीचे अपील अमान्य केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत.जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची नक्कल तयार आहे. तथापि जन माहिती अधिकारी यांच्याकडे ते म्हणतात त्याप्रमाणे तयार असलेल्या नकलेचे आयोगाने अवलोकन केले असता, ही कागदपत्रे, अपिलार्थीने मागणी केलेल्या नकलेशी जुळत नाहीत. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या अर्जामध्ये तारखेचा उल्लेख केला आहे, त्या तारखेचा उल्लेख जन माहिती अधिकारी यांच्याकडे तयार असलेल्या कथित नकलेवर नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी हे अपिलार्थीस विसंगत माहिती पुरवू इच्छितात, असे सिध्द होत आहे.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद आणि आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे व आयोगाच्या निदर्शनास आलेली वस्तुस्थिती पाहता, असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे अद्यापही उपलब्ध नाही. मूळात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, मूळात अस्तित्त्वात आहे किंवा कसे, हे अपिलार्थीच्या अनुपस्थितीमुळे आयोगास कळण्यास मार्ग नाही. अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्रामध्ये माहिती तयार आहे, असे कोणत्या कागदपत्रांच्या आधारे कळविले, ती कागदपत्रे उपस्थित जन माहिती अधिकारी हे

आयोगास दाखवू शकले नाहीत किंवा यासंदर्भात त्यांनी कोणताही खुलासा आयोगाकडे केला नाही. तसेच जन अपिलीय अधिकारी यांच्या दि. २९.०४.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन केले असता, त्यामध्ये केवळ जन माहिती अधिकारी हे त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती उपलब्ध असल्याचे सांगत आहेत म्हणून त्यावर विश्वास ठेवून जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीचे अपील अमान्य केले, ही त्यांची कृती चुकीची आहे.त्यांनी हा निर्णय देण्यापूर्वी अपिलार्थीने मागणी केलेली माहिती खरोखरीच जन माहिती अधिकारी यांच्याकडे उपलब्ध आहे किंवा कसे याची व्यक्तिशः शहानिशा करणे गरजेचे होते. तथापि त्यांनी तसे केल्याचे त्यांच्या निर्णयावरुन आढळून येत नाही. या सर्व घटनाक्रमाचे अवलोकन करता, जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दि. १४.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे दिलेला प्रतिसाद चुकीचा व दिशाभूल करणारा असल्याचे सिध्द होत आहे. अपिलार्थीने ज्या तारखेची कागदपत्रे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहेत, ती कागदपत्रे जर त्यांच्याकडे उपलब्ध नव्हती तर त्यांनी अपिलार्थीस तसे कळवावयास हवे होते. तथापि त्यांनी आज रोजी आयोगाकडे द्वितीय अपिलाची सुनावणी होईपर्यंत त्यांच्याकडे अपिलार्थीने मागणी केलेल्या कागदपत्रांच्या प्रती उपलब्ध असल्याचा खोटा युक्तिवाद आयोगासमोर व प्रथम अपिलीय अधिकारी यांच्यासमोर केला आहे. हे पाहता, संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिशाभूल करणारी माहिती दिली असल्याचे निःसंयशपणे सिध्द होत आहे. त्यामुळे त्यांनी स्वतःला अधिनियमातील कलम २० च्या तरतुदीप्रमाणे करावयाच्या कारवाईस पात्र ठरविले आहे. या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी दर्शविलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील नितांत सचोटी व कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची जमाबंदी आयुक्त तथा संचालक,भूमी अभिलेख,म.रा.,पुणे यांना शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीस माहिती देण्यासंदर्भात जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सत्य स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच सात दिवसांच्या आत सत्य स्वरुपात व विनामूल्य पुरवावी.

३. संचालक तथा जमाबंदी आयुक्त, भूमी अभिलेख,म.रा.,पुणे यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १३-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. निवृत्ती सोपान माळी (भोजणे), रा. काटी, ता. तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तालूका निरीक्षक भूमी अभिलेख, तुळजापूर, ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा अधिक्षक, भूमी अभिलेख, उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. संचालक तथा जमाबंदी आयुक्त, भूमी अभिलेख,महाराष्ट्र राज्य, कॉन्सील हॉलसमोर, नवीन प्रशासकीय इमारत,पुणे -१ यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०३
निर्णय दिनांकः  १३.०८.२००९

१. श्री. रामराव संभाजी शिंदे, : अपिलार्थी
रा. भाटेगांव, ता. हदगांव, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार, तहसील कार्यालय हदगांव,
जि. नांदेड.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
जिल्हाधिकारी, जिल्हाधिकारी कार्यालय, नांदेड.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय,हदगाव,जि.नांदेड
जन अपिलीय अधिकारी : तहसीलदार,हदगाव,जि.नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.२६.०५.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती अधिकार ब फॉर्मची माहिती दिली नसल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे. या अपील अर्जाद्वारे अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. ०२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौ. भाटेगाव येथील धान्य, रॉकेल नियतन व शिधापत्रिकाबाबत काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले होते. तथापि यासंबंधीचा वैध पुरावा त्यांनी त्यांच्या अर्जासोबत जोडला नव्हता. तसेच या अर्जामध्ये

अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीचा कालावधी अपिलार्थीने, "१५ दिवस" असा दर्शविला होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २०.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतचे वैध प्रमाणपत्र / पुरावा त्यांच्याकडे सादर करण्याचे सूचित केले. तथापि अपिलार्थीने अशाप्रकारचे कोणतेही वैध प्रमाणपत्र जन माहिती अधिकारी यांच्याकडे विहित मुदतीत सादर केले नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २६.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने सदर अपील अर्ज जिल्हाधिकारी,नांदेड यांच्याकडे केला होता. तो अर्ज जिल्हाधिकारी यांनी तहसीलदार,हदगाव यांच्याकडे दि. ११.०३.२००८ रोजीच्या पत्राव्दारे पाठविला. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांच्याकडे अपिलार्थीचे, ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे प्रमाणपत्र उशिराने प्राप्त झाले. तथापि हे प्रमाणपत्र म्हणजे प्रमाणपत्राची एक झेरॉक्स प्रत असून ती सत्यप्रत असल्याबाबत कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने ती प्रमाणित केलेली नाही. व तसेच अपिलार्थीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्याकडे प्राप्त न झाल्याने अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर अद्यापपावेतो सुनावणी होऊ शकली नाही.

जन माहिती अधिकारी यांच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता,या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या दि. ०२.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे. अशाप्रकारे दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असलेल्या अर्जदाराला शासनाच्या सामान्य प्रशासन विभागाच्या दि. ११.१०.२००५ रोजीची अधिसूचना क्रमांक आर.टी.आय.२००५/सी.आर.३१५/०५/५ अन्वये त्यांच्या मूळ माहितीच्या अर्जासोबत ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याबाबतच्या प्रमाणपत्राचा वैध पुरावा सादर करणे अनिवार्य आहे. अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी यांच्याकडे फक्त त्यांच्या प्रमाणपत्राची झेरॉक्स प्रत उशिरा सादर केली आहे. सदर झेरॉक्स प्रत देखिल कोणत्याही सक्षम प्राधिकरणाने प्रमाणित केली नसल्याने हा पुरावा वैध असल्याचे मानता येणार नाही. परिणामी अपिलार्थीचा दि. ०२.०१.२००८ रोजीचा मूळ अर्जच या प्रकरणी अवैध ठरत आहे.

अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्जच अशाप्रकारे अवैध ठरला असल्यामुळे अपिलार्थीच्या विचाराधीन अपिलावर निर्णय देण्याचे कोणतेही प्रयोजन आयोगास आढळून येत नाही. सबब अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १३-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. रामराव संभाजी शिंदे, मु. पो. भाटेगांव, ता. हदगांव, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार (पुरवठा), तहसील कार्यालय हदगांव,जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय हदगांव,जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१०९९
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

१. श्री. संदीपान ग्यानोबा सोमवंशी, औरंगाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा
मिळकत व्यवस्थापक,
महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास व प्राधिकरण,
औरंगाबाद. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा
मुख्य अधिकारी,
महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास व प्राधिकरण,
औरंगाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. १६.०५.२००७ रोजी नोंदविलेले, दि.२४.०६.२००८ रोजी फेर सादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन असून या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येत आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. २०.०२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण ४० मुद्यांद्वारे मोठी व्याप्ती असलेल्या माहितीची मागणी केली होती. अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही शासनाच्या आरक्षणात गाळे व प्राधिकरणाने निर्देशित केलेल्या आदेशासंदर्भातील होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. २३.०३.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१२८/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.

तथापि या शुल्काचा भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०४.२००७ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०५.२००७ रोजी सुनावणी घेतली व या संदर्भातील आपले आदेश दि. ०७.०५.२००७ रोजी पारित केले. या आदेशाद्वारे त्यांनी अपिलार्थीस १५ दिवसांचे आत माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. यानंतर अपिलार्थीने सुनावणीच्या दिवशीच रु.१२८/- इतक्या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला. तदनंतर दि. २१.०५.२००७ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती पुरविली, तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी यांचे प्रतिनिधी, जन माहिती व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीच्या प्रतिनिधीने आपल्या युक्तिवादामध्ये आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती पुरविल्याचे आयोगासमोर स्पष्ट केले.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे स्वरुप संमिश्र असल्याचे आणि त्यांना अपेक्षित असलेल्या माहितीची व्याप्ती मोठया प्रमाणात असल्याचे आयोगास आढळून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून, जन अपिलीय अधिकारी यांच्याकडून अपिलार्थीच्या प्रथम अपिलावर निर्णय दिल्यानंतर अपिलार्थीस जी माहिती पुरविली गेली आहे, ती माहिती परत एकदा जन माहिती अधिकारी यांनी तपासून अपिलार्थीस आवश्यक असलेली सर्व माहिती त्यांना उपलब्ध करुन देणे गरजेचे आहे, असे आयोगास वाटते. सबब मुख्याधिकारी, म्हाडा, औरंगाबाद यांना असे सूचित करण्यात येत आहे की, या प्रकरणी त्यांनी हे आदेश निर्गमित होताच, अपिलार्थीबरोबर तीस दिवसांच्या आत एक बैठक घेऊन, बैठकीमध्ये

त्यांच्या मूळ माहितीसाठीच्या अर्जातील मुद्देनिहाय माहिती संबंधीत उपलब्ध कागदपत्राच्या प्रती अपिलार्थीस देऊन सद्यस्थिती अवगत करावी, जेणेकरुन अपिलार्थीचे समाधान होऊ शकेल. वरील कार्यवाही जन अपिलीय अधिकारी यांनी शासनाने विहित केलेल्या नियमास अनुसरुन करावी.

या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने दि. ०४.०५.२००७ रोजी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १२८/- भरले असताना त्यांना १७ दिवस विलंबाने अपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांनी पुरविली आहे. जन माहिती अधिकारी यांची अपिलार्थीस विलंबाने सशुल्क माहिती देण्याची सदर कृती चुकीची असून आता त्यांना अपिलार्थीकडून स्वीकारलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची रक्कम अपिलार्थीस परत करावी लागेल, हे शुल्क अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत परत करावे, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.
२. मुख्याधिकारी, म्हाडा,औरंगाबाद यांनी वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे विहित मुदतीत आवश्यक ती कार्यवाही करावी.
३. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीकडून माहितीपोटीचे स्वीकारलेले शुल्क रु.१२८/- त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत परत करावे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांकः १३-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. संदीपान ग्यानोबा सोमवंशी, शुभश्री कॉलनी, घर नं. ९९५, सिडको एन -६, औरंगाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा मिळकत व्यवस्थापक, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास व प्राधिकरण, सी.बी.एस.रोड औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्याधिकारी, महाराष्ट्र गृहनिर्माण क्षेत्र विकास व प्राधिकरण, सी.बी.एस.रोड औरंगाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०४
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

१. श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, : अपिलार्थी
रा. लोण खुर्द, ता. अर्धापूर, जि. नांदेड

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
नायब तहसीलदार (महसूल), तहसील कार्यालय
मुदखेड, ता. मुदखेड, जि. नांदेड

२. जन अपिलीय अधिकारी तथा
तहसीलदार, तहसील कार्यालय मुदखेड, जि. नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.०६.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांच्या प्रथम अपील अर्जावर तहसीलदार यांनी दि. १७.०४.२००८ रोजी सुनावणी ठेवली असता, ते सुनावणीसाठी हजर नव्हते व यासंदर्भात त्यांना संबंधित तहसीलदार यांनी काहीच न कळविल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १९.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे मुदखेड तालुक्यातील गट क्र. ५ व ४० मौजे धनज या गावाच्या शेताच्या ७/१२ वर 'नारायण बनाजी लखे' या नावाची इतर अधिकार व वारसा म्हणून सन २००७ या वर्षामध्ये नोंद घेतली आहे. 'नारायण परबता लखे' हे नाव खरे असताना नारायण बनाजी लखे' हे खोटे नाव कशाच्या आधारे ७/१२ वर घेण्यात आले, त्या सर्व कागदपत्रांच्या प्रतीची माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. २६.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस यासंदर्भात खुलासा केला व या जमिनीच्या ७/१२ च्या आधारावर फेरक्रमांक ९३ व २७९च्या प्रमाणे नावात बदल झाला असल्याचे अपिलार्थीस कळविले व या जमिनीचे ७/१२ चा सुधारित उतारा अपिलार्थीस पाठविला व तलाठी सजा धनज, ता.मुदखेड,जि.नांदेड यांना फेर क्र. ९३ व २७९ च्या सत्यप्रती अपिलार्थीस टपालाद्वारे त्वरित पाठविण्याचे सूचित केले. तथापि या प्रतिसादाने समाधान न झाल्याने व प्राप्त माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २४.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १७.०४.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. तथापि यासंदर्भात कोणताही निर्णय प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाहीत.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती व अपिलार्थीच्या अर्जासंदर्भात दि. २६.०२.२००८ रोजी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी दिलेली माहिती आयोगास सुसंगत व योग्य वाटते. या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांनी संबंधित जमिनीशी संबंधित फेर क्र. ९३ व २७९ च्या प्रती अपिलार्थीस पाठवावयाचे तलाठी सजा,धनज यांना सूचित केले होते व त्याप्रमाणे संबंधित तलाठयाने अपिलार्थीस फेर क्रमांक २७९ व ९३ च्या प्रती पाठविल्याचे दिसून येते. अपिलार्थीस ही माहिती अपूर्ण व दिशाभूल करणारी असल्याचे वाटल्यावरुन त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. या

अपिलावर निर्णय झालेला नाही, त्यामुळे अपिलार्थीने आयोगाकडे द्वितीय अपील करण्याचे देखील हेच कारण असावे, असे अनुमान काढण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जामध्ये व्यक्त केलेल्या शंकांचे निरसन त्यांना, सक्षम महसूल अधिकारी यांच्याकडे रीतसर अपील दाखल करुन प्राप्त करुन घेता येईल. अपिलार्थीस त्यांना जन माहिती अधिकारी यांनी पुरविलेली माहिती अर्धवट व दिशाभूल करणारी कशी वाटते, हे स्पष्ट करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत, हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १३-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. पूरभाजी हनमंतराव शिंदे, रा. लोण खुर्द, ता. अर्धापूर, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा नायब तहसीलदार, (महसुल) तहसील कार्यालय मुदखेड, ता. मुदखेड, जि. नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय मुदखेड, जि. नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

# राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०५
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

१. श्री. शे. खलील शे. महेमुद, : अपिलार्थी
रा. गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय
गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड
२. जन अपिलीय अधिकारी तथा
गटविकास अधिकारी , पंचायत समिती किनवट,
जि. नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०२.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक ती माहिती न पुरविल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१९.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये ग्राम विकास अधिकारी, ग्रामपंचायत गोकुंदा,ता.किनवट यांच्याकडे गोकुंदा परिसरातील शेत स.नं.४१ मध्ये प्लॉटींग करिता खरेदी केलेल्या फेरफार बॉंड व रजिस्टरवर एकूण किती प्लॉटधारक आहेत, याचे मूळ दस्तऐवज, मूळ मालकाकडून विक्री झालेल्या दस्तऐवज,लेआऊट,नकाशा,मालकी, नमुना नं.८ च्या सत्यप्रती, याची माहिती व्यक्तिशः मागितली होती. अपिलार्थीने या अर्जामध्ये ते दारिद्रयरेषेखालील व्यक्ती असल्याचे नमूद केले आहे.

जन माहिती अधिकारी यांच्याकडून अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.०५.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि या नंतरही अपिलार्थीस संपूर्ण माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी अपिलार्थी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांच्या युक्तिवादामध्ये मूळ माहितीची मागणी कायम ठेवून व आयोगास असे अवगत केले की, ते जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी वारंवार गेले तथापि त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून आवश्यक ती माहिती प्राप्त होऊ शकली नाही.

अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन करण्याकरिता जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी कुणीही अथवा त्यांचे कोणी प्रतिनिधी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती ही, अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत आहे. अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत माहिती न देण्याची कारणे आयोगास आता, आवश्यक त्या कागदपत्रांअभावी आणि संबंधितांच्या अनुपस्थितीमुळे, आयोगास कळण्यास मार्ग नाही. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी. तसेच या प्रकरणी अपिलार्थीच्या दि. १९.०३.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी

अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः पुरवावी.

३. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नांदेड यांना संबंधित जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १३-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. शे. खलील शे. महेमुद,रा. गोकुंदा(विद्यानगर बी. अँड सी परीसर), ता. किनवट जि. नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा ग्रामविकास अधिकारी, ग्रामपंचायत कार्यालय गोकुंदा, ता. किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा गटविकास अधिकारी , पंचायत समिती किनवट, जि. नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०६
निर्णय दिनांक: १३.०८.२००९

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, : अपिलार्थी
तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, : प्रतिवादी
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,
उस्मानाबाद.

२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपनियंत्रक,
वैध मापनशास्त्र, औरंगाबाद

प्रत्यक्षत: जन माहिती अधिकारी : प्रबंधक,
जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच,
जिल्हा कार्यालय,उस्मानाबाद

जन अपिलीय अधिकारी : प्रबंधक,
राज्य ग्राहक वाद निवारण आयोग,
औरंगाबाद

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २५.०२.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून जन माहिती व अपिलीय अधिकारी यांनी कायद्याचे उल्लंघन केल्याने कलम २० नुसार त्यांच्यावर शास्ती लावण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमत: त्यांच्या दि. ०५.१०.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी

यांच्याकडे केलेल्या अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"दि. २१/०७/०७ च्या पत्रानुसार पुढील माहिती मिळावी-

दि.२१/०७/०७ रोजीच्या पत्रावर संबंधित अधिकाऱ्यांनी या संदर्भात दिलेला आहे.इ.पत्राच्या संदर्भानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी कार्यवाही करण्यास संबंधित अधिकाऱ्यास दिलेला आदेश व सूचना.ई. पत्राच्या संदर्भानुसार संबंधित अधिकाऱ्यांने दिलेला आदेश व दिलेल्या आदेशानुसार संबंधित अधिकाऱ्यांनी केलेल्या कार्यवाहीचा अहवाल उ. अ,आ,इ,ई.या मुद्यांच्या सत्यप्रती मिळणे." सदर माहिती अपिलार्थीने व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. ०६.१०.२००७ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला व अपिलार्थीचा दि. २१.०७.२००७ रोजीचा मूळ अर्ज त्यांना अप्राप्त असल्याने त्यांनी मागणी केलेली माहिती देता येत नसल्याचे अपिलार्थीस कळविले. यानंतर परत अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी दि. ०३.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस माहिती देण्याचा प्रयत्न केला व या प्रकरणी, उपनियंत्रक,वैधमापन शास्त्र,औरंगाबाद हे प्रथम अपिलीय अधिकारी असल्याचे अपिलार्थीस कळविले. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी तथा उपनियंत्रक,वैधमापन शास्त्र,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांच्याकडे दि. १६.११.२००७ रोजी प्रथम अपील केले. तथापि उपनियंत्रक,वैधमापन शास्त्र,औरंगाबाद विभाग,औरंगाबाद यांनी त्यांच्याकडील दि. २६.११.२००७ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीचा सदर अपील अर्ज, प्रबंधक,राज्य ग्राहक वाद निवारण आयोग,परिक्रमा खंडपीठ,औरंगाबाद यांच्याकडे पाठवून या पत्राची प्रत अपिलार्थीस देऊन अपिलार्थीस प्रबंधक,राज्य ग्राहक वाद निवाय आयोग,परिक्रमा खंडपीठ औरंगाबाद यांच्या कार्यालयाशी संपर्क साधण्याचे सूचविले.या सर्व प्रकारामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व अपिलीय अधिकारी यांना या प्रकरणाच्या संदर्भात कोणतीही माहिती नसल्याचे आयोगास आढळून आले आहे. सबब जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक, राज्य ग्राहक वाद निवारण आयोग परिक्रमा खंडपीठ,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि. १६.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, त्यांनी तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयाने अपिलार्थीचे समाधान न झाल्यास, ते अधिनियमातील कलम १९(३) नुसार, सदर आदेश त्यांना प्राप्त झाल्यापासून नव्वद दिवसांच्या आत, राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील करु शकतील.

प्रसंगावशात, असे आढळून येत आहे की, आज रोजी सुनावणीस ग्राहक तक्रार निवारण मंचाच्या उपस्थित अधिकाऱ्यांस या प्रकरणासंदर्भात आयोगाने विचारलेल्या प्रश्नांना नीटपणे उत्तरे देता आली नाहीत तसेच त्यांना त्यांचे स्वतःचे पदनाम देखील निश्चित माहिती नाही.अशाप्रकारच्या अकार्यक्षम अधिकाऱ्यांस सुनावणीसाठी त्यांनी पाठवू नये, असे राज्य ग्राहक वाद निवारण आयोग परिक्रमा खंडपीठ,औरंगाबाद यांना सूचित करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक, राज्य ग्राहक वाद निवारण आयोग परिक्रमा खंडपीठ,औरंगाबाद यांनी अपिलार्थीच्या दि.१६.११.२००७ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, हे आदेश निर्गमित होताच, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद**
**दिनांकः १३-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. संजय महादेवराव सोनवणे, राजे संभाजीनगर (प.), तुळजापूर, जि. उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा ग्राहक तक्रार निवारण मंच, जिल्हाधिकारी कार्यालयामागे उस्मानाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा प्रबंधक, राज्य ग्राहक वाद निवारण आयोग परिक्रमा खंडपीठ,पदमपूरा, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०७
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. वाघमारे पोचीराम विठ्ठलराव,<br>रा. फुलवळ, ता. कंधार, जि. नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, नांदेड. | | |

त्रयस्थ पक्ष : श्री. शहापूरे आर.एन.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि.१८.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. आर.एन.शहापूरे यांच्या संदर्भात खालीलप्रमाणे माहिती मागितली होती.

"अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळ, कंधार यांचे मुख्याध्यापक श्री. शहापूरे आर.एन.यांनी शिक्षण विभागाला जन्मनोंदणी प्रमाणपत्राबद्दल खोटी माहिती दिली म्हणून प्रचलीत नियमाप्रमाणे कार्यवाही करण्यास संस्थेस आदेशीत केले होते. प्रमाणपत्र अद्याप मिळाले नाहीत व मुख्याध्यापक सेवेत कार्यरत आहेत याचे कारण काय? चौकशी करुन प्रमाणपत्र मिळवून दोषींवर कार्यवाही करणे."

अपिलार्थीने ही माहिती, त्यांनी अर्ज केल्यापासून 'अकराव्या दिवशी ऑफीसमध्ये आमनेसामने' अशास्वरुपात मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १६.०१.२००८ रोजीच्या एका पत्राद्वारे या प्रमाणपत्राचा पाठपुरावा केला. तथापि या पत्रास देखील जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांनी शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दि. २०.०२.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. २४.०३.२००८ रोजी सुनावणी ठेवली होती. या सुनावणीमध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी कोणता निर्णय दिला हे आयोगास आवश्यक त्या कागदपत्रांच्या अभावी कळण्यास मार्ग नाही. अशाप्रकारे जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्याकडून मिळालेल्या नकारात्मक प्रतिसादाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती व अपिलीय अधिकारी यांच्यापैकी आयोगासमोर कोणीही उपस्थित नाही. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत त्यांचा एक वेगळा अर्ज जोडला असून त्या अर्जामध्ये त्यांनी या प्रकरणाची पार्श्वभूमी विशद केली आहे. त्यावरुन असे दिसून येते की, अण्णाभाऊ साठे शिक्षण प्रसारक मंडळ,कंधार या शाळेचे मुख्याध्यापक श्री. आर.एन.शहापूरे यांनी शिक्षण विभागाला त्यांच्या जन्मतारखेचे खोटे प्रमाणपत्र सादर केल्यामुळे त्यांना निलंबित करण्यात आले होते. तथापि काही कालावधीनंतर संबंधित मुख्याध्यापक हे संस्थेमध्ये कार्यरत असल्याचे अपिलार्थीस दिसून आल्यामुळे त्यांनी लोकशाहीदिनामध्ये या प्रकरणाशी संबंधित माहिती शिक्षणाधिकारी कार्यालयाकडे त्यांच्या दि.

०२.०७.२००७ व दि. ०६.०८.२००७ रोजीच्या दोन वेगवेगळया अर्जाद्वारे मागितली असतानादेखील शिक्षणाधिकारी कार्यालयाने त्यांना कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींचा आधार घेऊन ही माहिती मिळविण्याचा प्रयत्न केला आहे. तथापि शिक्षणाधिकारी (प्राथ.) जि.प.नांदेड यांनी माहिती अधिकार अधिनियमाला देखील न जुमानता परत अपिलार्थीच्या विनंतीस कोणताही प्रतिसाद न देऊन त्यांच्या बेफिकीर कार्यशैलीवर अशाप्रकारच्या कृतीद्वारे शिक्कामोर्तब केले असल्याचे आयोगास आढळून येत आहे.

माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींच्या मर्यादेत या अर्जाकडे पहावयाचे झाल्यास अपिलार्थीने त्यांच्याकडील दि. १८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नाही. या मुद्याद्वारे अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांना श्री. शहापुरे हे निलंबित असूनही मुख्याध्यापक पदावर सेवेत कार्यरत असल्याचे कारण काय? , अशी माहिती विचारली आहे. माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार अशाप्रकारची कारणे माहिती अधिकाऱ्यास विचारण्याचा अधिकार अर्जदारास नाही. या अधिनियमामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अर्जदाराने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे ज्या स्वरुपात उपलब्ध आहे, त्या स्वरुपात ती अर्जदारास देण्यासंदर्भात, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार कार्यवाही करणे एवढीच सीमित प्रक्रिया यामध्ये अभिप्रेत आहे. वास्तविक पाहता अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ही, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी सुसंगत नसल्याने ती माहिती अपिलार्थीस मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय नव्हती. तथापि अपिलार्थीच्या दि. १८.१२.२००७ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस किमान नकारात्मक प्रतिसाद तरी देणे या प्रकरणी त्यांना भाग होते. तथापि त्यांनी अशाप्रकारची कृती या प्रकरणी केली नाही. शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, नांदेड यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जास कोणताही प्रतिसाद न देऊन आपल्या कार्यशैलीतील कर्तव्य परायणतेचा अभाव स्पष्ट केला आहे, असे या प्रकरणी निःसंशयपणे सिध्द होत आहे. सबब, मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना संबंधित शिक्षणाधिकारी (प्राथ.) जिल्हा परिषद, नांदेड

यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकाऱ्यावर प्रचलित सेवानियमानुसार यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींशी मूळात सुसंगत नसल्याने ती अपिलार्थीस देय होत नाही. सबब अपिलार्थीचे आयोगाकडील विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १३-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. वाघमारे पोचीराम विठ्ठलराव,रा. फुलवळ हा मु. द्वारा बसवंते बी. एम. वाहतूकनगर कंधार, ता. कंधार, जि. नांदेड.

२. जन माहिती अधिकारी, शिक्षणाधिकारी ,(प्राथमिक) जिल्हा परिषद नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी, (प्राथमिक) जिल्हा परिषद नांदेड, ता. जि. नांदेड, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. निर्णय नस्ती

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०८
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

१. सौ. मंदाकिनी रमेश चव्हाण, : अपिलार्थी
तुळजापूर, जि. उस्मानाबाद .

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा : प्रतिवादी
तहसीलदार,
तुळजापूर जि. उस्मानाबाद.
२. जन अपिलीय अधिकारी तथा
उपविभागीय अधिकारी, उस्मानाबाद.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. ०७.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीप्रमाणे अर्ज करुनही त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती उपलब्ध करुन दिली नाही. त्यानंतर जन अपिलीय अधिकारी यांच्या सुनावणी नंतर त्यांच्या आदेशाचे अनुपालन केले नाही. जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक ताठर भूमिका अंगिकारल्याने त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील केले आहे व आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.०६.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे -"श्रीमती लक्ष्मीबाई बाळासाहेब कदम शुक्रवार पेठ, तुळजापूर यांचा मोजणी नियम ८५/२ अन्वये मोजणी अर्ज स.नं.८/१ कसबे तुळजापूर पारित आदेश - संदर्भ अभिलेख संपूर्ण 'संचिका' दि. ११.०८.२००३" - ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि. ०५.०३.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेल्या संचिकेचा शोध घेऊनही संचिका आढळून आली नाही, असे उत्तर दिले व संचिका प्राप्त होताच माहिती देण्याचे आश्वासित केले. तथापि या उत्तराने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १३.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०४.०४.२००८ रोजी आपले आदेश पारित केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची संचिका शोधून काढून अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले. तथापि यानंतरही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी या गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयानंतर देखील त्यांनी त्यांच्या कार्यालयामध्ये आवक-जावक रजिस्टरची तपासणी केली असता, त्यांच्या कार्यालयाकडून दि. ११.०८.२००३ रोजी कोणतेही आदेश पारित केले गेले नसल्याचे त्यांना आढळले आहे व तसेच या महिन्यापासून पाठीमागील महिन्याच्या आवक नोंदवहीची देखील त्यांनी छाननी केली असता, यामध्ये श्रीमती लक्ष्मीबाई बाबासाहेब कदम यांनी मोजणीचा अर्ज केल्याची कोणतीही नोंद नाही. त्यामुळे अपिलार्थीस अपेक्षित माहिती त्यांना पुरविता आली नाही. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या विधानाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या दि. ०६.०२.२००८ रोजीच्या अर्जाद्वारे मागणी केलेली

माहिती ही संदिग्ध स्वरुपाची असून, त्यांनी मागणी केलेल्या माहितीवरुन असे अनुमान काढणे शक्य आहे की, अपिलार्थीस श्रीमती लक्ष्मीबाई बाळासाहेब कदम यांना तहसीलदार तुळजापूर यांच्याकडे मोजणी नियम ८५/२ अन्वये नोंदणी केलेल्या अर्जावर तहसीलदार तुळजापूर यांनी दि. ११.०८.२००३ या पारित केलेल्या आदेशासंदर्भातील संचिकेच्या प्रतींची अपेक्षा आहे. अर्थात हे केवळ अनुमान काढण्यात येत आहे. अपिलार्थीस निश्चित कोणती माहिती हवी आहे, हे स्पष्ट करण्यासाठी व तसेच त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामधील त्यांचे म्हणणे की, जन माहिती अधिकारी यांनी जाणीवपूर्वक माहिती देण्याचे टाळले, ताठर भूमिका घेतली आहे, हे सिध्द करण्यासाठी त्या आयोगासमोर उपस्थित नाहीत. या प्रकरणी मूळात अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेली माहिती अस्तित्त्वात आहे किंवा कसे याबाबत आयोग साशंक आहे. कारण त्यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अस्तित्वासंदर्भात कोणताही पुरावा त्यांनी जन माहिती अधिकारी यांना दिलेला नाही. अशाप्रकारे अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीचे संदिग्ध स्वरुप आणि अपिलार्थीची आज रोजीची सुनावणीच्या वेळेची अनुपस्थिती पाहता, अपिलार्थीस माहिती मिळविण्यामध्ये कोणतेही स्वारस्य नसावे, असे अनुमान काढून अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: १३-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. सौ. मंदाकिनी रमेश चव्हाण, 'जीवन मित्र निवास', माऊली नगर, तुळजापूर ता. तुळजापूर जि. उस्मानाबाद .

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, तहसील कार्यालय, तुळजापूर, जि. उस्मानाबाद, यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, उपविभागीय कार्यालय उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७४६
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, उस्मानाबाद. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी, तहसील कार्यालय, वाशी जि. उस्मानाबाद. : प्रतिवादी

२. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम, जि. उस्मानाबाद.

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : तहसीलदार, वाशी, जि.उस्मानाबाद

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयामध्ये दि. २०.०६.२००६ रोजी नोंदविलेले, दि.१७.१२.२००७ रोजी फेरसादर केलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहिती दिली नसल्याने व त्यांनी प्रथम अपिलीय अधिकारी यांच्या आदेशाप्रमाणे कार्यवाही न केल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०१.२००६ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे जानेवारी ०४ ते डिसेंबर ०५ या कालावधीतील वाशी तालुक्यातील गावनिहाय व विक्रेतानिहाय त्यांना झालेल्या केरोसिन पुरवठयाबद्दल व केरोसिन वितरणाच्या परवान्याची आणि इतर अन्य कारणाने कारवाई करण्यात आलेल्या केरोसीन विक्रेत्यांच्या

संदर्भातील संचिकांची व किरकोळ विक्रीबद्दल त्यांच्याकडील स्टॉक रजिस्टरच्या व विक्रीच्या पावत्या प्रती आणि इतर असंख्य मुद्यांवर काही माहिती तपासणीसाठी व त्यातून त्यांना आवश्यक असलेली माहिती झेरॉक्स करुन घेण्यासाठी उपलब्ध करुन देण्याची विनंती केली होती. या अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांना सर्व माहितीची कागदपत्रे व्यक्तीशः पाहून आवश्यक त्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांना घ्यावयाच्या आहेत.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २८.०२.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ३१.०३.२००६ रोजी आपला निर्णय देऊन अपिलार्थीस त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांनी तहसील कार्यालयात आवश्यक ते शुल्क भरुन हस्तगत करुन घेण्याचे अपिलार्थीस सूचित केले व तहसीलदार, वाशी यांना अपिलार्थीस आवश्यक त्या माहितीपोटीचे शुल्क विहित मुदतीत कळविण्याच्या सूचना दिल्या. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांच्याकडे आज रोजी तयार असून अपिलार्थीस ती देण्यासाठी ते तयार आहेत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि.१८.०१.२००६ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित

केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. तसेच अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावरील निर्णयावरुन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले नसल्याचे देखील कबूल केले आहे. परंतु एवढे असूनही जन अपिलीय अधिकारी यांनी तहसीलदार, वाशी यांना अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे सूचित केले. उपविभागीय अधिकारी,भूम यांच्या आदेशानुसार तहसीलदार वाशी यांनी त्यानंतर दि. २०.०४.२००६ रोजीच्या पत्राव्दारे अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.४०००/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले. जन माहिती व अपिलीय अधिकारी यांची ही कृती चुकीची आहे. अधिनियमातील कलम ७(१) मधील तरतुदीनुसार अर्जदाराने माहितीसाठी केलेल्या अर्जास या कलमामध्ये विहित केलेल्या मुदतीमध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे प्रतिसाद न दिल्यास अधिनियमातील कलम ७(६) प्रमाणे अर्जदारास जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचा हक्क आपोआप प्राप्त होत असतो, उपरोक्त प्रकरणी जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस कोणताही प्रतिसाद न दिल्याने त्यांना अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना आता तपासणीसाठी व त्यामधील अपिलार्थीस आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती विनामूल्य उपलब्ध करुन देणे भाग आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांपर्यंत तपासणीसाठी उपलब्ध करुन द्यावी व या मुदतीमध्ये त्यांना आवश्यक असलेल्या सर्व कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांनी अपिलार्थीस याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवाव्यात. हा कालावधी व्यपगत झाल्यानंतर अपिलार्थीस ही माहिती कोणत्याही प्रकारे विनामूल्य उपलब्ध असणार नाही, याची त्यांनी नोंद घ्यावी. अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे त्यांना टपालाने माहिती पाठविणे आवश्यक नसल्याचे नमूद केले असल्याने अपिलार्थीस असे सूचित करण्यात येते की, या प्रकरणी त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे तपासणीसाठी

उपलब्ध असणारी माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी व्यक्तिशः जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात पूर्वनियोजित वेळी कार्यालयीन दिवशी उपस्थित राहणे त्यांना अनिवार्य राहील.

वरील विवेचनाच्या पार्श्र्वभूमीवर अपिलार्थीचे अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित झाल्यापासून तीस दिवसांच्या कालावधीपर्यंत तपासणीसाठी वर निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे उपलब्ध करुन द्यावी व त्यातील त्यांना आवश्यक असलेल्या कागदपत्रांच्या झेरॉक्स प्रती त्यांना याच कालावधीमध्ये विनामूल्य पुरवाव्यात.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १३-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. राजेंद्र गुरुराज बहिरे, २७/५२५, माणिक चौक, माणिकनगर, उस्मानाबाद.

२. जन माहिती अधिकारी तथा तहसीलदार, वाशी जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा उपविभागीय अधिकारी, भूम, जि. उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/२७४७
निर्णय दिनांकः १३.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. गुलाब हणमंतराव पांचाळ,<br>लातूर . | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा<br>शिक्षणाधिकारी (प्राथमिक),<br>जिल्हा परिषद, लातूर | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा<br>मुख्य कार्यकारी अधिकारी,<br>जिल्हा परिषद, लातूर | | |

त्रयस्थ पक्षः ऋषिकेश गोविंद रेड्डी

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाच्या मुंबई येथील कार्यालयात दि. २१.०९.२००६ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने, त्यांनी मागणी केलेली माहिती ही त्रयस्थ पक्षाची वैयक्तिक माहिती असल्याने जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांचे अपील फेटाळून लावले. तथापि ही माहिती कार्यालयीन माहिती असल्यामुळे त्यांनी मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली माहिती त्यांना पुरविण्यात यावी, असे आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १३.१२.२००५ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष श्री. ऋषिकेश गोविंद रेड्डी हे प्राथमिक शिक्षक, मुख्याध्यापक म्हणून मौ. माळकोंडजी, तालुका औसा, येथे जिल्हा परिषदेच्या शाळेतून दि.३०.०६.१९९९ रोजी निवृत्त झाले, त्यांच्या सेवाकालावधीमध्ये त्यांना जिल्हा परिषदेने दोन वेळा निलंबित केले होते. या

निलंबनाची कारणे व त्यांच्यावर करण्यात आलेल्या कारवाईच्या तपशीलाची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १७.१२.२००५ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीने मागणी केलेली माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देता येणार नाही, या कारणास्तव अपिलार्थीस माहिती देण्याचे नाकारले. या पत्राने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०७.०८.२००६ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊन अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील विलंबाने सादर केल्याचे कारण दर्शवून, व अधिनियमातील कलम १६ (च) (ट) या चुकीच्या कलमाचा निर्देश करुन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे वरील परिच्छेदामध्ये नमूद केल्याप्रमाणे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १३.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी अनुपस्थित आहेत. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने ज्या त्रयस्थ पक्षासंदर्भात त्यांच्याकडे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार माहिती मागितली होती ती त्रयस्थ व्यक्ती म्हणजे श्री. आर.जी.रेड्डी यांना त्यांच्या सेवाकालावधीमध्ये एकदा निलंबित केल्याची कागदपत्रे त्यांच्याकडे उपलब्ध आहेत. या प्रकरणी त्रयस्थ पक्ष श्री. रेड्डी यांनी जिल्हा परिषदेने एका प्रकरणी निलंबित केले होते व विभागीय चौकशीचे आदेश निर्गमित होण्यापूर्वी त्यांना "कारणा दाखवा" नोटीस पाठविण्यात आली होती. तथापि हे आदेश प्राप्त झाल्यानंतर अतिरिक्त आयुक्त (महसूल),औरंगाबाद यांनी त्यांच्या आदेशान्वये या कारवाईस स्थगिती दिली व तदनंतर विभागीय चौकशीचे प्रकरण निकाली काढले.

जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये त्रयस्थ पक्षाच्या निलंबनाची कारणे जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपेक्षिले आहेत. तथापि अशाप्रकारची कारणे माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदींनुसार जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस देणे मूळात अभिप्रेत नाही, त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस निलंबनाची कारणे देणे या प्रकरणी आवश्यक नाही. मात्र या अर्जातील त्रयस्थ पक्षावर झालेल्या कारवाईची माहिती त्यांना अपिलार्थीस पुरवावी लागेल. तथापि या प्रकरणी अपिलार्थीने 'कारवाईच्या तपशीलाची' अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. त्या कारवाईचा तपशील म्हणजे नेमकी कोणत्या मुद्यावर अपिलार्थीस माहिती हवी आहे, याचा येथे बोध होत नाही. तथापि अपिलार्थीस त्रयस्थ पक्षासंदर्भात माहिती देण्याच्या दृष्टीने जन माहिती अधिकारी यांना असे सूचित करण्यात येत आहे की, त्यांनी उपरोक्त प्रकरणी त्रयस्थ पक्षाच्या निलंबनाचे आदेश व तदनंतर त्यांना सेवेत परत रुजू करुन घेतल्याचे व त्रयस्थ पक्षाने त्यांच्या सेवाविषयक प्रकरणासंदर्भात केलेल्या अपील अर्जावर अपर विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांनी दिलेल्या आदेशाची प्रत अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होता तीस दिवसांच्या आत व्यक्तिशः व विनामूल्य पुरवावी, जेणेकरुन अपिलार्थीस देय माहिती प्राप्त होऊ शकेल. हा कालावधी व्यपगत झाल्यानंतर ही माहिती अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून देय असणार नाही.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागणी केलेली,वरील निर्णयामध्ये स्पष्ट केल्याप्रमाणे, त्रयस्थ पक्षाच्या निलंबनाचे आदेश व या संदर्भात अपर विभागीय आयुक्त,औरंगाबाद यांनी दिलेल्या निर्णयाची प्रत त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गतमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य व व्यक्तिशः उपलब्ध करुन द्यावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांकः १३-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**

**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. गुलाब हणमंतराव पांचाळ, जिल्हा कोषागार कार्यालय, लातूर .

२. जन माहिती अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, लातूर यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक क्र.११११/०८ व १११२/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११११ व १११२
निर्णय दिनांक: १४.०८.२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, नांदेड. :अपिलार्थी

**विरुध्द**

१. <u>अपील क्र.११११/०८</u>

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,इस्लापूर,ता.हिमायतनगर, जि. नांदेड. | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.), नांदेड | :प्रतिवादी |

२. <u>अपील क्र.१११२/०८</u>

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड, जि. नांदेड. | जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू), नांदेड |

**<u>निर्णय</u>**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०६.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत. अपिलार्थीने एकच माहिती दोन वेगवेगळया अर्जाद्वारे संबंधित दोन जन माहिती अधिकारी यांना एकाच दिवशी विचारली असल्याने आणि यासंदर्भात त्यांनी आयोगाकडे एकाच दिवशी दोन स्वतंत्र द्वितीय अपिले केली असल्याने अपिलार्थीच्या या दोनही अपील अर्जांची सुनावणी एकत्रित घेण्यात येत आहे.

या दोन अपील अर्जांपैकी अपील क्र.११११/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.०१.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता, माहिती अधिकारी यांनी मुदतीच्या आत व मुदत संपल्यानंतरही माहिती

देण्यास जाणूनबुजून विलंब व टाळाटाळ केल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०५.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, त्यांनी दि.१५.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊन अर्जदारास विनामूल्य माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती दिली नाही. अपील क्र.१११२/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने असे नमूद केले आहे की,त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.०१.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता, माहिती अधिकारी यांनी गैर कायदेशीर व नियमबाह्य शुल्क आकारुन अर्जदाराची दिशाभुल केल्यामुळे त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. १४.०३.२००८ रोजी प्रथम अपील दाखल केले असता, त्यांनी दि.१५.०४.२००८ रोजी सुनावणी घेऊन अर्जदारास सशुल्क माहिती देण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी यांनी त्यांना माहिती पुरविली नाही. यामुळे अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे उपरोक्त दोनही प्रकरणांच्यासंदर्भात आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून विचाराधीन दोनही द्वितीय अपिले सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर व वन परिक्षेत्र अधिकारी,मुखेड यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील आर्थिक वर्ष २००४ ते डिसेंबर,२००७ या कालावधीतील कामाच्यासंदर्भात मोठया प्रमाणातील व्याप्ती असलेली माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - त्यांच्या कार्यालयातर्फे रो.ह.यो.अंतर्गत केल्या गेलेल्या कामांची यादी, कामाच्या अंदाजपत्रकाच्या, मोजमापपुस्तिकेच्या सत्यप्रती आणि झालेल्या कामावर उपस्थित असलेल्या मजूरांचे हजेरी मस्टर तसेच पेशिटच्या सत्यप्रती तसेच जन माहिती अधिकारी यांच्याकडून रो.ह.यो.व्यतिरिक्त राबविण्यात आलेल्या इतर योजनांच्या संदर्भात शासनाकडून प्राप्त झालेला निधी व सदर निधी कोणत्या कामावर खर्च करण्यात आला, त्याचा तपशील, काम केलेल्या संस्था व एजन्सीची नावे व त्यांना अदा करण्यात आलेल्या देयकांच्या सत्यप्रती तसेच नमुना नं.४ च्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपील क्र.१११९/०८ च्या संदर्भात अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, तर अपील क्र.१११२/०८ च्या संदर्भात अपिलार्थीचा माहितीसाठीचा दि.१८.०१.२००८ रोजीचा मूळ अर्ज जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड यांच्याकडे प्रत्यक्षात दि. २१.०१.२००८ रोजी प्राप्त झाला. अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,मुखेड यांनी त्यांच्याकडील दि.२९.०१.२००८ रोजीच्या पत्रान्वये अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.३५१५०/- इतक्या शुल्काचा भरणा त्यांच्या कार्यालयात करण्याचे सूचित केले.या पत्रामध्ये त्यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा कोणताही तपशील दिलेला नाही. जन माहिती अधिकारी यांच्या अशाप्रकारच्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार अपील क्र.११११/०८ च्या संदर्भात दि. ०५.०३.२००८ रोजी व अपील क्र. १११२/०८ च्या संदर्भात दि. १३.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले. जन अपिलीय अधिकारी यांनी अपील क्र. ११११/०८ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०५.२००८ रोजीच्या निर्णयाद्वारे अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले व अपील क्र.१११२/०८ च्या संदर्भात दि.१९.०४.२००८ रोजी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांनी आपले आदेश पारित करुन त्या आदेशाद्वारे अपिलार्थीस आकारण्यात आलेल्या शुल्काचा तपशील कळविण्याचे व सदर तपशील कळविल्यानंतर अपिलार्थीस तीन दिवसांच्या आत शुल्क भरण्याचे सूचित केले आणि अपिलार्थीने शुल्काचा भरणा केल्यानंतर लागलीच अपिलार्थीस सशुल्क माहिती देण्याचे संबंधित जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि हे आदेश देऊनही अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे दोन स्वतंत्र द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या दोन प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १४.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी दोनही प्रकरणातील जन माहिती अधिकारी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, इस्लापूर यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दि. २८.०७.२००८ रोजी अपिलार्थीस पूर्ण माहिती दिली असून अपिलार्थीस ही माहिती पुरविल्यापृष्ठयर्थ अपिलार्थीच्या कबूली जबाबाची सत्यप्रत त्यांनी आयोगास सादर केली. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड यांनी असा युक्तिवाद केला की,सदर प्रकरण हे त्यांच्या पूर्वीच्या काळातील असून जन अपिलीय अधिकारी यांनी सूचित केल्याप्रमाणे तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या रकमेपोटीचा तपशील त्यांना कळविला आहे किंवा कसे हे त्यांना आता सांगता येणार नाही.

दोनही जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, दोनही प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या दोन प्रकरणांच्या संदर्भात असे आढळून येते की, जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,इस्लापूर यांनी अपिलार्थीस आवश्यक ती माहिती, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे दि.२४.०६.२००८ रोजी द्वितीय अपील केल्यानंतर दि.२८.०७.२००८ रोजी उपलब्ध करुन दिली आहे व यापृष्ठयर्थ अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिलेल्या कबूली जबाबाची प्रत जन माहिती अधिकारी यांनी आयोगास सादर केली आहे. यावरुन अपिलार्थीस त्यांच्या अपील क्र.११११/०८ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती मिळाल्याचे दिसून येत आहे.

अपील क्र.१११२/०८ च्या संदर्भात आयोगास उपस्थित असलेल्या जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील त्यांना तत्कालीन जन माहिती अधिकारी यांनी कळविला किंवा कसे, यासंदर्भात काहीच सांगता येणार नाही, असे स्पष्ट

केले. या द्वितीय अपील अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिलेल्या दि.२९.०१.२००८ रोजीच्या पत्राचे अवलोकन करता या पत्रामध्ये जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस अधिनियमातील कलम ७(३)(एक) प्रमाणे आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील दिला नसल्याचे आढळून येत आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,मुखेड यांचे दि.२९.०१.२००८ रोजीचे पत्र अवैध ठरत आहे. जन अपिलीय अधिकारी (अपील क्र. १११२/०८) यांच्या अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जासंदर्भातील दि.१९.०४.२००८ रोजीच्या निर्णयाचे अवलोकन करता तत्कालीन जन माहिती अधिकारी हे सुनावणीसाठी गैरहजर राहिल्याचे त्यांनी नमूद केले आहे व त्यांनी देखील तत्कालीन जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस शुल्क कळविण्याचा विकल्प दिला असूनही त्यांनी सदरचे शुल्क अपिलार्थीस कळविल्याचा कोणताही पुरावा आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांमध्ये समाविष्ट नाही व यासंदर्भात उपस्थित जन माहिती अधिकारी यांना देखील आयोगास काहीही सांगता येत नाही. अशा परिस्थितीत वनपरिक्षेत्र अधिकारी, मुखेड यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, अपिलार्थीस अपील क्र.११११/०८ च्या संदर्भातील संपूर्ण माहिती त्यांनी आयोगाकडे द्वितीय अपील अर्ज सादर केल्यानंतर त्यांना प्राप्त झाली असल्याने सदर अपील खारीज करण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन व अपील क्र. १११२/०८ मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र.११११/०८ खारीज करण्यात येत आहे.

२. अपील क्र. १११२/०८ मान्य करण्यात येत आहे.

३. अपील क्र.१११२/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी,मुखेड,जि.नांदेड यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे

मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांक: १४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,इस्लापूर,ता.हिमायतनगर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मुखेड,जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रो.ह.यो.),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (तेंदू),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार**

**अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक**

**क्र.१११३/०८,१११४/०८ व १११५/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१११३,१११४ व १११५
निर्णय दिनांक: १४.०८.२००९

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल, नांदेड. :अपिलार्थी

**विरुध्द**

१. अपील क्र.१११३/०८

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी,किनवट,<br>जि. नांदेड. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जं.का.स.),<br>नांदेड | :प्रतिवादी |

२. अपील क्र.१११४/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी,<br>जि. नांदेड. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जं.का.स.),<br>नांदेड |

३. अपील क्र.१११५/०८

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>वन परिक्षेत्र अधिकारी, माहूर,<br>जि. नांदेड. | जन अपिलीय अधिकारी तथा<br>सहायक वनसंरक्षक (जं.का.स.),<br>नांदेड |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०६.२००८ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १८.०१.२००८ रोजीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज केला असता, त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.०३.२००८ रोजी प्रथम अपील केले होते. तथापि अपील क्र.

१११३/०८ व १११४/०८ च्या संदर्भात जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय त्यांना मान्य नसल्यामुळे व अपील क्र.१११५/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांना जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस विनामूल्य माहिती देण्याचे सूचित करुनही त्यांना अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांनी कोणतीही माहिती न दिल्यामुळे त्यांनी विचाराधीन तीनही अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की,या तीनही अपील अर्जासंदर्भात अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट, मांडवी व माहूर यांच्याकडे आर्थिक वर्ष २००४ ते डिसेंबर,२००७ या कालावधीतील त्यांच्या कार्यक्षेत्रातील कामांसंदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - रोजगार हमी योजनेअंतर्गत झालेल्या कामाची गावनिहाय यादी, तसेच एलबीसी, सीटीएस या कामाची संपूर्ण यादी, तसेच अंदाजपत्रक व कामाच्या मोजमाप पुस्तिकांच्या सत्यप्रती, झालेल्या कामावर उपस्थित असलेल्या मजूरांचे मस्टर व पगारपत्रकाच्या सत्यप्रती, तसेच आर्थिक वर्षात रोजगार हमी योजनेशिवाय कोणकोणत्या योजना राबविण्यात आल्या व त्याकरिता शासनाकडून किती निधी उपलब्ध झाला आणि निधी कोणकोणत्या कामावर खर्च करण्यात आला त्याचा लेखी तपशील व काम केलेल्या संस्था व एजंसीची नावे व त्यांना अदा केलेल्या देयकांच्या सत्यप्रती, तसेच नमुना-४ च्या तपशीलवार सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास संबंधित जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट, मांडवी व माहूर यांनी अनुक्रमे दि. २२.०१.२००८, १२.०२.२००८ व दि. २५.०१.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद दिला. या पत्राद्वारे वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट व वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर यांनी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क अनुक्रमे रु. २६३६४/- व रु.३५,०००/- इतके चलनाद्वारे त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले व वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांनी त्यांच्या दि.१२.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे अपिलार्थीस आवश्यक

असलेली माहिती पोस्टाने पाठविली. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादांनी समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि.१३.०३.२००८ रोजी तीन स्वतंत्र प्रथम अपिले दाखल केली. यापैकी वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट व मांडवी यांच्याशी संबंधित प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. ०५.०४.२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीस वनपरिक्षेत्र अधिकारी, किनवट यांच्याकडून सशुल्क माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले व वनपरिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांच्या संदर्भात अपिलार्थीस त्यांनी माहिती पुरविल्यामुळे व या सुनावणीच्या वेळी अपिलार्थीचे त्यांना प्राप्त झालेल्या माहितीवर समाधान झाल्याने अपिलार्थीचे माहितीसाठीचे हे प्रकरण बंद केले. अपिलार्थीच्या वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर यांच्यासंदर्भातील प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि.१५.०४.२००८ रोजी निर्णय देऊन त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. तथापि सदर निर्णय अपिलार्थीस मान्य नसल्याने व वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे विचाराधीन द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या तीनही प्रकरणांची एकत्रित सुनावणी आज दिनांक १४.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी तीनही प्रकरणातील जन माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून, त्यांनी विहित केलेल्या मुदतीत अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क सविस्तर तपशीलासह कळविले. त्यामुळे अपिलार्थीने मागणी केलेली माहिती अपिलार्थीस ते सशुल्क पुरविण्यास तयार आहेत. अपिलार्थीने मागणी

केलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांनी कळविल्यानंतर अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात कधीही हजर राहिले नाहीत अथवा शुल्क भरणा करण्याकरिता त्यांनी कधीही तयारी दर्शविली नाही.

जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, मांडवी यांनी असा युक्तिवाद केला की, त्यांनी अपिलार्थीस दि. १२.०२.२००८ रोजी माहिती पुरविली आहे. अपिलार्थीने प्रथम अपील करण्यापूर्वी ही माहिती त्यांना पोस्टाद्वारे प्राप्त झाली नसल्याने त्यांना माहिती प्राप्त न झाल्याचे कारण दर्शवून जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले होते. तथापि अपिलार्थीस सुनावणीच्या वेळी त्यांनी परत एकदा विनामूल्य माहिती पुरविली.

जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, माहूर यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थी हे त्यांच्याकडे माहिती प्राप्त करुन घेण्यासाठी कधीही हजर न झाल्याने ते अपिलार्थीस माहिती पुरवू शकले नाहीत.

तीनही जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, तीनही प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून आले की, अपिलार्थीने मूळात जन माहिती अधिकारी यांना त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित विस्तृत प्रमाणातील माहिती मागितली होती. इतक्या विस्तृत प्रमाणात माहिती मागवून व नंतर अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काची कल्पना आल्यानंतर त्या शुल्काचा भरणा हे संबंधित अपिलार्थी कधीही करीत नाहीत, असे यापूर्वीच्या त्यांच्या बऱ्याच अपिलांच्या संदर्भात आयोगाच्या लक्षात आले आहे.

वन परिक्षेत्र अधिकारी, किनवट यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविताना या शुल्काच्या रकमेचा संपूर्ण तपशील त्यांनी अपिलार्थीस कळविला आहे व तसेच अपिलार्थीस शासकीय कोषागारामध्ये शुल्काचा भरणा करणे सोईचे व्हावे याकरिता त्यांनी अपिलार्थीस चलनाची प्रतही पाठविली आहे, परंतु अपिलार्थीने या शुल्काचा भरणा

शासकीय कोषागारात केला नाही. एवढेच नव्हेतर, प्रथम अपिलीय अधिकारी यांच्याकडे या शुल्काचा भरणा करण्याचे कबूल करुनही अपिलार्थी यांनी यासंदर्भात पुढे शुल्क भरण्याची कुठलीही तयारी दर्शविल्याचे आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. यावरुन अपिलार्थीस या प्रकरणी माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे सिध्द होत असल्याने त्यांचे अपील क्र.१११३/०८ हे फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे. अपील क्र.१११४/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांना माहिती मिळाल्याचे लेखी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे देऊनही आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले व स्वतः आयोगाकडील सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी यांच्या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी उपस्थित नाहीत. हे पाहता अपिलार्थीचे अपील क्र.१११४/०८ हे देखील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत आयोग आला आहे. अपिलार्थीच्या अपील क्र. १११५/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी तथा वनपरिक्षेत्र अधिकारी, माहूर यांनी अपिलार्थीस अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत जरी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कळविले असले तरी, या शुल्काचा तपशील, जो अपिलार्थीस कळविणे जन माहिती अधिकारी यांना अधिनियमातील कलम ७(३)(एक) प्रमाणे आवश्यक आहे, तो तपशील त्यांनी अपिलार्थीस कळविला नाही. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांचे दि. २५.०१.२००८ रोजीचे माहितीपोटीचे शुल्क भरण्यासंदर्भात पाठविलेले पत्र अवैध ठरत आहे व परिणामी त्यांना अपिलार्थीस आता विनामूल्य माहिती द्यावी लागणार आहे. या प्रकरणाशी संबंधित प्रथम अपील अर्जावरील निर्णय पाहता, त्यामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीस असे सूचित केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती हस्तगत करुन घ्यावी. जन अपिलीय अधिकारी यांचा अशाप्रकारचा निर्णय चुकीचा असून अपिलार्थीने त्यांच्या दि. १८.०१.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे नोंदणीकृत टपालाद्वारे माहितीची मागणी केली आहे. त्यामुळे जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस ही माहिती नोंदणीकृत टपालाद्वारे पाठविणे त्यांना अनिवार्य आहे. त्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडे जाऊन माहिती उपलब्ध

करुन घेण्याचे सूचित करण्याचा जन अपिलीय अधिकारी यांनी दिलेला निर्णय चुकीचा असून माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीअंतर्गत एखाद्या अर्जदाराने माहितीची मागणी केल्यास व ती माहिती जर व्यक्तिशः मागितली नसेल तर, ही माहिती अर्जदारास त्यांनी मागणी केलेल्या माध्यमाद्वारेच पुरविणे त्यांना अनिवार्य आहे. हे पाहता, अपिलार्थीचे अपील क्र.१११५/०८ मान्य करण्यात येऊन जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पुरवावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर या तीनही अपिलांच्यासंदर्भात खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १११३/०८ व १११४/०८ फेटाळण्यात येत आहेत.

२. अपील क्र.१११५/०८ मान्य करण्यात येत आहे.

३. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,माहूर यांनी,अपिलार्थीने त्यांच्या अपील क्र.१११५/०८ च्या संदर्भात मूळ अर्जाद्वारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच पंधरा दिवसांच्या आत नोंदणीकृत टपालाद्वारे विनामूल्य पाठवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १४-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. सौदागर महंमद वसीम महंमद एकबाल,रा. समिराबाग,खडकपूराच्या पाठीमागे,नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,किनवट, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,मांडवी, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी,माहूर, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जं.का.स.),नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक

## क्र.१११६/०८, १११७/०८ व १११८/०८

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१११६,१११७ व १११८
निर्णय दिनांकः १४.०८.२००९

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल पिता महंमद युसुफ, नांदेड. : अपिलार्थी

**विरुध्द**

१. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर, तरोडा बु., ता.जि. नांदेड. : प्रतिवादी
२. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड.

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०६.२००८ रोजी नोंदविलेली तीन स्वतंत्र द्वितीय अपिले आयोगाच्या विचाराधीन आहे.

या तीनही अपील अर्जांपैकी अपील क्र.१११६/०८ व १११७/०८ या दोन अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.०२.२००८ रोजी त्यांच्या संस्थेच्या संदर्भात काही माहिती मागितली असता, विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी शिक्षणाधिकारी, जि.प.नांदेड यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन निर्णय प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील अर्ज आयोगास सादर केलेले आहेत. अपील क्र.१११८/०८ च्या अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी दि.२५.०४.२००८ रोजी जन माहिती अधिकारी यांना सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती पुरविण्याचे आदेशित करुनही जन माहिती अधिकारी

यांच्याकडून त्यांना माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपील क्र. १११६/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडे अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्या प्राथमिक शाळेविषयी काही माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - कार्यरत असलेल्या अनुदानित, विनाअनुदानित व कायम विनाअनुदानित, प्रशिक्षित व अप्रशिक्षित एकूण शिक्षक,सहशिक्षक,शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या नावांची यादी, नेमणूक दिनांक, अनुदानितअसलेल्या शिक्षकांच्या नावांची यादी, तसेच त्यांच्या पगारपत्रकांच्या सत्यप्रती, तसेच जिल्हा परिषद शिक्षण विभाग प्राथमिक यांच्याकडून मिळालेल्या एकूण तुकड्यांच्या मान्यतेच्या सत्यप्रती - या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीच्या अपील क्र.१११७/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये - शैक्षणिक वर्ष २००६-०७ व २००७-०८ या वर्षात जन माहिती अधिकारी यांच्या शाळेअंतर्गत चालू असलेल्या एल.के.जी. व यु.के.जी. च्या विद्यार्थ्यांची संख्या व याविषयाच्या संदर्भात इतर अधिक माहिती मागितली होती. अपील क्र.१११८/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने त्यांच्या दि. १८.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे - सना ऊर्दू प्राथमिक शाळा, नोमानियानगर, तरोडा बु.नांदेड या शाळेचे अंशतः अनुदान २५ टक्के, ७५ टक्के, १०० टक्के वर्ग १ ली ते ४ थी पर्यंत देण्यात आलेल्या अंशतः अनुदान कोणत्या शैक्षणिक वर्षापासून सुरु करण्यात आले,अनुदानाच्या वर्षनिहाय आदेशाच्या सत्यप्रती, तसेच वर्ग ५ ते ७ पर्यंत अंशतः अनुदानाच्या २५ टक्के, ७५ टक्के, १०० टक्के देण्यात आलेल्या अंशतः अनुदानाच्या वर्षनिहाय आदेशाच्या प्रती, सदरील अनुदान कोणत्या वर्षापासून पात्र करण्यात आले त्याचा वर्षनिहाय सत्यप्रती, तसेच आपल्या कार्यालयाकडून सदरील शाळेस कोणकोणत्या वर्षापासून अंशतः अनुदान देण्यात आले, त्याची लेखी स्वरुपात माहिती - अशी माहिती मागविली

होती. अपिलार्थीने या तीनही अपील अर्जासंदर्भातील मूळ अर्जाद्वारे मागितलेली माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या द्वितीय अपील क्र.१११६/०८ च्या संदर्भातील मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दि.१८.०२.२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१३५/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या अपील क्र.१११७/०८ च्या संदर्भात माहितीसाठीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी कोणताही प्रतिसाद दिला नाही व अपील क्र. १११८/०८ च्या संदर्भातील प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांच्याकडे प्राप्त झाला नाही. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपील क्र. १११६/०८ व १११७/०८ च्या संदर्भात दि. ०८.०४.२००८ रोजी व अपील क्र. १११८/०८ च्या संदर्भात दि. २४.०३.२००८ रोजी शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांच्याकडे प्रथम अपील केले. तथापि या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय दिल्याचे उपलब्ध कागदपत्रांवरुन आढळून येत नाही. अशाप्रकारे अपिलार्थीस आवश्यक ती माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त न झाल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १४.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीस दि.१११६/०८ च्या अपिलासंदर्भात त्यांच्याकडे दि. १४.०२.२००८ रोजी प्राप्त झालेल्या अर्जास त्यांनी दि. १८.०२.२००८ रोजी प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १३५/- इतके त्यांच्या कार्यालयात जमा करण्याचे सूचित केले होते. तथापि या शुल्काचा भरणा त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न केल्यामुळे त्यांना ही माहिती अपिलार्थीस देता आली नाही.

अपिलार्थीच्या अपील क्र.१११७/०८ च्या संदर्भातील अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जाच्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीस कोणताही युक्तिवाद आयोगासमोर करता आला नाही. मात्र त्यांनी आयोगास असे अवगत केले की, अपिलार्थीने या अर्जाद्वारे त्यांच्याकडे ज्या वर्गाशी संबंधित माहिती मागविली आहे. ते लोअर के.जी. व अपर के.जी.चे वर्ग त्यांच्या शाळेमार्फत चालविण्यात येत नाहीत.त्यामुळे अपिलार्थीस त्यांच्या अर्जाशी संबंधित माहिती त्यांच्याकडून देय होत नाही.

अपिलार्थीच्या अपील क्र. १११८/०८ च्या संदर्भात अपिलार्थीने आयोगाकडे सादर केलेला त्यांचा दि.१८.०२.२००८ रोजीचा प्रथम अर्ज जन माहिती अधिकारी यांना मूळात प्राप्तच झाला नसल्यामुळे ते या प्रकरणी कोणतीही कार्यवाही करु शकले नाहीत, असे त्यांनी आयोगास अवगत केले. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी अथवा त्यांचे प्रतिनिधी यापैकी कोणीही आयोगासमोर उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या अपील क्र.१११६/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीच्या दि. १४.०२.२००८ रोजीच्या अर्जास अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत योग्य प्रकारे प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१३५/- त्यांच्या कार्यालयात भरण्याचे त्यांना सूचित केले होते. तथापि त्यांनी या शुल्काचा भरणा न केल्यामुळे अखेरीस त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त होऊ शकली नाही. या घटनाक्रमामध्ये जन माहिती अधिकारी यांचा कोणताही दोष आढळून येत नाही. अपिलार्थीस या माहितीची अजूनही आवश्यकता असेल तर ते ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून सशुल्क प्राप्त करुन घेऊ शकतात.अशाप्रकारे अपिलार्थीस त्यांच्या अपील क्र.१११६/०८ च्या संदर्भात माहिती प्राप्त न होण्यासाठी अपिलार्थी हेच जबाबदार असल्याचे आढळून येत असल्यामुळे,अपिलार्थीचे सदर अपील फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष आयोगातर्फे काढण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या अपील क्र.१११७/०८ च्या संदर्भात मूळ अर्जाचे अवलोकन केले असता, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे लोअर के.जी. व अपर के.जी. या तुकडयांच्या संदर्भात माहिती मागितली असल्याचे दिसून येत आहे. तथापि हे वर्ग जन माहिती अधिकारी यांच्या शाळेमार्फत चालविण्यात येत नसल्याने, ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना प्राप्त होऊ शकणार नाही, हे उघड आहे. तथापि अपिलार्थीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत त्यांना ही माहिती कळवावयास हवी होती. ती त्यांनी अपिलार्थीस न कळविता, अपिलार्थीचा माहितीसाठीचा मूळ अर्ज स्वतःकडे तसाच प्रलंबित ठेवल्यामुळे त्यांना आयोगातर्फे सक्त ताकीद देण्यात येत असून, इतःपर माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार त्यांच्याकडे प्राप्त होणाऱ्या प्रत्येक अर्जावर त्यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत आवश्यक ती कार्यवाही करावी, असे त्यांना सूचित करण्यात येत आहे. तसेच त्यांना असे आदेशित करण्यात येत आहे की, अपिलार्थीने त्यांच्या दि. १४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची वस्तुस्थिती त्यांनी अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

अपिलार्थीच्या अपील क्र.१११८/०८ शी संबंधित माहितीसाठीचा दि.१८.०२.२००८ रोजीचा मूळ अर्ज  जन माहिती अधिकारी यांच्याकडे मूळात प्राप्त झालेला नाही असा जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने युक्तिवाद केला व जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी आयोगासमोर उपस्थित नाहीत. तसेच अपिलार्थीने त्यांच्या प्रथम अपील अर्जासंदर्भात आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपिलामध्ये असे नमूद केले आहे की, या प्रकरणी शिक्षणाधिकारी (प्राथमिक),जि.प.नांदेड यांनी जन माहिती अधिकारी यांना, दि.२५.०४.२००८ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थीस सात दिवसांच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे सूचित केले आहे. तथापि जन अपिलीय अधिकारी यांचा हा निर्णय अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जासोबत जोडलेला नाही. त्यामुळे आवश्यक त्या

कागदपत्रांच्या अनुपलब्धतेअभावी अपिलार्थीचे अपील क्र. १११८/०८ हे फेटाळण्यायोग्य असल्याचा निष्कर्ष आयोग काढत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील क्र. १११६/०८ व १११८/०८ फेटाळण्यात येत आहेत व अपील क्र.१११७/०८ अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील क्र. १११६/०८ व १११८/०८ फेटाळण्यात येत आहेत.

२. अपील क्र.१११७/०८ अंशतः मान्य करण्यात येत आहे.

३. अपील क्र.१११७/०८ च्या संदर्भात जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाद्वारे मागितलेल्या माहितीची वस्तुस्थिती अपिलार्थीस, हे आदेश निर्गमित होताच तीन दिवसांच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद**
**दिनांकः १४-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु. ता. जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (प्राथमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

## राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/१११९
निर्णय दिनांकः १४.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, तरोडा बु., ता. जि. नांदेड . | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दि. १४.०२.२००८ रोजी माहिती मागितली असता, विहित मुदतीत माहिती न दिल्यामुळे त्यांनी अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले असता, जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०५.२००८ रोजी सुनावणी घेऊनही निर्णय प्रलंबित ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि. १४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या हायस्कूलच्या संदर्भात काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - जन माहिती अधिकारी यांच्या हायस्कूलमध्ये कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या अनुदानित,विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानित एकूण शिक्षक,शिक्षकेतर

कर्मचाऱ्यांच्या नावांची यादी, नेमणूक दिनांक, त्यांच्या पगारपत्रकाच्या सत्यप्रती,जिल्हा परिषद शिक्षण विभाग माध्यमिक यांच्याकडून मिळालेल्या एकूण तुकडयांच्या मान्यता आदेशाच्या सत्यप्रती, सदरील शाळा अल्पसंख्यांक दर्जाची असल्याबाबत अल्पसंख्यांक प्रमाणपत्राच्या सत्यप्रती, कायम स्वरुपी कार्यरत असलेल्या अनुदानित,विनाअनुदानीत व कायम विनाअनुदानित शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांच्या शैक्षणिक पात्रतेच्या सत्यप्रती- या मुद्यांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून नोंदणीकृत टपालाद्वारे अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दि.१८.०२.२००८ रोजीच्या पत्राद्वारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु.१०५/- डी.डी.द्वारे भरण्याचे त्यांनी अपिलार्थीस सूचित केले. तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे न करता अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन दि. २७.०५.२००८ रोजी आपले आदेश पारित केले व अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क माहिती पुरवावी, असे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले. तथापि जन अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपिलावरील निर्णय प्रलंबित ठेवल्याचे कारण दर्शवुन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन माहिती व अपिलीय अधिकारी, यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे गैरहजर आहेत. जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार असून ते ही माहिती अपिलार्थीस सशुल्क पुरविण्यासाठी तयार आहेत. या प्रकरणी अपिलार्थीस विहित मुदतीत शुल्काची रक्कम कळवूनही अपिलार्थीने अद्यापपर्यंत त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क न भरल्यामुळे अपिलार्थीस ते आतापर्यंत माहिती पुरवू शकले नाहीत. जन

माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीच्या या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर आज रोजी उपस्थित नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांच्या प्रतिनिधीने केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दि. १४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दि. १८.०२.२००८ रोजी योग्य तो प्रतिसाद देऊन अपिलार्थीस, त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रु. १०५/- इतके त्यांच्या कार्यालयात मुख्याध्यापकांच्या नावाने डी.डी. तयार करुन भरण्याचे सूचित केले असता, अपिलार्थीने या शुल्काचा भरणा जन माहिती अधिकारी यांच्याकडे केला नाही व जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दि. १४.०५.२००८ रोजी सुनावणी घेतली. या सुनावणीसाठी अपिलार्थी हे हजर होते. या सुनावणीमध्ये काय निर्णय झाला, हे अपिलार्थीस माहित होते. जन अपिलीय अधिकारी यांच्या या सुनावणीचा निर्णय लेखी स्वरुपात अपिलार्थीस दि. २७.०५.२००८ रोजीच्या पत्राद्वारे निर्गमित केला आहे. तथापि एवढे असूनही अपिलार्थीने त्यानंतर दि. २४.०६.२००८ रोजी आयोगाकडे केलेल्या द्वितीय अपील अर्जामध्ये जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी प्रलंबित ठेवल्याचे असत्य विधान केले आहे. तसेच त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क देखील त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न भरता, प्रथम अपिलीय अधिकारी यांचा व राज्य माहिती आयोगाचा निष्कारण वेळ घेतला आहे. या अपिलार्थीची अशाप्रकारची अनेक अपिले आयोगाकडे त्यांनी दाखल केली असून सर्व सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यापक स्वरुपाची माहिती मागवावयाची व तदनंतर प्राधिकरणाकडे त्यांनी केलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा भरणा कधीही न करता विनामूल्य माहिती हस्तगत करण्याचा प्रयत्न अपिलार्थी कायम/सातत्याने करीत असल्याचे आयोगास आढळून येत आहे. अपिलार्थीच्या याच प्रकरणी नव्हेतर वेगवेगळया सार्वजनिक प्राधिकरणाच्या जन माहिती अधिकारी यांनी आयोगाकडे असंख्य तक्रारी केलेल्या आहेत, हे येथे विशेषत्वाने नमूद करण्यात येत आहे. या

प्रकरणी अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना जन माहिती अधिकारी यांनी विहित मुदतीत कळविले आहे. विहित मुदतीत अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क त्यांना ज्ञात होऊनही अपिलार्थीने ते न भरल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती प्राप्त होऊ शकणार नाही. यावरुन अपिलार्थीस माहिती प्राप्त न होण्यासाठी ते स्वतःच जबाबदार असल्याचे या प्रकरणी आढळून येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १४-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा मुख्याध्यापक, सना उर्दू हायस्कूल, नोमानियानगर, तरोडा बु. ता.जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा शिक्षणाधिकारी (माध्यमिक), जिल्हा परिषद, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११२०
निर्णय दिनांकः १४.०८.२००९

| | | |
|---|---|---|
| १. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, नांदेड. | : | अपिलार्थी |

**विरुध्द**

| | | |
|---|---|---|
| १. जन माहिती अधिकारी तथा सचिव, सना एज्यूकेशन सोसायटी, मार्फत नोबल उर्दु हायस्कुल, मुखेड, ता. मुखेड, जि. नांदेड | : | प्रतिवादी |
| २. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड. | | |

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दि. २४.०६.२००८ रोजी नोंदविलेले द्वितीय अपील आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार सचिव, सन एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे दि. १४.०२.२००८ रोजी माहितीसाठीचा अर्ज पाठवून दिला असता, या मुदतीत माहिती न दिल्याने अपिलार्थीने सहायक धर्मादाय आयुक्त यांच्याकडे प्रथम अपील दि. ०८.०४.२००८ रोजी केले असता, त्यांनी सुनावणी न घेता त्यांचे अपील प्रलंबित ठेवल्याने, त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दि.१४.०२.२००८ रोजीच्या मूळ अर्जान्वये सचिव, सना एज्युकेशन सोसायटी यांच्याकडे त्यांच्या संस्थेच्या कामकाजासंदर्भात सन २००६-२००७ व २००७-२००८ या कालावधीशी संबंधित काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाद्वारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. ०८.०४.२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील सादर केले आहे.

या प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १४.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी जन अपिलीय अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी हे दोघेही अनुपस्थित आहेत. जन अपिलीय अधिकारी यांच्या प्रतिनिधीने, त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न दिल्याचे आयोगास अवगत केले.

वरील घटनाक्रम व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी आयोगास असे आढळून येते की, सहायक धर्मादाय आयुक्त हे फक्त त्यांच्या कार्यालयातील जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या निर्णयासंदर्भात माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी म्हणून काम करु शकतात. या प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीचा मूळ अर्ज व प्रथम अपिल अर्ज दोन वेगवेगळया, ज्यांचा एकमेकांशी काहीही संबंध नाही, अशा प्राधिकरणाकडे केला आहे. हे पाहता, अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षापत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद**
**दिनांकः १४-०८-२००९**

**( वि. बा. बोरगे )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड,नांदेड

२. जन माहिती अधिकारी तथा सचिव, सना एज्यूकेशन सोसायटी, मार्फत नोबल उर्दु हायस्कुल, मुखेड, ता. मुखेड, जि. नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन अपिलीय अधिकारी तथा सहाय्यक धर्मादाय आयुक्त, नांदेड विभाग, नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग,खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९(३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक क्र.११०९/०८ व १११०/०८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११०९ व १११०
निर्णय दिनांक: १४.०८.२००९

१. श्री. जी. एस.रायबोळे, : अपिलार्थी
रा.किनवट, जि.नांदेड.

**विरुध्द**

१. **अपील क्र.११०९/०८**

| | | |
|---|---|---|
| जन माहिती अधिकारी<br>तालुका कृषि अधिकारी कार्यालय,<br>किनवट,जि.नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>तालुका कृषि अधिकारी,<br>किनवट,जि.नांदेड | :प्रतिवादी |

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी :
कृषि अधिकारी,
तालुका कृषि कार्यालय, किनवट,
जि.नांदेड

२. **अपील क्र.१११०/०८**

| | |
|---|---|
| जन माहिती अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी<br>कार्यालय,नांदेड | जन अपिलीय अधिकारी तथा<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी<br>कार्यालय,नांदेड |
| प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी :<br>उपविभागीय कृषि अधिकारी,<br>किनवट,जि.नांदेड | प्रत्यक्षतः जन अपिलीय अधिकारी:<br>कृषि उपसंचालक,<br>जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी<br>कार्यालय,नांदेड |

त्रयस्थ पक्षः श्री. आर.जे.मारदोडे

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दि. १३.०६.२००८ रोजी नोंदविलेली दोन स्वतंत्र द्वितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवून त्रयस्थ पक्षाच्या जातीच्या व टीसीच्या प्रमाणपत्राची मूळ माहिती कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे दिसून येते की, अपिलार्थीने प्रथमतः दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडे, त्यांच्या दि. १०.०३.२००८ रोजीच्या दोन स्वतंत्र अर्जान्वये त्यांच्या कार्यालयातील कृषि पर्यवेक्षक श्री. आर.जे. मारदोडे, लिपीक श्री. एस.के.कचिकवाड यांनी कृषि कार्यालयाच्या सेवेत दाखल होतेवेळी सादर केलेल्या त्यांच्या जातीच्या प्रमाणपत्राची व टी.सी.च्या छायांकित प्रतींची तसेच जात प्रमाणपत्राची वैधता प्राप्त झाली असेल तर वैध प्रमाणपत्राच्या प्रतींची माहिती मागितली होती. अपिलार्थीने ही माहिती दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः मागितली होती. यानंतर अपिलार्थीस माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९(१) च्या तरतुदीनुसार दोनही प्रकरणाशी संबंधित जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दि. २१.०४.२००८ रोजी दोन स्वतंत्र प्रथम अपिले सादर केली. अपिलार्थीच्या या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेतली नाही अथवा अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांसंदर्भात त्यांच्याशी कोणताही पत्रव्यवहार केला नाही. त्यामुळे व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपिले सादर केली आहेत.

या प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १४.०८.२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीसाठी दोनही प्रकरणातील जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व त्रयस्थ पक्ष उपस्थित आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी हे अनुपस्थित आहेत. कृषि अधिकारी, किनवट यांच्या प्रतिनिधीने आयोगास असे अवगत करुन दिले की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे तयार आहे. तथापि अपिलार्थीने व्यक्तिशः माहितीची मागणी करुनही ते त्यांच्या कार्यालयात माहिती हस्तगत करुन घेण्यासाठी कधीही हजर झाले नाहीत. उपरोक्त दोनही प्रकरणासंदर्भात अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांना अंतिमतः दि. १८.०६.२००८ रोजीच्या पत्राद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य पुरविण्यात आली असून, अपिलार्थीची ही माहिती त्यांना प्राप्त झाल्यापृष्ठयर्थ पोचसही असलेली पावती त्यांनी आयोगास सादर केली.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता, या प्रकरणी असे आढळून येते की, दोन वेगवेगळ्या त्रयस्थ पक्षाविषयी अपिलार्थीने एकाच मुद्यावरील माहिती दोन वेगवेगळया जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागितली आहे. या प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः माहितीची मागणी केली असल्याने जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठीचा मूळ अर्ज केल्यापासून त्या अर्जासंदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून होणाऱ्या घडामोडीसंदर्भात त्यांच्याशी व्यक्तिशः संपर्क साधून, माहिती हस्तगत करुन घेण्याची संपूर्ण जबाबदारी अपिलार्थी यांची होती. जन माहिती अधिकारी यांच्या, अपिलार्थी हे त्यांच्या कार्यालयात व्यक्तिशः माहितीची मागणी करुन कधीही उपस्थित राहिले नाहीत, या युक्तिवादाचे खंडन करण्यासाठी अपिलार्थी हे आयोगासमोर उपस्थित नाहीत. अपिलार्थीस आवश्यक ती माहिती त्यांनी राज्य माहिती आयोगाकडे द्वितीय अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य प्राप्त झाली असल्याने आता अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती देय उरत नाही, हे पाहता, अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील क्र.११०९/०८ व १११०/०८ फेटाळण्यात येत आहेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**
**दिनांकः १४-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त,**
**खंडपीठ औरंगाबाद.**

प्रत,

१. श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसुफ, मुख्य संपादक, सा.सत्यवृत्त, मिलकॉर्नर, बसस्टँड रोड, नांदेड.

२. जन माहिती अधिकारी तथा कृषि अधिकारी,तालुका कृषि कार्यालय,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३. जन माहिती अधिकारी तथा उपविभागीय कृषि अधिकारी,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,किनवट,जि.नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५. जन अपिलीय अधिकारी तथा कृषि उपसंचालक,जिल्हा अधीक्षक कृषि अधिकारी कार्यालय,नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदी संदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६. निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११२१/२००८ व ११२२/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११२१ व ११२२

निर्णय दिनांक १७-०८-२००९

१ श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, : अपिलार्थी
राजेसंभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५, २६, जळगांव रोड,
पोस्ट हर्सूल, औरंगाबाद

**विरुध्द**

१ अपील क्रमांक ११२१/२००८
जन माहिती अधिकारी
तथा सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त,
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद

१ अपील क्रमांक ११२२/२००८
जन माहिती अधिकारी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांचे कार्यालय, औरंगाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक धर्मादाय आयुक्त,

सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद

## निर्णय

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी मागणी केलेली माहिती जन माहिती अधिकारी यांनी संगनमताने अपिलार्थीस देण्यासाठी टाळाटाळ केली आहे व हेतुपुरस्सर नाकारली आहे. जन माहिती अधिकारी यांनी उशीरा माहिती दिल्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी त्यांच्या अपील निर्णयामध्ये मान्य केले आहे. परंतु अपिलार्थीचे अपील फेटाळले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे केले आहे. या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे झेंडुबुवा मठ पैठण ट्रस्ट ए ३१७१ च्या संदर्भात मठाच्या बाहेरील आरक्षित खुल्या जागेवरील वाढीव बांधकाम आणि पांडुरंग मंदिराच्या बांधकामासंदर्भात, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २६-०६-२००७ रोजीच्या केलेल्या अर्जावर माहिती अधिकारी यांनी काय कारवाई केली यासंदर्भात, सन १९८२ ते ११-०१-२००८ या कालावधीमध्ये जी काही बांधकामे केली आहेत त्या बांधकामासंदर्भात संबंधित अनधिकृत बांधकाम, निरीक्षकांनी सहायक धर्मादाय आयुक्त यांचे निदर्शनास ज्या चौकशी अहवालावरुन आणले त्या चौकशी अहवालाच्या प्रती या माहितीची मागणी केली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडील दिनांक ०५-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे

शुल्क रुपये ६० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले. तथापि या शुल्काचा अपिलार्थीने भरणा न करता अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २०-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीने जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे हे अपील केल्यानंतर जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस दिनांक २९-०२-२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीशी संबंधित जी माहिती त्यांच्याकडे उपलब्ध होती ती माहिती अपिलार्थीस दिनांक २९-०२-२००८ रोजी विनामूल्य पुरविली. यानंतर अपिलार्थीच्या दिनांक २०-०२-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०३-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे प्रथम अपील फेटाळले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी व जन माहिती अधिकारी, लातूर हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी दिनांक २९-०२-२००८ रोजी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे. अपिलार्थीस आता जी माहिती देणे बाकी राहिले आहे ती माहिती संबंधित संस्थेकडे असून ही माहिती संस्थेकडून प्राप्त करुन नंतर ती अपिलार्थीस तीस दिवसाच्या आत पुरविता येऊ शकेल.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपैकी जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्याकडे उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस विनामूल्य पुरविली आहे व उर्वरित माहिती संबंधित संस्थेकडे उपलब्ध आहे. माहिती अधिकार अधिनियमातील कलम २ (च) मधील माहिती शब्दाच्या व्याख्येचे अवलोकन केले

असता या माहितीची व्याप्तीमध्ये " त्या त्या वेळी अंमलात असलेल्या अन्य कोणत्याही कायद्यान्वये सार्वजनिक प्राधिकरणास मिळविता येईल अशी कोणत्याही खाजगी निकायाशी संबंधित माहिती " यांचा समावेश होतो. या प्रकरणी अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीपैकी उर्वरित माहिती ही संबंधित संस्थेकडे उपलब्ध आहे व ही माहिती धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयास मिळविता येईल अशी आहे. त्यामुळे अपिलाथीने मागणी केलेली माहिती ही माहिती अधिकार अधिनियमातील " माहिती " या सज्ञेमध्ये मोडत असल्यामुळे जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस आता उर्वरित माहिती संबधित संस्थेकडून प्राप्त करुन नंतर ती अपिलार्थीस द्यावी लागेल. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली उर्वरित माहिती त्यांनी अपिलार्थीस हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जामध्ये त्यांना जन माहिती अधिकारी यांनी दिशाभूल करणारी व उशीरा माहिती दिल्यामुळे व पुरविलेली माहिती अपूर्ण असल्यामुळे त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीनुसार शिस्तभंगाची व दंडनीय कारवाई आदेशित करण्याची आयोगास विनंती केली आहे. तथापि या प्रकरणी अपिलाथीने त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्कच मूळात जन माहिती अधिकारी यांच्याकडे भरले नसल्यामुळे अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी विलंबाने माहिती दिली हा त्यांचा मुद्दा आयोग फेटाळून लावत आहे. तसेच माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार उपलब्ध असलेली माहिती अपिलार्थीस देण्यासाठी त्यांनी सकारात्मक प्रतिसाद दिला आहे. जन माहिती अधिकारी यांनी कोणत्याही दुष्ट हेतूने अपिलार्थीपासून ही माहिती दडविल्याचा प्रयत्न केल्याचे आयोगास आढळून येत नाही. मूळात ही माहिती संबंधित संस्थेशी संबंधित असल्यामुळे सहायक धर्मादाय आयुक्त यांच्या कार्यालयाने ही माहिती अपिलार्थीपासून कोणत्याही दुष्ट हेतूने दडविण्याचे कोणतेही कारण आयोगास आढळून येत नाही. हे सर्व मुद्दे एकत्रितपणे पाहता अपिलार्थीची जन माहिती अधिकारी यांना दंडीत करण्याची विनंती आयोग फेटाळून लावत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागितलेली उर्वरित माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

**अपील क्रमांक ११२२/२००८** **निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १३-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवली आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक ३०-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जान्वये जो जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयास दिनांक ०४-१२-२००७ रोजी प्राप्त झाला,त्याद्वारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्रयस्थ पक्ष झेंडुबुवा मठ पैठण ट्रस्ट ए ३१७१ औरंगाबाद विभाग यांच्याविषयी काही माहिती मागविली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - सदरहू ट्रस्टच्या सन १९९६ ते २०-११-२००७ पर्यंत लिहून ठेवलेल्या प्रोसिडींग बुक मिनिट्स बुकच्या प्रती, किर्द बुकच्या प्रती, स्थावर जंगम मालमत्तेच्या प्रती, सदरील ट्रस्टला या कालावधीत कोणत्या निरीक्षकाने भेटी दिल्या, सहायक धर्मादाय आयुक्त अथवा सह धर्मादाय आयुक्त यांनी चौकशीकरिता ज्या ज्या वेळी भेटी दिल्या ज्या भेटीचा दिनांक व संबंधिताचे नांव, सदरील ट्रस्टमध्ये दररोज घेत असलेल्या कार्यक्रमाच्या प्रती आणि ट्रस्टमध्ये व्यवस्थापनासाठी खास मंजूर केलेले पद याची माहिती व ते कायदेशीर आहे काय याचा खुलासा - या मुद्दयांचा समावेश होता.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही. त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ११-०१-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणताही निर्णय न दिल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन माहिती अधिकारी औरंगाबाद कार्यालय व जन माहिती अधिकारी, लातूर कार्यालय, हजर व अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर या टप्प्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन आपले आदेश निर्गमित करणे आवश्यक आहे असे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा. जन अपिलीय अधिकारी यांचा निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

<u>**आदेश**</u>

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक ११-०१-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसाच्या आत सुनावणी घेऊन आपला निर्णय पारित करावा.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. नामदेव पुंडलिक कोल्हे, राजेसंभाजी कॉलनी, प्लॉट नं. २५, २६, जळगांव रोड, पोस्ट हर्सूल, औरंगाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा अधीक्षक, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक धर्मादाय आयुक्त, सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११२३/२००८ व ११२४/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११२३ व ११२४

निर्णय दिनांक १७-०८-२००९

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, : अपिलार्थी

रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम,

तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा.प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

**निर्णय**

**अपील क्रमांक ११२३/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्याकडे बेकायदेशीर नळसंख्येबाबत पुरावा जोडला तरीही त्यांचे अपील फेटाळले असल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १८-१०-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती

अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यक्षेत्रातील नळासंदर्भात माहिती मागितली होती. अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीमध्ये - एकूण नळसंख्या, सार्वजनिक नळ, कायदेशीर नळ किती ? बेकायदेशीर नळ किती ? नगरसेवकाकडे किती नळ आहेत, नळ डिमांड रजिस्टरमध्ये खाडाखोड करुन भ्रष्टाचार केल्याचे दिसून येत आहे याची माहिती - या मुद्दयांचा समावेश होता. अपिलार्थीने ही माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून व्यक्तिशः अपेक्षिली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी यासंदर्भात कधी प्रतिसाद दिला हे आवश्यक त्या कागदपत्रांच्या अनुपलब्धतेमुळे कळण्यास मार्ग नाही, परंतु ही माहिती जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस त्यांच्याकडील दिनांक ३०-०१-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिल्याचे अपिलार्थीच्या आयोगाकडील वेगळ्या पत्रावरुन दिसून येते. जन माहिती अधिकारी यांच्या दिनांक ३०-०१-२००८ रोजीच्या पत्राच्या संदर्भात अपिलार्थीचा दिनांक २६-१२-२००७ रोजीचा अर्ज असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून प्राप्त झालेल्या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक ०८-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील फेटाळून लावले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थीने त्यांचा युक्तिवाद लेखी स्वरुपात आयोगाकडे रजिस्टर्ड पोस्टाने सादर केला असून त्यामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांच्या निर्णयाने त्यांचे समाधान झालेले नाही. त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्या-कडे पुरावा सादर करुनही अपुरी, दिशाभूल करणारी व खोटी माहिती त्यांना देण्यात आली असून

जन माहिती अधिकारी यांनी खरी माहिती देण्याचे टाळले आहे. तसेच या अर्जामध्ये त्यांनी मुरुम नगरपरिषदेच्या दैनंदिन कार्यपध्दतीबाबत विशिष्ट संदर्भात अनेक तक्रारी करुन देखील उपयोग नाही त्यामुळे नगरपरिषद कार्यालयावर एक समिती नेमावी अशी त्यांनी आयोगास विनंती केली आहे.

जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीचा दिनांक ०८-०४-२००८ रोजीचा प्रथम अपील अर्ज त्यांच्या कार्यालयात दिनांक १५-०४-२००८ रोजी प्राप्त झाल्या-नंतर त्यांनी दिनांक १३-०५-२००८ रोजी निर्णय दिला असून या निर्णयाव्दारे अपिलार्थीचे अपील अमान्य केले आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांनी त्यांना एक दिवस उशिराने माहिती दिली असल्याचे त्यांच्याकडील सुनावणीच्या वेळी सादर केले.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने राज्य माहिती आयोगाकडे त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपुरी, चुकीची व दिशाभूल करणारी माहिती मिळाली असल्याने राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील केले असल्याचे म्हटले आहे. आज त्यांनी आयोगाकडे सादर केलेल्या त्यांच्या लेखी युक्तिवादात देखील अशाच अर्थाचे म्हणणे आयोगासमोर मांडले आहे. मात्र त्यांनी नगर परिषदेवर घेतलेल्या आक्षेपांच्या संदर्भात कोणताही ठोस पुरावा आयोगाकडे सादर केलेला नाही. या अर्जामध्ये त्यांनी असे नमूद केले आहे की, त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे यासंदर्भात पुरावा सादर केला. तथापि जन अपिलीय अधिकारी यांच्या म्हणण्याप्रमाणे अपिलार्थीने प्रथम अपिलाच्या वेळीही कोणताही पुरावा सादर न करता अपिलार्थी हे या सुनावणीकरिता गैरहजर राहिले. आज देखील आयोगाच्या सुनावणीसाठी अपिलार्थी वैयक्तीक कारणास्तव गैरहजर आहेत हे पाहता अपिलार्थीचे विचाराधीन अपील आवश्यक त्या पुराव्याअभावी फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

अपिलार्थीच्या जर मुरुम नगरपरिषदेच्या कार्यपध्दतीबाबत काही तक्रारी असतील तर त्यांनी या प्रश्नासाठी त्यांनी आवश्यक त्या सक्षम प्राधिकरणाकडे जाऊन त्यांच्या संदर्भित तक्रारी संदर्भात त्यांच्याशी परस्पर संपर्क साधून आपल्या तक्रारीची परस्पर तड लावून घ्यावी असे त्यांना सूचित करण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**अपील क्रमांक ११२४/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक ३१-०५-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांच्यावर अधिनियमातील कलम २० (१) व २० (२) नुसार कारवाईची शिफारस केली नसल्याने व जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांना वैयक्तीक तपशील देण्यास भाग पाडल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे सादर केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १६-०१-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे " नगर-पालिकेची संपूर्ण डेड स्टॉक रजिस्टरवरुन माहिती मिळणेबाबत " अशी माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडे व्यक्तिशः व नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १४-०२-२००८ रोजीच्या पत्राव्दारे प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस त्यांच्याकडील डेड स्टॉक रजिस्टरची प्रत पाठविली. तथापि या माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १०-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १३-०५-२००८ रोजी निर्णय देऊन अपिलार्थीचे अपील अंशतः मान्य केले व जन माहिती अधिकारी यांना अपिलार्थीस

नगरपरिषदेमधील सर्व विभागांची एकत्रिपणे माहिती सात दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन देण्याचे सूचित केले. जन अपिलीय अधिकारी यांच्या या निर्णयाने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी, जन माहिती अधिकारी गैरहजर आहेत.

सुनावणीच्या वेळी जन अपिलीय अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीच्या दिनांक १०-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर त्यांनी दिनांक १३-०५-२००८ रोजी निर्णय दिला आहे.

वरील घटनाक्रम, जन अपिलीय अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेल्या माहितीचे अवलोकन करता असे दिसून येते की, अपिलार्थीस निश्चितपणे जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयाच्या डेड स्टॉक रजिस्टरमधील कोणती माहिती हवी आहे याचा बोध होत नाही. अपिलार्थीने त्यांच्या माहितीसाठीच्या मूळ अर्जामध्ये आवश्यक असलेली माहिती म्हणून " नगरपालिकेची संपूर्ण डेड स्टॉक रजिस्टरवरुन माहिती मिळणेबाबत " म्हणजे अपिलार्थीस नेमके काय म्हणावयाचे आहे याचा कोणासही बोध होणे शक्य नाही. तसेच आज रोजी अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या अर्जामध्ये देखील त्यांनी आयोगाकडे केलेल्या व्दितीय अपील अर्जाप्रमाणेच अशाच प्रकारची माहिती मागविली आहे. अपिलार्थीने जन माहिती अधिकारी व आयोगाकडे केलेले व्दितीय अपील पाहता त्यांनी मागणी केलेली माहिती ही अत्यंत मोघम स्वरुपाची असल्यामुळे अपिलार्थीचे विचाराधीन अपील फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## आदेश

१. अपील फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. दत्तात्रय निवृत्ती देशमुख, रा. मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, मुरुम, तालुका उमरगा, जिल्हा उस्मानाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११२५/२००८ व ११२६/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११२५ व ११२६

निर्णय दिनांक १७-०८-२००९

१ श्री. गोपाळरेड्डी कोनरेड्डी कोटावाड, : अपिलार्थी

मु. बाळापूर, कुंभारगल्ली जवळ, पो. तालुका धर्माबाद,

जिल्हा नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी

तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, धर्माबाद,

तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा उप आयुक्त (सा.प्र.),

विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद

| | |
|---|---|
| त्रयस्थ पक्ष : | १. गंगारेड्डी कोनय्या कोटावाड |
| अपील क्रमांक ११२५/०८ | २. श्री. आनंदराव माधवराव शिंदे |
| | ३. श्री. रामकिशन माधवराव शिंदे |
| | ४. श्रीमती शेषाबाई लक्ष्मण हरणे |
| | ५. श्रीमती पंचफुलाबाई मुकूंदराव गिरी |
| त्रयस्था पक्ष | १. श्री. उपोड नरेश गंगान्ना |
| अपील क्रमांक ११२६ | २. श्री. अशोक राजाराम |

## निर्णय

**अपील क्रमांक ११२५/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, जन माहिती अधिकारी यांनी अद्यापपावेतो संपूर्ण माहिती दिली नसल्याने त्यांच्यावर अधिनियमातील तरतुदीप्रमाणे २५० रुपये प्रतिदिनी याप्रमाणे शास्ती लावण्यात यावी व विभागीय चौकशीचे आदेश निर्गमित करण्यात येऊन त्यांना आवश्यक असलेली संपूर्ण माहिती जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य मिळावी.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे बाळापूर येथील अपिलार्थीचे आजोबा श्री. कोनय्या सोनय्या कोठावाड यांचे घर क्रमांक १-७४१ व १-२२८ संदर्भात जन माहिती अधिकारी यांच्याकडून एकूण दोन मुद्दयाव्दारे काही मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न दिल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदी-नुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १८-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०३-२००८ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन अपिलीय अधिकारी यांचा युक्तिवाद नोंदवून घेण्यात आला. अपिलार्थीने आयोगाकडे केलेल्या त्यांच्या व्दितीय अपील अर्जातील त्यांच्या लेखी म्हणण्याप्रमाणे युक्तिवाद करुन त्यांना जन माहिती अधिकारी यांनी माहितीपासून वंचित ठेवल्याचे आयोगास अवगत केले व त्यांनी मागणी केलेली माहिती दुष्ट हेतूने नाकारल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी आयोगास असे अवगत केले की, त्यांनी अपिलार्थीच्या मूळ अर्जातील संबंधित मुद्दयाबाबत त्यांच्याकडे उपलब्ध असलेली संपूर्ण माहिती अपिलार्थीस दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे पुरविली असून या पत्राबरोबर त्यांनी अपिलार्थीस एकूण ३७ पृष्ठांची माहिती पुरविली आहे. या व्यतिरिक्त त्यांच्याकडे या प्रकरणाशी संबंधित कोणतीही कागदपत्रे उपलब्ध नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने ज्या प्रकरणाशी संबंधित माहिती मागितली आहे ते प्रकरण अपिलार्थीच्या आजोबाच्या मिळकतीचे असून यासंदर्भात अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून काही माहिती आवश्यक असल्याचे दिसून येत आहे. जन माहिती अधिकारी यांनी त्यांच्या दिनांक १३-०३-२००८ रोजीच्या पत्राव्दारे दिलेल्या माहितीने अपिलार्थीचे समाधान झालेले नाही. सबब मुख्याधिकारी, नगर परिषद, धर्माबाद यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या प्रथम अर्जामध्ये अपिलार्थीने उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांवर मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस पुरवावी व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर अपिलार्थीस त्याप्रमाणे तसे लेखी कळवावे. जन माहिती अधिकारी यांच्याकडून ही माहिती प्राप्त झाल्यानंतर अपिलार्थी या माहितीवर पुढील आवश्यक ती कार्यवाही करु शकतील. या प्रकरणी अपिलार्थीच्या दिनांक १२-११-२००७ रोजीच्या प्रथम अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद न देऊन स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या

अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील अंशतः मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

**आदेश**

१. अपील अंशतः मान्य करण्यात येत आहे.

२. मुख्याधिकारी, नगर परिषद, धर्माबाद यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीच्या प्रथम अर्जामध्ये अपिलार्थीने उपस्थित केलेल्या सर्व मुद्दयांवर मुद्देनिहाय माहिती अपिलार्थीस हे आदेश निर्गमित झाल्यानंतर त्यांना ३० दिवसात विनामूल्य पुरवावी व अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध नसेल तर अपिलार्थीस तसे त्याप्रमाणे लेखी कळवावे.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**अपील क्रमांक ११२६/२००८**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १९-०४-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक १२-११-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे मौजे बाळापूर येथील मिळकत क्रमांक १/९३५ च्या संदर्भात मालकी हक्क

नोंदी व श्री. उपोड नरेश गंगान्ना यांनी केलेल्या नाव परिवर्तनाबाबत एकूण चार मुद्दयाव्दारे काही माहिती मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक ११-१२-००७ रोजीच्या पत्रान्वये प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये ८० इतके भरुन घेऊन अपिलार्थीस काही माहिती दिली. तथापि प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०२-२००८ रोजी प्रथम अपील केले. अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक १९-०३-२००८ रोजी आदेश पारीत करुन अपिलार्थीचे अपील मान्य करुन अपिलार्थीस सात दिवसाच्या आत विनामूल्य माहिती देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित केले. यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी, जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी व जन अपिलीय अधिकारी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी त्यांना जन माहिती अधिकारी यांच्याकडून अपूर्ण माहिती मिळाल्याचे व तसेच जन अपिलीय अधिकारी हे जाणुन बुजून माहिती देत नसल्याचे आयोगास अवगत केले आहे.

जन माहिती अधिकारी यांनी या प्रकरणाशी संबंधित काही माहिती अपिलार्थीस पुरविल्याचे स्पष्ट केले.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे एकूण चार मुद्दयाव्दारे माहिती मागितली असता अपिलार्थीस त्यांच्या अर्जातील मुद्दा क्रमांक २ व ३ शी संबंधित माहिती जन माहिती अधिकारी यांनी सशुल्क पुरविली आहे. मात्र मुद्दा

क्रमांक १ व ४ ची माहिती ते अपिलार्थीस पुरवू शकले नाहीत. या मुद्दयावरील माहिती पुरविण्याचे जन अपिलीय अधिकारी यांनी जन माहिती अधिकारी यांना सूचित केले होते. तथापि त्यांनी आजतागायत अपिलार्थीस ही माहिती दिली नसल्याचे अपिलार्थी यांच्या युक्तिवादावरुन स्पष्ट होते. अपिलार्थीच्या युक्तिवादाचे खंडन जन माहिती अधिकारी हे करु शकले नाहीत. त्यामुळे अपिलार्थीस सध्या तरी जन माहिती अधिकारी यांच्याकडून मुद्दा क्रमांक १ व ४ शी संबंधित माहिती मिळाली नसल्याचे स्पष्ट होते. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी त्यांनी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ व ४ शी संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

जन अपिलीय अधिकारी यांनी निर्णय देऊनही जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस विहित मुदतीत माहिती न पुरवून स्पष्ट केलेल्या त्यांच्या कार्यशैलीतील कर्तव्यपरायणतेच्या अभावाबद्दल त्यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना करण्यात येत आहे.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे.

## <u>आदेश</u>

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली मुद्दा क्रमांक १ व ४ ची संबंधित संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच तीस दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

३. संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांना, संबंधीत जन माहिती अधिकारी यांच्यावर प्रचलीत सेवानियमाप्रमाणे यथायोग्य शिस्तभंगविषयक कारवाई करण्याची शिफारस करण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. गोपाळरेड्डी कोनरेड्डी कोटावाड, मु. बाळापूर, कुंभारगल्ली जवळ, पो. तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मुख्याधिकारी, नगर परिषद कार्यालय, धर्माबाद, तालुका धर्माबाद, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा उप आयुक्त (सा.प्र.), विभागीय आयुक्त कार्यालय, औरंगाबाद यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ संचालक, नगरपालिका प्रशासन संचालनालय, महाराष्ट्र राज्य, शासकीय परिवहन सेवा इमारत, ३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, सी-फेस, वरळी, मुंबई - ३०

५ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११२७/०८ व ११२८/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११२७ व ११२८

निर्णय दिनांक १७-०८-२००९

१ श्री. शेख निसार शेख मतलुब, : अपिलार्थी
मु. पो. तामसा, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक ११२७/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, माहूर,
तालुका माहूर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक (जंकास), किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक ११२८/०८

१ जन माहिती अधिकारी
तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, भोकर,
तालुका भोकर, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक १६-०६-२००८ रोजी नोंदविलेली क्रमांक ११२७/२००८ व ११२८/२००८ ही दोन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या दोनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने आपल्या मूळ माहितीची मागणी कायम ठेवल्याचे दिसून येते.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपील क्रमांक ११२७/२००८ च्या संदर्भात अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २४-१२-२००७ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या कार्यालयाशी संबंधित सन २००५ ते २००७ या कालावधीतील त्यांच्या माहूर रेंजमधील त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व राऊंड मधील एलबीएस व सीसीटी व शासनाच्या विविध योजनामध्ये झालेल्या व वन विभागाने केलेल्या सर्व कामांची संपूर्ण माहिती अशा प्रकारची माहिती मागितली होती. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने दिनांक १४-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. त्यावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ११-०३-२००८ रोजी आपले आदेश पारीत करुन अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांच्याकडून विनामूल्य माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले.

अपिलार्थीच्या अपील क्रमांक ११२८/२००८ च्या संदर्भात अपिलार्थीने अशा प्रकारच्या माहितीची जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्याकडील दिनांक १३-१२-२००७ रोजीच्या प्रथम अर्जाव्दारे मागणी केली आहे. अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक २६-१२-२००७ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस माहिती देण्यासाठी त्यांच्याकडे पुरेसे अनुदान उपलब्ध नसल्याचे कळविले. जन माहिती अधिकारी यांच्या या प्रतिसादाने समाधान न झाल्याने अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार दिनांक ०७-०२-२००८ रोजी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे प्रथम अपील केले. या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ०५-०३-२००८ रोजी सुनावणी घेऊन त्याच दिवशी आपले निर्णय पारीत करुन अपिलार्थीस अनुदान प्राप्त होताच विनामूल्य माहिती पुरविण्याचे जन माहिती अधिकारी यांना सूचित केले.

तथापि यानंतरही संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडून माहिती प्राप्त न झाल्याने अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ११२७/०८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. अपील क्रमांक ११२८/०८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर आहेत. या दोनही अपील प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी हजर आहेत.

आज रोजी सुनावणीच्या वेळी अपिलार्थी यांनी अद्यापपावेतो जन माहिती अधिकारी यांच्याकडून त्यांना माहिती उपलब्ध झाली नसल्याचे आयोगास अवगत केले.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती त्यांच्याकडे उपलब्ध असून ते ती अपिलार्थीस विनामूल्य देण्यास तयार आहेत. तथापि अनुदानाच्या अनुपलब्धतेमुळे ते ही माहिती अपिलार्थीस देऊ शकत नाहीत.

वरील घटनाक्रम, दोन्ही बाजूंनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता या प्रकरणी असे आढळून येते की, अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे त्यांच्या भोकर रेंजसंदर्भातील त्यांच्या कार्यक्षेत्रातील सर्व राऊंड मधील एलबीएस व सीसीटी व शासनाच्या विविध योजनामध्ये झालेल्या व वन विभागाने केलेल्या कामाची माहिती "सर्व कामांची संपूर्ण माहिती" अशा प्रकारे मोघम स्वरुपात मागविली होती. अपिलार्थीस "सर्व कामांची संपूर्ण माहिती" म्हणजे नेमकी जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणती माहिती अपेक्षित आहे याचा बोध अपिलार्थीच्या माहितीसाठीच्या प्रथम अर्जावरुन होत नाही. तसेच अपिलार्थीस माहिती देण्यासाठी संबंधित जन माहिती अधिकारी यांनी या घटनाक्रमाच्या कोणत्याही टप्प्यावर कार्यवाही केली नाही. अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती ते अपिलार्थीस पाहाण्यासाठी, तपासण्यासाठी विनामूल्य उपलब्ध करुन देण्यास तयार आहेत हे पाहता अपिलार्थीस आवश्यक असलेली माहिती त्यांनी जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात जाऊन ती व्यक्तिशः

तपासणी करावी असे अपिलार्थीस सूचविण्यात येत आहे. या दोनही प्रकरणी अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्याकडे कोणत्याही विशिष्ट अशा स्वरुपाच्या माहितीची मागणी त्यांच्याकडे केली नसल्याने अपिलार्थीचे दोनही माहितीसाठीचे मूळ अर्ज अवैध ठरत आहेत, त्यामुळे अपिलार्थीस दोनही जन माहिती अधिकारी यांच्याकडून कोणतीही माहिती, माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार देय होत नाही. सबब अपिलार्थीची विचाराधीन दोनही अपिले फेटाळण्यायोग्य असल्याच्या निष्कर्षाप्रत येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

<u>**आदेश**</u>

१. अपील क्रमांक ११२७/०८ फेटाळण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ११२८/०८ फेटाळण्यात येत आहे.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. शेख निसार शेख मतलुब, मु. पो. तामसा, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (जंकास), किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा वन परिक्षेत्र अधिकारी, वन परिक्षेत्र कार्यालय, भोकर, तालुका भोकर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा सहायक वनसंरक्षक (रोहयो), नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेली अपिले क्रमांक ११२९/२००८, ११३०/०८ व ११३१/२००८**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११२९, ११३० व ११३१

निर्णय दिनांक १७-०८-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

अपील क्रमांक ११२९/०८

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली,
तालुका बिलोली, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक ११३०/०८

१ जन माहिती अधिकारी,
तालुका कृषि अधिकारी कार्यालय, किनवट,
तालुका किनवट, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट,

तालुका किनवट, जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, किनवट, जिल्हा नांदेड

अपील क्रमांक ११३१/०८

१ जन माहिती अधिकारी,

तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगांव,

तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी

तथा तालुका कृषि अधिकारी, हदगांव,

तालुका हदगांव, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेली क्रमांक ११२९/२००८, ११३० व ११३१/२००८ ही तीन स्वतंत्र व्दितीय अपिले आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहेत.

या तीनही अपील अर्जांमध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, माहिती अधिकार अधिनियम २००५ च्या तरतुदीनुसार त्यांनी संबंधित जन माहिती अधिकारी यांच्याकडे माहितीसाठी-चे अर्ज पाठवूनही त्यांना मुदतीत माहिती प्राप्त न झाल्याने त्यांनी तालुका कृषि अधिकारी, यांच्या-कडे दिनांक २४-०३-२००८ रोजी अपील क्रमांक ११२९/०८ च्या संदर्भात, दिनांक २२-०४-२००८ रोजी अपील क्रमांक ११३०/०८ च्या संदर्भात व दिनांक १८-०४-२००८ रोजी अपील क्रमांक ११३१/०८ च्या संदर्भात प्रथम अपिले केली. तथापि या अपील अर्जांवर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता प्रकरण प्रलंबीत ठेवल्यामुळे त्यांनी विचाराधीन अपिले आयोगाकडे सादर केली आहेत.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, अपिलार्थीने या प्रकरणी जन माहिती अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी,कार्यालय बिलोली,

किनवट व हदगांव यांच्याकडून त्यांच्या दिनांक २२-०२-२००८, दिनांक ०३-०३-२००८ व दिनांक ०३-०३-२००८ रोजीच्या अर्जाद्वारे त्यांच्या कार्यक्षेत्राशी संबंधित आर्थिक वर्ष २००३ ते दि. ३१-०१-२००८ या कालावधीमधील काही माहिती नोंदणीकृत टपालाव्दारे मागितली होती.

तथापि अपिलार्थीच्या या अर्जांना संबंधित जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत कोणताही प्रतिसाद दिला नाही, त्यामुळे अपिलार्थीने अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे अपील क्रमांक ११२९/०८ च्या संदर्भात दिनांक २४-०३-२००८, अपील क्रमांक ११३०/०८ च्या संदर्भात दिनांक २२-०४-२००८ रोजी व अपील क्रमांक ११३१/०८ च्या संदर्भात दिनांक १८-०४-२००८ रोजी प्रथम अपिले केली. तथापि या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी कोणतीही सुनावणी न घेता अपिलार्थीची तीनही प्रथम अपिले प्रलंबीत ठेवल्याने व्यथित होऊन अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर केली आहेत.

वरील प्रकरणांची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली. सुनावणीच्या वेळी अपील क्रमांक ११३०/०८ शी संबंधित जन माहिती अधिकारी हजर व जन अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. अपील क्रमांक ११२९/०८ व ११३१/०८ शी संबंधित जन माहिती व अपिलीय अधिकारी गैरहजर आहेत. या तीनही अपील प्रकरणाशी संबंधित अपिलार्थी गैरहजर आहेत.

अपिलार्थीने मागणी केलेल्या माहितीची व्याप्ती व स्वरुप पाहता उपरोक्त प्रकरणी जन अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थीच्या प्रथम अपील अर्जांवर या टप्प्यावर सुनावणी घेऊन आपले आदेश निर्गमित करणे आयोगास गरजेचे वाटते.

सबब, संबंधित जन अपिलीय अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त तीनही प्रकरणी त्यांनी अपिलार्थीच्या दिनांक २४-०३-२००८, दिनांक २२-०४-२००८ व दिनांक १८-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

जन अपिलीय अधिकारी यांचे निर्णय अपिलार्थीस मान्य न झाल्यास, ते माहिती अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) च्या तरतुदीनुसार, सदर निर्णय त्यांना प्राप्त झाल्यापासून ९० दिवसाच्या आत राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपिले सादर करु शकतील.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीची राज्य माहिती आयोगाकडे केलेली तीनही व्दितीय अपिले निकाली काढण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

**आदेश**

१. अपील क्रमांक ११२९/०८ निकाली काढण्यात येत आहे.

२. अपील क्रमांक ११३०/०८ निकाली काढण्यात येत आहे.

३. अपील क्रमांक ११३१/०८ निकाली काढण्यात येत आहे.

४. जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली, किनवट व हदगांव यांनी अपिलार्थीच्या अनुक्रमे दिनांक २४-०३-२००८, २२-०४-२००८ व दिनांक १८-०४-२००८ रोजीच्या प्रथम अपील अर्जावर, झालेला व संभाव्य विलंब क्षमापित करुन, हे आदेश निर्गमीत होताच तीस दिवसांच्या आत सुनावणी घेऊन आपले निर्णय पारित करावेत.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, बिलोली, तालुका बिलोली, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

५ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, किनवट, तालुका किनवट, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

६ जन माहिती अधिकारी, तालुका कृषि अधिकारी कार्यालय, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

७ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, हदगांव, तालुका हदगांव, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

८ निर्णय नस्ती.

**राज्य माहिती आयोग, खंडपीठ औरंगाबाद यांचे समोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील**

अपील क्रमांक २००८/रामाआ/अपील/सिआर/११३२

निर्णय दिनांक १७-०८-२००९

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, : अपिलार्थी
मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त,
मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड

**विरुध्द**

१ जन माहिती अधिकारी
तथा तालुका कृषि कार्यालय, माहूर, तालुका माहूर,
जिल्हा नांदेड

२ जन अपिलीय अधिकारी : प्रतिवादी
तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर,
जिल्हा नांदेड

प्रत्यक्षतः जन माहिती अधिकारी : मंडळ कृषि अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड

**निर्णय**

उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे दिनांक २४-०६-२००८ रोजी नोंदविलेले व्दितीय अपील आज रोजी आयोगाच्या विचाराधीन आहे.

या अपील अर्जामध्ये अपिलार्थीने असे नमूद केले आहे की, त्यांनी माहिती अधिकार अधिनियमातील तरतुदीनुसार जन माहिती अधिकारी यांच्याकडे दिनांक २२-०२-२००८ रोजी पोस्टाव्दारे माहिती मागविली असता त्यांना विहित मुदतीत माहिती न मिळाल्याने त्यांनी जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले. तथापि जन

अपिलीय  अधिकारी यांनी या प्रकरणी त्यांच्या प्रथम अपील अर्जावर कोणताही निर्णय न देऊन प्रकरण प्रलंबीत ठेवल्याने त्यांनी विचाराधीन अपील आयोगाकडे दाखल केले आहे.

आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेल्या कागदपत्रांवरुन असे आढळून येते की, या प्रकरणी अपिलार्थीने प्रथमतः त्यांच्या दिनांक २२-०२-२००८ रोजीच्या मूळ अर्जाव्दारे जन माहिती अधिकारी यांच्याकडे आर्थिक वर्षे २००३ ते ३१ जानेवारी २००८ पर्यंतच्या कालावधीतील त्यांच्या कार्यालयातील रोजगार हमी योजना व इतर योजनाच्या संदर्भात काही माहिती तपशीलवार मागितली होती.

अपिलार्थीच्या या अर्जास जन माहिती अधिकारी यांनी अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत दिनांक १९-०३-२००८ रोजी प्रथम प्रतिसाद देऊन अपिलार्थीस आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क रुपये १६००० इतके त्यांच्या कार्यालयात भरण्याचे सूचित केले.  तथापि या शुल्काचा भरणा अपिलार्थीने जन माहिती अधिकारी यांच्या कार्यालयात न करता अधिनियमातील कलम १९ (१) च्या तरतुदीनुसार जन अपिलीय अधिकारी यांच्याकडे दिनांक १५-०४-२००८ रोजी प्रथम अपील केले.  अपिलार्थीच्या या अपील अर्जावर जन अपिलीय अधिकारी यांनी दिनांक ३१-०४-२००८ रोजीच्या त्यांच्या पत्राव्दारे अपिलार्थीस निर्णय कळविला. जन अपिलीय  अधिकारी यांनी  अपिलार्थी  सुनावणीसाठी सूचित करुनही उपस्थित न राहिल्याने त्यांचे प्रकरण  नस्तीबंद करण्यात येत असल्याचे त्यांना कळविले व सशुल्क माहिती प्राप्त करुन घेण्याचे सूचित केले. अपिलार्थीच्या प्रथम अपिलावरील सदर निर्णय अपिलार्थीस प्राप्त झाला किंवा नाही हे आयोगास कळण्यास मार्ग नाही.  तथापि यानंतर अपिलार्थीने वरील परिच्छेदात नमूद केल्याप्रमाणे राज्य माहिती आयोगाकडे व्दितीय अपील सादर केले आहे.

वरील प्रकरणाची सुनावणी आज दिनांक १७-०८-२००९ रोजी औरंगाबाद येथे घेण्यात आली.  सुनावणीच्या वेळी जन माहिती व अपिलीय अधिकारी हजर व अपिलार्थी गैरहजर आहेत.

जन माहिती अधिकारी यांनी असा युक्तिवाद केला की, अपिलार्थीने मागणी केलेली माहिती ते अपिलार्थीस आवश्यक त्या शुल्काचा त्यांच्याकडे भरणा न केल्याने पुरवू शकले नाहीत.

वरील घटनाक्रम, जन माहिती अधिकारी यांनी केलेला युक्तिवाद व आयोगास उपलब्ध करुन देण्यात आलेली कागदपत्रे पाहता असे आढळून येते की, अपिलार्थीच्या दिनांक २२-०२-२००८ रोजी मूळ अर्जास जन माहिती अधिकारी यांनी दिनांक १९-०३-२००८ रोजी म्हणजे अधिनियमाव्दारे विहित केलेल्या मुदतीत प्रतिसाद दिला असला तरी या पत्रामध्ये अपिलार्थीस जन माहिती अधिकारी यांनी त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीच्या शुल्काचा तपशील, जो जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थीस कळविणे अधिनियमातील कलम ७ (३) (क) प्रमाणे आवश्यक आहे, तो दिलेला नाही. या प्रकरणी त्यांनी अपिलार्थीस त्यांना आवश्यक असलेल्या माहितीपोटीचे शुल्क कशा प्रकारे व कोठे भरावयाचे आणि अपिलार्थीस देण्यात येणा-या माहितीपोटीच्या संभावित पृष्ठांची संख्या याचा देखील उल्लेख नाही या कारणास्तव जन माहिती अधिकारी यांचे दिनांक १९-०३-२००८ रोजीचे सदर पत्र अवैध ठरत आहे. सबब जन माहिती अधिकारी यांना असे आदेशित करण्यात येते की, उपरोक्त प्रकरणी अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

वरील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर अपिलार्थीचे राज्य माहिती आयोगाकडे केलेले व्दितीय अपील मान्य करण्यात येऊन खालीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहेत.

## आदेश

१. अपील मान्य करण्यात येत आहे.

२. जन माहिती अधिकारी यांनी, अपिलार्थीने त्यांच्या मूळ अर्जाव्दारे मागणी केलेली संपूर्ण माहिती त्यांना, हे आदेश निर्गमित होताच १५ दिवसाच्या आत विनामूल्य पुरवावी.

**औरंगाबाद** **( वि. बा. बोरगे )**

**दिनांक १७-०८-२००९** **राज्य माहिती आयुक्त**

**खंडपीठ औरंगाबाद**

प्रत,

१ श्री. मुदखेडकर महंमद एकबाल महंमद युसूफ, मुख्य संपादक, सा. सत्यवृत्त, मिल कॉर्नर, बसस्टॅण्ड रोड, नांदेड.

२ जन माहिती अधिकारी तथा मंडळ कृषि अधिकारी, माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

३ जन अपिलीय अधिकारी तथा तालुका कृषि अधिकारी, माहूर, तालुका माहूर, जिल्हा नांदेड यांना या निकालपत्रातील नोंदीसंदर्भात पुढील कार्यवाहीसाठी.

४ निर्णय नस्ती.